विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक

संशोधनमुक्तावलि

[सर तिसरा]

प्रस्तुत संग्रहांतील लेखांवरून ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंतच्या जवळ जवळ हजार वर्षांच्या काळांतील महाराष्ट्र, कोंकण व मध्यप्रदेश या प्रदेशांच्या प्राचीन इतिहासावर, तसेंच कालिदास व भवभूति या कविश्रेष्ठांच्या स्थलकालचरित्रविषयक अनेक समस्यांवर महत्त्वाचा प्रकाश पडलेला आढळेल.

"भारताच्या विशेषतः महाराष्ट्राच्या इतिहाससामग्रीचें अध्ययन वाढत आहे, व त्यांत अधिकाधिक भर पडत आहे. त्यांत म. म. मिराशी यांची संशोधनमुक्तावलि अपूर्व शोभेने चमकत राहील यांत शंका नाही."

तर्कतीर्थ, **लक्ष्मणशास्त्री जोशी**

लेखक

वा. वि. मिराशी

किंमत चार रुपये

विदर्भ संशोधन मंडळ ग्रंथमाला, क्रमांक १०

संशोधनमुक्तावलि

सर तिसरा

लेखक
महामहोपाध्याय वासुदेव विष्णु मिराशी, एम्. ए.
माजी प्राचार्य, मॉरिस कॉलेज, नागपूर आणि
विदर्भ महाविद्यालय, अमरावती;
संस्कृत, पालि व प्राकृत आणि प्राचीन भारतीय इतिहास
व संस्कृति या विभागांचे अध्यक्ष,
नागपूर विश्वविद्यालय.

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

प्रथमावृत्ति] किंमत चार रुपये [१९५८

प्रकाशक :
देवीदास गोविंद लांडगे, बी. ए. एल्‌एल्‌. बी.
चिटणीस, विदर्भ संशोधन मंडळ,
नागपूर.

(सर्व हक्क लेखकाच्या स्वाधीन)

मुद्रक :
पां. ना. बनहट्टी, बी. एस्‌सी.
नारायण मुद्रणालय, धनतोली,
नागपूर.

ई/230

कै. गुरुवर्य प्रा. गोपाळ केशव गर्दे, एम्. ए.,
वेदान्तशास्त्री व शास्त्रचिन्तामणि,

यांच्या

पूज्य स्मृतीस

सादर सपर्पण

अनुक्रमणिका

डॉ. सर भवानीशंकर नियोगी यांचा पुरस्कार (७)

लेखकाचें हृद्‌गत (१२)

संशोधनपर लेख १-२२४

संस्कृत वाङ्मय

१ कालिदासाचा काळ १

२ भवभूतीचें जीवनचरित १०

३ भवभूति आणि उम्बेक ४३

प्राचीन भारतीय इतिहास

४ प्राचीन विदर्भ ६२

५ दक्षिण कोसलची प्राचीन राजधानी ७७

६ महाराष्ट्रांतील प्राचीन शक राजवंश ८४

७ मानपुरचे राष्ट्रकूट ९५

८ हूणविजेता यशोधर्मन्–विष्णुवर्धन १०३

९ 'पृथ्वीराजविजयां'तील कलचुरिविषयक उल्लेख ११८

प्राचीन भारतीय कोरीव लेख

१० सेंद्रक नृपति जयशक्ति याचा मुंदखेडे ताम्रपट १३१

११ राष्ट्रकूट नृपति दन्तिदुर्गाचा मानोर ताम्रपट १४२

१२ राष्टकूटांचा अरब मांडलिक सुगतिप याचा चिंचणी ताम्रपट १४९

१३ परमार नृपति जगद्देव याचा डोंगरगाव शिलालेख १७१

१४ यादव नृपति रामचंद्राचा रामटेक शिलालेख १८४

प्राचीन भारतीय नाणीं

१५ चंदेल्लनृपति वीरवर्मन् याचें सोन्याचें नाणें २०१
१६ विजयनगरच्या कृष्णरायाचें तांब्याचें नाणें २०६
१७ गोंड राजांचीं नाणीं २०९

परिशिष्ट

प्रा. वा. वि. मिराशी यांच्या संशोधनपर लेखांची यादी
इंग्रजी लेख २१५
मराठी लेख २१६
सूची २१७

सूचना--

तिसऱ्या विभागांतील पृष्ठें १३१-२०० यांवर दिलेल्या कोरीव लेखांचें वाचन करतांना खालील संकेत ध्यानांत ठेवावे—

(१) चौकोनी [ ] कंसांतील अक्षरें अस्पष्ट आहेत असें समजावें.

(२) चौकोनी कंसांतील अक्षरें तारकांकित [*] केलीं असल्यास तीं मुळांत नाहीत किंवा नष्ट झालीं आहेत व म्हणून संपादकाने सुचविलीं आहेत, असें समजावें.

(३) वाटोळया ( ) कंसांतील अक्षरें मूळच्या अशुद्ध अक्षरांच्या जागीं शुद्ध म्हणून सुचविलीं आहेत, असें समजावें.

पुरस्कार

विदर्भ संशोधन मंडळाने गतवर्षी महामहोपाध्याय वा. वि. मिराशी यांच्या 'संशोधनमुक्तावली'चा दुसरा सर प्रसिद्ध केला. आता त्या ग्रंथावलीचा तिसरा सर प्रकाशित होत आहे. या 'सरां'च्या प्रकाशनाचें श्रेय ज्या मुंबई शासनाने त्यांच्याकरितां द्रव्यसाहाय्य केलें आणि ज्या सुबुद्ध व चिकित्सक वाचकांनी त्यांचें आदराने स्वागत केलें त्यांच्याकडे आहे.

या चतुरंग सरांत संस्कृत वाङ्मय, प्राचीन भारतीय इतिहास, प्राचीन भारतीय कोरीव लेख आणि प्राचीन भारतीय नाणीं या विषयांचा समावेश झाला आहे. मुक्तावलीच्या तीन सरांत संकलित केलेल्या लेखांशिवाय म. म. मिराशी यांचे इंग्रजी भाषेंत लिहिलेले लेख जवळ जवळ पावणे दोनशें आहेत हें या ग्रंथाच्या परिशिष्टावरून दिसून येतें. त्यावरून त्यांच्या कार्याचा विस्तार किती आहे याची स्पष्ट कल्पना होते.

या 'सरां'तील समग्र लेखसंग्रह वाचकांना मननीय असा वाटेलच. ते त्यांतील मर्म जाणण्याचा प्रयत्न करतील यांत शंका नाही. मला विशेषतः दोन मुद्द्यांकडे वाचकांचें लक्ष आकर्षित करावें असें वाटतें. सहाव्या लेखांतील 'हिंदु संस्कृतीने शकांना आत्मसात् केलें' (पृ. ९१) यानंतर जो मजकूर आहे तो सांप्रतच्या घटनेवर प्रकाश पाडणारा आहे. ज्या परकी आक्रमक जमातींनी चातुर्वर्ण्याचा सिद्धांत स्वीकारला त्यांना हिंदु समाजांत स्थान मिळालें. प्रस्तुत ग्रंथाचे विद्वान् लेखक मनुस्मृति व महाभारत यांतील अवतरणें देऊन या विषयावर आपले विचार व्यक्त करतात ते असे—

'याप्रमाणे हिंदु धर्माने शकयवनादि अनार्य लोकांना, ते म्लेच्छ म्हणून दूर न सारतां, समाजांत योग्य स्थान देऊन व वैदिक कर्मांचा अधिकार देऊन त्यांचा आपणांत समावेश करून घेतला. पण कालांतराने या उदार वृत्तीचा लोप झाला. जो जन्माने हिंदु तोच हिंदु असें मानण्यांत आलें. तेव्हा ज्या शक, यवन, गुर्जर, हूण आदि लोकांना

पूर्वी हिंदु धर्मांत स्थान मिळालें होतें, त्यांना आपल्या परकी जातीचा उल्लेख करणें अपमानास्पद वाटूं लागलें.' गुर्जर वंशांतील द्वितीय दद्दाचा उल्लेख करून लेखक म्हणतात, 'त्याच्या वंशजांच्या लेखांत गुर्जर वंशाचा उल्लेख गाळून तो वंश महाभारतांतील कर्णापासून निघाला असें म्हटलें आहे...इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत ही संकुचित वृत्ति नव्हती.' (पृ. ९३-९४).

एका विचारवंताने 'A historian is a prophet who looks backward' अशा शब्दांत वर्णन केलें आहे. इतिहासकार हा अतीत व अनागत काल यांना जोडणारा 'चिरंतन प्रस्तुत' (eternal present) सारखा सांधा आहे. 'The present is ever a mystery to us until it is irradiated by some knowledge of the past. Without a knowledge of the effects of institutions on human well-being, we cannot wisely guide the future. It is equally clear that without such knowledge, we cannot understand the present.' (Crozier-Civilization and Progress, pp. 20, 23.) या उक्तीप्रमाणें कट्टर वर्ण-व्यवस्थेचे जे दुष्परिणाम आज आपण पाहतों त्यांचें निराकरण करून भावी कालांत समाजरचना कोणत्या तत्त्वावर करावी या समस्येवर गतकाल कसा मार्गदर्शक होतो हें ग्रंथकारांनी स्पष्ट केलें आहे. या लेखाने त्यांनी संशोधनाचें एक विशाल दालन खुलें केलें आहे.

ईसाई व इस्लाम धर्मांने पुरस्कृत केलेल्या साकार एकेश्वरीवादांतून (Monotheism मधून) जी धर्मांधता (Fanaticism) प्रकट झाली तिची धग इस्लामद्वारें भारताला लागण्यापूर्वी वैदिक पुरुषसूक्तांतर्गत चातुर्वर्णिक समाजामध्ये प्रवेश करण्याचा मार्ग बौद्ध, शैव व वैष्णव या पंथांनी काढला हें कनिष्क, मिहिरकुल व हेलियोडोरस यांच्या उदाहरणांवरून दिसतें. त्या काळीं भारत हा जगाच्या गुरुस्थानीं होता. पश्चिमेकडे बुद्धधर्म-प्रसाराचा प्रयत्न अशोकाने खिस्तपूर्व २५० वर्षांपूर्वी केला, हें त्याच्या

तेराव्या शिलालेखावरून दिसतें. क्लेमंट ऑफ अलेक्झांड्रिया याने इ. स. च्या पहिल्या शतकांत लिहिलेल्या ग्रंथांत त्याला पुष्टि मिळते. 'The Magis of the Persians, who foretold the Savior's birth, came into the land of Judea, guided by the Star. The Indian Gymnosophists are also in the number and other barbarian philosophers, some of them called Sramane and others Brahmins.....Some too of the Indians obey the precepts of Buddha, whom, on account of his extraordinary sanctity, they have raised to divine honours.' (Ante-Nicean Christian Literature, Vol- IV, p. 308, quoted at p. 85 in Jainism, Christianity and Science). ब्राह्मणहि भागवत धर्माचे प्रचारक होते असें दिसतें. इ. बी. हॅवेल म्हणतो—'Recent archaeological research has discovered evidence of the presence of Aśoka's missionaries in Egypt, and....it is more than justifiable to conclude that the Buddhist missions established by Aśoka prepared the soil from which both Christianity and Islam afterwards sprang.' (Aryan Rule in India, p. 100)

खिस्तपूर्व २५० वर्षांपूर्वी सोळा धर्मप्रसारक वायव्य चीनमध्ये होते. पुढे इ. स. ७० मध्ये सम्राट् मिंगटी याच्या निमंत्रणावरून ते चीन देशांत गेले. (Williams-China, Yesterday and Today, p. 295.)

भारतांतील भौतिक संपत्ति व ज्ञानभांडार जगतांत कसें पसरलें याचा उल्लेख करून जगद्विख्यात तत्त्वज्ञ हेगेल असें म्हणतो—'India as a land of Desire forms an essential element in

General History.' (Philosophy of History, revised ed., p. 142.) सर चार्लस इलियट या भारताच्या ज्ञानप्रसाराचें वर्णन 'the intellectual conquest of the world' अशा शब्दांत करतो. याच कारणाने एच्. जी. वेल्स् आपल्या Short History of the World मध्ये बुद्ध व अशोक यांना मानाचें स्थान देतो. या वरील अवतरणांवरून 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' (ऋग्वेद, ९, ६३, ५) हा संकल्प कोणी तडीस नेला हें स्पष्ट होतें.

भारताच्या उत्कर्षकालीं मनुस्मृति व महाभारत यांतील अवतरणांत (पृ. ९२-९३) जी उदारबुद्धि दिसते तिच्या प्रभावाने 'क्रियालोपात्' सारख्या कायदेपंडितांना परिचित असलेल्या legal fictions चा आधार घेतला जात असे. पण पुढे ज्या लोकांना वर्णाश्रमव्यवस्था मान्य नव्हती त्यांना 'नास्तिक' ठरवून हिंदुधर्माच्या बाहेर घालविण्यांत आलें. याचा दाखला पूज्यपाद शंकराचार्यांच्या पुढील वचनांत सापडतो—'यो नास्ति ब्रह्मेति मन्यते स सर्वथैव सन्मार्गस्य वर्णाश्रमव्यवस्थादिलक्षणस्याश्रद्धानतया नास्तित्वं प्रतिपद्यते...अतो नास्तिकः' आपल्या पडत्या काळांत कदाचित् हें योग्य असेल, पण आता भारताच्या संविधानांतून व हिंदु कायद्यांतून वर्णव्यवस्थेचें उच्चाटन झालें आहे व राज्य लौकिक झालें आहे. गतकालीं आपद्धर्म म्हणून जी संकुचित वृत्ति निर्माण झाली तिचा त्याग केला म्हणजे ज्या 'उदारवृत्तीचा लोप झाला' असा म. म. मिराशी म्हणतात ती वृत्ति पुनरपि जागृत होऊन 'भारतीय' (केवळ हिंदु नव्हे) संस्कृति, समाज व राष्ट्र यांच्या पुनर्निर्माणाला (renaissance याला) पोषक होईल.

दुसरा मुद्दा असा की आपल्या आत्मविस्मृतीमुळे आपल्या हातून ऐतिहासिक सामग्रीची कशी नासाडी झाली याचें एक उदाहरण या ग्रंथाच्या १०४ पानावर आहे. अशीं उदाहरणें अनेक सापडतात. सांप्रदायिक वेडाला बळी पडून नेपाळचे राजमंत्री राणा जंग बहादूर यांनी एका बौद्ध विहारांतील ग्रंथसंग्रह सडकेवर फेकून दिला होता. तो रेसिडेन्सीमधील डॉ. राइटने हस्तगत करून केंब्रिज युनिव्हर्सिटीला देऊन टाकला. म. म.

मिराशी यांच्या सारखे प्रशिक्षित संशोधक तयार करण्याचें कार्य प्रथमतः विश्वविद्यालयाकडे आहे. नागपूर विद्यापीठाने 'प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति' या विषयाच्या स्नातकोत्तर (post-graduate) अध्ययनाची योजना करून म. म. मिराशी यांना प्राध्यापक नेमलें ही गोष्ट फार आनंददायक आहे. त्यांची धुरा खांद्यावर घेण्यालायक चिकित्सक व अभ्यासू संशोधक निर्माण होतील अशी आशा आहे. ऐतिहासिक संशोधनहें राष्ट्रसेवेचें महत्त्वाचें अंग आहे असें जाणून सुविद्य वाचकवर्ग संशोधन-मुक्तावलीच्या तिसऱ्या सराचें मनःपूर्वक स्वागत करील अशी मला आशा आहे.

भवानीशंकर नियोगी
अध्यक्ष, विदर्भ संशोधन मंडळ.

लेखकाचें हृद्गत

गतवर्षी विदर्भ संशोधन मंडळाने माझ्या संशोधनपर लेखांचा आणखी एक संग्रह 'संशोधनमुक्तावलि : सर दुसरा' या नांवानें प्रकाशित केला. त्याचेंहि विद्वानांकडून पहिल्या सर्गाप्रमाणेंच सहर्ष स्वागत झालें. अनेक परीक्षणकारांनी त्यांतील लेखांची प्रशंसा केली आणि असेच आणखी 'सर' प्रकाशित करावे अशी उत्कट इच्छा प्रदर्शित केली. तदनुसार विदर्भ संशोधन मंडळ या ग्रंथाचें प्रकाशन करीत आहे.

प्रस्तुत ग्रंथांत एकंदर सतरा लेख आहेत, पहिल्या लेखांत कविकुलगुरु कालिदास याच्या गुप्तकालीनत्वावर घेतलेल्या कांही आक्षेपांचें साधार खंडन केलें आहे. त्यापुढील दोन लेख भवभूतिविषयक आहेत. दुसऱ्या लेखांत त्या सुविख्यात संस्कृत कवीचें स्थल, काल व चरित्र याविषयी सर्व उपलब्ध माहिती एकत्र दिली आहे. भवभूति आणि उम्बेक हे एकच होत असें अनेक विद्वानांनी प्रतिपादिलें आहे. त्यांच्या मताचें सविस्तर परीक्षण करून ते भिन्न कालीं व स्थलीं होऊन गेले हें तिसऱ्या लेखांत सप्रमाण दाखविलें आहे. यानंतरचे सहा लेख प्राचीन भारतीय इतिहासासंबंधी आहेत. त्यांत विदर्भ, दक्षिण कोसल (छत्तीसगड), पश्चिम व दक्षिण महाराष्ट्र, माळवा आणि मध्यप्रदेश यांच्या प्राचीन इतिहासावर नवीन प्रकाश टाकलेला आढळेल. विशेषतः शक व पूर्व राष्ट्रकूट या राजवंशाविषयीं तसेंच हूणांच्या मगरमिठींतून भारताला मुक्त करणाऱ्या औलिकरवंशी यशोधर्मन्-विष्णुवर्धनाविषयी अत्यंत महत्त्वाची व नवी माहिती या लेखांत दिली आहे. त्यापुढचे पांच लेख सेंद्रक, राष्ट्रकूट, ताजिक (अरब), परमार आणि यादव या राजवंशांच्या कोरीव लेखांवर आहेत. त्यांतील प्रत्येकांत त्या त्या राजवंशाविषयी अन्यत्र अप्राप्य अशी महत्त्वाची व मनोरंजक माहिती आढळेल. अरब मांडलिक सुगतिप याच्या ताम्रपटावरील संस्कृत लेखांत कोंकणच्या प्राचीन इतिहासाविषयी अनेक प्रश्नांचा ऊहापोह केला आहे. डोंगरगावच्या

शिलालेखाने परमारांच्या इतिहासाविषयी अनेक गैरसमजुतींचा निरास झाला आहे. अलीकडे मुंबई राज्यशासन रामटेकास कालिदासाचें स्मारक उभारण्याचा विचार करीत आहे. अशा प्रसंगीं रामटेक येथील लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखाविषयी महाप्रयासाने जमविलेली माहिती उपयुक्त होईल अशी आशा आहे. रामटेक हेंच प्राचीन रामगिरि हें यापूर्वीच 'संशोधनमुक्तावली'च्या पहिल्या सरांतील एका लेखांत सप्रमाण सिद्ध केलें आहे. शेवटचे तीन लेख चंदेल्ल, विजयनगराधिपति व गोंड या राजवंशांच्या नाण्यांविषयीं आहेत. त्यांतील कांहीं नाणीं येथे प्रथमच मराठींत प्रसिद्ध होत आहेत.

याप्रमाणे प्रस्तुत संग्रहांतील लेखांवरून खिस्तोत्तर तिसऱ्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंतच्या जवळजवळ दीड हजार वर्षांच्या काळांतील महाराष्ट्र, कोकण व मध्यप्रदेश या प्रदेशांच्या प्राचीन इतिहासावर तसेंच कालिदास व भवभूति या कविश्रेष्ठांच्या स्थलकालचरित्रविषयक अनेक समस्यांवर महत्त्वाचा प्रकाश पडलेला आढळेल असा मला भरवसा आहे.

प्रस्तुत संग्रहांतील लेख भिन्न भिन्न प्रसंगीं लिहिले असल्यामुळे त्यांत कांही ठिकाणीं थोडी पुनरुक्ति झाली आहे. पण त्यांतील विवेचनाच्या पूर्तीकरिता ती आवश्यक होती. यांपैकी कांही लेख पंधरा वीस वर्षांपूर्वी लिहिले होते. त्यांतील माहिती आता अद्ययावत् आणली आहे आणि जरूर तेथे नवीन संदर्भ घातले आहेत. सारांश, प्रस्तुत पुस्तक सामान्य वाचकांस तसेंच अभ्यासकांसहि आकर्षक व उपयुक्त व्हावें असा प्रयत्न केला आहे.

या 'सरां'तील लेख ज्या नियतकालिकांत वा ग्रंथांत प्रसिद्ध झाले त्यांचा निर्देश त्या त्या लेखाच्या आरंभीं केला आहे. त्यांच्या संपादकांनी त्या लेखांच्या पुनर्मुद्रणास परवानगी दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें.

कै० प्राध्यापक गोपाळ केशव गर्दे यांचा व माझा परिचय सुमारें चाळीस वर्षांपूर्वी मी नागपुरास नोकरीनिमित्त आल्यावर लौकरच झाला. त्यांच्या जवळ मी पातंजल महाभाष्याच्या कांही भागांचें अध्ययन केलें.

त्यांची विद्वत्ता, विशुद्ध चारित्र्य, निरभिमानी वृत्ति, निरपेक्ष विद्यादान इत्यादि गुणांविषयी मला सदैव वाटत असलेला निःसीम आदर मी प्रस्तुत पुस्तक त्यांच्या पूज्य स्मृतीस सादर अर्पण करून व्यक्त करीत आहें.

मागीलप्रमाणे याहि 'सरा'चें प्रकाशन मुंबई शासनानें विदर्भ संशोधन मंडळास दिलेल्या अनुदानांतून होत आहे, याबद्दल मी त्या शासनाचा अत्यंत ऋणी आहे. तसेंच त्या मंडळाने प्रस्तुत पुस्तक प्रकाशनाकरितां स्वीकारलें आणि डॉ. सर भवानीशंकर नियोगी यांनी आपल्या मार्मिक पुरस्काराने त्यास भूषविलें, याबद्दल त्या दोघांचेहि मी हार्दिक आभार मानतों.

वा. वि. मिराशी

संशोधनमुक्तावलि

सर तिसरा

संशोधनमुक्तावलि

सर तिसरा

संस्कृत वाङ्मय

१. कालिदासाचा काळ*

श्री. अ. ज. करंदीकर यांनी अलीकडे कविकुलगुरु कालिदासाच्या काळाविषयी वाद उपस्थित केला आहे. त्यांनी प्रथम 'सह्याद्रि' मासिकाच्या जून १९४८ च्या अंकांत 'कालिदास आणि अश्वघोष' या विषयावर लेख लिहून त्यांत कालिदास हा अश्वघोषाच्या पूर्वी ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला, हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्या लेखाला प्रस्तुत लेखकाने 'सह्याद्रि' मासिकाच्याच मार्च १९४९ च्या अंकांत उत्तर दिलें.[1] यानंतर 'ज्ञानेश्वर' (वर्ष ३, अंक २) मध्ये त्यांनी तो वाद पुनः उकरून काढला आहे. प्रतिपक्षाविषयी अधिक्षेपपूर्वक लिहिण्याची श्री. करंदीकरांची वादपद्धति आम्हांस संमत नाही. विरुद्ध पक्षाला लाखोली

---

* 'ज्ञानेश्वर', पु. ४, पृ. ६–१३.

१. संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. ३८–४६ पाहा.

वाहून त्यावर मात करण्याचा त्यांचा हेतु असल्यास गोष्ट वेगळी; पण तत्त्वबोध हा त्यांच्या लेखनाचा उद्देश असल्यास तो अशा प्रकारच्या वाद-पद्धतीने साध्य होणार नाही व सुज्ञ वाचक तिला महत्त्व देणार नाहीत हें त्यांच्या दृष्टीस आणून त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांस संक्षेपाने उत्तर देण्याचा विचार आहे.

श्री. करंदीकारांनी आपल्या लेखांत अनेक विवाद्य विधानें केलीं आहेत. ह्या सर्वांना उत्तर देऊं म्हटलें तर अनेक लेख लिहावे लागतील. तेव्हा त्यांच्या लेखांतील फक्त प्रमुख आक्षेप शक्य तों त्यांच्याच शब्दांत देऊन आम्ही त्यांचें परीक्षण करणार आहों.

श्री. करंदीकरांच्या मतें कालिदास गुप्तकाळांत गुप्तसम्राट् द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या दरबारीं होऊन गेला असणें शक्य नाही. कारण—

आक्षेप १—चंद्रगुप्ताने आपल्या रामगुप्त नामक वडील भावास मारून आणि त्याच्या पत्नीशी विवाह करून सिंहासनारोहण केलें होतें. तेव्हा त्याच्या सभेंत 'दुरितैरपि कर्तुमात्मसात् प्रयतन्ते नृपसूनवो हि यत्' (रघुवंश, ८, २) इत्यादि श्लोक कालिदासाने म्हणणें ही अनौचित्याची परमावधि होय! तसेंच 'इति शिरसि स वामं पादमाधाय राज्ञाम् । उदवहदनवद्यां तामवद्यादपेतः' (रघुवंश, ७, ७०) या श्लोकांतील वर्णन वाचून चंद्रगुप्ताला आपल्या अपमानशल्यावर मीठ चोळल्याचाच भास झाला असता.

उत्तर—रामगुप्ताच्या चरित्राविषयी माहिती आपणांस तत्कालीन लेखांवरून मिळाली नाही. गुप्तकालानंतर कांही शतकांनी लिहिलेल्या संस्कृत ग्रंथांवरून व कोरीव लेखांतील उल्लेखांवरून रामगुप्तकालीन घटनां-विषयी संशोधकांनी अनुमानें केलीं आहेत. त्यांत अद्यापि कांही शंकास्थळें आहेत. जसजसा जास्त पुरावा मिळेल, तसतशीं तीं नाहीशीं होतील. रामगुप्ताचीं नाणीं अद्याप मिळालीं नसल्याने त्या नांवाचा कोणी राजाच गुप्तकालांत झाला नव्हता असा कांही संशोधकांचा आक्षेप होता. पण नागपूर येथे १९५० सालच्या डिसेंबरमध्ये भरलेल्या भारतीय नाणक परिषदेच्या

अधिवेशनांत गुप्तकालीन अक्षरवटिकेंत ' रामगुप्त ' नाम असलेलीं कांही नाणीं दाखविण्यांत आलीं. त्यांवरून तो आक्षेप दूर झाला आहे. आवश्यक तो सर्व पुरावा मिळून रामगुप्त व चंद्रगुप्त यांच्या परस्पर संबंधाविषयी केलेलीं अनुमानें निर्विवाद पद्धतीने सिद्ध झालीं तरी चंद्रगुप्ताचा आश्रित असलेल्या कालिदासाने आपल्या ग्रंथांत श्री. करंदीकरांनी उद्धृत केलेल्या-सारखे श्लोक लिहिणें असंभवनीय नाही. परकीय कुशाण व क्षत्रप राजांचा निःपात करून उत्तर भारतांत हिंदूंचें एकछत्री साम्राज्य स्थापन करणाऱ्या व वैदिक धर्म, संस्कृत विद्या व विविध कला यांना उदार आश्रय देऊन त्यांचें पुनरुज्जीवन करणाऱ्या पराक्रमी, दानशूर व विद्वान् चंद्रगुप्त–विक्रमा-दित्याविषयी तत्कालीन लोकांच्या मनांत नितान्त आदर असल्यास त्यांत आश्चर्य नाही. त्याच्या चरित्रांतील एखाद्या आक्षेपार्ह घटनेकडे सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन त्यांनी दुर्लक्ष केलें असेल. ' एको हि दोषो गुणसन्नि-पाते निमज्जतीन्दोः किरणेष्विवाङ्कः ' (कुमारसंभव, १, ३) ही पंक्ति लिहिणाऱ्या कालिदासाचेंहि मत तसेंच असणें असंभवनीय नाही.

आक्षेप २—रामगुप्तचरित्रांतील अद्भुत प्रसंग कालिदासाच्या काळीं घडून आला असता तर ह्या कवीने त्या प्रसंगावर नक्की एक अमर नाटक लिहिलें असतें.

उत्तर—कालिदासाने असें नाटक लिहिलें होतें किंवा नाही, हें आपणांस माहीत नाही; पण तें लिहिलें असतें तरी तें कालोदधींत नष्ट झालें असणें अशक्य नाही. कारण कालिदासाने लिहिलेल्या सर्व ग्रंथांची यादी श्री. करंदीकरांसहि उपलब्ध झाली नसावी. प्राचीन काळचे शेकडों 'अमर' होण्याच्या योग्यतेचे ग्रंथ आता नष्ट झाले आहेत. क्षेमेंद्राने आपल्या 'औचित्यविचारचर्चे'त कालिदासाच्या 'कुन्तलेश्वरदौत्य' नामक ग्रंथाचा उल्लेख करून त्यांतील एक श्लोकहि दिला आहे. राजशेखर, भोज इत्यादि आलंकारिकांनीहि त्यांतील श्लोक उद्धृत केले आहेत. त्यावरून तो ग्रंथ इ. स. च्या अकराव्या शतकापर्यंत तरी उपलब्ध होता यांत संशय नाही. पण तो आतां मिळत नाही. 'सह्याद्रि' जुलै १९४५ च्या अंकांत या

ग्रंथाविषयी माहिती मिळेल.[२] तेव्हा कालिदासाने रामगुप्तचरित्रांतील प्रसंगावर नाटक लिहिलें नाही, या आक्षेपांत कांही तथ्य नाहीं.

आक्षेप ३—कालिदासाच्या काळांत विदिशा नगरी राजधानी म्हणून सर्वत्र प्रसिद्ध होती. गुप्तकाळांत मात्र ती नगरी ध्वंसावशिष्ट होऊन तिच्या जागीं आधुनिक काळचें भिलसा गांव अस्तित्वांत आलें होतें असें जॉन मार्शलने स्पष्ट विधान केलें आहे. हें स्थित्यंतर नागपूरच्याच कुलगुरु केदारांनींहि कधीच दाखवून दिलें आहे.

उत्तर—या बाबतींत उपलब्ध पुरावा स्वतः न पाहतां इतरांच्या विधानांवर अवलंबून राहिल्याने श्री. करंदीकरांची फसगत झाली आहे. गुप्तकाळांत विदिशा ध्वंसावशिष्ट झाली हें खरें मानलें तरी कालिदासकाळींहि तिची तीच अवस्था होती हें सिद्ध होत नाही. कारण कालिदासाच्या काळानंतर जवळजवळ शंभर वर्षें गुप्तांचें राज्य माळव्यांत चालू होतें; पण या बाबतींत अनुमान करण्याचीहि जरुरी नाही. विदिशेस खुद्द द्वितीय चन्द्रगुप्ताच्या मांडलिकाचा एक व मंत्र्याचा एक असे दोन लेख उदयगिरीच्या लेण्यांत कोरले आहेत. त्या लेण्यांत गुप्तकालीन सुंदर शिल्पेंहि अद्यापि विद्यमान आहेत. त्यावरून चन्द्रगुप्ताच्या काळीं विदिशा केवळ अस्तित्वांतच नव्हे तर भरभराटींत होती यांत मुळीच संशय नाही. श्री. करंदीकरांनी स्वतः बेसनगर हें गाव व जवळच असलेलीं उदयगिरीचीं लेणीं पाहिलीं आहेत किंवा नाही, हें आम्हांस माहीत नाही. पण पाहिलीं असल्यास बेसनगरपासून उदयगिरीपर्यंत प्राचीन विदिशा नगरीचे विपुल अवशेष अद्यापि पाहावयास मिळतात हें त्यांच्या दृष्टीस पडलें असेल. किंबहुना कालिदासाने वर्णिलेला नीचैर्गिरि म्हणजे सध्याचा उदयगिरि हेंहि त्यांच्या लक्षांत आलें असेल. तेव्हा गुप्तकालीन कालिदासाने मेघदूतांतल्यासारखें विदिशेचें वर्णन करणें सुतराम् शक्य आहे.

विदिशा गुप्तकालांत ध्वंसावशिष्ट झाली नसून त्या कालानंतर निदान शेंदीडशें वर्षें अस्तित्वांत होती हेंहि सप्रमाण दाखवितां येतें. कै. डॉ.

---

२. संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. ६५–७५ पाहा.

देवदत्तपंत भांडारकर यांनी बेसनगर येथे हेलिओडोरसचा गरुडध्वज जेथे आहे तेथे उत्खनन केलें होतें. त्याचा वृत्तांत पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या सन १९१३–१४ च्या अहवालांत प्रसिद्ध झाला आहे. या उत्खननांत त्यांना कलचुरि कृष्णराजाचीं (इ. स. ५५०–५७५) चांदीचीं नाणीं सापडलीं होतीं. कृष्णराजाचा नातु बुद्धराज याचा कलचुरि संवत् ३६० (सन ६१०) चा ताम्रपट श्री. य. रा. गुप्ते यांनी प्रसिद्ध केला आहे. तो त्या राजाचा मुक्काम विदिशेस असतांना दिला होता. तेव्हा विदिशा गुप्त-कालांत ध्वंसावशिष्ट झाली होती हें विधान निराधार आहे. सध्याचें भिलसा हें गाव विदिशेजवळच्या भाइल्लस्वामिनामक सूर्याच्या देवळावरून पडलें आहे. या देवळाचा उल्लेख इ. स. च्या अकराव्या शतकापूर्वी मिळत नाही. तेव्हा विदिशा गुप्तकाळांत ध्वंसावशिष्ट होऊन तिच्या जागीं भिलसा हें सध्याचें गाव अस्तित्वांत आलें हें विधान चूक ठरतें व कालिदासाच्या गुप्तकालीनत्वाला त्यामुळे कांही बाध येत नाही.

आक्षेप ४—गुप्तांची राजधानी उज्जयिनीला कधीच नव्हती. यांच्या काळांत उज्जयिनीची अशी दुर्दशा झाली होती की, गुप्तांच्या इतर साऱ्या प्रांतांतून सोन्याचीं नाणीं प्रचलित असूनसुद्धा केवळ माळव्याकरिता त्यांना चांदीचीं नाणीं पाडावीं लागलीं.

उत्तर—हीं विधानेंहि निराधार आहेत. कै. रामकृष्णपंत भांडार-करांनी कित्येक वर्षांपूर्वी दाखवून दिलें आहे की, कर्नाटकांतील कांही ‘गुत्त’ नामक सामन्त आपणांस चन्द्रगुप्ताचे वंशज म्हणवीत व आपल्या मूळ पुरुषाचें वर्णन ‘पाटलीपुरवराधीश्वर’ व ‘उज्जयिनीपुरवराधीश्वर’ असें करीत असत. त्यावरून पाटलीपुत्राप्रमाणे उज्जयिनीहि द्वितीय चन्द्र-गुप्ताची राजधानी होती असें दिसतें. चन्द्रगुप्ताने स्वतः उज्जयिनीच्या विद्वत्परिषदेपुढे परीक्षा दिली होती अशी आख्यायिका राजशेखराने उद्धृत केली आहे. (आमचा ‘कालिदास’ ग्रंथ, द्वितीयावृत्ति, पृ. ३६ पाहा.)

श्री. करंदीकरांना हें माहीत नसावें की, माळव्यांतहि सोन्याचीं नाणीं चालत. पूर्व माळव्याची राजधानी विदिशा येथून जवळच असलेल्या सांचीच्या स्तूपाच्या कठडयावर द्वितीय चन्द्रगुप्ताच्या काळचा लेख

मिळाला आहे. त्यांत त्याचा मंत्री आम्रकार्दव याने सांचीच्या पंचायतीस पंचवीस 'दीनार' देऊन त्याच्या व्याजांतून सांची येथे चन्द्रगुप्ताच्या व आपल्या नांवें पांच पांच भिक्षूंस भोजन घालावें व रत्नगृहांत (बुद्धाच्या मूर्तीसमोर) नंदादीप लावावा अशी व्यवस्था केली होती. पूर्व माळव्यांत दीनार नामक सोन्याचीं नाणीं चालू असतां तीं पश्चिम माळव्यांत मात्र प्रचलित नव्हतीं असें मानण्यास कांही आधार नाही. माळवा जिंकल्यावर चन्द्रगुप्ताने चांदीचीं नाणीं पाडलीं याचें कारण त्या प्रांताच्या लोकांस क्षत्रपांच्या काळांत चांदीच्या नाण्यांची सवय झाली होती हें होय. ज्या प्रांतांत जीं नाणीं पूर्वीपासून प्रचलित असत त्या तऱ्हेचीं नाणीं विजयी राजे ते प्रांत जिंकल्यावर सामान्यतः पाडीत असत. गुजराथेंत कारवाण (प्राचीन कायावरोहण) येथे सापडलेलें द्वितीय चन्द्रगुप्ताचें 'विक्रम'नामांकित गुप्तकालीन अक्षरवटिकेचें **शिशाचें नाणें** डॉ. मो. गं. दीक्षित यांनी १९५० सालच्या डिसेंबरमध्ये नागपुरास दाखविलें.[३] त्यावरून गुप्तकाळीं उत्तर गुजराथची अत्यंत दुर्दशा झाली होती असें म्हणण्यासारखेंच उज्जयिनीच्या दुर्दशेविषयीचें श्री. करंदीकरांचें विधान हास्यास्पद आहे.

आक्षेप ५—चन्द्रगुप्ताच्या मृत्युसमयीं द्वितीय प्रवरसेनाचें वय पंधरासोळा वर्षांच्या जवळपास येत असल्याने कालिदासाने चन्द्रगुप्त विक्रमादित्याच्या सांगण्यावरून त्याचें सेतुबंध काव्य सुधारून दिलें असणें शक्य नाही.

उत्तर—यांत अशक्य असें कांहीच नाही. गुप्तांप्रमाणे कांही वाकाटक राजेहि विद्याभिलाषी व प्रतिभासंपन्न होते. वाकाटक नृपति सर्वसेन याने 'हरिविजय'नामक प्राकृत काव्य रचलें होतें, हें अनेक उताऱ्यांवरून प्रस्तुत लेखकाने सिद्ध केलें आहे. (नवभारत, जून १९४८, पृ. १–७)[४] सर्वसेन व प्रवरसेन यांच्या नांवावर अनेक गाथा गाथासप्तशतीच्या टीकाकारांनी दिल्या आहेत. प्रवरसेन सिंहासनावर आल्यावर लौकरच त्याने

३. जर्नल ऑफ दि न्यूमिस्मॅटिक सोसायटी ऑफ् इंडिया, पु. १३, पृ. २७ पाहा.

४. संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. १३९–१५०.

सेतुबंध काव्य रचण्याला सुरुवात केली असें त्या काव्याच्या एका गाथेंत म्हटलें आहे. ('कालिदास', द्वितीयावृत्ति, पृ. १२३ पाहा). तेव्हा त्या काव्याच्या रचनेंत किंवा सुधारणेंत कालिदासाची मदत त्याला झाली असणें मुळीच असंभवनीय नाही.

आक्षेप ६—कालिदासाच्या काळीं यवनांचीं राज्यें भारताच्या वायव्य सीमेवर होती. 'शाकुंतलां'तील नायक 'यवनीभिः परिवृतः' असा प्रवेश करतो. रघूने केलेल्या पारसीकांच्या पराजयाचें वर्णन खरोखर विक्रमाच्या स्वारीचें आहे. याच्या उलट कालिदासाला गुप्तकालीन मानल्यास त्याचा तत्कालीन परिस्थितीशीं कांही मेळ बसत नाही.

उत्तर—रघूच्या दिग्विजयाच्या वर्णनांत कालिदास आपल्या आश्रयदात्या राजाचे विजय यथातथ्य वर्णीत होता असें मानण्यास कांही आधार नाही. इ. स. पूर्वी पहिल्या शतकांत माळव्याच्या विक्रमाने वायव्य सीमेवरच्या प्रांतावर स्वारी केली होती हें केवळ अनुमान आहे. त्याला तत्कालीन कोरीव लेखांचा आधार नाही. 'रघुवंशां'तील वर्णनावरून अशीं अनुमानें काढूं लागलें तर अनवस्था प्रसंग येईल. 'रघुवंशां'तील इतर वर्णनेंहि विक्रमाचींच मानावीं लागलील. 'रघुवंशां'तील शेवटच्या अग्निवर्ण राजाप्रमाणे कालिदासाचा आश्रयदाता विक्रमहि सदैव ख्यालीखुशालींत व नृत्यगायनांत मग्न असे. उपभोगातिशयानें त्याला क्षय होऊन तो त्यांत मरण पावला असेंहि कोणी अनुमान करतील. शिवाय 'रघुवंशां'तील हूणांचा उल्लेखहि या काळाच्या विरुद्ध जातो. रघुदिग्विजयवर्णनांत कालिदासाला स्वकालीन घटनांवरून कांही कल्पना सुचल्या असणें शक्य आहे. पण त्यावरून तत्कालीन 'इतिहास' सांगणें कितपत शक्य आहे याचा वाचकांनी विचार करावा. कालिदासाच्या ग्रंथांत गुप्तकालीन राजकीय घटनांचें प्रतिबिंब पडलें आहे हें आम्ही दाखविलें आहेच. ('कालिदास', द्वितीयावृत्ति, पृ. ४०-४१ पाहा).

आक्षेप ७—कालिदासाच्या काळीं गणपति हा शंकराचा पुत्र म्हणून ओळखला जात नव्हता. त्याला गजवदनहि प्राप्त झालें नव्हतें. त्या काळीं निकुंभ हा गणाधीश होता. तसेंच परशुरामहि विष्णूचा अवतार

म्हणून मान्य झाला नव्हता. हें कालिदासाच्या प्राचीनत्वाचें गमक म्हणून सांगतां येईल.

उत्तर—कालिदासाच्या ग्रंथांत गणपतीचें वर्णन आलें नाही हें खरें; पण त्यावरून तो गुप्तकाळापूर्वी होऊन गेला हें कसें सिद्ध होतें? हें अनुमान अभावात्मक आहे (argumentum ex silentio). त्या ग्रंथांत गणपतीचा उल्लेख आला पाहिजे होता असें दाखविल्याखेरीज तें संयुक्तिक होणार नाही. कालिदासाच्या ग्रंथांत असा प्रसंग आला नाही. कार्त्तिकेय हा शंकराचा वडील मुलगा असल्याने त्याचा जन्म ज्यांत वर्णिला आहे त्या 'कुमारसंभव' काव्यांत गणपतीचा उल्लेख येणें असंभवनीय आहे. नाही तर 'कालविपर्यास' हा ढोबळ दोष झाला असता. 'रघुवंशा'च्या दुसऱ्या सर्गांत प्रसंगवशात् उल्लेखिलेला निकुंभ म्हणजे गणपति किंवा गणांचा अधिपति असें मानण्यास यत्किंचितहि आधार नाही. दुसरें असें की, गुप्तकाळांतहि गणपतीची पूजा प्रचारांत आली होती असें दिसत नाही. डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांनी म्हटल्याप्रमाणे गुप्तकालीन कोरीव लेखांत कोठेहि गणपतीचा उल्लेख आढळत नाही. तशींच त्याचीं शिल्पेंहि इ. स. च्या सातव्या आठव्या शतकापर्यंत मिळत नाहीत ('वैष्णव, शैव व इतर पंथ', पृ. १४८). संस्कृत वाङ्मयांतील गणपतीचा प्रथम उल्लेख भवभूतीच्या 'मालतीमाधवां'त (इ. स. चें ८ वें शतक) आला आहे. 'गाथासप्तशतीं'त गणपतीच्या वर्णनपर एक गाथा आली आहे हें खरें; पण त्या गाथेचा काळ निश्चित नाही. 'गाथासप्तशतीं'त खिस्तोत्तर आठव्या शतकापर्यंत वेळोवेळीं भर पडत गेली हें आम्ही इतरत्र दाखविलें आहे. [नागपूरच्या 'युगवाणी' (१९४६, पृ. ७–२७) तील 'गाथासप्तशतीचा काळ' या विषयावरील आमचा लेख पाहा.[५]] तेव्हा या आक्षेपाने कालिदास गुप्तकाळांत होऊन गेला या मताला बाध येत नाही. परशुरामाच्या अवताराच्या बाबतींत हीच परिस्थिति आहे. कालिदासानंतर तीन शतकांनी झालेल्या भवभूतीच्या 'महावीरचरितांत'हि परशुरामाचें वर्णन विष्णूचा अवतार म्हणून केलेलें नाही.

५. संशोधनमुक्तावलि, सर १, पृ. १०४–१२३.

येथवर श्री. करंदीकरांनी कालिदासाच्या गुप्तकालीनत्वावर घेतलेल्या प्रमुख आक्षेपांचें साधार परीक्षण करून ते कसे बिनबुडाचे आहेत हें दाखविलें आहे. गुप्तकालाविषयी आपणांस बरीच माहिती असल्यामुळे श्री. करंदीकरांस वरील आक्षेप घेतां आले. पण त्यांस संमत असलेल्या खिस्तपूर्व पहिल्या शतकांतील विक्रमाविषयी आपणांस कांहीच माहिती नाही. किंबहुना शशशृंगाप्रमाणे त्याला अस्तित्वहि नाही. ' कालकाचार्य-कथानकां'तील कथा ऐतिहासिक असती तर तींत उल्लेखिलेल्या संवत्-संस्थापक विक्रमादित्याचें नांव पुराणांत आलें असतें. या विक्रमाच्या काळा-नंतर सुमारें चारशें वर्षांनी पुराणांतील राजवंशावलि समाप्त करण्यांत आल्या. पुराणांत नंद, मौर्य, शुंग, काण्व, आन्ध्र इत्यादि ऐतिहासिक वंशांतील राजांचा नामोल्लेख आहे. संवत्संस्थापक विक्रमादित्य ज्या गर्द-भिल्लवंशांत जन्मला म्हणून ' कालकाचार्यकथानकां'त म्हटलें आहे त्याचाहि उल्लेख आहे खरा; पण त्या वंशांतील सात राजांनी आंध्र किंवा सातवाहन राजाच्या काळानंतर म्हणजे (इ. स. २५० नंतर) राज्य केलें, असें पुराणें सांगतात. यापूर्वी या वंशाचें कधी राज्य होतें असा पुराणांत उल्लेख नाही. त्या वंशांतील विख्यात शककर्ता विक्रमादित्य—ज्याने आपल्या मालव देशाला शकांच्या दास्यांतून मुक्त केलें, असें म्हणतात—त्याचा नामनिर्देशहि पुराणांत असूं नये याचें आश्चर्य वाटतें. त्याने जो संवत् स्थापला असें म्हणतात, त्याशीं त्याचें नांव इ. स. च्या दहाव्या शतकापर्यंत संलग्न नव्हतें, इतकेंच नाही तर त्याला 'कृत' असें दुसरें नांव होतें.[६] यावरून खिस्तपूर्व पहिल्या शतकांत विक्रमादित्य नामक राजा झाला नाही असेंच अनुमान कोणीहि निराग्रही मनुष्य काढील. तेव्हा अशा विक्रमाच्या दरबारीं कविकुलगुरु कालिदासास ठेवण्याचा आपला आग्रह श्री. करंदी-करांनी सोडून द्यावा असें त्यांस सुचवून हा लांबलेला लेख पुरा करतों.

---

६. ' कालिदास ', द्वितीयावृत्ति, पृ. ६–७.

२. भवभूतीचें जीवनचरित*

संस्कृत वाङ्मयांतील अत्यंत श्रेष्ठ कवींमध्ये भवभूतीची गणना होते, किंबहुना, प्राचीन काळीं कालिदास श्रेष्ठ की भवभूति श्रेष्ठ याविषयी विद्वानांमध्ये मोठा कडाक्याचा वाद होत असे. त्याचे पडसाद दीर्घकालानंतर आजहि ऐकूं येतात. एकदा असा वाद चालला असतां, एका विद्वानानें आपलें मत पुढील श्लोकार्धांत व्यक्त केलें—

कवयः कालिदासाद्याः भवभूतिर्महाकविः ।

"कालिदासादिकांची कवींमध्ये गणना करण्यास हरकत नाही, पण 'महाकवि' ही पदवी कोणास द्यावयाची असल्यास तिला भवभूति हाच पात्र आहे" असा त्याच्या म्हणण्याचा आशय होता. पण कालिदासाचे अभिमानी थोडेच स्वस्थ बसणार ! त्यांपैकी एकाने हेटाळणीच्या स्वरानें म्हटलें—

तरवः पारिजाताद्याः स्नुहीवृक्षो महातरुः ।

"पारिजातादि दिव्य वृक्षांना फार तर तरु म्हणा, पण महातरु या पदवीला कोणी लायक असेल तर आमच्या परड्यांतला निवडुंग हाच होय !" कालिदास व भवभूति हे समकालीन होते व त्यांच्यांत कवित्वाच्या बाबतींत स्पर्धा चाले, अशाहि आख्यायिका 'भोजप्रबन्धा'दि ग्रंथांत दिल्या आहेत. त्यांत ऐतिहासिक तथ्य मुळीच नाही, तरी विद्वानांमध्ये या दोन कवींच्या कृतींच्या सरसनीरसतेविषयी चर्चा चालत असे, यांत संशय नाही. रसिकांनी शृंगारवर्णनांत व ललितोक्तींत कालिदासाला श्रेष्ठ मानलें आहे 'एकोऽपि जीयते हन्त कालिदासो न केनचित् । शृंगारे ललितोद्गारे कालिदासत्रयी किमु ॥' असें एका सुभाषितांत म्हटलें आहे; पण त्यांनीच करुणरसांत भवभूतीची बरोबरी कोणीहि करूं शकत नाही, असाहि निर्णय दिला आहे. 'कारुण्यं भवभूतिरेव तनुते' ही पंक्ति पाहा. हिमालयाचें गौरिशंकर हें

---

* विदर्भ साहित्य संघाच्या संमेलनांत गोंदिया येथे सन १९५७ मध्ये झालेल्या परिसंवादांत वाचलेला निबंध.

शिखर उंच की कांचनगंगा उंच, हें त्याच्या पायथ्याशीं उभा असलेल्या मनुष्याला कसें ठरवितां येणार ? तद्वत् कालिदास व भवभूति यांत श्रेष्ठ कनिष्ठ आपण कसें ठरविणार ? ते दोघेहि आपणांस वंद्य आहेत.

त्यांतहि भवभूतीविषयी आपणां विदर्भवासीयांना जास्त आत्मीयता व प्रेम वाटणें साहजिकच आहे, कारण तो आपल्या नाटकांच्या प्रस्तावनांत आपले पूर्वज दक्षिणापथांतल्या विदर्भदेशांत पद्मपुर येथे राहत होते असें मोठ्या अभिमानानें सांगतो. 'महावीरचरिता'च्या प्रस्तावनेंतील सूत्रधाराच्या भाषणांतील पुढील उतारा पाहा—'अस्ति दक्षिणापथे पद्मपुरं नाम नगरम्। तत्र केचित्तैत्तिरीयिणः काश्यपाश्चरणगुरवः पङ्क्तिपावनाः पञ्चाग्नयो धृतव्रताः सोमपीथिन उदुम्बरनामानो ब्रह्मवादिनः प्रतिवसन्ति। तदामुष्यायणस्य तत्रभवतो वाजपेययाजिनो महाकवेः पञ्चमः सुगृहीतनाम्नो भट्टगोपालस्य पौत्रः पवित्रकीर्तेर्नीलकण्ठस्यात्मसंभवः श्रीकण्ठपदलाञ्छनो भवभूतिर्नाम जातूकर्णीपुत्रः कविर्मित्रधेयमस्माकमित्यत्रभवन्तो विदांकुर्वन्तु।' हा उतारा थोडा लांब झाला खरा, पण तो याच्याहि पेक्षा लांब असता तरी कोणी तक्रार केली नसती; कारण यामध्ये भवभूतीने आपल्या पूर्वजांविषयी अन्यत्र अप्राप्य अशी बहुमोल माहिती दिली आहे. सामान्यतः संस्कृत कवि स्वतःविषयी क्वचितच लिहितात. त्यामुळे त्यांच्या स्थलकालांविषयी आधुनिक विद्वानांमध्ये रणें माजून राहिलीं आहेत. तेव्हा भवभूतीने स्वतःविषयी ही जी थोडीशी माहिती दिली आहे तिजबद्दल आपण त्याचे आभार मानले पाहिजेत.

पद्मपुर उत्तर भारतांत नव्हतें

'महावीरचरितां'तील वरील उताऱ्यांत भवभूतीचे पूर्वज दक्षिणापथांतील पद्मपुरनामक नगरांत राहात होते असें म्हटलें आहे. 'दक्षिणापथ' या शब्दाने सामान्यतः नर्मदेच्या दक्षिणेचा प्रदेश समजण्यांत येतो. 'नर्मदाया दक्षिणेन देशो दक्षिणापथः' असें वात्स्यायनाच्या 'कामसूत्रा'चा टीकाकार यशोधर म्हणतो. राजशेखराच्या 'काव्यमीमांसे'त (पृ. ९३) 'माहिष्मत्याः परतो दक्षिणापथः।' माहिष्मतीच्या किंवा महेश्वराच्या

दक्षिणेचा देश हा दक्षिणापथ, असें म्हटलें आहे. तेव्हा भवभूति हा दक्षिण-भारतांतील कवि होय हें स्पष्ट आहे. कांहींनी त्याला उत्तर भारतांतील कवि बनविण्याचा प्रयत्न केला होता. भवभूतीचीं आरंभींचीं दोन नाटकें 'महावीरचरित' व 'मालतीमाधव' हीं कालप्रियनाथाच्या म्हणजे काल्पी येथील देवाच्या यात्रेच्या प्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलीं, असें त्यांतील उल्लेखांवरून दिसतें. दक्षिणापथ याचा रूढ अर्थ न घेतां यौगिक अर्थ म्हणजे दक्षिण दिशेचा मार्ग असा घेतल्यास भवभूतीच्या पूर्वजांचें निवासस्थान पद्मपूर हें काल्पीच्या दक्षिणेस होतें, असें सिद्ध होईल. 'मालतीमाधव' नाटकाचें संविधानक जेथे घडलें तें पद्मावती नगर प्राचीन काळीं नागराजांच्या राजधानीचें शहर म्हणून सुविख्यात होतें. ही पद्मावती म्हतजेच भवभूतीचें पद्मपुर होय, असें एक मत आहे. पद्मावती ही नगरी सध्याच्या मध्यप्रदेशांत नरवारच्या जवळ पवाया (किंवा पदम पवाया) या नांवाने अवशिष्ट आहे. तेथे प्राचीन काळचे अनेक अवशेष—स्तूप, शिल्पें, नाणीं वगैरे—मिळाले आहेत. पदम पवाया हें काल्पीच्या दक्षिणेस असल्यामुळे 'महावीरचरितां'तील पद्मपुरचें वर्णन याला ठीक लागू पडतें. तेव्हा हा पदम पवायाचा अर्थात् उत्तर भारताचा रहिवासी होता, असें मत कांही वर्षांपूर्वी श्री. मा. व्यं. लेले यांनी व्यक्त केलें होतें.

पद्मपुर विदर्भांत होतें ह्याला प्रमाणें

पण हें मत बरोबर नाही. कारण स्वतः भवभूतिच आपल्या 'मालतीमाधवां'त 'अस्ति दक्षिणापथे विदर्भेषु पद्मपुरं नाम नगरम्।' आपल्या पूर्वजांचें निवासस्थान पद्मपुर हें दक्षिणापथांतील विदर्भांत होतें, असें सांगतो. उत्तर भारतांतील पद्मावतीच्या सभीवारच्या प्रदेशास विदर्भ म्हणत, याला मुळीच पुरावा नाही. याच्या उलट नर्मदेच्या दक्षिणेस खानदेश व दक्षिण कोसल (छत्तीसगड) यांच्यामधील प्रदेशाचें विदर्भ हें नांव फार प्राचीन काळापासून चालत आलें आहे. या प्रदेशांत पद्मपुर नांवाचें नगर प्राचीन काळीं होतें, याविषयी उपलब्ध असलेला पुरावा मी वीस वर्षांपूर्वी मध्यप्रांत (आता विदर्भ) संशोधन मंडळाच्या सभेंत सविस्तरपणें पुढे मांडला होता. छत्तीसगडाच्या दुर्ग जिल्ह्यांतील मोहल्ला या गावीं एका

घराचा पाया खणत असतां ताम्रपटाचा एक पत्रा सापडला होता. तो मी प्रसिद्ध केला आहे.[१] या ताम्रपटावरील लेख कांही कारणाने अपूर्ण राहिलेला दिसतो. हा लेख पेटिकाशीर्षक लिपींत (box-headed characters मध्ये) लिहिला असून त्यांत वाकाटक राजवंशाची आरंभींची वंशावळ आली आहे. तींत नवीन असें कांही नाही. पण ताम्रपटांतील आरंभींचा 'पद्मपुरात्' (पद्मपुराहून हा ताम्रपट दिला आहे) हा शब्द मात्र अत्यंत महत्त्वाचा आहे. या शब्दानंतर 'वासकात्' (शिबिराहून) यासारखा एखादा शब्द नसल्याने पद्मपुरांत वाकाटक नृपतीचा केवळ मुक्काम नसून तें त्याच्या राजधानीचें शहर होतें असें अनुमान करतां येतें. नन्दिवर्धन (नागपूरजवळचें नगरधन), प्रवरपुर (वर्ध्याजवळचें पवनार), वत्सगुल्म (वाशीम) या नगरीं वाकाटकांच्या आरंभींच्या राजधान्या होत्या. त्याप्रमाणेच पद्मपुर हेंहि एका काळीं (बहुधा वाकाटकांच्या कालाच्या अखेरीस पांचव्या शतकांत) त्यांच्या राजधानीचें शहर असावें. विदर्भांत 'पद्मपुर' या नांवाचीं अनेक गावें विद्यमान आहेत. पण यांपैकी आमगावाजवळच्या पदमपुर या गावींच प्राचीन अवशेष अद्यापि विद्यमान आहेत. सुमारें वीस वर्षांपूर्वी ते अवशेष समक्ष पाहून हें पदमपुरच भवभूतीचें पद्मपुर होय असा मी निर्णय केला.[२] तो आता सर्वमान्य झाला आहे.

वाकाटक नृपतींचा भवभूतीच्या पूर्वजांस आश्रय

वाकाटक राजे स्वतः ब्राह्मण असून श्रौतविद्येचे पुरस्कर्ते होते. त्यांनी स्वतः अश्वमेध, वाजपेय इत्यादि अनेक श्रौत यज्ञ केल्याचा त्यांच्या ताम्रपटांत उल्लेख आहे. तेव्हा त्यांचा विद्वान् ब्राह्मणांस आश्रय असला पाहिजे. वाकाटक नृपति द्वितीय प्रवरसेनाने अनेक गावें ब्राह्मणांना दिल्याचें त्याच्या ताम्रपटावरून दिसतें. भवभूति आपल्या नाटकांत पद्मपुरास आपल्या पांच पिढया होऊन गेल्याचें सांगतो. तो आठव्या शतकाच्या आरंभीं

---

१ 'वाकाटकनृपति आणि त्यांचा काळ', पृ. २९५ पाहा.

२ यासंबंधी माझा 'भवभूतीचें जन्मस्थान' या शीर्षकाचा लेख 'संशोधनमुक्तावलि', सर १ पृ. ७६–९४ यांवर पाहा.

होऊन गेला हें पुढे सिद्ध केलें आहे. तेव्हा त्याचा पांचवा पूर्वज महाकवि हा इ. स. च्या सहाव्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला असावा. त्या पूर्वीहि त्याचे पूर्वज पद्मपुरास येऊन राहिले असल्यास त्यास वाकाटक नृपतींचा आश्रय होता, असें अनुमान करतां येईल.

भवभूतीचें उपनाम

मागे 'महावीरचरितां'तला जो उतारा दिला होता त्यासारखाच 'मालतीमाधवा'च्या प्रस्तावनेंत आला आहे. या दोन्ही ठिकाणीं त्याने आपल्या पूर्वजांना 'उदुम्बरनामानः' असें विशेषण लावलें आहे. या विशेषणाने अनेकांस बुचकळयांत पाडलें आहे. उदुम्बर (उंबर) हें एका वृक्षाचें नांव. तें कुलनाम कसें होऊं शकेल, अशी शंका येऊन 'मालतीमाधवा'चा टीकाकार जगद्धर हा 'डम्बरनामानः' असा पाठ सुचवतो व 'डम्बरं प्रसिद्धं नाम येषां ते' ज्यांचें नांव सुविख्यात आहे, असा त्याचा अर्थ देतो. डॉ. श्री. व्यं. केतकर हे तर डांबरे हें भवभूतीचें उपनाम होतें असें प्रतिपादितात. पण 'उदुम्बरनामानः' असा पाठ कोणत्याहि प्राचीन हस्तलिखितांत सापडत नाही. 'उदुम्बरनामानः' याचा अर्थ 'मूळचे उदुम्बर गावचे' असा केला पाहिजे. याच अर्थाची 'वलभीविनिर्गत' 'नन्दिवर्धनविनिर्गत' अशीं विशेषणें ब्राह्मणांच्या नांवामागे लावलेलीं प्राचीन ताम्रपटांत आढळतात. तेव्हा भवभूतीचे पूर्वज मूळचे उदुम्बरचे असून राजाश्रयाच्या निमित्ताने पद्मपुरास येऊन राहिले असावे, असें अनुमान करण्यास हरकत नाही. हें उदुम्बर यवतमाळ जिल्ह्यांतील पैनगंगा नदीच्या उत्तर तीराजवळचें उमरखेड असणें शक्य आहे.

आतापर्यंत उपलब्ध पुराव्यावरून भवभूतीच्या मूळ निवासस्थानाचा शोध केला. आता त्याचा कालनिश्चय करूं.

भवभूतीचा काल

संस्कृत कवीच्या कालाविषयी बहुधा निश्चित माहिती मिळत नाही. पण भवभूतीच्या बाबतींत सुदैवाने थोडा बहुत पुरावा उपलब्ध झाला आहे. भवभूति झाला त्या काळांत विदर्भांत कोणी मोठें घराणें राज्य करीत नव्हतें.

म्हणून भवभूतीला आपली नाटकें लोकाश्रयाकरिता यात्रेच्या प्रसंगीं दाखवावीं लागत. पुढे त्याची कीर्ति कनोजच्या यशोवर्मा नामक राजाच्या कानीं गेली. त्याने त्यास बोलावून आपल्या पदरीं ठेवलें. यशोवर्म्याचा पुढे काश्मीरच्या ललितादित्य मुक्तापीड या राजाने पराजय केला. काश्मीरचा इतिहासकार कल्हण याने ह्या घटनेचा उल्लेख करतांना खालील श्लोक 'राजतरंगिणीं'त (४, १४४) घातला आहे.

कविवाक्पतिराजश्रीभवभूत्यादिसेवितः ।
जितो ययौ यशोवर्मा तद्गुणस्तुतिबन्दिताम् ॥

'पूर्वी कनोजच्या राजसभेंत वाक्पतिराज, भवभूति यांसारखे महाकवि ज्याची स्तुति करीत असत, तो यशोवर्म राजा स्वतःच पराभव पावल्यामुळे काश्मीरच्या ललितादित्याचा भाट बनला.' या श्लोकांत उल्लेखिलेला वाक्पतिराज हा 'गौडवध' या यशोवर्म्याच्या दिग्विजय-वर्णनपर सुप्रसिद्ध प्राकृत काव्याचा कर्ता. त्याने या काव्यांत 'भवभूति हा अमृताचा सागर असून त्याचे कांही बिन्दु मात्र माझ्या कथावर्णनांत स्फुरतात' असें अत्यंत विनयाने भवभूतीचें ऋण व्यक्त केलें आहे. त्या-वरूनहि भवभूति यशोवर्म्याच्या दरबारीं राजकवि होता, याविषयी संशय राहात नाही.

'राजतरंगिणीं'तील उल्लेखाने ललितादित्य मुक्तापीड हा सुमारें इ. स. ७०० ते ७३६ या कालांत होऊन गेला असें दिसतें. चिनी ग्रंथांतील निर्देशावरून इचाफॉन्मो नामक भारतीय राजाने इ. स. ७३१ या सालीं चीन देशांत आपला वकील पाठवला होता असें दिसतें. हा इचाफॉन्मो यशोवर्मनच असावा. 'गौडवध' काव्याच्या ७९९ व्या गाथेंत एका कंकणाकृति सूर्यग्रहणाचा उल्लेख आहे. त्याचें गणित करून जर्मन ज्योतिः-शास्त्रज्ञ याकोबी याने तें सन ७३१ मध्ये घडलें असें दाखविलें आहे. यशोवर्म्याच्या नंतर गादीवर आलेल्या आमराज नामक राजाने सन ७५३ सालीं जैन धर्माचा स्वीकार केला असें जैन ग्रंथकार राजशेखर सांगतो. या सर्व प्रमाणांवरून भवभूति खिस्तोत्तर आठव्या शतकाच्या प्रथम पादांत होऊन गेला असें अनुमान करण्यास हरकत नाही. भवभूतीच्या ग्रंथांतून

अलंकारादिकांचीं उदाहरणें देणारा कालक्रमाने पहिला आलंकारिक वामन हा खिस्तोत्तर आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेला असें अनेक प्रमाणांवरून ठरवितां येतें. त्यावरूनहि खिस्तोत्तर ७००–७२५ हा भवभूतीच्या साहित्यनिर्मितीचा काल समर्थित होतो.

भवभूतीच्या पूर्वजांविषयी माहिती

भवभूति स्वतः पूर्वजांविषयीं आपल्या ग्रंथांत बरीच माहिती देतो. त्यांचें कुलनाम उदुंबर होतें हें मागे सांगितलें आहेच. ते तैत्तिरीय शाखेचे कृष्णयजुर्वेदी ब्राम्हण होते. त्यांचें गोत्र भारद्वाज असून त्यांनी आपल्या शाखेच्या अध्यापनाकरता वेदविद्यालय चालविलें होतें असें दिसतें. कारण त्यांना 'चरणगुरवः' शाखाध्ययन करणाऱ्यांचे गुरु असें म्हटलें आहे. ते मोठे धार्मिक, व्रतानुष्ठान व सोमयाग करणारे आणि पांचहि अग्नि राखून सदैव त्यांची होमहवनांनी पूजा करणारे असे अत्यंत पवित्र आचरणाचे ब्राम्हण होते. त्यामुळे त्यांना समाजांत मोठा मान असून ते 'पंक्तिपावन' गणले जात असत. जे पवित्राचरणाचे व विद्वान् ब्राह्मण एखाद्या पंक्तींत भोजनास बसले असतां ती पंक्ति पावन होते त्यांस 'पंक्तिपावन ब्राम्हण' असें म्हणत. 'मनुस्मृतींत' (३, १८४) 'पंक्तिपावन' ब्राम्हण कोणास म्हणावें, तें खालील श्लोकांत सांगितलें आहे.

अग्र्याः सर्वेषु वेदेषु सर्वप्रवचनेषु च ।
श्रोत्रियान्वयजाश्चैव विज्ञेयाः पंक्तिपावनाः ।।

जे चारी वेदांत आणि शिक्षा, निरुक्त, व्याकरण, ज्योतिष, छन्दस् व कल्प या साही वेदांगांत पारंगत आहेत व दहा पिढयांपर्यंत ज्यांच्या वंशांत वेदविद्येचें अध्ययन चालत आलेलें आहे अशा अत्यंत पवित्र आचरणाच्या व विद्वान् ब्राह्मणांनाच पंक्तिपावनांत गणलें जाई. आपले पूर्वज या योग्यतेचे होते व अशा पवित्र वंशांत आपला जन्म झाला याचा यथार्थ अभिमान भवभूतीला होता व तो त्याने आपल्या नाटकांच्या प्रस्तावनांत व्यक्त केला आहे.

भवभूति आपल्या पांच पूर्वजांविषयी माहिती देतो. त्यांचा पांचवा पूर्वज महाकवि नामक होता. 'महावीरचरिता'च्या एका प्रतींत महाकवि हें

विशेषण करून सिंहभूति असें त्याचें नांव दिलें आहे. पण त्याला इतर हस्तलिखितांचा आधार नाही. म्हणून तें 'भवभूति' या नांवावरून बनविलेलें असावें. या महाकवीने वाजपेय याग केला होता हें भवभूतीने आवर्जून सांगितलें आहे. वाजपेय हा अत्यंत महत्त्वाचा व त्रैवर्णिकांना विहित असा सोमयाग होता. क्षत्रियांनी तो केला असतां त्यांना सम्राट् पदवी धारण करण्याचा अधिकार प्राप्त होत असे. वाकाटक राजांमधील महाप्रतापी राजा प्रथम प्रवरसेन याने हा याग करून सम्राट् पदवी धारण केली होती. तिचा साभिमान उल्लेख त्याच्या वंशजांच्या बहुधा सर्व ताम्रपटांत आढळतो. असा हा महत्त्वाचा सोमयज्ञ भवभूतीच्या महाकवि नामक पांचव्या पूर्वजाने केला होता. त्यानंतर भवभूतीचा पितामह भट्ट गोपाल याचा निर्देश आला आहे. हाहि स्वतःच्या विद्वत्तेने व पवित्राचरणाने प्रातःस्मरणीय झाला होता. म्हणून त्याच्या नांवामागे 'सुगृहीतनामा' हें विशेषण लावलें आहे. भवभूतीच्या पित्याचें नांव नीलकण्ठ आणि मातेचें जातूकर्णी असें होतें. नीलकण्ठाचीहि धार्मिकपणाबद्दल ख्याति होती. कारण त्याला पवित्रकीर्ति असें वर्णिलें आहे. भवभूतीच्या मातेचें जातूकर्णी हें गोत्रनाम दिसतें. ह्या गोत्राचा उल्लेख कांही प्राचीन ताम्रपटांत आढळतो.

भवभूतीचें दुसरें नांव

नाटकांत कवीचें नांव देतांना 'श्रीकण्ठपदलाञ्छनो भवभूतिर्नाम कविः' असा प्रयोग केला आहे. भवभूतीच्या पित्याचें नांव नीलकण्ठ होतें. तेव्हा त्याने आपल्या पुत्राचें नांव श्रीकण्ठ ठेवलें असावें, असें वाटून अनेक टीकाकारांनी तेंच कवीचें मूळ नांव मानलें आहे. पुढे त्याने खालील सुंदर श्लोक रचल्यामुळे त्याला भवभूति हें नांव मिळालें अशी आख्यायिकाहि ते देतात.

कां तपस्वी गतोऽवस्थामिति स्मेराविव स्तनौ ।
वन्दे गौरीघनाश्लेषभवभूतिसितानतौ ॥

[**भावार्थ**—एकदा भगवान् शंकरांनी पार्वतीला गाढ आलिंगन दिलें, तेव्हा त्यांच्या अंगावर चर्चिलेल्या भस्माने पार्वतीचे स्तन शुभ्र झाले.

जणूं काय, 'पहा या तपस्व्याची प्रेमपरवशतेमुळे काय अवस्था झाली आहे' असें ते हसून सांगत होते.]

हा श्लोक ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकांत होऊन गेलेल्या श्रीधरदासाच्या 'सदुक्तिकर्णामृतां'त (१, २२, ५) भवभूतीच्या नांवावर दिला आहे, त्यावरून ही आख्यायिका बरीच प्राचीन दिसते. कांही टीकाकारांच्या मतें श्रीकण्ठ कवीला भवभूति नांव मिळण्याचें कारण

साम्बा पुनातु भवभूतिपवित्रमूर्तिः ।

'भगवान् शंकराच्या भस्माने आलिंगनांत जिचा देह पवित्र झाला आहे अशी अम्बा किंवा पार्वती तुमचें रक्षण करो', अशी सुंदर पंक्ति त्याने रचली हें होय. पण नाटकांतील 'श्रीकण्ठपदलाञ्छनः भवभूतिर्नाम कविः' ह्या शब्द-प्रयोगावरून कवीचें मूळचें नांव भवभूति असून श्री म्हणजे वाग्देवी त्याच्या कंठांत असल्यामुळे त्याला 'श्रीकण्ठ' हें टोपणनांव मिळालें, असें दिसतें. पुढे त्याच्या 'भवभूति' ह्या नांवावरून वरील आख्यायिका उत्पन्न झाल्या असाव्या.

भवभूति व उम्बेक हे एकच काय ?

अलीकडे कांही विद्वानांनी भवभूतीचें उम्बेक असें आणखीहि तिसरें नांव होतें. असें प्रतिपादिलें आहे. याला खालील तीन प्रमाणें दिलीं जातात—

(१) 'मालतीमाधवा'च्या सुमारें ५०० वर्षें जुन्या असलेल्या हस्तलिखितांत तें नाटक उम्बेकाने लिहिलें असा निर्देश आहे. या नाटकाच्या प्रस्तावनेवरून तें भवभूतीने रचलें, यांत संशय नाही. म्हणून भवभूति व उम्बेक एकच.

(२) उम्बेकाने कुमारिलाच्या 'श्लोकवार्त्तिका'वर टीका लिहिली आहे. तिच्या आरंभीं

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां
जानन्तु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।

इत्यादि श्लोक घातला आहे. हाच श्लोक भवभूतीच्या 'मालतीमाधवां'त आला आहे भवभूति आपल्या श्लोकांची स्वतःच्या नाटकांत अनेकदा पुनरुक्ति करतो. म्हणून भवभूति व उम्बेक हे एकच असावेत.

(३) चित्सुखाचार्यांच्या 'तत्त्वप्रदीपिकें'त 'न हि पुरा आप्त एव सन् नाटकनाटिकादिप्रबन्धविरचनमात्रेणानाप्तो भवति भवभूतिः । उक्तं चैतदुम्बेकेन 'यदाप्तोपि कस्मैचिदुपदिशति न त्वयाननुभूतार्थविषयकं वाक्यं प्रयोक्तव्यम्।' या उताऱ्यावरील नयनप्रसादिनी नामक टीकेंत 'भवभूतिरुम्बेकः ।' असें स्पष्ट म्हटलें आहे. त्यावरूनहि भवभूति व उम्बेक हे एकच होत.

ही प्रमाणें बलवत्तर नाहीत. त्यांचें खंडन करणें कठीण नाही.

(१) भवभूतीच्या नाटकांचीं अनेक हस्तलिखितें सापडलीं आहेत. त्यांत वरील एक अपवाद वगळल्यास कोठेहि भवभूति आपलें 'उम्बेक' असें नांव देत नाही. उम्बेकहि आपल्या पूर्वमीमांसेवरील टीकाग्रंथांत आपला 'भवभूति' असा निर्देश करीत नाही. इतरांचा पुरावा काय कामाचा ? शिवाय भवभूतीचें नांव व त्याच्या पूर्वजांचींहि नांवें विदर्भांतील ब्राह्मणांच्या नांवांसारखीं आहेत. याच्या उलट उम्बेक हें नांव द्रविड देशांतील दिसतें. म्हणून भवभूति व उम्बेक हे भिन्न होत.

(२) 'ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां' इत्यादि केवळ एका श्लोकावरून भवभूति व उम्बेक एक होत, असें म्हणणें धाडसाचें आहे. उम्बेक हा जाडा मीमांसक होता. पूर्वमीमांसेच्या अनेक प्रश्नांवर त्याचीं मतें इतरांच्याहून निराळीं होतीं, असें त्याच्या ग्रंथावरून स्पष्ट दिसतें. या कारणास्तव त्याच्या हयातींतच त्याच्या मतांवर टीका झाली असल्यास नवल नाही. तसेंच तो मोठा मानी व स्पष्टवक्ता होता हें शबरस्वामी व कुमारिलभट्ट यांच्या मतांवर त्यानें जी प्रखर टीका केली आहे तिजवरून दिसून येतें. अशा मानी गृहस्थास स्वकालीनांनी केलेला अनादर सहन न होऊन 'माझ्या ग्रंथाचें महत्त्व जाणणारा कोठें तरी असेल किंवा पुढे मागे उत्पन्न होईल. त्याच्याकरता मी लिहीत आहे; तुमच्याकरता नव्हे,' असें आपल्या टीकाकारांस सांगावेसें वाटल्यास नवल नाही. हें आपलें मनोगत

व्यक्त करण्यास भवभूतीचा 'ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्' इत्यादि श्लोक उत्कृष्ट वाटून नवा श्लोक न रचतां त्याने तो उद्धृत केला असल्यास नवल नाही. त्या श्लोकांत भवभूतीचें नांव नसल्याने तो उम्बेकाच्या बाबतींतहि तितकाच अनुरूप होता. संस्कृत ग्रंथकारांनी इतरांचीं वचनें घेतल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. तेव्हा या श्लोकावरून भवभूति व उम्बेक हे एकच हें सिद्ध होत नाही.

(३) चित्सुखाचार्यांच्या ग्रंथांतील वचनांचें बारकाईने वाचन केल्यास भवभूति व उम्बेक हे एक नसून भिन्न होते असेंच त्यांचें मत होतें असें दिसून येईल. ते एक आहेत असें चित्सुखाचार्यांचें मत असतें तर त्यांनी 'उक्तं चैतदुम्बेकेन' (हें उम्बेकाने म्हटलें आहे) असें न म्हणतां, 'उक्तं च तेनैव' (त्यानेच म्हणजे भवभूतीनेच म्हटलें आहे) असें त्यांनी म्हटलें असतें. त्यांच्या टीकाकाराला त्यांच्या शब्दांचा अर्थ नीट न समजल्यामुळे त्याने मात्र भवभूति व उम्बेक एक होत असें म्हटलें आहे. पण त्याला मुळीच आधार नाही.[३]

भवभूतीचें पूर्वमीमांसाज्ञान

भवभूति व उम्बेक हे एक नसले तरी भवभूति उम्बेकासारखाच पूर्वमीमांसाप्रवीण होता यांत संशय नाही. तो विद्वान् श्रोत्रिय कुळांत जन्मला होता. त्याच्या पूर्वजांनी सोमयाग केले होते. ते वेदवेदांगांच्या पठनपाठनांत निरत असत. अशा कुलांत वाढलेला भवभूति पूर्वमीमांसानभिज्ञ असेल असें वाटत नाही. किंबहुना, या बाबतींत अनुमान करण्याचीहि जरूरी नाही. आपल्या नाटकांच्या प्रस्तावनेंत भवभूति स्वतःचें 'पदवाक्यप्रमाणज्ञ' असें वर्णन करतो. यांतील वाक्य या पदाने मीमांसा, विशेषेंकरून पूर्वमीमांसा, अभिप्रेत आहे. कारण पूर्वमीमांसेंत वेदवाक्यांचा अर्थ करण्याचे नियम दिले आहेत. तेव्हा भवभूति हा उम्बेक नव्हे खरा, पण त्या सारखाच तो पूर्वमीमांसेंत पारंगत होता, असें म्हणण्यास हरकत नाही.

---

३ याविषयी सविस्तर विवेचन 'भवभूति आणि उम्बेक' या आमच्या पुढील लेखांत पाहा.

भवभूतीचा गुरु

भवभूतीने परमहंस ज्ञाननिधि नामक संन्याशाजवळ अध्ययन केलें होतें. या आपल्या गुरूचा अत्यंत गौरवपूर्वक उल्लेख त्याने आपल्या नाटकांत येणेप्रमाणे केला आहे.—

श्रेष्ठः परमहंसानां महर्षीणामिवाङ्गिराः ।
यथार्थनामा भगवान् यस्य ज्ञाननिधिर्गुरुः ।।

(महावीरचरित, १, ५.)

'महर्षींमध्ये जसा अंगिरा ऋषि श्रेष्ठ तसा सर्व परमहंसांमध्ये अग्रेसर असलेला व आपल्या नांवाप्रमाणे ज्ञानाचा खरोखरच निधि असलेला ज्ञाननिधि नामक यति या भवभूतीचा गुरु आहे' असें सूत्रधार सांगतो.

भवभूतीचा अनेक शास्त्रांचा अभ्यास

भवभूतीने अनेक शास्त्रांचा व विद्यांचा अभ्यास केला होता, हें त्याच्या ग्रंथांतील प्रत्यक्षाप्रत्यक्ष उल्लेखांवरून समजतें. आपण नाटकें रचलीं तरी पांडित्यांतहि कमी नाही, हें समकालीनांना सांगण्यासाठी तो म्हणतो—

यद्वेदाध्ययनं तथोपनिषदां सांख्यस्य योगस्य च
ज्ञानं तत्कथनेन किं न हि ततः कश्चिद्गुणो नाटके ।

भवभूतीचें कुल श्रोत्रियांमध्ये अग्रगण्य गणलें जात असे. तेव्हा त्याने लहानपणीं वेदाध्ययन केलें असलें तर तें साहजिकच होय. त्याच्या ग्रंथांत वेदविद्येच्या अध्ययनाचें, वैदिक यज्ञांचे व संस्कारांचे, ऋषींच्या आश्रमांचे, त्यांतील मधुपर्कादि विधींचे, वटूंच्या निरागस जीवनक्रमाचे व खेळकर वृत्तीचे जे उल्लेख आले आहेत त्यांवरून भवभूतीची वेदविद्येविषयी आत्मीयता व आदर व्यक्त होतात. त्याच्या नाटकांत अनेक ठिकाणीं त्याच्या वेदवेदांगादिकांच्या अध्ययनाचे पडसाद ऐकूं येतात. उदाहरणार्थ; 'आविर्भूतज्योतिषां ब्राह्मणानां ये व्याहारास्तेषु मा संशयोऽभूत् । भद्रा ह्येषां वाचि लक्ष्मीर्निषक्ता नैते वाचं विप्लुतां व्याहरन्ति । (उत्तररामचरित, ४. १८.) या राजर्षि जनकाच्या उक्तींत 'सक्तुमिव तितउना पुनन्तो यत्र

धीरा मनसा वाचमक्रत । अत्रा सखायः सख्यानि जानते भद्रैषां लक्ष्मीर्निहिताधि वाचि ॥' या ऋचेचा (ऋग्वेद १०, ७१, २) स्पष्ट प्रभाव पडला आहे. 'उत्तररामचरिता'च्या चौथ्या अंकांतील 'ननु मूर्खाः पठितमेव युष्माभिस्तत्काण्डे । किं न पश्यथ प्रत्येकं शतसंख्याः कवचिनो दण्डिनो निषङ्गिणश्च रक्षितारः' इत्यादि लवाचें भाषण 'शतपथब्राह्मणां'तील अश्वमेध यज्ञाच्या अश्वाच्या रक्षणार्थ विहित असलेल्या रक्षकांच्या संख्येविषयीच्या नियमांस अनुसरून आहे. कालिदासादि नाटककारांनी आपल्या नाटकांचे विषय राजेमहाराजांच्या अंतःपुरांतून घेतले होते, पण भवभूतीने ते महर्षींच्या पवित्र आश्रमांतून घेतले आहेत. त्याच्या नाटकांतील मुख्य पात्रें राजे, राण्या वगैरे नसून जनकविश्वामित्रासारखे राजर्षि, वाल्मीकीसारखे महर्षि, गंगा, भूदेवी, तमसा, मुरला इत्यादि देवता यांसारखीं आहेत. 'उत्तररामचरितां'तील वाल्मीकीच्या आश्रमाचें वर्णन केवळ काल्पनिक नसून कवीच्या प्रत्यक्ष निरीक्षणावरून त्यास सुचलेलें दिसतें.

भवभूति उत्तम मीमांसक होता हें मागे सांगितलें आहेच. मीमांसाशास्त्रांतील अर्थवाद ह्या पारिभाषिक संज्ञेचा उपयोग 'अर्थवाद एषः । दोषं तु कञ्चित् कथय येन स प्रतिविधीयेत' या 'उत्तररामचरितां'तील रामचंद्राच्या उक्तींत आला आहे. पूर्वमीमांसेप्रमाणे वेदांतशास्त्राशींहि भवभूतीचा चांगला परिचय होता. परमहंसश्रेष्ठ ज्ञाननिधीजवळ त्याने वेदान्ताचें अध्ययन केलें होतें हें मागे सांगितलें आहेच. उपनिषदांतील अनेक वचनांचें त्याच्या उक्तींत प्रतिबिंब पडलेलें दिसतें. उदाहरणार्थ, अन्धतमिस्रा ह्यसूर्या नाम ते लोकास्तेभ्यः प्रतिविधीयन्ते य आत्मघातिनः इत्येवमृषयो मन्यन्ते ।' ('उत्तररामचरित', अंक ४) या जनकाच्या उक्तींतील विचार व शब्दरचनाहि 'असुर्या नाम ते लोका अन्धेन तमसावृताः । तांस्ते प्रेत्याभिगच्छन्ति ये के चात्महनो जनाः॥' या 'ईशावास्योपनिषदां'तील वचनावरून सुचली आहे. अद्वैतवेदान्तांतील विवर्तवाद भवभूतीनंतर सुमारें एक शतकाने झालेल्या श्रीशंकराचार्यांनी प्रथम प्रस्तुत केला असें सामान्यतः मानलें जातें. पण त्याचें स्पष्ट स्वरूप भवभूतीच्या अनेक उक्तींत दिसून येतें, हें उल्लेखनीय आहे. उदाहरणार्थ, खालील उक्ति पाहा—

शब्दब्रह्मणस्तादृशं विवर्तमितिहासम्', (उत्तररामचरित), 'विद्याकल्पेन मरुता मेघानां भूयसामपि। ब्रह्मणीव विवर्तानां क्वापि विप्रलयः कृतः॥' (उत्तररामचरित, ६, ६.) 'एको रसः करुण एव निमित्तभेदाद् भिन्नः पृथग् पृथगिवाश्रयते विवर्तान्। आवर्तबुद्बुदतरंगमयान् विकारान् अम्भो यथा सलिलमेव तु तत्समग्रम्॥ ('उत्तररामचरित' ३, ४७) यांतील पाणी व बुडबुडे यांचा हाच दृष्टांत श्रीशंकराचार्यांनी 'उपसंहारदर्शनान्नेति चेन्न क्षीरवद्धि' या ब्रह्मसूत्रावरील आपल्या भाष्यांत दिला आहे. तो भवभूतीच्या वरील श्लोकावरूनच त्यांस सुचला असावा, असें म्हणण्यास हरकत नाही.

पूर्व व उत्तर मीमांसेप्रमाणे सांख्य व योग या दर्शनांचाहि भवभूतीने अभ्यास केला होता हें त्याने स्वतःच सांगितलें आहे. त्यांपैकी योगाचे उल्लेख 'षडधिकदशनाडीचक्रमध्यस्थितात्मा' ('मालतीमाधव', ५. १) व 'नित्यं न्यस्तषडङ्गचक्रनिहितं हृत्पद्ममध्योदितं' इत्यादि ('मालतीमाधव', ५. २) कपालकुण्डलेच्या श्लोकांत व 'मम हि संप्रति सातिशयप्राक्तनोपालम्भसम्भावितात्मजन्मनः' इत्यादि माधवाच्या गद्य भाषणांत आले आहेत.

भवभूतीने तन्त्रशास्त्राचा अभ्यास केल्याचा निर्देश 'यद्वेदाध्यनं' इत्यादि श्लोकांत नाही. तथापि अभिनवगुप्ताने आपल्या तन्त्रालोकांत 'दीक्षा, अभिषेक इत्यादिकांशिवाय गुरुत्व येत नाही.' या मताचें खंडन करतांना भवभूतीचा उल्लेख खालील श्लोकांत केला आहे.[४]

असदेतदिति प्राहुर्गुरवस्तत्त्वदर्शिनः।
श्रीसोमानन्दकल्याणभवभूतिपुरोगमाः॥
तथाहि त्रीशिकाशास्त्रविवृतौ तेऽभ्यधुर्बुधाः॥

(तन्त्रालोक, १३, १४९)

त्यावरून भवभूतीचा तन्त्रशास्त्रावर ग्रंथ होता, हें स्पष्ट दिसतें. 'मालतीमाधवां'त (९, ५१) त्याने गुरुचर्या, तपश्चर्या, तन्त्र, मन्त्र, योग इत्यादिकांच्या योगें सिद्धि प्राप्त होते, असें म्हटलें आहे.

---

४ हा उतारा माझे मित्र प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांनी माझ्या नजरेस आणून दिला.

मीमांसा, वेदान्त, सांख्य, योग इत्यादि तर्ककर्कश शास्त्रांप्रमाणे अर्थशास्त्र व कामशास्त्र यांचाहि चांगलाच परिचय भवभूतीस होता, यांत संशय नाही. 'महावीरचरिता'च्या दुसऱ्या व चवथ्या अंकांत माल्यवान् व शूर्पणखा रामचंद्राच्या नाशाकरता विविध युक्त्या योजतात त्यांत भवभूतीचें अर्थशास्त्रज्ञान दिसून येतें. या संदर्भांत त्याने 'उत्साहशक्ति', 'धर्मविजयी' 'प्रकृतिकोप', 'आभिगामिक गुण', 'संघवृत्ति' इत्यादि अर्थशास्त्रांतील पारिभाषिक संज्ञा योजिल्या आहेत.

अर्थशास्त्राप्रमाणे कामशास्त्राचाहि आपल्या कवीने बारकाईने अभ्यास केला होता यांत संशय नाही. 'मालतीमाधवां'त कामन्दकीच्या भाषणांत 'यस्यां मनश्चक्षुषोरनुरागः तस्यामृद्धिः' (ज्या स्त्रीविषयीं मन व नेत्र यांमध्ये अनुराग उत्पन्न होतो तिच्याच योगें समृद्धि प्राप्त होते) असें वचन अंगिरस ऋषीचें म्हणून उद्धृत् केलें आहे. तें त्या ऋषीच्या कामसूत्रांतून घेतलें असावें. त्याच नाटकाच्या सातव्या अंकांतील बुद्धरक्षितेच्या भाषणांत तर 'कुसुमसधर्माणो हि योषितः सुकुमारोपक्रमाः। तास्त्वनभिगतविश्वासैः प्रसभमुपक्रम्यमाणाः सम्प्रयोगविद्वेषिण्यो भवन्ति' असा वात्स्यायनाच्या 'कामसूत्रां'तील (३, २, ६) उतारा आला आहे. 'मालतीमाधवां'तील नाट्यगुणांचा निर्देश करतांना कवीने सूत्रधाराच्या तोंडीं 'औद्धत्यमायोजितकामसूत्रम्' असे शब्द घातले आहेत व त्यायोगें आपण त्या नाटकांत कामसूत्रांतील नायकनायिकांच्या परस्परानुनयाविषयीच्या सूचना अनुसरल्या आहेत असें ध्वनित केलें आहे. आणि खरोखरीच मालती, लवंगिका व कामन्दकी यांचे प्रवेश लिहितांना भवभूतीच्या पुढे 'वात्स्यायनकामसूत्रा'च्या तिसऱ्या अधिकरणांतील पांचवा अध्याय होता, असें दिसतें. कारण त्यांतील सूचना त्याने अगदी तंतोतंत अमलांत आणल्या आहेत. तसेंच या संबंधांत आलेल्या 'निसृष्टार्थदूती' सारख्या पारिभाषिक संज्ञाहि योजिल्या आहेत. या सर्वांवरून भवभूतीचा कामशास्त्राचा अभ्यास व्यक्त होतो.

याशिवाय 'महावीरचरितां'त प्रसंगाने यकृत्, क्लोम, वृक्क, स्नायु, धमनि, प्लीह इत्यादि आयुर्वेदिक पारिभाषिक संज्ञांचा, तसेंच असाध्य रोग

शरीरांतून काढून टाकण्याकरिता वैद्याला क्वचित् प्रसंगीं कराव्या लागणाऱ्या शस्त्रक्रियेचाहि उल्लेख आला आहे. त्यावरून भवभूतीचें आयुर्वेदाचेंहि ज्ञान अनुमानितां येतें.

रसिक कवि व नाटककार

भवभूति हा केवळ पढिक पंडित नव्हता तर अत्यंत रसिक असा श्रेष्ठ कवि व नाटककार होता. केवळ पांडित्याचा नाटकनिर्मितींत कांही उपयोग नाही. त्याकरिता वाणीची प्रौढता तसेंच अर्थगौरव हे गुण आवश्यक आहेत हें त्यानें स्वतःच सांगितलें आहे—

यत्प्रौढित्वमुदारता च वचसां यच्चार्थतो गौरवं
तच्चेदस्ति ततस्तदेव गमकं पाण्डित्यवैदग्ध्ययोः ।।

'मालतीमाधव', १-७.

त्याच्या नाटकांत विविध रसांचे प्रयोग, सुंदर घटना, वाग्वैचित्र्य इत्यादि गुण आढळतील, असें सूत्रधार सांगतो तें खोटें नाही. त्याचें संस्कृत भाषेवरील प्रभुत्व असामान्य होतें. 'उत्तररामचरितां'त म्हटल्याप्रमाणे (यं ब्रह्माणमियं देवी वाग्वश्येवानुवर्तते) देवी सरस्वती त्याला सर्वस्वी वश होती. म्हणून वीर, शृंगार, तसेंच करुण या विविध रसांतील त्याची नाटकरचना सारखीच यशस्वी झाली आहे.

भवभूतीचे उदात्त विचार

भवभूतीचे कुटुंबविषयक विचार अत्यंत उदात्त होते, हें त्याच्या ग्रंथांवरून स्पष्ट आहे. त्याचे सर्व नायक एकपत्नीव्रत पाळणारे आहेत. पति व पत्नी यांचे परस्पर संबंध कसे असावेत हें त्यानें खालील श्लोकांत ('मालतीमाधव', ६, १८) सांगितलें आहे—

प्रेयो मित्रं बन्धुता व समग्रा सर्वे कामाः शेवधिर्जीवितं वा ।
स्त्रीणां भर्ता धर्मदाराश्च पुंसामित्यन्योन्यं वत्सयोर्ज्ञातमस्तु ।।

'पति व पत्नी हे परस्परांचे प्रिय मित्र, बान्धव, इष्टार्थ, धनदौलत, किंबहुना साक्षात् प्राण आहेत,' अशी कौटुंबिक प्रेमाची अत्यंत उदात्त कल्पना त्यानें आपल्या ग्रंथांत मांडली आहे.

भवभूतीचा स्वभाव

भवभूति हा गंभीर वृत्तीचा व तापट स्वभावाचा होता, असें त्याच्या ग्रंथांवरून दिसतें. त्याच्या एकाहि नाटकांत विदूषकाचें पात्र नाही. तो स्वतः वेदविद्यारत अशा श्रोत्रिय कुलांत जन्मला असल्यामुळे विदूषका-सारख्या खादाड ब्राह्मणब्रुवाला रंगभूमीवर आणून ब्राह्मणवर्गाविषयी प्रेक्षकांत हशा व तिरस्कार उत्पन्न करणें हें त्याला योग्य वाटलें नसावें. म्हणून तत्पूर्वीच्या नाटकांत सदैव आढळणारा विदूषक त्याने बुद्धि-पुरस्सर गाळलेला दिसतो. तथापि त्याला उच्च दर्जाचा विनोद आवडत नव्हता, असें नाही. त्याचीं कांही उदाहरणें त्याच्या नाटकांत आलीं आहेत. 'उत्तररामचरितां'तील चित्रदर्शन प्रवेशांत लक्ष्मण सीतेला मिथिलेंतील विवाहप्रसंगाचीं चित्रें दाखवीत होता. सीता व भरतपत्नी मांडवी यांच्या नंतर त्या ठिकाणीं त्याची पत्नी उर्मिला हिचें चित्र काढलें होतें. पण तें न दाखवतां तो तिच्यानंतरच्या शत्रुघ्नभार्या श्रुतकीर्तीच्या चित्राकडे वळला. तेव्हा सीता हसून म्हणते 'वत्स इयमपरा का ?' 'तुम्ही ही मधली स्त्री कोण तें सांगितलें नाही. कोण बरें ही ?' या प्रसंगींचा विनोद विदग्ध प्रेक्षकांनाच समजण्यासारखा व रुचण्यासारखा आहे. याच्या उलट त्याच नाटकाच्या चौथ्या अंकांत वाल्मीकीच्या आश्रमांतील बटूंच्या संभाषणांत त्यांनी प्रथमच पाहिलेल्या घोड्याच्या खालील वर्णनांतील निरागस विनोद सर्वांनाच हसविणारा आहे—

> **पश्चात्पुच्छं वहति विपुलं तच्च धूनोत्यजस्रं**
> **दीर्घग्रीवः स भवति खुरास्तस्य चत्वार एव ।**
> **शष्पाण्यत्ति प्रकिरति शकृत्पिण्डकानाम्रमात्रान्**
> **किं व्याख्यातैर्व्रजति स पुनर्दूरमेह्येहि यामः ॥**

'उत्तररामचरित,' ४, २६.

भवभूति हा जाडा पंडित, सदाचरणी, उदात्त विचारांचा व गंभीर स्वभावाचा होता. तो ज्या श्रोत्रिय कुलांत जन्मला होता तें त्या कालांत सुसंपन्न गणलें जात असावें, कारण तें आपलें धन यज्ञयागादिकांच्या अनु-

ष्ठानांत, तसेंच वापी, कूप, आराम, अन्नसत्रें इत्यादि पूर्त किंवा लोकोपयोगी कृत्यांत खर्च करीत असे, हें खालील वर्णनावरून दिसतें—

ते श्रोत्रियास्तत्त्वविनिश्चयाय भूरि श्रुतं शाश्वतमाद्रियन्ते ।
इष्टाय पूर्ताय च कर्मणेऽर्थान् दारानपत्याय तपोऽर्थमायुः ॥

'मालतीमाधव,' १, ५.

स्वकालीनांविषयीं तुच्छता

अशा विद्वान्, सदाचरणी, परोपकाररत व संपन्न कुलांत जन्मलेल्या व स्वतःमध्ये विद्वत्व, कवित्व, रसिकत्व इत्यादि गुण असलेल्या भवभूतीच्या स्वभावांत अहंकार उत्पन्न झाला नसता तरच नवल. आपण जसें विद्वत्तेंत श्रेष्ठ तसेंच साहित्यनिर्मितींतहि सर्वोत्तम गणलें जावें अशी त्याची महत्त्वाकांक्षा होती. म्हणून त्यानें आपल्या 'महावीरचरिता'चे पहिले पांच अंक रचून ते स्वकाळीं विद्वानांना व रसिकांना परीक्षणार्थ दिले. भवभूति विविधशास्त्रपारंगत होता. त्याची कवित्वशक्ति तसेंच निरीक्षणशक्तिहि उच्च दर्जाची होती. पण त्याला कविकुलगुरु कालिदासाच्या तोडीचा मानणें शक्य नव्हतें. रसिकांनी त्याच्या त्या नाटकाला कमी प्रतीचें लेखलें, आणि त्याच्या कृतींतील अनेक दोष दाखवून त्याचा पाणउतारा केला. तेव्हा स्वाभिमानी भवभूतीच्या अंगाचा तिळपापड झाला. तो म्हणाला—

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां
जानन्तु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

'मालतीमाधव', १, ६.

'जे अहंमन्य लोक आमची अवज्ञा लोकांत करीत आहेत ते कितीहि विद्वान् असोत. त्यांच्याकरिता मी हें नाटक लिहिलें नाही. माझ्याशी समान धर्म असलेला कोणी रसिक पुढे मागे उत्पन्न होईल असा मला भरवसा आहे. कारण काल अनंत आहे. कदाचित् असा रसिक

सध्याहि कोठेतरी विद्यमान असेल. कारण पृथ्वी विशाल आहे. असे रसिकच माझ्या कृतीचें योग्य मूल्यमापन करूं शकतील.'

भवभूतीने क्रोधाच्या आवेशांत महावीरचरित अर्धेंच टाकून दिलें. 'या अहंमन्य शास्त्राभ्यासजड अशा पंडितांची संगत नको', असें म्हणून तो घर सोडून उत्तरेंत निघून गेला. 'महावीरचरिता'च्या पांचव्या अंकांतील ४६ व्या श्लोकानंतरचा भाग व त्यापुढील सहावा व सातवा हे अंक भवभूतीचे नसून ते सुब्रह्मण्य नामक कोणा दुसऱ्या कवीने रचले होते, असें 'महावीरचरिता'चा टीकाकार वीरराघव सांगतो. (एतावत्येव भवभूतेः सूक्तिः । इतः परन्तु सुब्रह्मण्यनाम्नः कस्यचित्कवेर्वचः इति मूल एव स्फुटीभविष्यति ।) महावीरचरिताच्या बहुतेक दक्षिणी हस्तलिखितांत पांचव्या अंकांतील ४६ श्लोकापर्यंतचाच भाग आहे. तसेंच उत्तरेंतील सर्वांत महत्त्वाच्या हस्तलिखितांतहि त्या श्लोकानंतर 'एतावद्भवभूतेः । अग्रे कविनायकविनायकभट्टैरपूरि' (एथपर्यंतचा भाग भवभतीचा. या पुढील भाग कविश्रेष्ठ विनायक भट्ट यांनी लिहून हें नाटक पूर्ण केलें) असें म्हटलें आहे. उत्तरेंतल्या कांही हस्तलिखितांतहि इतकाच भाग असतो सुब्रह्मण्य व विनायक भट्ट यांनी लिहिलेल्या भागांत पुष्कळ फरक आहे.[५] त्यावरून भवभूतीने हें नाटक पुरें केलें नसावें. पुढे कांही कालानंतर त्याने प्रस्तावनेचा कांही भाग नवीन रचून आपल्या इतर नाटकांप्रमाणे कालप्रियनाथाच्या यात्रेंत त्याचा प्रयोग करविला असावा, असें वाटतें. महावीरचरिताच्या चिकित्सक आवृत्तीचे संपादक प्रो. तोडरमल्ल यांचेंहि अनेक हस्तलिखितें पाहिल्यावर असेंच मत झालें होतें.

भवभूतीचा टीकाकारांवरचा रोष दीर्घकाल टिकला. 'मालतीमाधव' नाटक रचल्यानंतर त्याला रसिक समाजांत चांगलाच मान मिळाला असला पाहिजे. तरीहि 'उत्तररामचरितां'तील प्रस्तावनेंत (१, ५) 'यथा स्त्रीणां

---

५. याविषयी सविस्तर विवेचन तोडरमल्लांची 'महावीरचरिता'ची आवृत्ति व सुशीलकुमार दे यांचा इंडियन अॅंटिक्वरी, पु. ५९, मधील एतद्विषयक लेख यांत मिळेल.

तथा वाचां साधुत्वे दुर्जनो जनः।' (जसें स्त्रियांच्या पातिव्रत्याच्या बाबतींत तसेंच वाङ्मयाच्या गुणांविषयीहि लोक दुष्टपणानें वागतात) अशी कोपरखळी आपल्या टीकाकारांस मारल्याशिवाय त्याला राहवेना.

पद्मावतीस निर्याण

क्रोधाच्या आवेशांत भवभूति पद्मपुराहून निघाला तो तडक मध्यभारतांतील पद्मावती नगरीस गेला. तेथे ज्ञाननिधि नामक यति आपल्या नांवाप्रमाणेच ज्ञानाचा निधि म्हणून सुविख्यात झाला होता. त्याच्या जवळ भवभूतीने वेदान्ताचें अध्ययन केलें असावें. मालतीमाधवांतील नायक माधव हा विदर्भाच्या मंत्र्याचा मुलगा असून पद्मावतींत आन्वीक्षिकी विद्येच्या (अध्यात्मविद्येच्या) अभ्यासाकरिता राहिला होता, असें दाखविलें आहे. यांत कवीच्या स्वतःच्या चरित्रांतील कांही भाग प्रतिबिंबित झाला आहे, असें मानण्यास हरकत नाही.

पद्मावतीचा इतिहास

पद्मावती ही नगरी फार प्राचीन काळापासून नाग राजांची राजधानी व विद्येचें माहेरघर म्हणून सुप्रसिद्ध होती. तिचें आता पवाया किंवा पदम पवाया नामक लहानशा खेडयांत रूपांतर झालें आहे. हें पवाया मध्यभारतांत ग्वाल्हेरच्या नैऋत्येस ४२ मैलांवर आहे. तेथील उत्खननावरून तेंच प्राचीन पद्मावती, याविषयी संशय राहिला नाही.

पवायास सापडलेल्या कांही नाण्यांवरून पद्मावती नगरी खिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत अस्तित्वांत होती असें दिसतें. त्यानंतर खिस्तोत्तर पहिल्या शतकांत शिवनंदी नामक नागराजा तेथे राज्य करीत होता ही माहिती तेथे सापडलेल्या मणिभद्र यक्षाच्या मूर्तीच्या पीठावर कोरलेल्या लेखावरून मिळते. पुराणांत ' नव नागास्तु भोक्ष्यन्ति पुरीं पद्मावतीं नृपाः। (नऊ नाग राजे पद्मावतीस राज्य करतील) असें म्हटलें आहे. त्यांचीं नांवें पुराणांत आलीं नाहीत, पण पवायास व त्याच्या सभोवारच्या भागांत सापडलेल्या नाण्यांवरून महाराज भीमनाग, स्कन्दनाग, बृहस्पतिनाग, देवनाग, विभुनाग इत्यादि नाग राजांचीं नांवें माहीत झालीं आहेत. हे

राजे भारशिव वंशाचे होते. आपल्या कोणा पूर्वजाने शिवलिंग सदैव स्वतः-च्या स्कंधावर धारण केल्यामुळे संतुष्ट झालेल्या भगवान् शंकराने त्याला राज्यपद दिलें, अशी त्यांची श्रद्धा होती. तिचा उल्लेख कोरीव लेखांत येतो. खिस्तोत्तर पहिल्या दुसऱ्या शतकांत कुशाणांचें राज्य उत्तर भारताच्या बऱ्याच मोठया प्रदेशावर पसरलें होतें. या परकी राजांना पिटाळून लावून आपल्या मातृभूमीला दास्यांतून मुक्त करण्यांत ज्या भारतीय राजांनी पुढाकार घेतला त्यांमध्ये पद्मावतीचे नाग राजे प्रमुख होते. ते वैदिक धर्मांचे व संस्कृतीचे कट्टे पुरस्कर्ते होते. त्यांनी दहा अश्वमेध करून सर्वत्र आपली सत्ता पसरविली होती. तसेंच भागीरथीपर्यंतचा प्रदेश शौर्याने पादाक्रांत करून मिळविलेल्या पवित्र जलाने स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला होता. खिस्तोत्तर तिसऱ्या शतकाच्या अखेरीस भवनाग नामक बलाढय राजा पद्मावतीस राज्य करीत होता. त्याचीं कांही नाणीं त्या भागांत सापडलीं आहेत.[६] याच कालांत विदर्भांत वाकाटकांचा उदय होऊन विंध्यशक्तीचा पुत्र प्रथम प्रवरसेन याने चार अश्वमेध करून दक्षिण भारतांत आपली सत्ता दृढ केली होती. उत्तरेंतील भवनाग राजाने वाकाटक प्रवरसेनाच्या गौतमीपुत्र नामक मुलास आपली मुलगी देऊन उत्तर–दक्षिण भारतांत नाग–वाकाटक यांची संयुक्त फळी (axis) स्थापण्याचा प्रयत्न केला. तो कांही काळ यशस्वी झाला. पण पुढे महाप्रतापी समुद्रगुप्तापुढे नागराजांना हात टेकावे लागले. समुद्रगुप्ताच्या प्रयागप्रशस्तींत त्याने उच्छेद केलेल्या राजांची नामावलि दिली आहे. तींत पद्मावतीच्या नाग-सेनाचा निर्देश आहे. या नागराजाचें राजकारण त्याच्या प्रासादांतील मैनेने बाहेर फोडलें. त्यामुळे त्याचा नाश झाला अशी आख्यायिका बाणाने आपल्या 'हर्षचरितां'त (निर्णयसागर प्रत, पृ. १९८) दिली आहे.

गुप्तकालांत नागराजांचा उच्छेद झाला तरी पद्मावतीचें महत्त्व नष्ट झालें नाही. त्यानंतर निदान तीनचार शतकें तरी तें विद्येचें केंद्र म्हणून सुविख्यात झालें होतें. तेथे विदर्भासारख्या दूरदूरच्या प्रदेशांतून विद्याध्यय-

---

६. ज. न्यू. सो. इं., पु. १२, पृ. १११.

-नार्थ विद्यार्थी येत असत, असें दिसतें. खिस्तोत्तर अकराव्या शतकापर्यंत -तें तेथील देवालयें, विहार, उद्यानें, उत्तुंग प्रासाद व सुंदर युवति यांच्या योगें सुविख्यात झालें होतें, असें संस्कृत वाङ्मयांतील व कोरीव लेखांतील -त्यांच्या वर्णनावरून दिसतें.

धाराधीश भोजाच्या सरस्वतीकण्ठाभरणांतील (२, २२४) पद्मावती -नगरी, तिच्या जवळच्या नद्या, पर्वत व उपवनें यांचें वर्णन पाहा---

पुरः पाराऽपारा तटभुवि विहारः पुरवरं
ततः सिन्धुः सिन्धुः फणिपतिवनं पावनमतः ।
तदग्रे तूदग्रो गिरिरिति गिरिस्तस्य पुरतो
विशाला शालाभिर्ललितललनाभिर्विजयते ।

'ही पुढे जिला उतार नाही अशी पारा नदी दिसत आहे; तिच्या -तीरावर विहार व नंतर उत्कृष्ट नगर आहे. नंतर सागरासारखी सिन्धुनदी -व पुढे नागराजाचें पवित्र उपवन दिसत आहे. त्याच्या पुढे गिरि नांवाचा -पर्वत आहे आणि त्याच्या समोर विशाल पद्मावती नगरी सुंदर स्त्रियांच्या योगें शोभत आहे.'

खजूराहो येथील विक्रम संवत् १०५८ (इ. स. १०००-१००१) -च्या शिलालेखांत पद्मावतीचें वर्णन पुढीलप्रमाणे केलें आहे.[७]

आसीदप्रतिमा विमानभवनैराभूषिता भूतले
लोकानामधिपेन भूमिपतिना पद्मोत्थवंशेन या ।
केनापीह निवेशिता कृतयुगत्रेतान्तरे श्रूयते
सच्छास्त्रे पठिता पुराणपटुभिः पद्मावती प्रोच्यते ॥
सौधोत्तुङ्गपतङ्गलङ्घनपथप्रोत्तुङ्गमालाकुला
शुभ्राभ्रंकषपाण्डुरोच्चशिखरप्राकारचित्राम्बरा ।
प्रालेयाचलशृङ्गसन्निभशुभप्रासादसद्मावती
भव्या पूर्वमभूदपूर्वरचना या नाम पद्मावती ॥

---

७ एपिग्राफिया इंडिका, पु. १, पृ. १४८.

त्वङ्गत्तुङ्गतुरंगमोद्‌गमखुरक्षोदाद्रजः प्रोद्धतं
यस्यां जीर्णकठोरवस्त्रमकरोत्कूर्मोदराभं नभः ।
मत्तानेककरालकुम्भिकरटप्रोत्क ˘ ¯ ष्टाद्‌भुतं
युक्तं कर्दममुद्रया क्षितितलं तां ब्रूत किं संस्तुमः ॥

[उत्तुंग प्रासादांनी सुशोभित झालेली, पद्मवंशांतील कोणा राजानें कृतयुग व त्रेतायुग यामधील काळांत स्थापिलेली व पुराण शास्त्रज्ञांनी जिचें वर्णन केलें आहे अशी अप्रतिम पद्मावती नामक नगरी होती.

ज्या नगरींत सूर्याच्या आकाशांतील मार्गाइतक्या उत्तुंग सौधांची रांग लागून राहिली होती, जिच्या गगनचुंबी शुभ्र शिखरांच्या तटांनी आकाश चित्रविचित्र दिसत असे, जिच्या मध्ये हिमालयाच्या शिखरांसारखे उत्तुंग मंगल प्रासाद (देवालयें) होतीं व जी अत्यंत भव्य व अपूर्व रचनेची होती अशी ती पद्मावती नगरी होती.


ज्या नगरींतील दौडणाऱ्या उंच घोड्यांच्या टापांनी उडवलेल्या धुळीच्या योगें आकाशाला जीर्ण व जाड वस्त्राचें अस्तर उत्पन्न होऊन तें कासवाच्या पोटासारखें दिसूं लागते असे व जिच्यांतील अनेक मत्त व भीषण आकाराच्या हत्तींच्या गंडस्थलांतून वाहणाऱ्या मदानें पृथ्वीतलावर चिखल होत असे अशी ती नगरी होती. तिचें आम्ही कसें वर्णन करावें सांगा.]

भवभूतीच्या नाटकांतील पद्मावतीविषयक उल्लेख

भवभूतीचा बराच काळ पद्मावती नगरींत गेला असावा. त्याच्या 'मालतीमाधवां'तील कथानक या नगरींत घडलें असें दाखविलें असून त्याच्या अनुषंगानें तेथील नद्या, देवालयें, वाडे यांचा उल्लेख व वर्णन आलें आहे.[८] पद्मावती ही पारा व सिंधु यांच्या संगमावर वसली होती. याचा उल्लेख 'मालतीमाधवा'च्या चौथ्या अंकांतील माधवाच्या पुढील भाषणांत आला आहे—

---

८ यासोबतचा नकाशा पाहा.



भवभूतिकालीन पद्मावती

तदुत्तिष्ठ । पारासिन्धुसम्भेदमवगाह्य नगरीमेव प्रविशाव: ।

(चल तर, पारा व सिंधु नद्यांच्या संगमावर स्नान करून पद्मावती नगरींत प्रवेश करूं.)

सध्या या नद्यांना सिंध व पार्वती अशीं नांवें आहेत. पवायाच्या नैऋत्येस सुमारें दोन मैलांवर सिन्धु नदीच्या जलप्रपाताने सदैव निनादित होणारें रम्य स्थल आहे. तेथे नंतर धूमेश्वर नामक मंदिर ओरछाचा राजा वीरसिंहदेव याने बांधलेलें अद्यापि सुस्थितींत आहे. येथील जलप्रपाताचें सुंदर वर्णन मालतीमाधवाच्या नवव्या अंकांत सौदामिनीच्या भाषणांत आलें आहे—

अयमसौ भगवत्या: सिन्धोर्दारितरसातलस्तटप्रपात: ।
यत्रत्य एष तुमुलो ध्वनिरम्बुगर्भ-
गम्भीरनूतनघनस्तनितप्रचण्ड: ।
पर्यन्तभूधरनिकुञ्जविजृम्भमाणो
हेरम्बकण्ठरसितप्रतिमानमेति ।।

—मालतीमाधव, ९, ३.

(हा पाहा पवित्र सिन्धु नदीचा पृथ्वीतलाला फोडून जाणारा धबधबा ! या ठिकाणचा वर्षाकालीं पाण्याने भरलेल्या नव मेघांच्या गंभीर गर्जनेप्रमाणे प्रचण्ड व भयंकर आवाज सभोवारच्या पर्वतांच्या लतागृहांत विस्तार पावून गणपतीच्या गर्जनेप्रमाणे भासत आहे.)

तसेंच तिच्या भाषणांतील पद्मावतीच्या ऐश्वर्याचें वर्णन पाहा—

पद्मावती विमलवारिविशालसिन्धु-
पारासरित्परिकरच्छलतो बिभर्ति ।
उत्तुङ्गसौधसुरमन्दिरगोपुराट्ट-
संघट्टपाटितविमुक्तमिवान्तरिक्षम् ।।

—मालतीमाधव, ९. २.

(ही पद्मावती नगरी सभोवारच्या स्वच्छ जलाच्या व विशाल अशा सिन्धु व पारा नद्यांच्या रूपाने आपले उत्तुग प्रासाद, देवालयें, गोपुरें व गच्चीवरील विलासगृहें यांच्यामुळे फाटून खाली पडलेलें आकाशच जणू काय धारण करीत आहे.)

पवायाच्या पूर्वेस तीन मैलांवर सिन्धु व मधुमती (सध्याची मद्दुवार) या नद्यांचा संगम आहे. तेथे सुवर्णबिन्दु नामक शिवालय होतें. त्याचाहि उल्लेख 'मालतीमाधवा'च्या त्याच नवव्या अंकांत सौदामिनीच्या भाषणांत आला आहे —

अयं च मधुमतीसिन्धुसम्भेदपावनो भगवान् भवानीपतिरपौरुषेयप्रतिष्ठः सुवर्णबिन्दुरित्याख्यायते ।

(हें मधुमती व सिन्धु यांच्या संगमावरील पवित्र असें भगवान् शंकराचें स्वयंभू लिंग सुवर्णबिन्दु या नावाने प्रसिद्ध आहे.)

सिंधु व मधुमती यांच्या संगमाजवळ अद्यापि एक चौथरा असून त्यावर शिवलिंग दिसतें. हेंच प्राचीन सुवर्णबिन्दु शिवालयाचें स्थान यांत संशय नाही. त्याच्याहि पूर्वेस प्राचीन लवणा (सध्याची नून) नदी आहे तिचाहि उल्लेख सौदामिनीने खालील श्लोकांत केला आहे—

सैषा विभाति लवणा ललितोर्मिपङ्क्ति-
र्यस्यागमे जनपदप्रमदाय यस्याः ।
गोगर्भिणीप्रियनवोलपमालभारि-
सव्योपकण्ठविपिनावलयो विभान्ति ।।

—मालतीमाधव, ९–२.

(ही सुंदर लाटांची लवणा नदी शोभत आहे. वर्षाकालाच्या आरंभीं गर्भिणी गाईंना विशेष आवडणाऱ्या नूतन तृणाने युक्त अशी हिच्या काठचीं कुरणें—ज्यांमध्ये येथील लोक विहार करतात तीं—सुंदर दिसत आहेत.)

याप्रमाणे पद्मावतीच्या आसमंताद्भागाचें बारीक वर्णन भवभूतीच्या 'मालतीमाधवां'त आलें आहे. त्यावरून त्या नगरीवर त्याचें चांगलेंच प्रेम होतें व तेथे तो बराच काल राहिला होता यांत संशय नाही.*

कालप्रियनाथाचा शोध

'मालतीमाधवां'त पद्मावतीच्या आसमंताद्भागाचें बारीक वर्णन आलें असल्यामुळे भवभूतीने तें नाटक तेथे असतांना रचलें असावें असें अनुमान करण्यास हरकत नाही. तथापि त्याचा पहिला प्रयोग पद्मावतीस न होतां कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगीं झाला असें दिसतें. त्या नाटकाच्या प्रस्तावनेंत सूत्रधार म्हणतो—'मारिष, सुविहितानि रङ्गमङ्गलानि, संनिपतितश्च भगवतः कालप्रियनाथस्य यात्राप्रसङ्गेन नानादिगन्तवास्तव्यो महाजनसमाजः। आदिष्टश्चास्मि विद्वज्जनपरिषदा यथा केनचिदपूर्वप्रकरणेन वयं विनोदयितव्या इति।' (मारिषा, रंगभूमीचीं मंगलकृत्यें उत्तम रीतीने पार पडलीं आहेत. भगवान् कालप्रियनाथाच्या यात्रेच्या निमित्ताने भिन्न भिन्न देशांतील अनेक लोक येथे आले आहेत. तेव्हा विद्वज्जनसभेने मला आज्ञा केली आहे की एखाद्या नवीन नाटकाने आमचें मनोरंजन करावें.)

'महावीरचरित' व 'उत्तररामचरित' या नाटकांच्या प्रस्तावनांतहि तीं नाटकें कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगींच प्रथम रंगभूमीवर आल्याचा निर्देश आहे. पण तो वरील निर्देशाच्या मानाने त्रोटक आहे. 'महावीरचरित' हें नाटक भवभूतीने विदर्भांत रचलें असावें हें मागे दाखविलें आहे. तें विद्वज्जनांस पसंत पडलें नसल्यामुळे भवभूतीने अर्धेंच टाकलें होतें. पुढे 'मालतीमाधवा'च्या योगाने त्याची कीर्ति पसरल्यावर त्याने 'महावीरचरिता'चाहि प्रयोग कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगीं करविला असावा. तथापि तेथील यात्रेंत रंगभूमीवर आलेलें तें भवभूतीचें पहिलें नाटक नव्हतें.

---

* याविषयी ग्वाल्हेरच्या पुरातत्त्वखात्याचे माजी संचालक श्री. मो. ब. गर्दे यांच्या आर्किऑलॉजिक सर्व्हे रिपोर्ट, सन १९१५–१६ मधील लेख पाहा.

म्हणून त्यांतील, तसेंच 'उत्तररामचरित' या भवभूतीच्या शेवटच्या नाटकांतीलहि, कालप्रियनाथाच्या यात्रेचें वर्णन त्रोटक रूपाने आलें आहे.

हीं तीनहि नाटकें राजाश्रयाने रंगभूमीवर आलीं नव्हतीं. त्यांत एकाहि राजाच्या सभेचा उल्लेख नाही. उलट त्यांचा प्रयोग व्हावा म्हणून भवभूतीला तीं नटांच्या स्वाधीन करावीं लागलीं असें 'मालतीमाधवां'तील सूत्रधाराच्या खालील उक्तीवरून दिसतें. 'भट्टश्रीकण्ठपदलाञ्छनो भवभूतिर्नाम कविर्निसर्गसौहृदेन भरतेषु स्वकृतिमेवंप्रायगुणभूयसीमस्माकमर्पितवान् ।' 'महावीरचरितां'तहि 'जातूकर्णीचा पुत्र भवभूति हा कवि आमचा मित्र आहे' (भवभूतिर्नाम जातूकर्णीपुत्रः कविर्मित्रधेयमस्माकम् ।) असें सूत्रधार मोठ्या आढ्यतेने सांगतो. प्राचीन काळी नटांना समाजांत मानमान्यता नसे. त्यांना 'जायाजीव' असें म्हणत. न्यायालयांत त्यांची साक्ष चालत नसे. ऋषि, महर्षि त्यांचें मुखावलोकन करण्याचेंहि टाळत असत. अशा भरतांचा स्नेह राजाश्रयाच्या अभावीं भवभूतीला आपला सर्व अहंकार बाजूला ठेवून संपादन करावा लागला. आणि त्यांच्या साहाय्याने आपलीं नाटकें रंगभूमीवर आणावीं लागलीं.

ज्या कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगीं भवभूतीच्या नाटकांचे प्रथम प्रयोग झाले, त्याचें देवालय कोठे होतें याविषयी प्राचीन टीकाकार कांही माहिती देत नाहीत.[१] त्या नाटकांचे आधुनिक टिप्पणकार कालप्रियनाथ हा उज्जयिनीचा महाकाल होय असें म्हणतात. कालिदासाप्रमाणे भवभूतिहि शिवोपासक होता असा समज असल्यामुळे हें मत विद्वन्मान्य झालें आहे. पण तें बरोबर वाटत नाही. उज्जयिनीच्या महाकालाचा उल्लेख व वर्णन अनेक पुराणांत आलें आहे, पण कोठेहि त्याला कालप्रियनाथ म्हटलें नाही. भवभूति हा शिवोपासक होता असेंहि दिसत नाही; नाही तर कालिदासाप्रमाणे त्याने आपल्या प्रत्येक नाटकाच्या आरंभीं शिव-

---

१ याविषयी सविस्तर विवेचन आमच्या 'संशोधनमुक्तावलि, सर १' या ग्रंथांतील 'भवभूतीच्या नाटकांतील कालप्रियनाथ' (पृ. ९५–१०३) या लेखांत पाहा.

स्तुतिपर नान्दी घातली असती. पण तसा प्रकार नाही. भवभूतीने फक्त ‘मालतीमाधवां’त आरंभीं गणपतीच्या विनोदमय वर्णनानंतर शिवस्तुतिपर श्लोक घातला आहे. ‘महावीरचरिता’च्या नांदींत स्वयंभू नित्य चैतन्य ज्योतीला म्हणजे ब्रह्माला व ‘उत्तररामचरितां’त पूर्वसूरींना नमन केलें आहे. तेव्हा तो शिवोपासक होता. असें दिसत नाही.

‘भविष्यपुराण’, ‘वराहपुराण’, ‘स्कन्दपुराण’ इत्यादि पुराणांत कुष्ठरोगपीडित कृष्णपुत्र साम्बाची कथा आली आहे. त्यावरून प्राचीन काळीं उत्तर भारतांत भगवान् सूर्याचीं तीन पवित्र स्थानें होतीं असें दिसतें—

> **साम्बः सूर्यप्रतिष्ठां च कारयामास तत्त्ववित् ।**
> **उदयाचले च संश्रित्य यमुनायाश्च दक्षिणे ॥**
> **मध्ये कालप्रियं देवं मध्याह्ने स्थाप्य चोभयम् ।**
> **मूलस्थानं ततः पश्चाद् अस्तमानाचले रविम् ।**
> **स्थाप्य त्रिमूर्ति साम्बस्तु प्रातर्मध्यापराह्णिकम् ॥**

इत्यादि ‘वराहपुराणां’तील (अध्याय १७८, श्लो. ५५–५७) श्लोकांत साम्बाने सूर्यमूर्तीची स्थापना उदयाचलावर म्हणजे पूर्वदिशेच्या पर्वतावर, यमुनेच्या दक्षिणेस कालप्रिय येथे व अस्तमानाचलीं मूलस्थान येथे तीन ठिकाणीं केल्याचा निर्देश आहे. यांपैकी पहिल्या स्थानाचा उल्लेख गंगासागरसंगम असाहि केलेला आढळतो. पूर्व दिशेस ओरिसांतील या पवित्रस्थलीं, पुरीपासून ३० मैलांवर, कोणार्क येथे गंगवंशी पहिल्या नरसिंह राजाने इ. स. च्या तेराव्या शतकांत बांधलेलें अत्यंत भव्य व सुंदर मंदिर Black Pagoda या नांवाने अद्यापि सुविख्यात आहे पश्चिमेस सिंधदेशांत मूलस्थान किंवा मुलतान येथेहि चन्द्रभागा (चिनाब) नदीतीरीं सूर्याचें सुप्रसिद्ध देवालय होतें. त्या देवस्थानाला यात्रेचें मोठें उत्पन्न असल्यामुळे अरबांनी सिंध पादाक्रांत केल्यावरहि त्या उत्पन्नाच्या लोभाने ती मूर्ति भग्न न करतां तिची पूजाअर्चा चालू ठेवली होती, असें अरब इतिहासकार अल् मसूदी याने लिहून ठेवलें आहे.

कोणार्क व मूलस्थान हीं सूर्यक्षेत्रें भारताच्या पूर्व व पश्चिम टोकांना होतीं, तर कालप्रिय हें त्यांच्या मध्यभागीं यमुनेच्या दक्षिणतीरीं होतें, म्हणून त्या ठिकाणीं सूर्याचें सान्निध्य मध्याह्नीं असे, असें पुराणांत म्हटलें आहे. कालप्रिय हें कनोजच्या दक्षिणेस होतें असें राजशेखराच्या काव्य-मीमांसेंतील (पृ. ९४) पुढील उताऱ्यावरून दिसतें—

अनियतत्वाद्दिशामनिश्चितो दिग्विभाग इत्येके। तथाहि यो गाधिपुरस्य दक्षिणः स कालप्रियस्य उत्तरः। (कोणत्याहि स्थलाचें केवळ 'दक्षिण' किंवा 'उत्तर' असें वर्णन करूं नये, असें कांही म्हणतात. कारण असें वर्णन दिशांवर अवलंबून असल्यानें अनिश्चित असतें. उदाहरणार्थ, जें स्थल गाधिपुरच्या म्हणजे कनोजच्या दक्षिणेस तेंच कालप्रियाच्या उत्तरेस असेल.)

कनोजच्या आणि यमुनेच्याहि दक्षिणेस असलेलें कालप्रियनगर—जेथें कालप्रियनाथ नामक सूर्याचें सुप्रसिद्ध देवालय होतें - तें सध्याचें काल्पी शहरच असावें, असें सहजच अनुमान करतां येतें.

कालप्रिय हें यमुनेच्या काठीं असून तेथें एक विस्तृत आवार असलेलें भव्य देवालय होतें हें कोरीव लेखांवरूनहि दाखवितां येतें. इ. स. च्या दहाव्या शतकाच्या आरंभीं (सन ९२० च्या सुमारास) मान्यखेट (पूर्वीच्या हैदराबाद संस्थानांतील मालखेड) येथें राज्य करणाऱ्या राष्ट्रकूटवंशी महाप्रतापी तृतीय इन्द्र राजानें कनोजवर स्वारी केली. या स्वारींत त्याला वाटेंत कालप्रिय येथें देवळाच्या परिसरांत कांही काळ थांबावें लागलें आणि नंतर त्यानें यमुना पार करून कनोज नगर उद्ध्वस्त केलें त्याचें सुंदर वर्णन खालील श्लोकांत केलें आहे—

यन्माद्यद्द्विपदन्तघातविषमं कालप्रियप्राङ्गणं
तीर्णा यत्तुरगैरगाधयमुना सिन्धुप्रतिस्पर्धिनी।
येनेदं हि महोदयारिनगरं निर्मूलमुन्मूलितं
नाम्नाद्यापि जनैः कुशस्थलमिति ख्यातिं परां नीयते॥

[तृतीय इन्द्राच्या मदोन्मत्त हत्तींच्या दंतांच्या आघातांनी कालप्रियाचें प्रांगण उंचसखल झालें. त्याच्या घोडयांनी सागराशीं विशालत्वांत स्पर्धा

करणारी यमुना नदी पोहून पार केली. त्याने समूळ उद्ध्वस्त केल्यामुळे ही महोदय (कनोज) नामक शत्रूची राजधानी अद्यापि कुशस्थल या नांवाने प्रसिद्ध झाली आहे. (पूर्वीच्या सुसमृद्ध नगरांत सध्या गवत उगवलें आहे असा अर्थ.)]

या श्लोकावरून कालप्रिय देवाच्या देवालयाचें अंगण अत्यंत विस्तृत होतें, इतकें की त्यामध्ये हत्ती, घोडे, पायदळ इत्यादि इंद्र नृपतीची चतुरंग सेना मामावली. तें नगर यमुनेच्या दक्षिण तीरावर होतें. कारण त्यानंतर इंद्र राजाला यमुना पार करून कनोजवर चाल करतां आली. सध्याचें काल्पी हें मान्यखेट (मालखेड) पासून कनोजला जाणाऱ्या मार्गावर आहे. काल्पीहून कनोज उत्तरेस सुमारें ७५ मैलांवर आहे.

तेव्हा कालप्रिय येथे सर्व भरतखंडांत विख्यात झालेलें सूर्याचें पवित्र व विशाल देवालय होतें. तेथे यात्रेच्या निमित्ताने दूरदूरच्या प्रदेशांतून हजारों लोक येत. नटांच्या मंडळीहि लोकाश्रयाकरिता अशा प्रसंगीं नवीन नवीन नाटकांचे प्रयोग करीत असत. अशा यात्रेच्या प्रसंगीं भवभूतीचीं तीन्ही नाटकें प्रथम रंगभूमीवर आलीं. ही माहिती ध्यानांत घेतली असतां भवभूतीने ‘ मालतीमाधवा ’च्या आरंभीं (१, ३) सूर्यस्तुतिपर खालील श्लोक कां घातला याचें स्वारस्य ध्यानांत येईल. सूत्रधार म्हणतो--

कल्याणानां त्वमसि महसां भाजनं विश्वमूर्ते
धुर्यां लक्ष्मीमथ मयि भृशं धेहि देव प्रसीद ।
यद्यत्पापं प्रतिजहि जगन्नाथ नम्रस्य तन्मे
भद्रं भद्रं वितर भगवन् भूयसे मङ्गलाय ॥

(हे विश्वमूर्ते ! तूं मंगल अशा तेजाचा निधि अहिस. मजवर कृपा करून वरिष्ठ अशी समृद्धि मला दे. मी तुजपुढे नम्र झालों आहें माझीं सर्व पापें नष्ट करून मङ्गलप्राप्तीकरिता सर्व कल्याणप्रद वस्तु मला प्राप्त करून दे.)

भवभूति कालप्रिय नगरांत बराच काळ राहिला असावा. कारण त्याचीं तीन्ही नाटकें कालप्रियनाथाच्या यात्रेच्या प्रसंगीं प्रथम रंगभूमीवर आलीं असें त्यांत म्हटलें आहे. हळू हळू त्याची कीर्ति दिगन्तीं पसरूं

लागून ती कनोजच्या यशोवर्मनृपतीच्या कानीं आली. हर्षानंतर कनोजच्या गादीवर आलेला हाच पहिला सुविख्यात राजा होय. यानें केलेल्या दिग्विजयाचें वर्णन त्याच्या दरबारच्या ‘ गउडवहो ’ (गौडवध) नामक प्राकृत काव्यांत आलें आहे, पण तें बहुतांशीं काल्पनिक आहे. तथापि त्या काव्यांतील मुख्य घटना–गौड किंवा उत्तर बंगालच्या राजाचा वध–ही मात्र ऐतिहासिक असावी. या राजाचा अंमल मगधावरहि होता असें दिसतें. यशोवर्म्यानें मगध देश काबीज करून आपल्या राज्यास जोडला असावा, कारण याच्या कालचा एक शिलालेख नालन्दा येथील सुप्रसिद्ध बौद्ध विश्वविद्यालयांत सापडला आहे. त्यांत त्याचें पुढील वर्णन आहे--

सर्वेषां मूर्ध्नि दत्वा पदमवनिभृतामुद्‌गतो भूरिधामा
निस्त्रिंशांशुप्रतानप्रदलितनिखिलारातिघोरान्धकारः ।
ख्यातो यो लोकपालः सकलवसुमतीपद्मिनीबोधहेतुः
श्रीमान् भास्वानिवोच्चैस्तपति दिशि दिशि श्रीयशोवर्मदेवः ॥

(ज्याप्रमाणे तेजस्वी लोकपाल सूर्य सर्व पर्वतांच्या शिखरांवर आपले किरण फेकून त्यायोगें घोर अंधकाराचा समूळ नाश करतो आणि सर्व कमलिनींना विकसित करून अखिल दिग्भागीं उच्च ठिकाणाहून तळपत राहतो, तसा हा प्रतापी यशोवर्म नृपति सर्व राजांच्या मस्तकावर पाद रोवून आपल्या तरवारीनें सर्व घोर शत्रूंचा निःपात करतो, आणि सर्व पृथ्वीला सज्ञान करून आणि प्रत्येक दिशेंत आपल्या तेजानें सर्वांना मागें टाकून उज्ज्वल दिसतो.)

अशा महाप्रतापी यशोवर्म्याच्या कानीं भवभूतीची कीर्ति गेल्यावर साहजिकच त्याला हें कविरत्न आपल्या सभेंत असावें, अशी इच्छा झाली; कारण अशा कविश्रेष्ठांच्या काव्यांच्या योगें राजांची कीर्ति दीर्घकाळ टिकून राहते. एका कवीनें म्हटलें आहे—

ख्यातिं यान्ति नरेश्वराः कविवरैः स्फारैर्न भेरीरवैः ।

(राजे लोक आपल्या दरबारच्या श्रेष्ठ कवींच्या योगानें प्रसिद्धि पावतात, नगाऱ्यांच्या मोठ्या आवाजानें नव्हे.)

वाक्पतिराजाशी मैत्री

कनोज येथे यशोवर्म्याच्या राजसभेंत भवभूतीची वाक्पतिराज नामक प्राकृत कवीशी मैत्री जमली. त्यांचा काळ एकत्र साहित्यगोष्ठींत मोठ्या आनंदांत जाऊं लागला. भवभूति हा वाक्पतिराजापेक्षा वयाने ज्येष्ठ व विद्वत्तेंत श्रेष्ठ होता. तेव्हा वाक्पतिराज आपलीं काव्यें त्याला वाचून दाखवून त्याच्या सल्ल्यानुसार त्यांत सुधारणा करीत असला तर त्यांत आश्चर्य नाही. अशा चर्चेतून आपणांस फार फायदा झाल्याचें वाक्पतिराजाने प्रांजळपणें व कृतज्ञतेने आपल्या ' गउडवहो ' नामक काव्यांत नमूद करून ठेवलें आहे. तो म्हणतो—

भवभूइजलहिणिग्गयकव्वामयरसकणा इव फुरन्ति ।
जस्स विसेसा अज्जवि वियडेसु कहाणिवेसेसु ॥

(भवभूतिजलधिनिर्गतकाव्यामृतरसकणा इव स्फुरन्ति ।
यस्य विशेषा अद्यापि विकटेषु कथानिविशेषु ॥)

(भावार्थ—भवभूति हा सागर आहे. त्या सागरांतून निघालेल्या अमृताचे कांही बिंदु मात्र माझ्या सुंदर गणलेल्या कथांत स्फुरतात.)

वाक्पतिराजाने 'गउडवहो' हें काव्य आपला आश्रयदाता यशोवर्मन् याच्या दिग्विजयाच्या वर्णनपर लिहिल्याचें मागे सांगितलें आहेच. याशिवाय त्याने महाराष्ट्री भाषेंत 'मधुमथनविजय' नामक काव्य लिहिलें होतें. तें सध्या उपलब्ध नाही. पण त्यांतील कांही प्राकृत गाथा भोज व अभिनवगुप्त यांनी उद्धृत केल्या आहेत. त्यांवरून त्यामध्ये कृष्णचरित्र वर्णिलें होतें, असें दिसतें. या काव्याची प्रशंसा सहृदयमूर्धन्य ' ध्वन्यालोक 'कार आनन्दवर्धन याने केली आहे. त्यावरून त्याची गुणसम्पदा अनुमानितां येईल. वाक्पतिराजाने कांही मुक्तक स्वरूपाच्या गाथाहि रचलेल्या दिसतात. कारण गंगाधराने ' गाथासप्तशती 'वरील आपल्या टीकेंत एक (क्रमांक ९५) आणि पीतांबराने आपल्या टीकेंत आणखी तीन (क्रमांक ६१६, ६१७ व ६१८) गाथा बप्पइराआच्या म्हणून उल्लेखिलेल्या आहेत. हा बप्पइराअ म्हणजे भवभूतीचा समकालीन वाक्पतिराजच असावा. ' गाथासप्तशती ' हा

प्राकृत सुभाषित ग्रंथ खिस्तोत्तर पहिल्या शतकांत होऊन गेलेल्या हाल-नृपताच्या नांवावर मोडत असला तरी त्यांत वेळोवेळीं जुन्या गाथांच्या जागीं नवीन गाथा घातल्या जात असत हें मी इतरत्र दाखविलें आहे.

भवभूतीचीं काव्यें

कनोज येथे यशोवर्म नृपतीचा आश्रय मिळाल्यावर भवभूतीचा काळ अत्यंत सुखासमाधानांत गेला असला पाहिजे. त्यानंतर त्याने कांही ग्रंथ लिहिले किंवा नाही, हें माहीत नाही. मागे उद्धृत केलेल्या वाक्पति-राजाच्या गाथेवरून त्याने कांही काव्येंहि रचलीं असावीं असें वाटतें. पण तीं आता उपलब्ध नाहीत. 'शार्ङ्गधरपद्धतीं'त मुक्तक स्वरूपाचीं दोन सुभाषितें भवभूतीच्या नांवावर दिलीं आहेत. जल्हणाच्या 'सूक्तिमुक्तावलीं'-तहि कांही श्लोक भवभूतीच्या नांवावर घातले आहेत.

सन ७३३ च्या सुमारास काश्मीरच्या ललितादित्य – मुक्तापीडाने यशोवर्म्याचा पाडाव केला असें 'राजतरंगिणी'वरून समजतें.[१०] त्या वेळीं भवभूति हयात होता असें कल्हणाच्या वर्णनावरून अनुमान करणें शक्य आहे. पण निश्चितपणें सांगतां येत नाही.

---

१०. कविवाक्पतिराजश्रीभवभूत्यादिसेवितः ।
जितो ययौ यशोवर्मा तद्गुणस्तुतिवन्दिताम् ॥

३. भवभूति आणि उम्बेक*

तर्केषु कर्कशतराः स्युरथापि पुंसां
काले भवन्ति मृदवः कवितासु वाचः ।
दैत्येन्द्रशैलकुलिशं दयिताकपोले
नाथस्य कोमलमुदाहरणं नखं नः ॥

—सुभाषित

संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासांत अद्यापि समाधानकारक रीतीने न सोडविलेले जे अनेक प्रश्न आहेत त्यांपैकी संस्कृत नाटककार भवभूति आणि मीमांसक भट्ट उम्बेक[१] हे एकच किंवा भिन्न हा एक महत्त्वाचा आहे. या प्रश्नावर अनेक विद्वानांनी लिहिलें आहे आणि त्यांच्यामध्ये त्यावर तीव्र मतभेद उत्पन्न झाला आहे. भवभूति हा वैदर्भ कवि. तेव्हा मराठी वाचकांना या प्रश्नाची चर्चा महत्त्वाची वाटण्याचा संभव आहे. म्हणून ती प्रस्तुत लेखांत संक्षेपाने केली आहे.

भवभूति आणि उम्बेक हे एकच होत या मताला उपोद्बलक असा पुरावा सत्तर वर्षांपूर्वी कै. शंकर पांडुरंग पंडित यांनी वाक्पतिराजाच्या गउडवहो (गौडवध) नामक काव्याला जोडलेल्या प्रस्तावनेंत प्रथम मांडला. 'मालतीमाधव' हें संस्कृत नाटक भवभूतीचें म्हणून सुविख्यात आहे. त्याच्या प्रस्तावनेंत भवभूतीने आपल्या कुलाविषयी बरीच माहिती दिली

---

* 'महाराष्ट्रसाहित्यपत्रिका', वर्ष ३१, अंक १२०.

१. याचें नांव अनेक ठिकाणीं उंवेक असें येतें. 'वबयोरभेदः' या न्यायाने तें उम्बेक असेंहि आढळतें. कमलशीलाच्या टीकेंत तें उबेयक असें आलें आहे. पुढे दाखविल्याप्रमाणे श्रीदेवाच्या 'स्याद्वादरत्नाकरा'त तर त्याचें 'ओंवक' असें अपभ्रष्ट रूप आढळतें.

आहे. त्यामध्यें तें नाटक श्रीकण्ठपदलांछन भवभूतीनें लिहिलें, असें स्पष्ट विधान आलें आहे. या तऱ्हेचें विधान त्याच्या 'महावीरचरित' व 'उत्तररामचरित' या इतर दोन नाटकांतहि आढळतें. या नाटकांच्या अंकांच्या पुष्पिकांमध्ये (colophons) किंवा निदान त्यांच्या अखेरीस त्यांचा कर्ता म्हणून भवभूतीचें नांव येतें. पण कै. शं. पां. पंडित यांना मिळालेल्या 'मालतीमाधवा'च्या सुमारें पांचशें वर्षें जुन्या असलेल्या एका हस्तलिखितांत सहाव्या अंकाच्या शेवटीं भवभूतीच्या ऐवजी उम्बेकाचार्यांचें नांव नाटककार म्हणून दिलेलें आढळलें. त्या ठिकाणीं उम्बेकाचार्यांला 'श्रीकुमारिलस्वामिप्रसादप्राप्तवाग्वैभव' (ज्याला श्रीकुमारिलस्वामींच्या प्रसादानें वाग्वैभव प्राप्त झालें आहे) असें विशेषण लावलें आहे. त्याच हस्तलिखितांत तिसऱ्या अंकाच्या शेवटीं तें नाटक भट्ट कुमारिलांच्या शिष्यानें रचलें असा उल्लेख आहे. हेंच हस्तलिखित पूर्वीं कै. माधव व्यंकटेश लेले यांच्या संग्रहीं होतें.[२] या हस्तलिखिताच्या पुराव्यावरून भवभूतीचें उम्बेक असें दुसरें नांव होतें व तो सुप्रसिद्ध मीमांसक कुमारिलभट्ट यांचा शिष्य होता हें मत प्रचलित झालें. कै. डॉ. रामकृष्णपंत भांडारकर यांना हे उल्लेख कुतूहलोत्पादक वाटले; पण त्यांच्या काळीं या प्रश्नाविषयी इतर कांहीच साहित्य उपलब्ध नसल्यानें त्यांनी त्याविषयी निर्णयात्मक मत दिलें नाही.[३] त्यानंतर उम्बेकाचे दोन ग्रंथ--(१) कुमारिलांच्या 'श्लोकवार्त्तिका'वरची तात्पर्यटीका नामक अपूर्ण व्याख्या[४] आणि (२) मंडनमिश्राच्या 'भावनाविवेका'वरची टीका[५] हे प्रसिद्ध झाले आहेत. तसेंच शांतरक्षिताच्या 'तत्त्वसंग्रहा'वरची कमलशीलाची टीका,[६] 'चित्सुखी'[७],

---

२. मा. व्यं. लेले, 'मालतीमाधवसार व विचार', पृ. ८४.

३. त्यांची 'मालतीमाधवा'ची प्रस्तावना, पृ. ८–९.

४. मद्रास युनिव्हर्सिटी संस्कृत सीरीज, नं. १३.

५. प्रिन्सेस ऑफ वेल्स् सरस्वतीभवन टेक्स्ट्स्, नं. ६ (भाग १ व २).

६. गायकवाड्स् ओरिएंटल सीरीज्, पु. २, पृ. ८१२.

७. निर्णयसागर प्रेस, पृ. २६५.

तिजवरील नयनप्रसादिनी टीका[८], 'शास्त्रदीपिके'वरील रामकृष्णाची युक्तिस्नेहप्रपूरणी सिद्धान्तचन्द्रिका टीका[९], श्रीदेवाचा 'स्याद्वादरत्नाकर'[१०] इत्यादि ग्रंथांतील उम्बेकाविषयी व त्याच्या विविध मतांविषयी आलेले उल्लेख माहीत झाले आहेत. त्यांचा अभ्यास केल्यावर विद्वानांमध्ये दोन तट पडले आहेत. म. म. कुप्पूस्वामी शास्त्री[११], गंगानाथ झा[१२], पां. वा. काणे[१३], यांच्या मतें भवभूति व उम्बेक हे एकच होत आणि उम्बेक हा कुमारिलांचा शिष्य होता. याच्या उलट डॉ. श्री. कृ. बेलवलकर यांस उम्बेक हें भवभूतीचें दुसरें नांव असेल असें वाटत नाही.[१४] डॉ. कुन्हन राजा यांनी उम्बेकाच्या श्लोकवार्तिकटीकेस जोडलेल्या आपल्या विस्तृत प्रस्तावनेंत या प्रश्नाचा सविस्तर ऊहापोह केला आहे.[१५] एके ठिकाणीं उम्बेक हा कुमारिलांचा शिष्य नव्हता तसेंच भवभूति व उम्बेक यांच्या ऐक्याला यत्किंचितहि प्रमाण नाही असें त्यांनी स्पष्ट म्हटलें आहे, तर

---

८. निर्णयसागर प्रेस, पृ. २६५.

९. निर्णयसागर प्रेस, पृ. २, १४, ३०, ४८ इत्यादि.

१०. भट्टपुत्रजयमिश्राच्या श्लोकवार्त्तिकटीकेला (मद्रास संस्कृत सीरीज, नं. १७) जोडलेल्या डॉ. कुन्हन राजांच्या प्रस्तावनेंतील (पृ. १२) उतारा पाहा.

११. सेकंड ओरिएंटल कॉन्फरन्स्चा रिपोर्ट, पृ. ४११.

१२. भावनाविवेकाच्या (सरस्वतीभवन टेक्स्ट्स) द्वितीय भागाची प्रस्तावना, पृ. ४ पाहा.

१३. 'उत्तररामचरिता'च्या त्यांच्या आवृत्तीची प्रस्तावना, पृ. १२–१६.

१४. भवभूतिप्रणीत 'उत्तररामचरिता'चें मराठी भाषांतर, प्रस्तावना पृ. २६.

१५. उम्बेकाच्या 'श्लोकवार्त्तिक'टीकेच्या आवृत्तीची प्रस्तावना, पृ. ३४.

दुसऱ्या ठिकाणीं तें ऐक्य संभवनीय मानलें आहे.[१६] असें असलें तरी त्यांच्या ऐक्याविषयीचा समज कसा उत्पन्न झाला याची त्यांनी कांहीच उपपत्ति सुचविली नाही. याप्रमाणे प्रस्तुत प्रश्न अत्यंत वादग्रस्त असल्यामुळे त्याची थोडथा बारकाईने चर्चा करणें अवश्य आहे.

चर्चेकरिता आपण दोन मुख्य प्रश्न घेऊं—(१) उम्बेक हा कुमारिलांचा शिष्य होता काय ? नसल्यास त्याचा काळ कोणता ? आणि (२) भवभूति आणि उम्बेक हे एकच किंवा भिन्न ?

उम्बेक कुमारिलभट्टांचा शिष्य होता याबद्दल प्रमाणें

उम्बेक आणि कुमारिल यांचा गुरुशिष्यसंबंध सिद्ध करण्यासाठी पुढील प्रमाणें दिलीं जातात :

(१) उम्बेक हा कुमारिल स्वामींचा शिष्य होता अशा आशयाचे दोन उल्लेख 'मालतीमाधवा'च्या एका अत्यंत प्राचीन हस्तलिखितांत आले आहेत त्यावरून हा संबंध सिद्ध होतो.

(२) विद्यारण्यांच्या 'श्रीमच्छंकरदिग्विजयां'त उम्बेक हें मंडनमिश्रांचें दुसरें नांव होतें, असें खालील श्लोकांत (७, ११६) सांगितलें आहे :

उंवेक इत्यभिहितस्य हि तस्य लोके
उंवेति बान्धवजनैरभिधीयमाना ।
हेतोः कुतश्चिदिह वाक् सुरुषाभिशप्ता
दुर्वाससाजनि वधूर्द्वयभारतीति ।।

(**अर्थ**—तो मंडनमिश्र उंवेक या नांवाने ज्ञात आहे. दुर्वासऋषीने जिला कांही कारणाने शाप दिला होता ती सरस्वती त्याची पत्नी असून तिला तिचे बांधव उंवा असें म्हणतात. तिचें उभयभारती असेंहि दुसरें नांव आहे.)

---

१६. श्लोकवार्त्तिकव्याख्या (मद्रास युनिव्हर्सिटी संस्कृत सीरीज, नं. १३), पृ. १०५–१०८

या श्लोकामध्ये उंवेक (किंवा उम्बेक) असें मंडनमिश्रांचें दुसरें नांव होतें असें म्हटलें आहे कुमारिलभट्टांनी शंकराचार्यांस आपला शिष्य मंडनमिश्र याजकडे पाठविलें अशी कथा पूर्वोक्त 'शंकरदिग्विजयां'त दिली आहे. उम्बेक हें मंडनमिश्राचें दुसरें नांव असल्यास या कथेने 'मालती-माधवा'च्या पुष्पिकेंतील वरील विधानास पुष्टिच मिळते.

(३) उम्बेक मंडनमिश्राच्या 'भावनाविवेका'वरील आपल्या टीकेंत 'अन्यदेव हि धात्वर्थसामान्यकरणात्मकम्। अन्यच्च भावना नाम साध्यत्वेन व्यवस्थितम्॥' या कुमारिलभट्टांच्या 'तन्त्रवार्त्तिकां'तील (पृ. ३५१) श्लोकाचा उत्तरार्ध एके ठिकाणीं (पृ. ९३) 'भट्टपादैरुक्तम्' या शब्दांनी व दुसऱ्या ठिकाणीं (पृ. ४३) 'यथोक्तं गुरुणा' अशा शब्दांनी उद्धृत करतो. त्यावरून तो कुमारिलभट्टांचा शिष्य होता असें दिसतें.

(४) उम्बेकाने श्लोकवार्त्तिकावरील आपल्या टीकेंत 'अभिचरन् श्येनेन यजेत' या श्रुतिवाक्याचें विवेचन करीत असतां भाष्यकार शबरस्वामी व वार्त्तिककार कुमारिलभट्ट या दोघांच्या मतांतील दोष दाखविले आहेत आणि आत्मसमर्थनार्थ

गुरोरप्यवलिप्तस्य कार्याकार्यमजानतः :
उत्पथप्रतिपन्नस्य परित्यागो विधीयते ॥

'महाभारतां'तील[१७] उक्ति उद्धृत केली आहे. उम्बेक कुमारिलभट्टांचा शिष्य असल्यास ही उक्ति उद्धृत करण्यामध्ये विशेष स्वारस्य दिसेल.

(५) उम्बेकाची 'श्लोकवार्तिका'वरची टीका स्फोटवादस्थानकापर्यंतच सापडली आहे. त्यानंतर त्याच हस्तलिखितांत या ग्रंथावरची भट्टपुत्र जयमिश्राची टीका दिली आहे.[१८] तेव्हा उम्बेकाच्या निधनानंतर जयमिश्राने

---

१७. 'महाभारत', उद्योगपर्व, १७८, ४७–४८; शांतिपर्व, ५७, ६–७; १४०, ४८. या संदर्भाबद्दल मी म. म. डॉ. पां. वा. काणे यांचा आभारी आहे.

१८. ही टीका आता मद्रास युनिव्हर्सिटी संस्कृत सीरीज, नं. १७, मध्ये छापली आहे.

त्याचें 'श्लोकवार्त्तिका'च्या टीकालेखनाचें कार्य पुरें केलें असें दिसतें. भट्टपुत्र जयनाथ हा कुमारिलभट्टांचा पुत्र असावा. त्याच्या टीकेच्या अगोदर उम्बेकाची टीका लिहिली असल्यामुळे उम्बेक हा कुमारिलांचा समकालीन व शिष्य होता या मतास पुष्टि मिळते.

वरील प्रमाणांचें परीक्षण

वरील पांच प्रमाणें उम्बेक हा कुमारिलांचा शिष्य होता हें सिद्ध करण्याकरिता पुढे केलीं जातात; पण तीं निर्णायक नाहीत हें पुढील विवेचनावरून दिसून येईल :

(१) उम्बेक हा कुमारिलांचा शिष्य होता असें स्पष्ट विधान 'मालती-माधवा'च्या फक्त एकाच हस्तलिखितांत आढळलें आहे व तें हस्तलिखितहि सुमारें ५०० वर्षांपेक्षा जुनें नाही. भवभूतीच्या या किंवा इतर नाटकांच्या कोणत्याहि अन्य हस्तलिखितांत असें विधान नाही. उम्बेकाचें 'मालती-माधवा'चें कर्तृत्व संशयास्पद आहे हें पुढे दाखविलें आहे. तेव्हा या प्रमाणावर विशेष भिस्त ठेवतां येत नाही

(२) 'शंकरदिग्विजय' हा ग्रंथ उम्बेकानंतर कित्येक शतकांनी रचलेला. त्यांतील अनेक कथा कपोलकल्पित असल्याचें सिद्ध झालें आहे. उदाहरणार्थ, शंकराचार्यांकडून पराभव पावल्यानंतर मंडनमिश्राने संन्यासाश्रम घेऊन सुरेश्वर हें नांव धारण केलें ही त्यांतील कथा अविश्वसनीय ठरली आहे.[१९] तेव्हा मंडनमिश्र व उम्बेक हे एकच आणि म्हणून उम्बेक हा कुमारिलभट्टांचा शिष्य होय, हें त्यांतील विधान निःसंदेहपणें स्वीकारतां येत नाही.

(३) उम्बेकाने अनेक ठिकाणीं कुमारिलभट्टांच्या मतांचा उल्लेख केला आहे. पण तसें करतांना बहुतेक सर्व ठिकाणीं त्यांचा वार्त्तिककार असाच निर्देश केला आहे. एका ठिकाणीं त्यांना 'भट्टपाद' असें म्हटलें आहे,

१९. म. म. डॉ. काणे यांचा रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या जर्नल (न्यू सीरीज, पु. ३, पृ. २८९–२९३) मधील लेख पाहा.

खरें, पण त्यावरून त्याचा कुमारिलांविषयी फक्त आदर व्यक्त होतो, गुरु-शिष्यसंबंध दाखविला जात नाही. फक्त एकाच ठिकाणीं (' भावनाविवेका '-वरील टीकेंत, पृ. ४३) त्यांच्या मताचा उल्लेख करतांना ' तदुक्तं गुरुणा ' असें म्हटलें आहे. कदाचित् कुमारिभट्ट मंडनमिश्राचे गुरु असतील, म्हणून मंडनमिश्राच्या ग्रंथाचें व्याख्यान करतांना उम्बेकाने त्याच्या गुरूचें वचन ' तदुक्तं गुरुणा ' अशा शब्दांनी उद्धृत केलें असावें. कुमारिभट्ट हे उम्बेकाचे स्वतःचे गुरु असते तर ' श्लोकवार्त्तिका 'वरील आपल्या टीकेच्या आरंभीं त्याने तसा निर्देश केला असता. पण तसा निर्देश त्या टीकेच्या आरंभींच काय पण इतरत्र कोठेहि त्याने केला नाही. डॉ. कुन्हन राजा यांच्या मतें तर ' तदुक्तं गुरुणा ' हा पाठ संशयास्पद आहे. ' भावना-विवेका 'च्या उम्बेककृत टीकेचीं आणखी हस्तलिखितें सापडल्यास त्यांत दुसरा पाठ सापडेल असें त्यांस वाटतें. तें कसेंहि असलें तरी केवळ एका ठिकाणच्या पाठावरून कुमारिलभट्ट व उम्बेक यांचा गुरुशिष्यसंबंध निर्विवादपणें सिद्ध झाला असें म्हणतां येत नाही.

याच्या उलट, उम्बेकाच्या ' श्लोकवार्त्तिक ' व 'भावनाविवेक' यांवरील टीकांचा सूक्ष्म अभ्यास केल्यास तो टीकाकार केवळ कुमारिलभट्टांनंतरच नव्हे, तर मंडनमिश्रानंतरहि कांही काळाने होऊन गेला असें स्पष्ट दिसून येईल.

कुमारिलभट्टांनी ' श्लोकवार्त्तिका 'च्या निरालम्बनवादप्रकरणांत स्वप्न-दर्शन, रज्जुसर्प, गन्धर्वनगर इत्यादि ठिकाणची भ्रान्ति निरालम्बन असते काय, या प्रश्नाची चर्चा करतांना पांच श्लोक लिहिले आहेत (श्लो. १०९–११३ पाहा). त्या श्लोकांचें व्याख्यान केल्यावर उम्बेकाने अन्य टीकाकारांचें मत 'अन्ये तु आलम्बनकथनपरत्वेन श्लोकपञ्चकं व्याचक्षते। ' अशा शब्दांत देऊन नंतर त्याचें खंडन केलें आहे. त्यावरून उम्बेक कुमारिलभट्टांचा साक्षात् शिष्य नसून त्या दोघांमध्ये बराच काळ गेला होता आणि त्या काळांत ' श्लोकवार्त्तिका 'वर अन्य टीकाहि लिहिल्या गेल्या होत्या, असें स्पष्ट दिसतें.

उम्बेकाने केवळ कुमारिलभट्टांच्या 'श्लोकवार्त्तिका'वरच टीका लिहिली असें नाही. त्याने मंडनमिश्रांच्या 'भावनाविवेका'वरहि टीका लिहिली आहे. या टीकेचें बारकाईने वाचन केलें असतां मंडनमिश्र व उम्बेक एकच, हें विद्यारण्यांचें मत चूक आहे असें स्पष्ट दिसतें.[२०] मूळ ग्रंथाला मंगलश्लोक नाही, पण उम्बेकाचार्यांच्या टीकेच्या आरंभीं

यस्य स्फुरन्ति युगपत् सकलाः पदार्था
यश्चैक एव जगदारभते समग्रम् ।
तस्मै जगत्त्रयनताय महेश्वराय
कृत्वा नमः क्रियत एष मया प्रबन्धः ॥

असा मंगलश्लोक आढळतो. त्यावरूनहि मूळ ग्रंथकार व टीकाकार एक नव्हते, हें स्पष्ट दिसतें. इतकेंच नव्हे तर टीकेवरून उम्बेक कांही काळाने होऊन गेला असेंहि सिद्ध होतें. उम्बेकाने अनेक ठिकाणीं 'भावनाविवेका'चे भिन्न भिन्न पाठ देऊन चर्चा केली आहे. तेव्हा तो व मंडनमिश्र हे भिन्न होते एवढेंच नाही, तर त्या दोघांमध्ये बऱ्याच मोठ्या कालाचें व्यवधान होतें आणि त्या कालांत त्या ग्रंथाच्या अनेक प्रती झाल्यामुळे पठन-पाठनांत बरेच पाठभेद उत्पन्न झाले होते हें उघड आहे.

(४) उम्बेकाने 'गुरोरप्यवलिप्तस्य' इत्यादि श्लोक भाष्यकार शबरस्वामींच्या मताचें खंडन केल्यावर घातला आहे. त्यापूर्वीचे त्याचे श्लोक असे आहेत—"श्येनादीनां तु न साक्षान्नाप्युपचारेण नापि तत्फलस्यानर्थत्वमिति तस्यानर्थत्वप्रतिपादनपरं 'श्येनो वज्र इषुः' इत्येवमादि भाष्यमुपेक्षणीयम् ।" तेव्हा 'गुरोरप्यवलिप्तस्य' इत्यादि 'महाभारतां'तील श्लोक उद्धृत करतांना 'भाष्यकार शबरस्वामी व श्लोकवार्त्तिककार कुमारिलभट्ट यांसारख्या पूज्य आचार्यांच्या मतांचें खंडन करतांना मर्यादातिक्रम होत नाही, कारण त्यांचीं मतें चूक आहेत,' असें त्यास सुचवावयाचें आहे. त्यावरून तो कुमारिलभट्टांचा शिष्य होता असें सिद्ध होत नाही.

---

२०. डॉ. राजा यांची 'श्लोकवार्त्तिक'व्याख्येच्या आवृत्तीस जोडलेली प्रस्तावना, पृ. १८-२० पाहा.

(५) जयनाथ हा कुमारिलभट्टांचा पुत्र होता, याला प्रमाण नाही. तोहि स्वतःच्या टीकेंत वार्त्तिककारांच्या अन्य टीकाकारांच्या मतांचा उल्लेख च खंडन करतो; त्यावरून तो वार्त्तिककार कुमारिलभट्टांनंतर कांही काळाने होऊन गेला हें उघड आहे. 'भट्टपुत्र' हें विशेषण प्राचीन काळीं ब्राह्मणांच्या नांवामागे लावण्याचा प्रघात होता हें अनेक कोरीव लेखांवरून दाखवितां येतें. उदाहरणार्थ, पालनृपति प्रथम महीपाल याच्या बनगड ताम्रपटांतील अनेक ब्राह्मणांच्या नांवामागे 'भट्टपुत्र' हें विशेषण लावलेलें आढळेल.[२१] जबलपूर जिल्ह्यांतील तिगोवा येथील गुप्तकालीन मंदिरांत नंतर कोरलेला एक लेख आहे. त्यांत 'भट्टपुत्र उमदेवा'चा निर्देश आहे. तेंव्हा, 'भट्टपुत्र' या विशेषणावरून जयमिश्र हा कुमारिलभट्टांचा पुत्र होता हें सिद्ध होत नाही. त्याची टीका उम्बेकाच्या टीकेनंतर लिहिलेली एका हस्तलिखितांत दिसते. पण एवढ्यावरून जयमिश्र उम्बेकानंतर लागलीच झाला असें सिद्ध होत नाही. अशा जोड टीकांचीं इतरहि कांही उदाहरणें डॉ. राजा यांनी जयमिश्राच्या शर्करिका टीकेला लिहिलेल्या प्रस्तावनेंत दिलीं आहेत. अर्थातच या प्रमाणांवरून उम्बेक हा कुमारिलभट्टांचा शिष्य होता असें अनुमान करणेंहि शक्य नाही हें उघड आहे.

येथपर्यंत उम्बेक हा कुमारिलभट्टांचा शिष्य होता हें सिद्ध करण्याकरिता पुढे केलेलीं प्रमाणें कशीं निर्बल आहेत हें दाखविलें. आता **उम्बेकाच्या कालाच्या पूर्वापरमर्यादा** निश्चित करूं.

अन्तःप्रमाणें--उम्बेकाने 'श्लोकवार्त्तिका'वरील टीकेंत अनेक प्रतिपक्षीयांच्या मतांचा उल्लेख केला आहे.[२२] तथापि त्यांपैकी बहुतेकांचे निर्देश द्वैतवादी, अद्वैतवादी, आत्माद्वैतवादी, ज्ञानाद्वैतवादी, याज्ञिक, शाक्य, क्षपणक, माध्यमिक अशा सामान्य रूपाचे आहेत. त्यांमुळे उम्बेकाच्या कालनिर्णयाला त्यांची कांहीहि मदत होत नाही. वैयक्तिक उल्लेख भर्तृमित्र

---

२१. एपिग्राफिया इंडिका, पु. १४, पृ. ३२८.

२२. डॉ. राजा यांची श्लोकवार्त्तिकव्याख्येला जोडलेली प्रस्तावना, पृ. ५०–५१.

भर्त्रीश्वर, सांख्यनायक माधव, उपवर्ष, वृत्तिकार व दिङ्नाग यांचे आले आहेत. त्यांपैकी उपवर्ष, वृत्तिकार व दिङ्नाग हे फार प्राचीन ग्रंथकार असल्यामुळे त्यांच्या निर्देशाचाहि या बाबतींत कांही उपयोग होत नाही. भर्तृमित्र हा कुमारिलभट्टाहून प्राचीन होता हें पार्थसारथिमिश्राच्या तद्विषयक उल्लेखांवरून अनुमानितां येतें. भर्त्रीश्वर व सांख्यनायक माधव यांच्याविषयी कांहीच माहिती नाही. तेव्हा उम्बेकाच्या कालनिर्णयास अन्तःप्रमाणांची फारशी मदत होत नाही. भावनाविवेकावरील त्याच्या टीकेंत अनेक पाठांचा उल्लेख असल्यामुळे तो मंडनमिश्रांनंतर निदान पन्नास–पाउणशें वर्षांच्या आंत झाला नसावा. मंडनमिश्रांचा काळ सामान्यतः इ. स. ७०० ते ७२५ असा धरला जातो. तेव्हा उम्बेकाच्या कालाची पूर्वमर्यादा सुमारें इ. स. ७७५ धरावयास हरकत नाही.

आता आपण बाह्य प्रमाणांकडे वळूं. उम्बेक हा फार मोठा मीमांसक होऊन गेला. एका प्राचीन पारंपरिक श्लोकांत म्हटलें आहे––

उम्बेकः कारिकां वेत्ति तन्त्रं वेत्ति प्रभाकरः ।
वामनस्तूभयं वेत्ति नोभयं वेत्ति रेवणः ।।

कांही ठिकाणीं ‘मण्डनस्तूभयं वेत्ति’ असाहि पाठ प्रचलित आहे. असो; उम्बेकाचीं मतें अनेक ग्रंथकारांनी उल्लेखिलीं आहेत. त्यांमध्ये बौद्ध तत्त्वज्ञ शांतरक्षिताच्या तत्त्वसंग्रह नामक ग्रंथाचा टीकाकार कमलशील हा कालक्रमाने पहिला आहे. तत्त्वसंग्रहाच्या एका श्लोकांत वेद हे पौरुषेय आहेत असें प्रतिपादिलें आहे.[२३] या श्लोकावर व्याख्या करतांना कमलशीलाने उवेयक नामक ग्रंथकाराचें मत देऊन त्यावर टीका केली आहे. वेद हे अपौरुषेय व स्वतःप्रमाण आहेत असें मीमांसकांचें मत आहे. कुमारिलभट्टांनी हें मत श्लोकवार्त्तिकाच्या शब्दपरिच्छेदप्रकरणांत प्रतिपादिलें आहे. त्यावर उम्बेकाची व्याख्या आहे. तथापि कमलशीलाने आपल्या टीकेंत उवेयकाचें म्हणणें जितकें सविस्तर दिलें आहे तितकें उम्बेकाच्या श्लोकवार्त्तिकावरील व्याख्येंत दिसत नाही. उम्बेकाहून भिन्न असा उवेयक नामक

---

२३. तत्त्वसंग्रह (गायकवाड्स् ओरिएंटल सीरीज्) भाग २, पृ. ८१२, स्वतःप्रामाण्यपरीक्षा प्रकरण पाहा.

दुसरा कोणी ग्रंथकार कुमारिल व कमलशील यांच्या मधील काळांत झालेला माहीत नाही. तेव्हा उंबेयक हें उम्बेकाचेंच लेखकाच्या प्रमादाने झालेलें अपभ्रष्ट रूप असावें.[२४] तसें असल्यास उम्बेकाचा वेदांचें अपौरुषेयत्व व स्वतःप्रामाण्य सिद्ध करणारा दुसरा एखादा ग्रंथ असावा असें वाटतें. कमलशील हा शांतरक्षिताचा शिष्य असून तो इ. स. ८००–८२५ ह्या काळांत होऊन गेला. तेव्हा उम्बेक त्यापूर्वी इ. स. ७७५ ते ८०० या काळांत झाला असावा.

यानंतर श्रीदेवाच्या 'स्याद्वादरत्नाकरां'त उम्बेकाच्या मताची चर्चा आहे. श्रीदेव खिस्तोत्तर ११०० च्या सुमारास होऊन गेला. यापुढील उल्लेख चित्सुखाचार्यांच्या मताची तत्त्वप्रदीपिका किंवा चित्सुखी या ग्रंथांत पुढीलप्रमाणे आला आहे. '**उक्तं चैतदुम्बेकेन । यथाऽङ्गुल्यग्रे हस्तियूथशतमास्ते तत्रार्थव्यभिचारः स्फुट इति ।**' (एखाद्याने आपणांस असें सांगितलें की अंगुलीच्या टोकावर हत्तींचें शंभर कळप राहिले आहेत तर तो आप्त किंवा सामान्यतः यथार्थवक्ता असला तरी त्याचें म्हणणें खरें असणें शक्य नाही, हें उघड आहे, असें' उम्बेकाने म्हटलें आहे.) चित्सुखाचार्य खिस्तोत्तर तेराव्या शतकांत होऊन गेले. यानंतर पार्थसारथिमिश्राच्या 'शास्त्रदीपिका' ग्रंथावरील युक्तिस्नेह-प्रपूरणी सिद्धान्तचन्द्रिका नामक टीकेंत रामकृष्णाने उम्बेकाचे अनेक उतारे दिले आहेत, ते सर्व आता त्याच्या श्लोकवार्त्तिकव्याख्येंत सापडतात हें डॉ. राजांनी दाखविलें आहे. हा रामकृष्ण उत्कल (ओरिसा) देशाधिपति प्रतापरुद्र गजपति याच्या दरबारीं होता असें त्याच्या टीकेंतील प्रास्ताविक श्लोकांवरून दिसतें. प्रतापरुद्राने सुमारें इ. स. १४९७ ते १५३९ पर्यंत राज्य केलें. तेव्हा सोळाव्या शतकांतहि उम्बेकाच्या ग्रंथाचा प्रचार होता असें दिसतें.

वरील विवेचनावरून **उम्बेक हा इ. स. ७७५ ते ८०० या काळांत होऊन गेला** असें दिसून येईल.

---

२४. 'उम्बेक' नांवाचें 'ओंवक' असें अपभ्रष्ट रूप श्रीदेवाच्या 'स्याद्वादरत्नाकरां'त आढळतें असें डॉ. राजांनी दाखविलें आहे. जयमिश्राच्या श्लोकवार्त्तिकटीकेची प्रस्तावना, पृ. १२ पाहा.

भवभूति आणि उम्बेक एकच काय ?

आता आपण 'भवभूति आणि उम्बेक हे एकच किंवा भिन्न ?' हा प्रश्न घेऊं.

भवभूति हा सुमारें इ. स. ७०० सुमारास होऊन गेला हें राजतरंगिणींतील उल्लेख व इतर प्रमाणें यावरून सिद्ध झालें आहे. तेव्हा तो इ. स. ७७५ नंतर होऊन गेलेल्या उम्बेकाचा समकालीन असणें शक्य नाही हें उघड आहे; तथापि त्याचें उम्बेकाशीं ऐक्य प्रतिपादणाऱ्या प्रमाणांचा विचार केला पाहिजे. तीं प्रमाणे येणेप्रमाणेः—

भवभूति आणि उम्बेक यांच्या एकत्वाचीं प्रमाणें

(१) 'मालतीमाधवा'च्या सुमारें पांचशे वर्षें जुन्या असलेल्या हस्तलिखितांत तें नाटक उम्बेकाने लिहिलें असें म्हटलें आहे. त्या नाटकाच्या प्रस्तावनेवरून तें भवभूतीने रचलें यांत संशय नाही. म्हणून भवभूति व उम्बेक हे एकच होत.

(२) उम्बेकाने 'श्लोकवार्त्तिका'वरील आपल्या तात्पर्यटीकेच्या आरंभीं

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञां
जानन्ति ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ।
उत्पत्स्यतेऽस्ति मम कोऽपि समानधर्मा
कालो ह्ययं निरवधिर्विपुला च पृथ्वी ॥

हा श्लोक घातला आहे. हाच श्लोक 'मालतीमाधवा'च्या प्रस्तावनेंत आला आहे. भवभूति आपल्या श्लोकांची स्वतःच्या नाटकांत अनेकदा पुनरुक्ति करतो. तेव्हा त्याने 'मालतीमाधवां'तला श्लोक 'श्लोकवार्त्तिका'वरील आपल्या टीकेच्या आरंभीं दिला असल्यास आश्चर्य नाही. म्हणून उम्बेक व भवभूति हे एकच होत.

(३) चित्सुखाचार्यांच्या 'तत्त्वप्रदीपिकें'त (निर्णयसागर प्रत, पृ. २६५) पुढील उतारा आला आहे :

तस्माच्छास्त्रं शब्दविज्ञानादसंनिकृष्टे बुद्धिरिति लक्षणमलक्षणम् । तथा आप्तवाक्यं शब्दप्रमाणमिति नैयायिकानामपि ।

आप्तोदीरितवाक्येषु मालतीमाधवादिषु ।
व्यभिचारान्न तद्युक्तमाप्तत्वस्यानिरुक्तितः ॥

स्वकपोलकल्पितमालतीमाधवादिवाक्येषु प्रामाण्याभावादतिव्याप्तिः । न हि पुरा आप्त एव सन् नाटकनाटिकादिप्रबन्धविरचनमात्रेणानाप्तो भवति भवभूतिः । उक्तं चैतदुम्बेकेन—'यदाप्तोऽपि कस्मैचिदुपदिशति न त्वयाननुभूतार्थविषयं वाक्यं प्रयोक्तव्यम् । यथा अङ्गुल्यग्रे हस्तियूथशतमास्ते इति । तत्रार्थव्यभिचारः स्फुटः ॥

(नैयायिक शब्दप्रमाण मानतात. त्यावर चित्सुखाचार्यांची ही टीका आहे. शब्दप्रमाणाची व्याख्या 'आप्तवाक्यं शब्दः' अशी नैयायिक करतात. शब्द म्हणजे आप्ताचें वचन. वस्तूचें यथार्थ ज्ञान देणाऱ्यास आप्त म्हणतात. नैयायिकांचें हें प्रमाण मानल्यास अतिव्याप्तिदोष येतो. भवभूति शास्त्रपारंगत असल्याने त्याचे शास्त्रीय ग्रंथ शब्दप्रामाण्याखाली येऊं शकतील. पण मालतीमाधवादि नाटकनाटिका त्यानेच रचल्या असल्याने त्याहि प्रमाण मानाव्या लागतील. ही नाटकें स्वकपोलकल्पित किंवा काल्पनिक आहेत हें सर्वांस माहीत आहे. शास्त्रीय ग्रंथ रचणारा भवभूति आप्त आणि नाटकें रचणारा मात्र अनाप्त असें म्हणतां येणार नाही. उम्बेकानेहि म्हटलें आहे की आप्तसुद्धा 'ज्याचा स्वतःला अनुभव नाही असें कांही सांगू नये,' असाच उपदेश करतात. उदाहरणार्थ, (अमक्याच्या) अंगुलीच्या टोकावर हत्तीचे शंभर कळप राहतात असें सांगू नये, कारण त्यांतील असत्यता स्पष्ट दिसेल.)

'चित्सुखी'वरील नयनप्रसादिनी टीकेंत या उताऱ्यावर खालील टीप दिली आहे–भवभूतिरुम्बेकः। एतदेव ग्रन्थान्तरस्थेन तद्वचनेन संमतयति । (भवभूति हाच उम्बेक होय. वर जें म्हटलें आहे त्याच्याच म्हणजे भवभूतीच्या अन्य ग्रंथांतील वचनावरून समर्थित करतात—'उक्तं चैतदुम्बेकेन' या शब्दांनी.) तेव्हा भवभूति व उम्बेक हे एकच होत.

वरील प्रमाणांचें परीक्षण

आता आपण वरील प्रमाणांचें परीक्षण करूं :

(१) पहिल्या प्रमाणाबद्दल मागे सविस्तर विवेचन केलें आहे. भवभूतीच्या नाटकांच्या अनेक हस्तलिखितांचा पुरावा दूर सारून केवळ एका हस्तलिखितांतील विधानावर विश्वास ठेवणें योग्य नाही. भवभूति स्वतःच्या ग्रंथांत आपलें नांव देत नाही, तसेंच उम्बेकहि आपल्या टीकांत कोठेहि आपला भवभूति नांवानें निर्देश करीत नाही. इतरांचा पुरावा या बाबतींत काय कामाचा ?

शिवाय भवभूति हा विदर्भांतील ब्राह्मण होता. त्याच्या पूर्वजांचीं महाकवि, गोपाल, नीलकंठ हीं नांवें तत्कालीन महाराष्ट्रीय ब्राह्मणांच्या नांवांसारखीं आहेत. याच्या उलट उम्बेक हें नांव द्राविड देशांतील आहे हें स्पष्ट दिसतें. या नांवांतील भिन्नतेवरूनहि भवभूति व उम्बेक भिन्न वाटतात.

(२) 'श्लोकवार्त्तिका'वरच्या उम्बेकाच्या तात्पर्यटीकेचें फक्त एकच अपूर्ण हस्तलिखित आजपर्यंत सापडलें आहे. तें मद्रासमध्ये अडयारच्या लायब्ररींत आहे. त्यावरून पं. एस्. के. रामनाथशास्त्री यांनी त्याचा कांही भाग (पृ. १–३८४) संपादिला व बाकीचा (पृ. ३८५–४७४) डॉ. कुन्हन राजांनी तयार केला. हा ग्रंथ मद्रास विश्वविद्यालयाच्या संस्कृत ग्रंथमालेंत (क्र. १३) सन १९४० मध्ये प्रसिद्ध झाला आहे. या ग्रंथाला डॉ. राजांनी विस्तृत प्रस्तावना जोडली आहे. तींत ते म्हणतात—"हें हस्तलिखित अत्यंत जीर्ण स्थितींत आहे, त्याच्या पहिल्या पृष्ठाचा वरचा भाग नष्ट झाला आहे, त्यामुळे आरंभींची एक ओळ पूर्णपणें गेली आहे. दुसऱ्या व तिसऱ्या ओळींतील कांही अक्षरेंहि नष्ट झालीं आहेत. 'ये नाम केचिदिह नः' इत्यादि श्लोक आता मुळीच दिसत नाही. त्यांतील अक्षरांची संख्या पाहतां तो पहिल्या ओळींत आला असणें अशक्य नाही खरें, पण तो तेथे आला असेल असें वाटत नाही—कारण (१) तो श्लोक या टीकेच्या आरंभीं अनुरूप वाटत नाही. भवभूति विद्वान् व शास्त्रपारंगत होता. असा गृहस्थ नाटकें लिहूं लागला तर लोक त्याला हसतील. हीच

गोष्ट भवभूतीच्या बाबतींत घडली असावी. त्याने 'महावीरचरित' लिहिल्यावर विद्वानांत त्याची मानखंडना झाली असावी. म्हणून त्याने त्यानंतरच्या 'मालतीमाधव' नाटकांत आपल्या टीकाकारांस 'ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्' इत्यादि शब्दांत उत्तर दिलें आहे. त्या नाटकांत तो श्लोक प्रसंगानुरूप आहे. पण भवभूति व उम्बेक हे एकच असल्यास 'श्लोकवार्त्तिका'वरील टीकेच्या आरंभीं तो योग्य दिसत नाही. कारण त्यासारख्या शास्त्रीय ग्रंथ लिहिणाऱ्याची लोकांत अवज्ञा कशी होईल? (२) हा श्लोक त्या टीकेच्या आरंभीं आला असल्यास त्यापूर्वी अवश्य असलेल्या मंगल श्लोकाला तेथे (पहिल्या ओळींत) पुरेशी जागा राहत नाही. उम्बेकाने 'भावनाविवेका'वरील आपल्या टीकेच्या आरंभीं 'यस्य स्फुरन्ति युगपत् सकलाः पदार्थाः' इत्यादि मागे उद्धृत केलेला श्लोक दिला आहे. त्यावरून तो ग्रंथारम्भीं मंगलश्लोक घालीत असे, हें स्पष्ट आहे.' वरील दोन कारणांवरून 'ये नाम केचिदिह नः' इत्यादि श्लोक 'श्लोकवार्त्तिका'वरील उम्बेकाच्या टीकेच्या आरंभीं होता काय याविषयी डॉ. राजा यांस संशय वाटतो. त्या टीकेचें एकच हस्तलिखित व तेंहि जीर्ण अवस्थेंत सापडलें असल्याने या बाबतींत निश्चित विधान करणें अशक्य आहे. तथापि वरील श्लोक त्या हस्तलिखितांत होता असें मानलें तरी तो तेथे अननुरूप असल्याने तो मूळचा उम्बेककृत नसून भवभूति व उम्बेक हे एकच होत असें मानणाऱ्या कोणा लेखकाने समासांत (मार्जिनमध्ये) लिहिला असावा व नंतर तो टीकेंत शिरला असें अनुमान डॉ. राजा यांनी केलें आहे. ते पुढे म्हणतात—'तो श्लोक तेथे उम्बेकाने घातला होता असें मानलें तरी त्यावरून त्याचें भवभूतीशीं ऐक्य प्रस्थापित होत नाही. कारण, (१) इतर कांही लेखकांप्रमाणे त्याने तो आपल्या पूर्वीच्या (भवभूतीच्या) 'मालतीमाधवां'तून घेतला असेल. (२) उम्बेक हा मोठा मीमांसक होता, पण भवभूति मीमांसक नसून वेदान्ती होता. त्याने आपल्या नाटकांत परमहंस ज्ञाननिधि नामक गुरूचा आदरपूर्वक निर्देश केला आहे. तसेंच विवर्त्तादि वेदान्ताच्या संज्ञा योजिल्या आहेत, त्यांवरूनहि हें स्पष्ट दिसतें. तेव्हा भवभूति व उम्बेक हे एकच हें मत निराधार आहे.'

डॉ. राजा यांचा सिद्धान्त आम्हांस मान्य असला तरी त्यांनी त्यास दिलेलीं कारणें मात्र आम्हांस सयुक्तिक वाटत नाहीत. 'ये नाम केचिदिह नः' इत्यादि श्लोक उम्बेकाच्या तात्पर्यटीकेच्या हस्तलिखितांत आरंभीं होता, असें पं. रामनाथ शास्त्री हे सांगत असल्यामुळे त्याविषयी संशय घेण्यास जागा नाही. तो श्लोक टीकेच्या आरंभीं अनुरूप नाही हें म्हणणें आम्हांस पटत नाही. उम्बेक हा जाडा मीमांसक होता. पूर्वमीमांसेच्या अनेक प्रश्नांवर त्याचीं मतें इतरांच्याहून निराळीं होतीं. हें पार्थसारथि-मिश्रांच्या 'शास्त्रदीपिके'वरील टीकेंत त्याच्या मतांचे जे अनेक उल्लेख आले आहेत, त्यांवरून स्पष्ट दिसतें. या कारणास्तव त्याच्या हयातींतच त्याच्या मतांवर टीका झाली असल्यास नवल नाही. तो मोठा मानी व स्पष्टवक्ता होता, हें शबरस्वामी व कुमारिलभट्ट यांच्या मतांवरील त्याच्या प्रखर टीकेवरून तसेंच त्याने 'गुरोरप्यवलिप्तस्य' इत्यादि जो श्लोक उद्धृत केला आहे त्यावरूनहि उघड आहे. अशा मानी गृहस्थाला स्वकालीनांनी केलेला अनादर सहन न होऊन 'माझ्या ग्रंथाचें महत्त्व जाणणारा कोठे तरी असेल, किंवा पुढेमागे उत्पन्न होईल. त्याच्याकरिता मी तें लिहीत आहे, तुमच्याकरिता नव्हे,' असें आपल्या टीकाकारांस सांगावेसें वाटल्यास आश्चर्य नाही. हें आपलें मनोगत व्यक्त करण्यास भवभूतीचा 'ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्' इत्यादि श्लोक उत्कृष्ट आहे असें वाटून नवा श्लोक न रचतां त्याने तो उद्धृत केला असावा. त्या श्लोकांत भवभूतीचें नांव नसल्याने तो उम्बेकाच्या बाबतींतहि तितकाच अनुरूप होत होता. उम्बेकाने 'गुरोप्यवलिप्तस्य' इत्यादि दुसराहि अन्यकृत श्लोक स्वमतसमर्थनार्थ उद्धृत केला आहे. अशा प्रकारें टीकाकारांनी प्राचीन ग्रंथांतून श्लोक घेऊन त्यांचा आपल्या ग्रंथांत उपयोग केल्याचीं कांही उदाहरणें डॉ. राजांनी दिलीं आहेत. दण्डीच्या काव्यादर्शातील 'चतुर्मुख-मुखाम्भोजवनहंसवधूर्मम । मानसे रमतां नित्यं सर्वशुक्ला सरस्वती ॥' हा मंगल श्लोक त्यानंतर कित्येक शतकांनी होऊन गेलेल्या उवटाने आपल्या सर्वानुक्रमणीभाष्यांत आरंभीं घातला आहे. तसेंच बाणाच्या कादम्बरींतील 'रजोजुषे जन्मनि सत्त्ववृत्तये' इत्यादि मंगलश्लोक माधव नामक सामवेदाच्या टीकाकाराने ग्रंथारंभीं दिला आहे. अशा तऱ्हेचीं कांही

उदाहरणें कांही कोरीव लेखांतहि आढळतात. उदाहरणार्थ, चालुक्य नृपति द्वितीय त्रिभुवनमल्ल याच्या शक संवत् १००६ च्या हदली येथील कोरीव लेखांत बाणाच्या 'हर्षचरिता'च्या आरंभींचा 'नमस्तुङ्गशिरश्चुम्बिचन्द्राचामरचारवे। त्रैलोक्यनगरारम्भमूलस्तम्भाय शम्भवे ॥' हा मंगलश्लोक दिला आहे. तेव्हां ये नाम केचिदिह नः' इत्यादि केवळ समान श्लोकावरून भवभूति व उम्बेक हे एकच असें म्हणतां येत नाही.

डॉ. राजा यांचीं इतर प्रमाणें मात्र आम्हांस ग्राह्य वाटत नाहीत. 'ये नाम केचिदिह नः' इत्यादि श्लोक हस्तलिखिताच्या आरंभीं असता तर त्या पहिल्या ओळींत मंगलश्लोकास जागा राहिली नसती हें प्रमाण निरपवाद नाही. सर्वच ग्रंथकार आपल्या सर्व ग्रंथांच्या आरंभीं मंगलश्लोक घालतात, असें नाही. उदाहरणार्थ, मंडनमिश्राच्या 'भावनाविवेका'च्या आरंभीं तसा श्लोक नाही. तसेंच भवभूति हा वेदान्ती असल्यामुळे त्यानें पूर्वमीमांसेवर ग्रंथ लिहिला असणें शक्य नाही हें प्रमाणहि सबळ नाही. भवभूति विद्वान् श्रोत्रियकुलांत जन्मला होता. त्याच्या पूर्वजांनी सोमयाग केले होते. ते वेदवेदांगांच्या पठन–पाठनांत तसेंच पंचाग्निहवनांत निरत असत. अशा कुलांत वाढलेला भवभूति पूर्वमीमांसानभिज्ञ असेल असें वाटत नाही. किंबहुना, या बाबतींत अनुमान करण्याचीहि जरुरी नाही. आपल्या नाटकांच्या प्रस्तावनांत तो स्वतःचें 'पदवाक्यप्रमाणज्ञ' असें वर्णन करतो. यांतील 'वाक्य' पदाने मीमांसा, विशेषेंकरून पूर्वमीमांसा, अभिप्रेत आहे. कारण पूर्वमीमांसेंत वेदवाक्यांचा अर्थ करण्याचे नियम दिले आहेत. भवभूतीच्या नांवावर असलेले पूर्वमीमांसेचे ग्रंथ अद्यापि सापडले नाहीत हें खरें पण हें प्रमाण केवळ अभावात्मक आहे. कदाचित् पुढेमागे असे ग्रंथहि प्रकाशांत येतील. भवभूतीने आपल्या ज्ञानाचें वर्णन करतांना 'यद्वेदाध्ययनं तथोपनिषदां सांख्यस्य योगस्य च। ज्ञानं तत्कथनेन किम्' इत्यादि श्लोकांत पूर्वमीमांसेचा उल्लेख केला नाही असा आक्षेप कित्येक विद्वान् घेतात, पण त्यांत तथ्य नाही; कारण वरील श्लोकांत उपनिषदांच्या उल्लेखानें जसें त्याचें वेदान्तज्ञान अभिप्रेत आहे, तसेंच 'वेदाध्ययन' शब्दाने पूर्वमीमांसेचें अध्ययन सूचित आहे. भवभूतीने

तन्त्रशास्त्राचा अभ्यास केल्याचाहि वरील श्लोकांत निर्देश नाही, तथापि अभिनवगुप्ताने आपल्या तन्त्रालोकांत 'दीक्षा, अभिषेक इत्यादिकांशिवाय गुरुत्व येत नाही' या मताचें खंडन करतांना भवभूतीचा उल्लेख खालील श्लोकांत केला आहे.[२५]

असदेतदिति प्राहुर्गुरवस्तत्त्वदर्शिनः ।
श्रीसोमानन्दकल्याणभवभूतिपुरोगमाः ।
तथाहि त्रीशिकाशास्त्रविवृतौ तेऽभ्युधुर्बुधाः ॥

त्यावरून भवभूतीचा तन्त्रशास्त्रावर ग्रंथ होता हें स्पष्ट दिसतें. तसा त्याचा पूर्वमीमांसेवरहि असेल. तेव्हा केवळ या अभावात्मक प्रमाणावरून त्याचें उम्बेकाहून भिन्नत्व सिद्ध होत नाही.

(३) 'चित्सुखीं'तील उल्लेखाचें जरा बारकाईने वाचन केल्यास चित्सुखाचार्यांसहि भवभूति व उम्बेक हे एक वाटत नव्हते, हें दिसून येईल. ते म्हणतात, "न हि पुरा आप्त एव सन् नाटकनाटिकादिप्रबन्धविरचनमात्रेण अनाप्तो भवति भवभूतिः । उक्तं चैतदुम्बेकेन 'यदाप्तोऽपि कस्मैचिदुपदिशति'—" इत्यादि. भवभूति व उम्बेक हे एकच असें चित्सुखाचार्यांचें मत असतें तर त्यांनी 'उक्तं चैतदुम्बेकेन' असें न म्हणतां 'उक्तं च तेनैव' असें म्हणून त्यापुढील उम्बेकाच्या टीकेंतील उतारा दिला असता. चित्सुखीच्या टीकाकाराने 'भवभूतिरुम्बेकः' असें म्हटलें आहे खरें, पण तो अलीकडचा ग्रंथकार आहे. त्याच्या त्या विधानावरून त्याच्या काळीं भवभूति व उम्बेक एक होत असा समज प्रचलित झाला होता, एवढेंच आपणांस म्हणतां येईल.

हा समजहि कसा उत्पन्न झाला हें सांगणें कठीण नाही. त्याचें कारण एकच. तें म्हणजे 'ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्' इत्यादि श्लोक. हा श्लोक 'मालतीमाधवां'त भवभूतीने स्वतःचा वृत्तांत देतांना घातला आहे. हें टीकाकारांस माहीत होतें. तोच श्लोक 'श्लोकवार्त्तिका'वरील

---

२५. हा श्लोक माझे विद्यार्थिमित्र प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांनी माझ्या नजरेस आणून दिला, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

उम्बेकाच्या टीकेच्या आरंभीं दिसल्यावर भवभूति व उम्बेक हे एकच असा टीकाकारांचा समज झाला असावा. तसेंच उम्बेकानें ज्या ठिकाणीं ' गुरोरप्यवलिप्तस्य ' इत्यादि श्लोक उद्धृत केला आहे त्या ठिकाणीं कुमारिलांच्या मताचें खंडन असल्यानें तो कुमारिलांचा शिष्य होता अशी समजूत रूढ झाली. कुमारिलांचा शिष्य मंडनमिश्र हा सुविख्यात मीमांसक होऊन गेला. उम्बेकहि तसाच जाडा मीमांसक होता व तो कुमारिलभट्टांना गुरु मानतो असें वाटल्यामुळे, उम्बेक व मंडनमिश्र एकच असाहि समज उत्पन्न झाला. तो विद्यारण्यांच्या 'शंकरदिग्विजयां'त ' उम्बेक इत्यभिहितस्य हि तस्य लोके ' इत्यादि पूर्वोक्त श्लोकांत स्पष्ट दिसतो. मंडनानें संन्यास घेऊन सुरेश्वर असें नांव धारण केलें असें 'शंकरदिग्विजयां'त वर्णिलें आहे. म्हणून मंडनमिश्र, उम्बेक, भवभूति व सुरेश्वर हे एकच असें मानलें गेलें. विद्यारण्यांच्या 'शंकरदिग्विजयां'त मंडनमिश्रांना अनेक ठिकाणीं विश्वरूप म्हटलें आहे. तेव्हा भवभूति, सुरेश्वर व विश्वरूप हीं तिन्ही नांवें एकाच व्यक्तीचीं होत, असें वाटून 'याज्ञवल्क्यस्मृती'च्या बालक्रीडा टीकेच्या एका उपटीकाकारानें पुढील श्लोकांत त्या तिघांचें ऐक्य कल्पिलें आहे—यत्प्रसादादयं लोको धर्ममार्गस्थितः सुखी । भवभूतिसुरेशाख्यं विश्वरूपं प्रणम्य तम् ॥ सारांश, टीकाकारांचीं सर्व मतें एकत्र केल्यावर मंडन, सुरेश्वर, विश्वरूप, उम्बेक आणि भवभूति अशीं पांच नांवें एकाच व्यक्तीनें धारण केलीं होतीं, असें मानावें लागेल. या मतांमुळे संस्कृत वाङ्मयाच्या इतिहासांत अत्यंत घोटाळा उत्पन्न झाला आहे. ही सर्व गुंतागुंत उलगडण्याचा प्रयत्न येथें केला नाही. पण भवभूति व उम्बेक हे भिन्न होते हें मात्र सिद्ध करण्यास पुरेशीं प्रमाणें आहेत, तीं प्रस्तुत लेखांत मांडलीं आहेत. त्यांचा विद्वानांनी विचार करावा अशी विनंती करून हा लांबलेला लेख पुरा करतों.

प्राचीन भारतीय इतिहास

४. प्राचीन विदर्भ*

विदर्भ हा अत्यंत प्राचीन देश आहे. प्राचीन काळीं यामध्ये घनदाट अरण्य होतें. पण विदर्भनामक राजाने त्यामध्ये आर्यांची वसाहत करून त्याला भरभराटीला आणलें म्हणून त्याला विदर्भ असें नांव पडलें अशी आख्यायिका आहे. 'भागवतपुराणां'त (५, ४, १०) विदर्भ हा ऋषभदेवाचा पुत्र होता असें म्हटलें आहे. विदर्भांची अत्यंत प्राचीन राजधानी कुंडिनपुर अद्यापि अमरावती जिल्ह्यांत पूर्वीच्या नांवानें विद्यमान आहे. त्याच्या जवळच्या नदीला विदर्भा असेंच नांव होतें हें नलचम्पूंतील खालील श्लोकावरून (६, ६६) दिसतें—

> वीरपुरुषं तदेतद्वरदातटनामकं महाराष्ट्रम् ।
> दक्षिणसरस्वती सा वहति विदर्भा नदी यत्र ।।

यामध्ये 'वरदातट' असें विदर्भांचें दुसरें नांव आहे. यापासून नंतर वऱ्हाड हें देशनाम प्रचलित झालें. वास्तविक याचें पूर्वीचें नांव वरदाकट असें असावें. प्राचीन विदर्भाच्या जिल्ह्यांचीं नांवें 'कट'शब्दान्त असत. उदाहरणार्थ, नान्दीकट म्हणजे हल्लीचें हैदराबाद राज्यांतील नांदेड; वेणाकट म्हणजे वेणा किंवा वैनगंगा तीराचा प्रदेश ज्यामध्ये अन्तर्भूत होत होता तो जिल्हा. त्याप्रमाणेच वरदातीरावरील प्रदेश ज्यामध्ये होता, त्याला

---

* 'मातृभूमि (अकोला), दिवाळी विशेषांक, १९५६.

चरदाकट असें म्हणत असावे. कालान्तराने या जिल्ह्याचें नांव सर्व देशाला प्राप्त झालें. प्रथम त्याचें रूपान्तर वरदातट व नंतर वऱ्हाड असें झालेलें दिसतें. पण विदर्भाची व्याप्ति सध्याच्या ' वऱ्हाड ' इतकी संकुचित नव्हती. त्यामध्ये उत्तरेस नर्मदा नदीपासून दक्षिणेस कृष्णा नदीच्या खोऱ्यापर्यंत व व पश्चिमेस ऋषीक (हल्लीच्या खानदेश) देशापासून पूर्वेस कोसल (छत्तीसगड) देशापर्यंत पसरलेल्या विशाल भूभागाचा समावेश होत होता. कालिदासाच्या ' मालविकाग्निमित्रां'त वरदा (वर्धा) नदीने विदर्भाचे दोन भाग झाले होते असें दाखविलें आहे. त्यावरूनहि वरील गोष्ट स्पष्ट होईल.

विदर्भाची प्राचीनता

विदर्भ देशाचें नांव ऋग्वेदांत येत नाही, पण ' विदर्भी कौण्डिन्य ' या ऋषीचा उल्लेख ' बृहदारण्यक उपनिषदां 'त येतो. तसेंच ' प्रश्नोपनिषदां 'त विदर्भ देशाच्या भार्गवाचें नांव आलें आहे. त्यावरून उपनिषद्काळीं विदर्भ देश प्रसिद्ध होता असें दिसतें. विदर्भी कौण्डिन्य हा गोत्रऋषि होता. याच्या गोत्रांतील ब्राह्मणांचा उल्लेख खिस्तोत्तर अकराव्या शतकांतील ताम्रपटांत आला आहे. [१]

विदर्भराजापूर्वीहि अगस्त्याने येथे आपला आश्रम स्थापून आर्यधर्माचा प्रसार केला होता अशी आख्यायिका आहे. अगस्त्यापुढे विन्ध्यपर्वत नम्र झाला होता, व त्याला त्याने ' मी परत येईपर्यंत असाच राहा ' असें सांगितलें होतें, अशी कथा आहे, तिचें तात्पर्य हें की अगस्त्याने प्रथम विंध्य पर्वतांतून दक्षिण दिशेचा मार्ग काढला. अगस्त्याचीं अनेक सूक्तें ऋग्वेदांत आहेत. त्याने विदर्भराजकन्या लोपामुद्रा हिच्याशीं विवाह केला होता. तिचाहि नामनिर्देश ऋग्वेदमंत्रांत ((१, १७९, ४) येतो.

महाभारत, रामायण, पुराणें इत्यादि उत्तरकालीन ग्रंथांत विदर्भाचा उल्लेख अनेक ठिकाणीं येतो. त्यांतील पयोष्णी (पूर्णा), वरदा (वर्धा),

---

१. वा. वि. मिराशी, ' इन्क्रिप्शन्स् ऑफ दि कलचुरि–चेदि ईरा ', भाग १, पृ. २५८.

वेणा (वाइनगंगा) इत्यादि पुण्य नद्यांचा व त्यांच्या तीरावरील पुण्य-क्षेत्रांचा उल्लेख व वर्णनहि वरील ग्रंथांत येतें. भगवान् कृष्णाची पट्टराणी रुक्मिणी व नलराजाची राणी दमयंती या विदर्भराजकन्या होत्या. रघुवंशांतील अजराजाची राणी इंदुमती हीहि विदर्भाचीच राजकन्या होती. तिच्या स्वयंवराचें सुंदर वर्णन कालिदासाच्या ' रघुवंशां 'त आलें आहे.

विदर्भाचा प्राचीन इतिहास

गेल्या शंभर दीडशें वर्षांतील संशोधनावरून विदर्भाच्या प्राचीन इतिहासावर बराच प्रकाश पडला आहे. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकांत हा प्रदेश पुण्यश्लोक अशोकाच्या साम्राज्यांत मोडत होता. खुद्द अशोकाचा लेख या प्रदेशांत अद्यापि सापडला नाही, तथापि त्यांच्या महामात्राने (प्रदेशाधिपतीने) कोरविलेला शिलालेख चांदा जिल्ह्यांतील देवटेक येथे मिळाला आहे. त्यामध्ये प्राण्याचें बंधन किंवा हिंसा करणाऱ्यास शासन करण्याची एका स्वामीची (राजाची) आज्ञा कोरली होती. त्या लेखाच्या अक्षरवटिकेवरून हा स्वामी अशोकच असावा असें वाटतें.

सातवाहन वंश

मौर्यांच्या नंतर सातवाहनांचा उदय झाला. त्यांच्या साम्राज्यांत विदर्भाचा समावेश होत होता यांत संशय नाही. सातवाहनांची राजधानी गोदावरीच्या तीरीं प्रतिष्ठान (पैठण) येथे होती. सातवाहनांच्या नाण्यांचा मोठा संचय वीस-बावीस वर्षांपूर्वी आकोला जिल्ह्यांतील तऱ्हाळा येथे सापडला होता, त्यामध्ये (गौतमीपुत्र) सातकर्णि, पुळुमावि, सातकर्णि, स्कन्द सातकर्णि, कुंभ सातकर्णि, कर्ण सातकर्णि, शक सातकर्णि, व (शेवटचा) पुळुमावि यांचीं अनेक नाणीं मिळालीं होतीं. त्यावरून सातवाहनांचें राज्य या प्रदेशावर अगदी अखेरपर्यंत (ख्रिस्तोत्तर २५० पर्यंत) टिकलें होतें, असें दिसतें.

सातवाहनांच्या काळीं कलिंगाधिपति खारवेल याने विदर्भावर स्वारी केली होती. त्याचें सैन्य सातकर्णि राजाची पर्वा न करतां पश्चिमेस कण्हबेण्णा नदीपर्यंत चालून गेलें होतें असें भुवनेश्वराजवळच्या हाथीगुंफा

लेण्यांतील लेखांत म्हटलें आहे. ही कण्हबेण्णा बहुतकरून नागपुरजवळची कन्हान असावी.

वाकाटक राजवंश

खिस्तोत्तर २५० च्या सुमारास सातवाहनांचा अस्त होऊन वाकाटक नृपतींचा उदय झाला. या घराण्याचा मूळ पुरुष वाकाटक याचा एक त्रुटित लेख आंध्र देशांत गुंटूर जिल्ह्यांतील अमरावतीच्या स्तूपावर खोदलेला सापडला आहे. हा वाकाटक हैदराबाद राज्याच्या मध्यभागांतील प्रदेशांत राहत असावा. पुढे कांही काळाने त्याच्या वंशांतील विंध्यशक्ति नामक पुरुषाने सातवाहनांचा उच्छेद करून विदर्भांत आपलें राज्य स्थापलें. या वंशाला 'वाकाटक वंश' असें नांव आहे.

वाकाटकांच्या काळीं विदर्भाची अत्यंत भरभराट झाली. त्यांचें साम्राज्य उत्तरेंत माळव्यापासून दक्षिणेंत तुंगभद्रेच्या खोऱ्यापर्यंत व पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंत पसरलें. या काळांत विदर्भांत संस्कृत व प्राकृत वाङ्मय, कलाकौशल्य, व्यापार इत्यादिकांना उत्तेजन मिळून विदर्भाची कीर्ति दिगन्तीं पसरली. म्हणून या कालाला विदर्भाच्या प्राचीन इतिहासाचें 'सुवर्णयुग' म्हणण्यास हरकत नाही.

वाकाटक राज्याचा संस्थापक विंध्यशक्ति याचा उल्लेख पुराणांत व अजंट्याच्या सोळा क्रमांकाच्या लेखांत येतो. त्या लेखांतील वर्णनावरून तो द्विज म्हणजे ब्राह्मण होता असें दिसतें. कोरीव लेखांत वाकाटकांचें विष्णुवृद्ध हें गोत्र उल्लेखिलें आहे. विंध्यशक्ति हा आरंभीं सातवाहनांचा मांडलिक किंवा मोठा अधिकारी असावा. इ. स. २५० च्या सुमारास योग्य संधि साधून त्याने विदर्भांत आपलें राज्य स्थापलें. त्याचा मुलगा प्रथम प्रवरसेन हा महापराक्रमी निघाला. याने आपलें साम्राज्य चारी दिशांस वाढवलें. नंतर याने अनेक सोमयाग, वाजपेय व चार अश्वमेध करून सम्राट् ही पदवी धारण केली. ही पदवी त्या काळीं दुसऱ्या कोणी धारण केलेली दिसत नाही. याला चार पुत्र होते. त्यांमध्ये त्याच्या निधनानंतर त्याच्या साम्राज्याची विभागणी झाली. ज्येष्ठ पातीची राजधानी रामटेक

जवळचें नन्दिवर्धन किंवा नगरधन ही होती. हिच्या अमलाखाली उत्तर विदर्भ होता. दुसरी शाखा वत्सगुल्म (वाशीम) येथून दक्षिण विदर्भावर राज्य करीत होती बाकीच्या दोन शाखांच्या अमलाखाली कोणता प्रदेश होता तें निश्चितपणें समजत नाही. कदाचित् त्यांपैकी एक दक्षिण कोसलवर (छत्तीसगडावर) व दुसरी कुन्तल देशावर (कृष्णा नदीच्या खोऱ्यावर) राज्य करीत असेल. या शाखांचे लेख अद्यापि मिळाले नाहीत.

नन्दिवर्धन शाखेंत अनेक पराक्रमी राजे होऊन गेले. सन ३९५ च्या सुमारास गुप्त नृपति द्वितीय चन्द्रगुप्त—विक्रमादित्य याने माळवा व काठेवाड यांवर राज्य करणाऱ्या क्षत्रपांच्या राज्यावर स्वारी करण्याचा बेत केला. वाकाटकांचें राज्य क्षत्रपांच्या राज्यास लागून होतें, म्हणून त्याने त्यांचें साहाय्य मागितलें. गुप्त व वाकाटक यांच्या सैन्यांनी क्षत्रपांचा उच्छेद केला. या निमित्ताने घडून आलेल्या संबंधाला चिरस्थायी स्वरूप देण्याकरिता द्वितीय चन्द्रगुप्ताने आपली कन्या प्रभावतीगुप्ता वाकाटक राजपुत्र द्वितीय रुद्रसेन यास दिली. गादीवर आल्यावर लौकरच द्वितीय रुद्रसेन कालवश झाला. त्या वेळीं त्याचे दोन्ही मुलगे दिवाकरसेन व दामोदरसेन हे अल्पवयी होते. म्हणून प्रभावतीगुप्ता दिवाकरसेन या वडील मुलाच्या नांवाने राज्य करूं लागली. तिला राज्यकारभारांत साहाय्य करण्याकरिता चन्द्रगुप्ताने आपल्या दरबारचे सेनापति व मुत्सद्दी विदर्भांत पाठविले होते. त्यांमध्ये कालिदास हाहि होता. विदर्भांत असतांना नन्दिवर्धन राजधानीजवळच्या रामगिरीवर श्रीरामचंद्राच्या पादुकांच्या दर्शनास कालिदास गेला असतां त्याला मेघदूताची कल्पना सुचली व त्याने तें काव्य विदर्भांतच पुरें केलें असें दिसतें.

दिवाकरसेन हाहि अल्पायुषी झाला. त्यानंतर त्याचा भाऊ दामोदरसेन हा (द्वितीय) प्रवरसेन या नांवाने गादीवर बसला. याने सेतुबंध किंवा रावणवध हें प्राकृत काव्य रचलें. त्यामध्ये त्याला कविकुलगुरु कालिदासाचें साहाय्य झालें होतें म्हणून तें काव्य कालिदासानेच विक्रमादित्याच्या आज्ञेने प्रवरसेनाकरिता रचलें अशी आख्यायिका प्रचलित झाली. या प्रवरसेनाचे अनेक ताम्रपट विदर्भांत सापडले आहेत. याने आपल्या नांवें

प्रवरपुर नामक नगर स्थापून तेथें आपली राजधानी केली. हें प्रवरपुर वर्ध्याजवळचें पवनार होय.

द्वितीय प्रवरसेनानंतर त्याचा पुत्र नरेंद्रसेन गादीवर आला. याच्या कारकीर्दींत याचें साम्राज्य उत्तरेस मालव (माळवा), मेकल (नर्मदेच्या उगमाजवळचा प्रदेश) व कोसल (छत्तीसगड) या प्रदेशांवर पसरलें; पण शेवटीं बस्तर प्रदेशांत राज्य करणाऱ्या नल नृपति भवदत्तवर्मा याने विदर्भावर स्वारी करून नन्दिवर्धन काबीज केलें. त्यामुळे वाकाटकांना पुनः आपली राजधानी बदलावी लागली. भंडारा जिल्ह्यांत आमगांवाजवळ पद्मपुर नामक गाव आहे. तेथे या शाखेची शेवटची राजधानी होती असें दिसतें. वाकाटकांचा एक ताम्रपट त्या नगरांतून दिलेला सापडला आहे.

नरेंद्रसेनाचा पुत्र द्वितीय पृथिवीषेण याने नलांचा पराभव करून त्यांना विदर्भांतून पिटाळून लावलें व उत्तरेस विंध्यप्रदेशांतील नागोद संस्थानापर्यंत आपला अंमल बसविला. पण त्याच्यानंतर सन ४९० च्या सुमारास या ज्येष्ठ शाखेचा अस्त झाला.

वाकाटकांची दुसरी शाखा वत्सगुल्म येथून राज्य करीत होती. या शाखेचा मूळ पुरुष सर्वसेन हा प्रथम प्रवरसेनाचा पुत्र होता. याने 'हरिविजय' नामक काव्य व कांही सुभाषितें महाराष्ट्री प्राकृतांत रचलीं होतीं. या शाखेचा शेवटचा राजा हरिषेण. याच्या साम्राज्यांत अवन्ति (माळवा), कोसल (छत्तीसगड), कलिंग, त्रिकूट (नाशिकजवळचा प्रदेश), लाट (गुजराथ), कुन्तल (दक्षिणमहाराष्ट्र) इत्यादि देश अन्तर्भूत होते, त्यावरून त्याच्या विस्ताराची कल्पना येईल. हरिषेणाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र नादान निघाल्यामुळे विदर्भांत अंदाधुंदी माजली. तिचें पर्यवसान कर्नाटकांतील वनवासीच्या कदंबांच्या स्वारींत होऊन वाकाटक राजा मारला गेला. या काळचें वर्णन दण्डीच्या दशकुमारचरिताच्या 'विश्रुतचरित' नामक उच्छ्वासांत आलें आहे.

विदर्भाचें सुवर्णयुग

वाकाटकांच्या काळीं धर्म, विद्या व कला यांना उदार राजाश्रय मिळून त्यांची अभूतपूर्व उन्नति झाली. प्रथम प्रवरसेनाच्या श्रौत यज्ञांचा

उल्लेख मागे आला आहे. त्याने पौराणिक धर्मालाहि आश्रय दिला होता. त्याने प्रवरेश्वर नामक देवालय बांधलें होतें. त्याचा उल्लेख कोरीव लेखांत आला आहे. बहुतेक वाकाटक नृपति शिवोपासक होते. त्यांनी अनेक शिवालयें बांधलीं असावीं, पण तीं आता अस्तित्वांत नाहीत. वाकाटकराज्ञी प्रभावतीगुप्ता ही विष्णूपासक होती. तिच्या प्रभावामुळे तिचा पति द्वितीय रुद्रसेन हाहि विष्णुभक्त झाला होता. प्रभावतीगुप्तेच्या काळीं नन्दिवर्धन राजधानीजवळील रामगिरि(रामटेक)वरील श्रीरामचंद्राच्या देवालयाला फार महत्त्व आलें होतें. तिचे व तिच्या द्वितीय प्रवरसेन नामक मुलाचे कांही ताम्रपट रामगिरि येथे दिलेले सापडले आहेत. रामगिरीवरील देवालयांत भगवान् रामचंद्राच्या पादुकांची पूजा होत असे. त्याचा उल्लेख कालिदासाच्या मेघदूतांत 'वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु' असा आला आहे. द्वितीय प्रवरसेनाने प्रवरपुर नगर स्थापून आपली राजधानी केल्यावर तेथे आपल्या मातेकरिता श्रीरामचंद्राचें उत्तुंग देवालय बांधून त्याला सुंदर शिल्पांनी सुशोभित केलें होतें. त्या शिल्पाचे कांही अवशेष पवनार येथे धामनदीच्या कांठीं आचार्य विनोबाजींच्या आश्रमाच्या परिसरांत सापडले आहेत. वाकाटक नृपतींनी अनेक विद्वान् ब्राह्मणांना भूमिदानें दिलीं होतीं. एकट्या द्वितीय प्रवरसेनाचेच दहा बारा ताम्रपट आतापर्यंत सापडले आहेत. वाकाटकांच्या काळीं बौद्ध धर्महि भरभराटींत होता. स्वतः वाकाटक नृपतींनी त्या धर्माला आश्रय दिल्याचे उल्लेख अद्यापि सापडले नाहीत, पण त्यांचे मंत्री व मांडलिक यांनी त्या धर्माचा पुरस्कार केला होता, यांत संशय नाही. अजंट्याचें सोळा नंबरचें लेणें व गुलवाडा येथील घटोत्कच लेणें हीं वाकाटक नृपति हरिषेण याचा सचिव वराहदेव याने कोरविलीं होतीं. ऋषीक (खानदेश) देशाधिपति वाकाटकांचा मांडलिक होता. त्याने अजंट्याचें सतरा क्रमांकाचें विहारलेणें व एकोणीस क्रमांकाचें चैत्यलेणें हीं कोरविलीं होतीं. अजंट्याच्या या लेण्यांतील शिल्पें व बरीचशीं चित्रें अद्यपि सुस्थितींत आहेत. त्यामुळे हीं लेणीं भारतांतील अत्युत्कृष्ट लेण्यांत गणण्यांत येतात.

संस्कृत व प्राकृत वाङ्मयालाहि वाकाटकांच्या काळीं उत्तम बहर आला होता. त्या काळच्या वैदर्भ काव्यांच्या उत्कृष्टत्वामुळे साहित्य-

शास्त्रांत वैदर्भी नामक रीतीला किंवा काव्यरचनाशैलीला सर्व रीतींमध्ये प्राधान्य मिळालें व कालिदासासारख्या अन्यदेशीय कवींनाहि त्याच रीतींत आपलीं काव्यें रचण्याची प्रेरणा झाली. कालिदासाचें 'मेघदूत' काव्य या रीतीचा उत्तम नमुना होय. इतर संस्कृत काव्यें कालाच्या ओघांत आता नष्ट झालीं आहेत. पण तत्कालीन कांही प्राकृत काव्यें व सुभाषितें सुदैवानें अद्यापि अवशिष्ट आहेत. विशेष उल्लेखनीय गोष्ट ही की स्वतः वाकाटक नृपतींनी प्राकृतांत उत्कृष्ट काव्यरचना केली होती. द्वितीय प्रवरसेनाचें 'सेतुबन्ध' किंवा 'रावणवध' हें महाराष्ट्री प्राकृतांत रचलेलें काव्य सुदैवानें अद्यापि उपलब्ध आहे. यांत सेतुबंधापासून रावणवधापर्यंतचें रामचरित पंधरा आश्वासांत (सर्गांत) वर्णिलें आहे. या काव्याची स्तुति बाण, दण्डी, आनंदवर्धन इत्यादि संस्कृत कवींनी व आलंकारिकांनी मुक्तकंठानें केली आहे. वत्सगुल्म शाखेचा संस्थापक सर्वसेन यानें 'हरिविजय' नामक उत्कृष्ट काव्य महाराष्ट्री प्राकृतांत रचलें होतें. तें आता उपलब्ध नाही, तथापि त्यांतील कांही उतारे ध्वन्यालोक, काव्यानुशासन इत्यादि अलंकारग्रंथांत घेतले आहेत. त्यांवरून त्यांत कृष्णानें स्वर्गावर स्वारी करून पारिजात वृक्ष पृथ्वीवर आणला आणि सत्यभामेला प्रसन्न केलें, हें कथानक घेतलें होतें हें स्पष्ट झालें आहे. या ग्रंथाचीहि स्तुति अनेक श्रेष्ठ आलंकारिकांनी केली आहे. याशिवाय या राजांनी व इतर कवींनी अनेक सुंदर सुभाषितें प्राकृतांत रचलीं होतीं त्यांपैकी कांहींचा अंतर्भाव पुढें 'गाथासप्तशती' या प्राकृत गाथासंग्रहांत करण्यांत आला.

कलचुरींचा उदय

वाकाटकांच्या अस्तानंतर सन ५५० च्या सुमारास माहिष्मतीच्या कलचुरींचें राज्य विदर्भांत प्रस्थापित झालें. कलचुरींचे लेख अद्यापि विदर्भांत सापडले नाहीत, पण त्या वंशाचा संस्थापक कृष्णराज यांचीं अनेक चांदीचीं नाणीं अमरावती जिल्ह्यांतील धामोरी व बैतुल जिल्ह्यांतील पट्टन या गावीं सांपडलीं आहेत. या नाण्यांच्या पुढील बाजूवर राजाचा मुखवटा असून मागील बाजूवर 'मातापितृपादानुध्यातपरममाहेश्वर-श्रीकृष्णराज' असा तत्कालीन लिपींत लेख असतो. कृष्णराजाचा मांडलिक

'राष्ट्रकूट' स्वामिराज याचा एक ताम्रपट रामटेकजवळ नगरधन गावीं थोडया वर्षांपूर्वी सापडला होता. त्यामध्ये एका महामात्रगणानें (माहुतांच्या संघानें) ब्राह्मणांना एक गाव दिल्याचा उल्लेख आहे.

चालुक्य व राष्ट्रकूट यांच्या राजवटी

सातव्या शतकाच्या प्रथमार्धांत उदयास आलेला बदामीचा चालुक्यनृपति द्वितीय पुलकेशी यानें कलचुरींचा पराभव करून तीन महाराष्ट्र आपल्या साम्राज्यास जोडले. त्याचें वर्णन त्याच्या ऐहोळे लेखांत पुढीलप्रमाणे आलें आहे.

अगमदधिपतित्वं यो महाराष्ट्रकाणां
नवनवतिसहस्रग्रामभाजां त्रयाणाम् ।

(जो पुलकेशी नव्याण्णव हजार गावें असलेल्या तीन महाराष्ट्रांचा स्वामी झाला.)

बदामीच्या चालुक्यांच्या व त्यानंतर उदयास आलेल्या राष्ट्रकूटांच्या राजवटींत विदर्भांत एक राष्ट्रकूट घराणें राज्य करीत होतें. त्याचे कांही ताम्रपट अकोला जिल्ह्यांत सांगळूद येथे व बैतुल जिल्ह्यांत मुलताई येथे सापडले आहेत. त्यांची राजधानी नंतरच्या काळांत तरी अचलपुर येथे होती. हें घराणें मांडलिक होतें. त्यामुळे त्याच्या दरबारीं विद्वानांस उदार राजाश्रय मिळणें कठीण जाई. या काळांतील सम्राटांच्या राजधान्या महाराष्ट्राबाहेर बदामी व मान्यखेट येथे होत्या. म्हणून विदर्भीय ग्रंथकारांना राजाश्रयाकरिता इतरत्र जावें लागे. उदाहरणार्थ, दंडीचे पूर्वज अचलपुरचे होते, तरी त्यांस पल्लव राजांच्या कांची या राजधानीस जावें लागलें, तेथे त्याने 'अवन्तिसुन्दरी' हें गद्यकाव्य रचलें. त्याचे 'दशकुमारचरित' व 'काव्यादर्श' हे ग्रंथहि सुप्रसिद्ध आहेत. दुसरा कवि भवभूति. यांचे पूर्वज भंडारा जिल्ह्यांतील पद्मपुर गावीं राहात होते. पद्मपुर हें एके काळीं वाकाटकांच्या राजधानीचें शहर होतें, पण भवभूतीला विदर्भांत राजाश्रय न मिळाल्यामुळे उत्तरेंत कालप्रियनाथाच्या (काल्पी येथील सूर्याच्या) यात्रेच्या प्रसंगीं आपल्या नाटकांचे प्रयोग करावे लागले. पुढे त्याची कीर्ति कनोजच्या

यशोवर्म्याच्या कानीं जाऊन त्याला त्याचा उदार आश्रय मिळाला. भवभूतीने 'महावीरचरित' 'मालतीमाधव' व 'उत्तररामचरित' हीं नाटकें या क्रमाने लिहिलीं. संस्कृत नाट्यवाङ्मयांत भवभूतीचा दर्जा कालिदासाच्या खालोखाल आहे. विशेषतः करुण रसांत तर त्याचा हात धरणारा कोणीहि नाही. हें 'कारुण्यं भवभूतिरेव तनुते' या सुप्रसिद्ध वचनांत सांगितलें आहे. तिसरा वैदर्भ कवि राजशेखर. हा आपणांस 'महाराष्ट्रकूलचूडामणि' म्हणवितो. हा व याचे पूर्वज वत्सगुल्म येथे राहात होते असें दिसतें. कारण याने वत्गुल्म (अकोला जिल्ह्यांतील वाशिम) या नगराविषयी आपलें प्रेम अनेक ठिकाणीं सूचित केलें आहे. राजशेखराचे अकालजलद, सुरानंद व तरल हे पूर्वज त्रिपुरी (जबलपुरजवळचें तेवर) येथे कलचुरिराजांच्या आश्रयास होते. राजशेखर आपल्या पूर्व वयांत कन्नोजच्या महेंद्रपाल व महीपाल या राजांच्या दरबारीं होता. तेथे त्याचीं 'बालरामायण' व 'बालभारत' हीं संस्कृत नाटकें व 'कर्पूरमंजरी' हें प्राकृत नाटक हीं रंगभूमीवर आलीं. पुढे राष्ट्रकूट व कलचुरि यांच्या स्वाऱ्यांमुळे प्रतीहारांचें साम्राज्य खिळखिळें झाल्यावर राजशेखर त्रिपुरीस कलचुरि राजांच्या आश्रयास आला. तेथे त्याने 'विद्धशालभंजिका' हें नाटक, 'काव्यमीमांसा' हा साहित्यशास्त्रावरचा अपूर्ण ग्रंथ, 'हरविलास' नामक काव्य आणि प्राचीन संस्कृत कवींच्या स्तुतिपर अनेक सुभाषितें लिहिलीं. दहाव्या शतकांत होऊन गेलेला 'नलचम्पू'कार त्रिविक्रमभट्ट हाहि विदर्भीय ग्रंथकार होता असें दिसतें.

आता आपण पुनः विदर्भाच्या राजकीय इतिहासाकडे वळूं. बदामीच्या चालुक्यांचे लेख विदर्भांत सापडले नाहीत, पण त्यांच्यानंतर उदयास आलेल्या राष्ट्रकूटांचे अनेक ताम्रपट तेथे मिळाले आहेत. त्यांमध्ये कालानुक्रमाने पहिला ताम्रपट प्रथम कृष्णराजाचा भांदक येथे मिळाला होता. त्यानंतर त्याचा नातू तृतीय गोविंद याचे अनेक ताम्रपट अकोला व अमरावती जिल्ह्यांत सापडले आहेत. त्यांमध्ये विद्वान् ब्राह्मणांना अनेक गावें दान दिल्याचा निर्देश आहे. त्यानंतर सन ९३३ च्या सुमारास अचलपुराजवळ पयोष्णीच्या तीरीं राष्ट्रकूट व कलचुरि यांच्या सैन्याची घनघोर लढाई होऊन तींत कलचुरीस विजय मिळाला. त्याचा उल्लेख

राजशेखराच्या ‘ विद्धशालभंजिके ’त आला आहे. या लढाईंत अचलपुरच्या मांडलिक राष्ट्रकूट राजाने भाग घेतला होता. त्याचा पराभव झाल्यामुळे तें घराणें पदच्युत झालें असावें. त्यानंतर विदर्भ मान्यखेटच्या राष्ट्रकूट राजांच्या प्रत्यक्ष अमलाखाली आला असावा.

राष्ट्रकूटांच्या दरबारीं प्राकृत व अपभ्रंश वाङ्मयाला उदार आश्रय मिळाला होता. अलीकडे अनेक प्राकृत व अपभ्रंश ग्रंथ कारंजाच्या जैन ग्रंथभांडारांत सापडले आहेत. त्यांपैकी कांहींचे कर्ते विदर्भांतील होते. राष्ट्रकूटांच्या काळीं चांदा जिल्ह्यांतील मार्कंडी येथील सुंदर शिल्पांनी भूषित केलेलें शंकराचें देवालय बांधलें गेलें.

कल्याणीचे उत्तर चालुक्य

राष्ट्रकूटानंतर कल्याणीच्या चालुक्यांचा उदय झाला. या वंशांतील महाप्रतापी राजा सहावा विक्रमादित्य याच्या काळचा शके १००८ (सन १०८७) या वर्षाचा स्तंभलेख नागपूर संग्रहालयांत ठेवला आहे. तो सीताबर्डीचा लेख म्हणून प्रसिद्ध असला तरी तो मूळचा भांदक येथे विंध्यासन टेकडीजवळ होता असे विनायकराव औरंगाबादकरांच्या वर्णनावरून दिसतें. या लेखांत एका ब्राह्मण अधिकाऱ्याने गाईच्या चराईकरिता कांही निवर्तनें जमीन दिल्याचा उल्लेख आहे.

परमारांचें आक्रमण

सुप्रसिद्ध धारानृपति भोज याचा पुतण्या जगद्देव हा सहाव्या विक्रमादित्याच्या आश्रयास आला होता. त्याचें स्वागत करून विक्रमादित्याने त्याला विदर्भाच्या कांही भागाचा अधिपति नेमलें होतें. त्याचा सन ११११२ चा शिलालेख कांही वर्षांपूर्वी यवतमाळ जिल्ह्यांतील पुसद गावानजीच्या डोंगरगांव या गावीं सापडला होता. त्यामध्ये जगद्देवाने डोंगरगांव येथे बांधलेल्या शिवालयाला तो गाव दान दिल्याचा उल्लेख आहे.

याप्रमाणे विदर्भाचा पश्चिम भाग उत्तर चालुक्यांच्या अमलाखाली आला, तरी पूर्व भागावर परमारांची सत्ता कांही काळ टिकली असावी. नागपूर

संग्रहालयांत परमारांचा एक मोठा शिलालेख (सन ११०४–५ चा) आहे. तो मूळचा भांदक येथील होता असें दिसतें. त्यामध्ये परमारनृपति लक्ष्मदेव याने एका देवळाला दोन गावें दान दिल्याचा उल्लेख आहे. या काळांत विदर्भांत कलाकौशल्याला पूर्वीप्रमाणेच उत्तेजन मिळत राहिलें हें त्या काळच्या मूर्ति मधून मधून विदर्भांत सापडतात त्यांवरून दिसून येईल.

देवगिरीचे यादव

बाराव्या शतकाच्या अखेरीस देवगिरीचे यादव उदयास आले. या यादवांचा विदर्भांतील पहिला लेख शके ११३३ (सन १२११–१२) चा असून तो बुलढाणा जिल्ह्यांत अंबडापुर येथे सापडला आहे. तो प्रताप-चक्रवर्ती सिंघण देवाच्या काळचा असून त्यांत एका श्रेष्ठीने एका देवळाचें तोरण उभारल्याचा उल्लेख आहे. यानंतर अमरावती जिल्ह्यांतील नांदगांव येथील टेकडीवरच्या देवळांत सिंघणाचा नातू कृष्ण यांच्या काळचा शके ११७७ (सन १२५४–५५) चा मराठी लेख आहे. त्यामध्ये त्या देवळांतील देवाच्या पूजेकरिता फुलांच्या लाखोल्या वहाव्या म्हणून कित्येक गद्याणकें (सोन्याची नाणीं) दिल्याचा उल्लेख आहे. कृष्णाचा आणखी एक लेख चांदा जिल्ह्यांतील मार्कंडीस सापडला आहे. कृष्णाचा मुलगा रामचंद्र याच्या राघव नामक अधिकाऱ्याने रामटेक येथील लक्ष्मणाच्या देवळाकरिता कांही (बहुधा त्याचा जीर्णोद्धार) केल्याचा उल्लेख त्या देवळाच्या गर्भ-गृहाला लावलेल्या शिलालेखांत आहे. रामदेवराव यादवाचा शेवटचा ताम्रपट शके १२३२ (सन १३१०) चा हैद्राबाद राजाच्या बीड जिल्ह्यांत गोदावरीच्या दक्षिण तीरावर पुरुषोत्तमपुरी येथे कांही वर्षांपूर्वी सापडला होता. त्यामध्ये रामदेवाने आपल्या पुरुषोत्तम नामक मंत्र्यास कांही गावें दान दिलीं व त्याने त्यांचा अग्रहार करून तो कांही ब्राह्मणांस दिला असा निर्देश आहे.

यादवांच्या राजवटींतील विदर्भाचा उत्कर्ष

देवगिरीच्या यादवांच्या राजवटींत संस्कृत व मराठी वाङ्मयाला उदार राजाश्रय मिळाला. सुप्रसिद्ध हेमाद्रि पंडित हा महादेव व रामदेव

यांच्या कारकीर्दींत 'श्रीकरणाधिप' म्हणजे सचिवालयाचा प्रमुख या उच्चपदावर होता. त्याने 'चतुर्वर्गचिंतामणि' नामक धर्मशास्त्राचा बृहत्कोश रचला होता. याचे व्रतखंड, दानखंड, तीर्थखंड व मोक्षखंड असे चार खंड आहेत. याशिवाय परिशेषखंड म्हणून एक पांचवें खंड आहे. त्यांत देवता, श्राद्ध, तिथिनिर्णय व प्रायश्चित्तें यांचें विवेचन आहे. याशिवाय 'आयुर्वेदरसायन' व 'मुक्ताफलटीका' हे ग्रंथहि त्याने लिहिले होते.

हेमाद्रीचा आश्रित बोपदेव याने व्याकरण, वैद्यक, तिथिनिर्णय, साहित्य, भागवत वगैरे विषयांवर अनेक ग्रंथ लिहिले होते. याचें मुग्धबोध व्याकरण समजण्यास सोपें असल्याने त्याचा प्रसार अद्यापि बंगाल प्रदेशांत चालू आहे. बोपदेवाच्या 'मुक्ताफल' नामक ग्रंथावर हेमाद्रीने टीका लिहिली आहे तींत बोपदेवाने व्याकरणावर दहा, वैद्यकावर नऊ, ज्योतिषावर एक, साहित्यशास्त्रावर तीन आणि भागवत तत्त्वावर तीन मिळून एकूण सव्वीस ग्रंथ लिहिले होते असें म्हटलें आहे. त्यावरून बोपदेवाच्या प्रचंड ग्रंथसंभाराची कल्पना येईल. बोपदेव हा वर्धा नदीच्या तीरीं असलेल्या वेदपद नामक गांवचा रहिवासी होता.

महानुभाव पंथाचा प्रसार

यादवांच्या राजवटींत विदर्भांत महानुभावपंथाचा उदय झाला. या पंथाचे मूळ पुरुष गोविंद प्रभु उर्फ गुंडम राउळ हे काण्व शाखीय ब्राह्मण असून अमरावतीजवळ ऋद्धपुर गावीं राहत होते. त्यांचे शिष्य गुजराथी नागर ब्राह्मण हरिपाल उर्फ चक्रधर यांनी विदर्भांत महानुभावपंथाची स्थापना व प्रसार केला. यादव घराण्यांतील कांही पुरुष व स्त्रियाहि या पंथाचे अनुयायी बनले होते असें महानुभाव वाङ्मयांतील उल्लेखांवरून दिसतें. हा पंथ कृष्णोपासक व भक्तिमार्गी होता तरी त्याचे कांही आचार तत्कालीन लोकांस विचित्र व सनातन वैदिक धर्माविरुद्ध असे वाटत होते, असें दिसतें. त्यामुळे रामदेवराव यादवाच्या काळीं या पंथाचा थोडाबहुत छळ झाला असावा. तथापि हेमाद्रीच्या आज्ञेने श्रीचक्रधराचा वध झाला असें विधान कांही महानुभावीय ग्रंथांत केलें आहे त्याला पुरेसा आधार

नाही. याच्या उलट श्रीचक्रधर बदरिकाश्रमास निघून गेले हें कांही महानुभावीय पोथ्यांतीलच विधान जास्त संभवनीय वाटतें. चक्रधराच्या वधानंतर रामदेव राजास उपरति होऊन त्याने हेमाद्रीला छळ करून ठार मारलें हें कांही महानुभावीय पोथ्यांतील विधान इतर बलवत्तर पुराव्यावरून आता असत्य ठरलें आहे.

श्रीचक्रधरांनी आपल्या पंथाचा उपदेश मराठींत करण्याचा उपक्रम केल्यामुळे त्या काळीं मराठींत उत्तम ग्रंथरचना झाली. कवीश्वर भास्कर भट्टाचें 'शिशुपालवध' व 'एकादशस्कंद,' दामोदर पंडिताचें 'वत्सहरण,' नरेंद्रकवीचें 'रुक्मिणीस्वयंवर,' विश्वनाथ बाळापूरकराचा 'ज्ञानबोध,' रवळो व्यासाचें 'सह्याद्रिवर्णन' व नारो व्यासाचें 'ऋद्धपुरवर्णन' या सात ग्रंथांना महानुभाव पंथीय विशेष पूज्य मानतात. मराठीच्या आद्य वाङ्मयांत यांची गणना होते.

यादवांच्या राजवटींत वैदिक धर्मीयांनीहि विदर्भांत उत्कृष्ट ग्रंथरचना केली होती. मराठींतील आद्य ग्रंथकार मुकुंदराज यांचे परमगुरु हरिनाथ यांची समाधि वैनगंगेच्या तीरीं अंबानगरी ऊर्फ अंभोरे येथे आहे. मुकुंदराजाची समाधि बैतुल जवळ खेडलें या गावच्या पडक्या किल्ल्यांत आहे. मुकुंदराजांनी विवेकसिंधु व परमामृत हे दोन उत्कृष्ट वेदान्तपर ग्रंथ लिहिले.

यादवसेनापति खोलेश्वर

यादवकालीं विदर्भीयांनी रणांगणावरहि आपल्या शौर्याने कीर्ति संपादन केली होती. यादव नृपति सिंघण याचा सेनापति खोलेश्वर हा मूळचा विदर्भांतील होता. त्याचा पिता त्रिविक्रम हा उदुम्बरपंक्ति नामक अग्रहारांत राहात असे. हें उदुम्बरपंक्ति वऱ्हाडांतील राणी उमरावती नामक गाव असावें असा तर्क आहे. खोलेश्वराने अनेक विजय मिळविले. त्यांचें वर्णन आंबेजोगाई येथील त्याच्या लेखांत केलें आहे. त्याने चांहंदाधीश्वर (चांद्याचा अधिपति) भोजदेव याचा पराभव केला, कलिंगराजाला रणांगणावर पकडलें, वाराणसीच्या (काशीच्या) रामपाल नामक राजाला पिटाळून लावलें, नागणाचा शिरच्छेद केला, तोरगलचा किल्ला काबीज केला,

गुर्जराना जर्जर करून भडोच जवळ समुद्रांत जयस्तंभ उभारला, असें वर्णन त्याच्या लेखांत आलें आहे. त्यावरून कर्णाटकापासून उत्तर प्रदेशापर्यंत आणि अरबी समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत त्याने आपल्या शौर्याने स्वतःचा दरारा बसविला होता असें स्पष्ट दिसतें. त्याचा पुत्र राम हाहि पित्याप्रमाणे शूर निघाला, पण गुर्जरांशीं नर्मदेच्या काठीं लढत असतां तो धारातीर्थी पडला, असें कोरीव लेखांत म्हटलें आहे.

खोलेश्वर विदर्भांतील असल्याने त्याने या प्रदेशांत अनेक धार्मिक कृत्यें केलीं. त्याने अचलपुरांत शार्ङ्गधराचें (विष्णूचें) पर्वतासारखें उत्तुंग मंदिर बांधलें, पयोष्णीच्या (पूर्णेच्या) तीरावर आपल्या नांवें खोलापुर नामक अग्रहार बसविला. हें गाव अद्यापि प्राचीन नांवाने विद्यमान आहे. तसेंच वरदातटांत (वर्धेच्या काठीं) किंवा वऱ्हाडांत अनेक मंदिरें, अग्रहार, प्रपा (पाणपोया) व वापी केल्या व अशा रीतीने आपल्या जन्मभूमीचें ऋण फेडलें.

तेराव्या शतकाच्या अखेरीस यादवांच्या राज्यावर मुसलमानांची स्वारी होऊन तींत रामदेवरावाचा पराजय झाला. व त्याला शत्रूला जबर खंडणी देणें भाग पडलें. यानंतर यादवांच्या राज्याला उतरती कळा लागत गेली व लौकरच विदर्भ मुसलमानांच्या अमलाखाली गेला. तो काळ मध्ययुगांत अंतर्भूत होत असल्याने त्याचें वर्णन येथे करणें अप्रस्तुत होईल.

वरील विवेचनावरून विदर्भाने प्राचीन काळीं राज्यशासन, साहित्य व कला या क्षेत्रांत किती प्रगति केली होती हें दिसून येईल. विदर्भाचा प्राचीन इतिहास अत्यंत उज्ज्वल आहे. त्यायोगें स्वातंत्र्योत्तर काळांतील विदर्भीयांस स्फूर्ति मिळो अशी आशा व्यक्त करून, विदर्भाच्या प्राचीन इतिहासाचें हें सिंहावलोकन पुरें करतों.

५. दक्षिण कोसलची प्राचीन राजधानी*

फार प्राचीन काळापासून ज्यावर सूर्यवंशी राजांचें राज्य होतें तो उत्तर हिंदुस्थानांतील कोसल देश सुप्रसिद्ध आहे. त्याची राजधानी अयोध्या होती. श्रीरामचंद्रांच्या वास्तव्यामुळे तिला पावनत्व प्राप्त होऊन तेव्हापासून भारतवर्षांतील सात मोक्षदायक पुरींमध्ये तिचा अन्तर्भाव करण्यांत आला आहे. पण या कोसल देशाशिवाय आणखी एका कोसल देशाचा आपल्या प्राचीन ग्रंथांत व कोरीव लेखांत उल्लेख येतो. 'वायुपुराणां'तें विन्ध्य पर्वताच्या आजूबाजूला वसलेल्या देशांमध्ये कोसल देशाचा उल्लेख आहे—

शृणुध्वं विन्ध्यवासिनः ॥३१॥

मालवाश्च करूषाश्च मेकलाश्चोत्कलैः सह ।
उत्तमार्णा दशार्णाश्च भोजाः किष्किन्धकैः सह ॥
तोसलाः कोसलाश्चैव त्रैपुरा वैदिशास्तथा ॥
... ...
एते जनपदाः सर्वे विन्ध्यपृष्ठनिवासिनः ॥

उत्तरेंतील कोसल देश विन्ध्यपर्वतापासून पुष्कळ दूर असल्याने तो येथे विवक्षित नाही हें उघड आहे. वराहमिहिराच्या 'बृहत्संहितें'त

आग्नेय्यां दिशि कोसलकलिङ्गवङ्गोपवङ्गजठराङ्गाः ।
शौलिकविदर्भवत्सान्ध्रचेदिकाश्चोर्ध्वकण्ठाश्च ॥

या श्लोकांत भारतवर्षाच्या आग्नेय दिशेस असलेल्या देशांच्या नामावलींत कोसल देशाचा उल्लेख आहे, तोहि उत्तर दिशेस असलेल्या कोसलाचा समजणें शक्य नाही. महाभारताच्या सभापर्वांत सहदेवाने भोजकटाच्या

---

* 'विहंगम,' नागपूर, ऑक्टोबर, १९३७.

भीष्मक राजाचा पराभव करून नंतर वेणातटाच्या व कोसलदेशाच्या राजांना जिंकलें असें वर्णन आलें आहे. हा कोसल देशहि भोजकट (सध्याचा वऱ्हाड) व वेणातट किंवा वेणाकट (वैनगंगेच्या दोन्ही तीरांवरील प्रदेश ज्यांत अंतर्भूत होत होता तो देश) याप्रमाणे दक्षिणेंत होता यांत संशय नाही. महाभारतांतील नलोपाख्यानांत दमयन्तीला विदर्भाचा मार्ग दाखवितांना नल म्हणतो—

एष पन्था विदर्भाणामसौ गच्छति कोसलान्।
अतःपरं च देशोऽयं दक्षिणे दक्षिणापथः ॥

यावरून विदर्भाप्रमाणे कोसल देशहि विन्ध्य पर्वताच्या दक्षिणेस होता हें दिसून येईल. प्रसिद्ध गुप्त सम्राट् समुद्रगुप्त याच्या अलाहाबादेंतील शिलास्तंभावरील दिग्विजयवर्णनांत त्याने जिंकलेल्या दक्षिणापथांतील राजांमध्ये कोसलदेशाधिपति महेन्द्र राजाचा उल्लेख आहे. या सर्व उल्लेखांवरून दक्षिणेंतहि एक कोसल देश प्रसिद्ध होता हें उघड आहे. दशरथाची स्त्री कौसल्या या देशाच्या राजाची कन्या असावी. श्रीरामचंद्राच्या स्वर्गारोहणानंतर त्याचा वडील मुलगा कुश याला याच कोसल देशाचें राज्य मिळालें. त्याच्या नांवाने श्रीरामचंद्रांनी वसविलेली कुशावती किंवा कुशस्थली ही नगरी या दक्षिण कोसलाची राजधानी झाली ती विन्ध्यपर्वताच्या पठारावर वसली होती असें वर्णन रामायण, वायुपुराण इत्यादि ग्रन्थांत आलें आहे.

कुशस्य नगरी रम्या विन्ध्यपर्वतरोधसि ।
कुशावतीति नाम्ना सा कृता रामेण धीमता ॥

(रामायण, अ० १२१)

त्याप्रमाणेच

कुशस्य कोशला राज्यं पुरी चापि कुशस्थली ।
रम्या निवेशिता तेन विन्ध्यपर्वतसानुषु ॥ (वायुपुराण)

या कुशावती किंवा कुशस्थली नगरीचा अद्यापि शोध लागला नाही. पण 'मृच्छकटिकां'तील उल्लेखावरून ती वेणा (वैनगंगा) नदीच्या तीरावर होती, असें समजतें. यानंतर दक्षिण कोसलाच्या राजधानीचें वर्णन ह्यूएनसन या चिनी यात्रेकरूने आपल्या प्रवासवृत्तांत केलें आहे. त्यावरून असें

समजतें की कलिंग देशांतील प्रवास संपवून ह्यूएनत्संग वायव्यदिशेने पर्वत व अरण्यांतून १८०० ली अंतर[१] प्रवास करून कोसल देशास पोचला. तेथील राजा बौद्धधर्मी असून उदार म्हणून प्रसिद्ध होता. या देशाच्या आग्नेय दिशेस राजधानीपासून ३०० लीपेक्षा थोडया जास्त अंतरावर पोलोमोलोकिलि नांवाचा पर्वत होता. त्या पर्वतांतील आश्चर्यकारक लेण्यांचें ह्यूएनत्संगने वर्णन केलें आहे. कोसलदेशांतील प्रवास संपवून हा चिनी यात्रेकरू दक्षिण दिशेस ९०० ली चालून गेल्यावर अन्तोलो नामक देशास पोचला. त्याच्या राजधानीचें नांव 'पिंग्चीलो' किंवा 'पिंग्किलो' असें होतें. ह्यूएनत्संगच्या या वर्णनांतील कांही देशांचीं नांवें निर्विवादपणें माहीत झालीं आहेत. कलिंग देश म्हणजे पूर्व किनाऱ्यावरील ओरिसाच्या दक्षिणेचा प्रदेश, ज्यामध्ये सध्याचे गंजाम, विजगापट्टम हे जिल्हे व गोदावरी जिल्ह्याचा कांही भाग अंतर्भूत होतो, तो होय. कोसल देश हा मागे उल्लेखिलेला दक्षिण कोसल होय. कोसल देशाहून ज्या देशास ह्यूएनत्संग पोचला तो अन्तोलो देश म्हणजे आन्ध्र (कृष्णा व गोदावरी या नद्यांमधील) देश होय. त्यांतील पिंग्ची(ग्कि)लो हें नगर इ. स. च्या सातव्या शतकांतील पूर्व चालुक्यांची राजधानी वेंगी असावें. कोसल देशाच्या राजधानीविषयी मात्र संशोधकांचें ऐकमत्य झालेलें नाहीं. फर्ग्यूसन व ग्रँट यांचे मतें ती राजधानी वैरागड ही असावी. कनिंग्हामने ह्यूएनत्संगने दिलेल्या अंतरावरून ती राजधानी चांदा असावी असें म्हटलें आहे. कै. रायबहादूर हीरालाल यांना ती चांद्याच्या उत्तरेस १६ मैलांवर असलेलें भांदक ही असावी, असें प्रथम वाटलें होतें; कारण ह्यूएनत्संगच्या वर्णनाप्रमाणे येथे बौद्ध लेणीं व इतरहि बौद्ध अवशेष दिसतात तसे अवशेष वैरागड किंवा चांदा येथेहि दिसत नाहीत. पुढे स्वतःच्या निधनापूर्वी थोडेच दिवस त्यांनी या विषयावर इंडियन अँटिक्वरीमध्ये एक लेख लिहिला होता व त्याचा सारांश त्यांनी 'शारदाश्रम वार्षिका'मध्ये दिला आहे. त्यांत 'रायपुर जिल्ह्यांतील श्रीपुर व भांदक या दोन्ही स्थलांचा दक्षिण कोसलच्या प्राचीन राजधानीवर सारखाच हक्क दिसतो. पण त्या हक्काच्या

---

१ सामान्यतः ६ ली म्हणजे १ मैल असें मानण्यांत येतें.

सिद्धयर्थ आवश्यक असलेलीं स्पष्ट प्रमाणें श्रीपुरपेक्षा भांदक येथे जास्त दिसतात ' असा निष्कर्ष त्यांनी काढला आहे.

राजधानीचा शोध

फर्ग्यूसन व कनिंग्हाम यांनी अनुक्रमें वैरागड व चांदा ही दक्षिण कोसलाची राजधानी असावी असें म्हटलें होतें. पण या दोन्ही ठिकाणीं महत्त्वाचे बौद्ध अवशेष नसल्याने त्यांचें मत रा. ब. हिरालाल यांनी दाखविल्याप्रमाणे मान्य करतां येत नाही. स्वतः रा. ब. हीरालाल यांचें भांदक ही राजधानी असावी हें मतहि निराळया कारणास्तव तितकेंच आक्षेपार्ह आहे. कारण भांदक हें प्राचीन दक्षिण कोसलांत मोडत नसुन विदर्भांत अन्तर्भूत होत होतें हें स्पष्ट आहे. वाकाटकांच्या एका लेखांत कोसल देशाच्या राजाचा मांडलिक म्हणून उल्लेख आहे. पण केवळ चांदाच नव्हे तर नागपूर, भंडारा व बालाघाट हे मध्यप्रांतांतील जिल्हे वाकाटकांच्या खास अमलाखाली होते हें त्यांच्या या जिल्ह्यांत सापडलेल्या ताम्रपटांवरून व त्यांत दिलेल्या गावांच्या उल्लेखांवरून स्पष्ट दिसतें. वर्धा नदीच्या पूर्वेचा हा प्रदेश सध्याच्या आकुंचित वऱ्हाडांत मोडत नसला तरी प्राचीन काळच्या विस्तृत विदर्भांत मोडत होता यांत संशय नाही. कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्रां'त वर्धा नदीने झालेले विदर्भाचे दोन भाग शुंगवंशी अग्निमित्राने यज्ञसेन व माधवसेन या दोन चुलत भावांत वाटून दिले असा कथाभाग वर्णिला आहे. भवभूतीचें पद्मपुर हें भंडारा जिल्ह्याच्या पूर्व सीमा प्रदेशीं असलेलें आमगांव जवळपासचें पदमपूर होय हें मी इतरत्र दाखविलें आहे.[२] हा प्रदेश विदर्भांत मोडत होता याला उपोद्बलक असें आणखी एक प्रमाण नुकतेंच श्री. य. खु. देशपांडे यांनी माझ्या नजरेस आणलें आहे. नागपूर येथील वकील व श्रीगजाननभक्त श्रीयुत ढोक यांनी पुरुषार्थाच्या गेल्या गणेशांकांत नागपूर पासून तीस मैलांवर असलेलें आदासा हें श्रीगणपतीचें स्थान विदर्भांत आहे, असा 'गणेशपुराणां'तील

---

२ संशोधनमुक्तावलि, सर १, यांतील 'भवभूतीचें जन्मस्थान' हा लेख पहा.

एक उतारा दिला आहे.[3] त्यावरूनहि नागपूर जिल्हा (व त्याप्रमाणेच चांदा जिल्हाहि) प्राचीन विदर्भांत मोडत होता यांत संशय नाही. हल्लीच्या छत्तीसगढाप्रमाणे दक्षिण कोसलाची पश्चिम मर्यादा बालाघाट व भंडारा जिल्हयांच्या पूर्वमर्यादेशीं संलग्न असावी. या सर्व कारणांस्तव चांद्याजवळचें भांदक हें प्राचीन दक्षिण कोसलची राजधानी असणें शक्य नाही, हें उघड आहे.

श्रीपुर हीच दक्षिण कोसलची राजधानी

तेव्हा श्रीपुर ही दक्षिण कोसलची राजधानी होती, हाच पक्ष सयुक्तिक दिसतो. येथे बौद्ध अवशेष मुबलक प्रमाणांत सापडतात व त्या ठिकाणीं उत्खनन केलें तर आणखीहि सापडतील यांत संशय नाही.[4] कलिंग देशाहून वायव्य दिशेस १८०० ली चालून गेल्यावर आपण कोसल देशास पोचलों असें ह्यूएनत्संगने म्हटलें आहे. असे दिशांचे व अंतरांचे उल्लेख एका देशाच्या राजधानीपासून दुसऱ्या देशाच्या राजधानीपर्यंत समजण्याचा प्रघात आहे. प्राचीन कलिंग देशाची राजधानी गंजाम जिल्ह्यांतील पार्ला-किमेडी शहरापासून १८ मैलांवर असलेलें मुखलिंगम् होय. श्रीपुर हें त्याच्या वायव्येस सरळरेषेंत सुमारें २७५ मैलांवर असल्याने दिशा व अंतर हीं या बाबतींत जुळतात, असें म्हणण्यास हरकत नाही. कोसल देशाच्या राजधानी-पासून नैर्ऋत्य दिशेस ३०० ली अंतरावर पोलोमोलोकिलि नांवाचा पर्वत आहे व त्यांत आश्चर्यकारक बौद्ध लेणीं आहेत, असें ह्यूएनत्संगने वर्णिलें आहे. पोलोमोलोकिलि हें संस्कृत भ्रमरगिरि नांवाचें चिनी रूप दिसतें. या नांवाचा पर्वत मध्यप्रांत वऱ्हाडांत दिसत नाही; तथापि श्रीपुरच्या नैऋत्य दिशेस सुमारें २० मैलांवर आरंग नांवाचें गांव आहे. तेथे पुष्कळ जैन व बौद्ध

३ विदर्भदेशे नगरं आदिशाख्यं बभूव ह ॥ गणेशपुराण, क्रीडाखंड, अ. २६.

४ अलीकडे डॉ. मो. गं. दीक्षित यांनी श्रीपुर येथे उत्खनन करून अनेक बौद्ध विहारांचे व मंदिरांचे अवशेष प्रकाशांत आणले आहेत.

देवळांचे व मूर्तींचे अवशेष अद्यापि सापडतात व पेटिकाशीर्षक लिपींत कोरलेले ताम्रपटहि तेथे सापडले आहेत. त्यावरून तें गाव अत्यंत प्राचीन आहे यांत संशय नाही. आरंगला सापडलेल्या एका शिलाखंडावर 'भृंगार-पर्वतो बलिविधितापको–' अशीं ब्राह्मी लिपींत लिहिलेलीं अक्षरें कोरलीं आहेत. तो शिलालेख रायपूरच्या अजबखान्यांत ठेवला आहे. तशा नांवाचा पर्वत आरंगच्या आसपास आहे काय व त्यांत प्राचीन व बौद्ध लेणीं दिसतात काय, ह्याविषयी मी स्वतः तें गाव पाहिलें नसल्यामुळे सांगतां येत नाही. तथापि असा एखादा पर्वत असल्यास भृंगार पर्वतालाच ह्यूएनत्संगने भ्रमरगिरि म्हटलें असावें. अशा बाबतींत नांवाची चूक होणें असंभवनीय नाही. शिवाय भ्रमर काय किंवा भृंगार काय दोन्ही लहान पाखरेंच. तें कसेंहि असलें तरी ह्यूएनत्संगने वर्णिलेला पर्वत आरंगजवळ असण्याचा बराच संभव आहे.

कोसल देशाहून ह्यूएनत्संग दक्षिणेस ९०० ली अंतर चालून आंध्र देशाला पोचला. त्याने उल्लेखिलेली आंध्र देशाची राजधानी पिंग्चिला ही वेंगी मानल्यास ती श्रीपुरच्या दक्षिणेसच येते. तेव्हा दिशेच्या दृष्टीने हा उल्लेख बरोबर मानण्यास हरकत नाही. श्रीपुरहून वेंगीचें अंतर मात्र ९०० ली किंवा सामान्यतः १५० मैल नसून सरळ रेषेंतही ३०० मैलांवर आहे. पण अंतराच्या बाबतींत ह्यूएनत्संगच्या वर्णनांत अशी चूक अनेक ठिकाणीं आढळते. हल्लीप्रमाणे त्या काळीं सर्व्हे डिपार्टमेन्टने सर्व प्रदेश मोजला नसल्याने चालून जाण्यास लागलेल्या काळावरून ह्यूएनत्संगने स्थळांचीं अंतरें ढोबळ मानाने दिलीं असावीं, हें उघड आहे.

कोसल देशाचा राजा बौद्धधर्मी असून औदार्याबद्दल प्रसिद्ध होता असें ह्यूएनत्संगने म्हटलें आहे. त्या काळीं कोसल देशावर सोमवंशी राजांचें आधिपत्य होतें. या राजांच्या लेखांत कोणत्याहि शकाचा उल्लेख नसल्याने त्यांचा काल त्यांच्या कोरीव लेखाच्या लिपीवरून ठरविण्यांत येत होता. पण कांही वर्षांपूर्वी श्रीपुर येथील एक शिलालेख रा. ब. हिरालाल यांनी प्रकाशित केला आहे, त्यांत महाशिवगुप्त बालार्जुन या राजाची माता वासटा ही मगधावरील आपल्या स्वामित्वामुळे प्रबल झालेल्या 'वर्मन्'

वंशांतील सूर्यवर्म्याची मुलगी होती असें म्हटलें आहे.[५] हा सूर्यवर्मन् मौखरि घराण्यांतील सूर्यवर्मन् असावा. ईशानवर्मन् नामक आपल्या पित्याच्या कारकीर्दींत या मौखरि सूर्यवर्म्यानें श्रीशंकराच्या देवळाचा जीर्णोद्धार केला होता. त्याचा उल्लेख असलेला एक शिलालेख उत्तर प्रदेशांत हराहा येथे सापडला आहे. त्यावर विक्रम सं. ६११ (इ. स. ५५५) हा कालनिर्देश आहे. त्यावरून त्याच्या मुलीचा मुलगा महाशिवगुप्त बालार्जुन याचा काल इ. स. च्या सहाव्या शतकाची अखेर हा येतो. तेव्हा हा राजा ह्यूएनत्संगच्या वेळीं कोसल देशावर राज्य करीत असावा. या महाशिवगुप्त बालार्जुनाचा पेटिकाशीर्षक लिपींत कोरलेला एक ताम्रपट अलिकडे बिलासपूर जिल्ह्यांत बिलासपूरपासून सुमारें १६ मैलांवर असलेल्या मल्लारगावीं सापडला आहे.[६] या ताम्रपटांत हा राजा आपणांस परममाहेश्वर म्हणवितो, तरी त्यानें आषाढ महिन्यांत सूर्यग्रहणप्रसंगीं तरडंशक नांवाच्या गावीं असलेल्या बौद्ध विहारांतील भिक्षुसंघाला एक गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. त्यावरून या राजाचा बौद्ध धर्माला उदार आश्रय होता यांत संशय नाही. ह्यूएनत्संगच्या वेळीं हाच राजा राज्य करीत असावा; कारण त्याची कारकीर्द निदान सत्तावन वर्षें चालली होती, हें एका ताम्रपटावरून दिसतें.[७] बौद्ध धर्माला उदार आश्रय देणाऱ्या राजाला ह्यूएनत्संगने बौद्धधर्मी मानलें असलें तर त्यांत आश्चर्य नाही.

वरील विवेचनावरून दक्षिण कोसलची प्राचीन राजधानी चांदा जिल्ह्यांतील भांदक ही नसून रायपूर जिल्ह्यांतील श्रीपुर होती, हें दिसून येईल.

---

५ निष्पङ्के मगधाधिपत्यमहतां जातः कुले वर्मणां
पुण्याभिः कृतिभिः कृती कृतमनःकम्पः सुधाभोजिनाम् ।
यामासाद्य सुतां हिमाचल इव श्रीसूर्यवर्मा नृपः
प्राप प्राक् परमेश्वरश्वशुरतागर्वानिखर्वं पदम् ॥

६ एपिग्राफिया इंडिका, पु. २३, पृ. ११३ इ. पाहा.

७ पूर्वोक्त, पु. २७, पृ. ३२५.

६. महाराष्ट्रांतील प्राचीन शक राजवंश*

पुण्यश्लोक अशोकाच्या काळानंतर महाराष्ट्रांत सातवाहन राजवंशाचा उदय झाला; व लौकरच त्यांचें साम्राज्य उत्तरेंत माळवा, गुजरात व सौराष्ट्र व दक्षिणेंत कोंकण, महाराष्ट्र, दक्षिण कोसल (छत्तीसगढ) कर्णाटक, आंध्र इत्यादि प्रदेशांवर पसरलें. बाणाच्या 'हर्षचरितां'त सातवाहनांना 'त्रिसमुद्राधिपति' (पूर्व, पश्चिम व दक्षिण या तीन्ही समुद्रांचे अधिपति) असें म्हटलें आहे. नाशिकच्या लेण्यांतील एका प्राकृत लेखांतहि सातवाहननृपति गौतमीपुत्र सातकर्णि याच्या वर्णनांत 'तिसमुदतोयपीत-वाहनस' (ज्याचे घोडे तिन्ही समुद्रांचे पाणी प्याले होते) असा शब्दप्रयोग आला आहे. त्यावरूनहि त्यांच्या साम्राज्याच्या विस्ताराची कल्पना करतां येते. पण खिस्ती शकाच्या आरंभीं या साम्राज्यावर मोठें गंडांतर आलें. त्या काळीं उत्तर हिंदुस्थानावर शककुशाणांच्या स्वाऱ्या झाल्या. कुशाणसम्राट् कनिष्क याने उत्तर हिंदुस्थानचा बराचसा भाग पूर्वेस काशी व दक्षिणेस विन्ध्यपर्वत येथपर्यंत आक्रमिला. त्याची राजधानी पुरुषपुर (सध्याचें पेशावर) येथे होती. याने आपल्या साम्राज्यांतील कांही प्रांतांवर क्षत्रप नांवाचे प्रांताधिकारी नेमले होते. या काळांत गुजरात, सौराष्ट्र, महाराष्ट्र व कोंकण या प्रदेशांवरहि शक टोळ्यांनी स्वाऱ्या करून तेथे आपलीं राज्यें स्थापिलीं. त्यांच्याहि अधिपतींना क्षत्रप अशी संज्ञा होती. त्यावरून ते दुसऱ्या कोणा बलाढ्य सम्राटाचे—बहुधा कुशाणवंशी कनिष्काचेच प्रांताधिपति असावेत, असें अनुमान केलें जातें. सौराष्ट्रांत चष्टन आणि गुजरात–महाराष्ट्रांत नहपान या क्षत्रपांनी राज्य केलें. या काळांत सातवाहनांना पश्चिम महाराष्ट्रांतून आपला पाय काढावा लागला. तेव्हा त्यांनी विदर्भांत वेणा (वैनगंगा) नदीच्या तीरीं आपली गादी स्थापिली.

---

* 'तरुणभारत', नागपूर, दीपावलि विशेषांक, १९५३.

‘ बेणाकटकस्वामी ’ सातकर्णि

पुढे योग्य संधि पाहून सातवाहननृपति गौतमीपुत्र सातकर्णि याने शकक्षत्रप नहपान याच्या मुलखावर स्वारी करून त्याच्या वंशाचा निःपात केला. या लढाईनंतर लौकरच त्याने नाशिकजवळ असलेल्या लेण्यांत आपला लेख कोरविला. त्यांत त्याने आपला निर्देश ‘ बेणाकटकस्वामी ’ असा केला आहे.[1] बेणाकट किंवा बेणाकटक याचा उल्लेख वाकाटकांच्याहि ताम्रपटांत येतो. वाकाटकनृपति द्वितीय प्रवरसेन याच्या तिरोडी येथील ताम्रपटांत बेणाकटाच्या पश्चिम भागांतील कोशम्बखण्ड (बालाघाट जिल्ह्यांतील कोसंब्रा) हें गाव दान दिल्याचा निर्देश आहे.[2] त्यावरून बेणाकटांत वैनगंगेच्या दोन्ही तीरांवरचा कांही प्रदेश अन्तर्भूत होत होता, असें दिसतें. तेव्हा गौतमीपुत्र सातकर्णि व त्याचे कांही पूर्वज यांची राजधानी कांही काळ या भागांत होती यांत संशय नाही.

नाशिकच्या लेण्यांतील उल्लेख

शक क्षत्रप नहपान याच्या काळचे कांही लेख नाशिक व कार्लें येथील लेण्यांत कोरले आहेत. ते प्राकृत भाषेंत आहेत. त्यांत नहपानाचा जामात उषवदात (ऋषभदत्त) याने बौद्ध भिक्षूंना व ब्राह्मणांना दिलेल्या अनेक, विध दानांचा उल्लेख आहे. नहपानाचें राज्य राजपुताना, अजमीर, माळवा-गुजरात, कोंकण व महाराष्ट्र या प्रदेशांवर पसरलें होतें. याच्या लेखांतील शेवटचें वर्ष ४६ आहे. तें कनिष्काने सन ७८ मध्ये स्थापिलेल्या संवताचें मानलें जातें. तेव्हा नहपानचा काळ खिस्ती शतकाचा पूर्वार्ध हा मानण्यास हरकत नाही.

नाशिकच्या लेण्यांतील एका प्राकृत लेखांत गौतमीपुत्र सातकर्णीचें वर्णन ‘ खखरातवसनिरवसेसकरस ’ (क्षहरात वंशाचा पूर्ण निःपात करणारा) असें आलें आहे. नहपान हा याच क्षहरात वंशांतील होता. तेव्हा गौतमी-

---

१ आर्किऑलॉजिकल सर्व्हे ऑफ् वेस्टर्न इंडिया, पु. ४, पृ. १०४.

२ एपिग्राफिया इंडिका, पु. २२, पृ. १७२.

पुत्राने या शकक्षत्रपांचा पूर्णपणे उच्छेद केला असें आतापर्यंत मानलें जात असे. यानंतर शकराजांचे लेख महाराष्ट्रांत किंबहुना दक्षिणेच्या कोणत्याहि प्रदेशांत सापडले नसल्याने वरील अनुमानाला पुष्टि मिळत होती. पण प्रस्तुत लेखकाच्या अलीकडील संशोधनावरून शकराजे खिस्तोत्तर पांचव्या सहाव्या शतकापर्यंत महाराष्ट्र–कर्नाटक भागांत राज्य करीत होते, असें स्पष्ट दिसतें. तीमाहिती प्रस्तुत लेखांत द्यावयाची आहे.

कोंडापूर येथील अवशेष

हैद्राबादच्या संस्थानांत हैद्राबादच्या वायव्येस ४३ मैलांवर कोंडापूर या नांवाचें खेडें आहे. त्या ठिकाणीं सुमारें पंधरा वर्षांपूर्वी कांही प्राचीन अवशेष दृष्टीस पडले. पुढे उत्खनन केल्यावर तेथे एका सातवाहनकालीन नगराचे विस्तृत अवशेष आढळून आले. त्यांमध्ये अनेक प्रकारचीं मातीचीं भांडीं, खेळणीं, मातीच्या व हस्तिदंती बांगडया, लोखंडाचीं विविध प्रकारचीं हत्यारें, तांबें, शिसें व पोटिन धातूचीं नाणीं इत्यादि वस्तु सापडल्या. याशिवाय घरें, चैत्यें किंवा बौद्ध देवालयें, स्तूप, मठ वगैरे इमारतींचे अवशेष सातवाहनकालीन आहेत. त्यांवरून खिस्तोत्तर पहिल्या दोन तीन शतकांतील महाराष्ट्रीय संस्कृतीची स्पष्ट कल्पना करतां येते.

कोंडापूर येथे सापडलेल्या प्राचीन वस्तूंमध्ये नाण्यांचें महत्त्व विशेष आहे. कारण त्यांवरून तेथील संस्कृतीचा कालनिर्णय करण्यास एक अचूक साधन सापडतें. सुमारें बारा वर्षांपूर्वी हैदराबाद पुराणवस्तुसंशोधन खात्याचे डायरेक्टर श्री. गुलाम यझदानी यांनी कोंडापूरच्या उत्खननांत सापडलेल्या कांही पोटीन व शिशाच्या नाण्यांचे फोटो मजकडे पाठविले होते. त्यांवरून तीं नाणीं गौतमीपुत्र सातकर्णि, पुळुमावि, यज्ञ सातकर्णि इत्यादि सातवाहन राजांचीं आहेत असें दिसलें. अशा तऱ्हेचीं नाणीं अकोला जिल्ह्यांत तऱ्हाळा गावीं सापडलेलीं मी प्रसिद्ध केलीं आहेत. या नाण्यांवरून कोंडापूर येथे सातवाहनांचें राज्य इ. स. च्या तिसऱ्या शतकापर्यंत होतें, असें दिसतें.

कोंडापूरच्या नाण्यांची संख्या फार मोठी आहे. सन १९४१ मध्ये श्री. गुलाम यझदानी यांनी तेथील अवशेषांची माहिती प्रसिद्ध केली. तोंपर्यंत तेथे दोन हजार नाणीं सापडलीं होतीं. त्यानंतरच्या उत्खननांतहि

आणखी अनेक सापडलीं असावीं. भूमिगत प्राचीन नाण्यांवर माती, जंग वगैरेचा मोठा थर जमलेला असतो. तो फार काळजीने काढून नाणीं साफ करावीं लागतात. याला बराच वेळ लागतो. तथापि साफ केलेल्या नाण्यांतून कांही महत्त्वाचीं नाणीं हैदराबाद म्यूझियमचे क्यूरेटर श्री. ख्वाजा मुहम्मद अहमद हे मधून मधून मजकडे पाठवीत असतात. याशिवाय हैदराबादचे नाणक संग्राहक श्री. हुरमुझ कौस या पारशी गृहस्थांनीहि अनेक नाणीं मजकडे पाठविलीं होतीं. त्यावरून दक्षिणच्या वाकाटकपूर्वकालीन सातवाहन, सेवक, महिष्र इत्यादि अनेक राजवंशांविषयी महत्त्वाची माहिती मिळाली आहे.

भरद्वाजपुत्र महासेनापति शक मान याचें नाणें

हें नाणें[३] शिशाचें असून वर्तुलाकार आहे. त्याचें वजन ६६६ ग्रेन व व्यास १·७ इंच आहे. या नाण्याच्या पुढील बाजूवर मध्यभागीं मोठें स्वस्तिक असून सभोंवार ब्राह्मी लिपींत' 'महासेनापतिस भरदजपुतस सगमानचटुकुलस' असा प्राकृत भाषेंतला लेख आहे. याचें संस्कृत रूपांतर 'महासेनापतेः भरद्वाजपुत्रस्य शकमानचुटुकुलस्य' (हें नाणें भरद्वाजाचा पुत्र चुटुकुलोत्पन्न शकवंशी मान याचें आहे) असें होतें. नाण्याच्या मागील बाजूस वज्रचिन्ह व खाली टोक केलेला बाण दिसतात.

हें नाणें दक्षिणच्या प्राचीन इतिहासाच्या व संस्कृतीच्या दृष्टीने फार महत्त्वाचें आहे. अक्षरवटिकेवरून तें इ. स. च्या तिसऱ्या शतकांतील दिसतें. तें शकवंशी चुटुकुलोत्पन्न मान राजा याचें आहे. त्याच्या पित्याचें नांव भरद्वाज असें होतें. हा आपणांस शकवंशी म्हणवितो. त्याच्या नाण्यावरचीं वज्र व बाण हीं चिन्हेंहि त्याच्या शकवंशाचींच द्योतक आहेत. भारतांत हजारों नाणीं सापडलीं आहेत. पण हीं चिन्हें गुजरात–कोंकण–महाराष्ट्र या प्रदेशांत सापडलेल्या शकक्षत्रप भूमक व नहपान यांच्याच नाण्यांवर आढळतात. दुसऱ्या कोणत्याहि राजाच्या किंवा प्रांताधिपतीच्या नाण्यांवर तीं दिसत नाहीत. त्यावरून मान हा केवळ शकवंशीच नव्हे तर भूमक–नहपानांचा वंशज होता, असें दिसतें.

---

३ याचा छाप नाण्यांच्या प्लेटमध्ये नं. १ पहा.

शकवंशी मानाने हीं नाणीं पाडलीं, पण त्याने त्यांवर आपली 'महासेनापति' हीच पदवी उल्लेखिलेली आहे. तो तत्कालीन सातवाहनांचा मुख्य सेनापति असावा. कदाचित् मांडलिकहि असूं शकेल. कारण सातवाहनांच्या मांडलिकांच्या लेखांतहि अशा पदव्या आढळतात. वास्तविक नाणें पाडण्याचा अधिकार राजाचा. पण सातवाहनांच्या काळीं तो अधिकार त्यांच्या कांही बलाढ्य सामंतांनीहि बळकाविलेला दिसतो. कारण त्यांनी पाडलेलीं कांही नाणीं सापडलीं आहेत. कदाचित् मानराजाने सातवाहन सम्राटाचें जूं झुगारून दिल्यावरहि आपली पूर्वीची 'महासेनापति' हीच पदवी नाण्यांवर उल्लेखिली असेल. शुंग नृपति पुष्यमित्र याने मौर्यांचा उच्छेद करून दोन अश्वमेध केल्यावरहि आपली 'सेनापति' हीच पदवी चालू ठेवली होती हें त्याच्या वंशजांच्या कोरीव लेखांवरून व कालिदासाच्या 'मालविकाग्निमित्र' नाटकावरून मी अन्य प्रसंगीं दाखविलें होतें[४] तसाच हाहि प्रकार असावा. तें कसेंहि असलें, तरी शक क्षत्रप नहपान याच्या वंशाचा समूळ उच्छेद झाला नव्हता, हें स्पष्ट आहे. त्याचे कांही वंशज पुढे सातवाहनांचें स्वामित्व पत्करून मुख्य सेनापतीसारख्या मोठमोठ्या हुद्यावर चढले होते. त्यांपैकी मान नांवाच्या महासेनापतीने शेवटच्या सातवाहन राजाच्या मृत्यूनंतर किंवा त्याला पदच्युत करून आपलें स्वतंत्र राज्य स्थापिलें असावें.

मान राजाचीं आणखी दोन नाणीं

याशिवाय याच मान राजाचीं आणखी दोन नाणीं मी सात वर्षांपूर्वी प्रसिद्ध केलीं होतीं. तीं हैद्राबादचे श्री. हुरमुझ कोस यांच्या संग्रहांतील आहेत. त्यांचेहि छाप नाण्यांच्या प्लेटींत (नं. २ व ३) दिले आहेत.

ही नाणीं तांब्याचीं आहेत. यांपैकी पहिलें नाणें जवळजवळ चौरस आकाराचें असून त्याचें वजन १३० ग्रेन आहे; दुसरें नाणें त्यापेक्षा लहान आकाराचें पण जाड आहे. त्याचें वजन १८० ग्रेन आहे. हीं दोन्ही पूर्वीच्या नाण्यांहून भिन्न पण एकाच प्रकाराचीं आहेत. पुढील बाजूवर वर सोंड

---

४ 'संशोधनमुक्तावलि', सर १, पृ. १५–१७.

केलेला हत्ती असून, त्याच्या पाठीवरील भागांत स्वस्तिक चिन्ह आहे. सभोंवार ब्राह्मी लिपींत लिहिलेला प्राकृत लेख आहे. पूर्ण लेख एकाहि नाण्यावर दिसत नाही. कांही अक्षरें पहिल्या नाण्यावर तर कांही दुसऱ्या-वरच दिसतात. दोन्ही नाण्यांवरचीं अक्षरें एकत्र केल्यावर पुढील लेख होतो— 'रंञो सगमानमहसस.' यांचें संस्कृत रूपांतर 'राज्ञः शकमानमहिषस्य' व अर्थ 'हें नाणें महिषनृपति शकमान याचें आहे' असा होतो. दोन्ही नाण्यांच्या मागील बाजूवर उज्जैनी चिन्ह (एकावर एक आडवे उभे ठेवलेले डंबेल्स) व त्याच्या सभोंवार चार लहान स्वस्तिक दिसतात.

हीं नाणीं मान नृपतीच्या कोंडापूर येथे सापडलेल्या नाण्यांहून निराळया प्रकारचीं आहेत. या प्रकारचीं वर सोंड केलेला हत्ती ज्यावर आहे अशीं नाणीं—मध्यप्रदेशांतील अकोला व चांदा जिल्ह्यांत तसेंच कोंडापूर येथील उत्खननांतहि सांपडलीं आहेत. तीं गौतमीपुत्र सातकर्णि, पुळुमावि, शिवश्री पुळुमावि, यज्ञ सातकर्णि, विजय सातकर्णि इत्यादि सातवाहन राजांनी प्रचलित केलीं होतीं. मान राजाने सातवाहन राज्याचा मध्य भाग हस्तगत केल्यावर हीं नाणीं पाडलेलीं दिसतात. त्यांवर त्याच्या पूर्वीच्या 'महासेनापति' या पदवीऐवजीं 'राजा' ही राजत्वनिदर्शक पदवी योजिली आहे.

'माहिषक' हा देश कोणता ?

याशिवाय या नाण्यांचा आणखी एक विशेष हा की, यांवर या मान राजाला 'महिष' असें म्हटलें आहे. याचें कारण त्याचें राज्य माहिषक किंवा महिषमंडल या प्रदेशावर होतें, हें असावें. माहिषक देशाचा उल्लेख 'महाभारत', 'रामायण' इत्यादि प्राचीन ग्रंथांत अनेक ठिकाणीं येतो. 'वायुपुराणां'त त्याचा निर्देश दक्षिणच्या जनपदांमध्ये महाराष्ट्र व कलिंग यांच्या बरोबर केला आहे. 'रामायणां'त सुग्रीवाने वानरांना सीतेच्या शोधाकरिता विदर्भ, ऋषीक (खानदेश) व माहिषक देशांस जाण्याविषयी सांगितलें आहे. 'महाभारता'च्या अनेक पर्वांत माहिषक देशाचा उल्लेख कलिंग, केरल, द्रविड, आन्ध्र इत्यादि दक्षिणच्या देशांसमवेत केला आहे. कदंबांच्या एका ताम्रपटांत 'महिषविषयां'तील हेबेट हा गाव दान

दिल्याचा उल्लेख आहे. या सर्व निर्देशांवरून हैद्राबाद संस्थानचा दक्षिण भाग व नजीकचे कानडी जिल्हे यांना माहिषक ही संज्ञा होती असें दिसतें. या माहिषक देशावर राज्य करीत असल्यामुळे मान राजाने आपणांस 'महिष' हें नांव घेतलें असावें.

हा शकवंशी मान राजा प्राचीन काळच्या सुप्रसिद्ध व बलाढ्य राजांपैकी एक होता. कारण त्याचें नांव पुराणांतहि आलें आहे. वरील नाण्यांचा अभ्यास करतांना पुराणांतील खालील ओळीकडे माझें लक्ष गेलें. खिस्तोत्तर तिसऱ्या शतकांतील राजांचीं नांवें देतांना पुराणें सांगतात—

शक्यमानाभवद्राजा महिषीणां महीपतिः ।

पार्जिटरसाहेबांनी पुराणांचीं अनेक हस्तलिखितें जमवून त्यांतून त्यांना शुद्ध वाटलेले पाठ 'कलियुगांतील राजवंश' नामक इंग्रजी पुस्तकांत दिले आहेत. वरील पाठ त्यांचाच आहे.[५] त्याचें भाषांतर त्यांनी 'शक्यमान हा महिषींचा राजा होता' असें केलें आहे. पण हा अर्थ कोणासहि समाधानकारक वाटणार नाही. पुराणांचे पाठ गेल्या शेकडों वर्षांतील लेखकांच्या अनवधानामुळे अत्यंत अशुद्ध झाले आहेत. श्री. कौस यांच्या वरील नाण्यांच्या साहाय्याने मी वरील पाठ 'शकमानोऽभवद्राजा महिषाणां महीपतिः' असा शुद्ध केला. याचा अर्थ 'महिषदेशाचा राजा शकवंशी मान हा होऊन गेला' असा होतो. पुराणांत विशेष प्रसिद्ध व बलाढ्य अशाच ऐतिहासिक कालांतील राजांचीं नांवें आलीं आहेत. शकवंशी मान राजाचा त्यांत उल्लेख आहे. त्यावरून त्याचें महत्त्व प्रतीत होतें. असो.

शकवंशी मान राजाच्या पित्याचें नांव भरद्वाज होतें, ही माहितीहि प्राचीन हिंदु संस्कृतीच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मुसलमानपूर्व काळांत ग्रीक, शक, पल्हव, कुशाण, हूण, गुर्जर इत्यादि अनेक परकी लोकांच्या स्वाऱ्या झाल्या. या लोकांनी हिंदुस्थानचा कांही प्रदेश जिंकला, पण उलट हिंदु धर्म व संस्कृति यांनीहि त्यांना आत्मसात् केलें.

---

५ डायनेस्टीज ऑफ दि कलि एज, पृ. ५१.

हिंदु संस्कृतीने शकांना आत्मसात् केलें

या परकी राजांनी एक दोन पिढ्यांतच हिंदु किंवा बौद्ध धर्माचा स्वीकार केला, हिंदु नांवें धारण केलीं, ब्राह्मण व बौद्ध भिक्षूंना दानें दिलीं, त्यांच्याकरिता विहार खोदविले व देवळें किंवा स्तूप बांधविले. भिलसा स्टेशनजवळ बेसनगर (पूर्वीची विदिशा) येथे तक्षशिलेचा ग्रीक राजप्रतिनिधि हेलिओडोरस या यवनाने उभारलेला गरुडस्तंभ अद्यापि विद्यमान आहे. त्यावरील लेखांत तो आपणाला भागवत (भगवान् विष्णूचा भक्त) म्हणवतो. कुशाणवंशी कनिष्क व हुविष्क यांच्या नंतर गादीवर आलेल्या राजाने वासुदेव हें नांव धारण केलें होतें. नहपान या शक क्षत्रपाचा जामात ऋषभदत्त होता. नाशिकच्या लेण्यांत शक अग्निवर्म्याच्या विष्णुदत्ता नामक कन्येने दिलेल्या दानांचा उल्लेख आहे. या सर्व उल्लेखांवरून यवन, शक व कुशाण हे हिंदु नांवें धारण करून हिंदु समाजांत कसे मिसळून गेले होते, तें दिसून येईल. शकांचे शरीरसंबंध भारतीय राजांशीं झाले होते. त्यांच्यापैकी वासिष्ठीपुत्र सातकर्णि नामक राजाने सौराष्ट्राचा शकक्षत्रप रुद्रदामन् याच्या कन्येशीं विवाह केला होता. आंध्र देशांतील इक्ष्वाकुवंशी राजांचाहि शरीरसंबंध उज्जैनीच्या क्षत्रपांशीं झाला होता. इ. स. च्या पांचव्या शतकाच्या अखेरीस हूणांच्या स्वाऱ्या भारतावर होऊन गुप्त साम्राज्य खिळखिळें झालें. हूण नृपति तोरमाण याचा मुलगा मिहिरकुल हा शिवोपासक होता. त्याच्या शत्रूच्याहि लेखांत त्याचें वर्णन 'स्थाणोरन्यत्र येन प्रणतिकृपणतां प्रापितं नोत्तमाङ्गम्' (भगवान् शंकराशिवाय अन्य कोणाहि पुढे त्याने आपलें मस्तक नमविलें नव्हतें) असें वर्णन केलें आहे. पुढे या हूणांची उत्तम क्षत्रियांत गणना झाली. हूण राजकन्या आवल्लदेवी हिचा विवाह सुविख्यात बलाढ्य कलचुरि सम्राट् कर्ण याच्याशीं झाला होता. त्यांचा पुत्र यशःकर्ण हा पुढे त्रिपुरीच्या गादीवर बसला.[६] या सर्व उल्लेखांवरून परकी आर्येतरांना हिंदु धर्माने व समाजाने कसें स्वतःमध्ये सामावून घेतलें तें दिसून येईल. मान राज्याच्या पित्याचें भरद्वाज हें नांव या दृष्टीने महत्त्वाचें

---

६. वा. वि. मिराशी—कलचुरि नृपति आणि त्यांचा काल, पृ. २५.

आहे. भरद्वाज हें एका वैदिक ऋषीचें नांव, पण तें एका शकवंशी व्यक्तीने धारण केलेलें दिसतें. यावरून शक लोक प्राचीन काळीं हिंदु समाजांत कसे मिसळून गेले होते, तें दिसून येईल.

मनुस्मृतींतील पुरावा

शकहूणादिकांना हिंदु धर्मांत व हिंदु समाजव्यवस्थेंत आश्रय मिळाला तो अर्थातच सन्मानानेंच मिळाला असला पाहिजे. तसें नसतें तर त्यांनी आपल्या लेखांत स्वतःच्या वंशाचा अभिमानाने निर्देश केला नसता. अलीकडे एरण येथे सापडलेल्या स्तंभलेखांत शकनृपति श्रीधरवर्मा याने आपल्या वंशाचा स्पष्ट निर्देश केला आहे.[७] मान राजानेहि आपल्या सर्व नाण्यांवर आपलें सग (शक) हें वंशनाम घातलें आहे. हिंदु धर्म हा स्वभावतः आक्रमक नाही, पण प्राचीन काळीं तरी स्वेच्छेने त्याचा स्वीकार करणाऱ्या लोकांस दूर लोटण्याइतका संकुचित मनोवृत्तीचाहि तो नव्हता, यांत संशय नाही. यवन, शक, पल्हव इत्यादि आर्येतर शूर लोकांचा अन्तर्भाव क्षत्रिय जातींत होत असला पाहिजे. किंबहुना या बाबतींत अनुमान करण्याचीहि जरूरी नाही. मनुस्मृतींत (१०, ४३, ४४) म्हटलें आहे—

शनकैस्तु क्रियालोपादिमाः क्षत्रियजातयः ।
वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च ॥
पौण्ड्रकाश्चौड्रद्रविडाः काम्बोजा यवना शकाः ।
पारदाः पल्हवाश्चीनाः किराता दरदाः खशाः ॥

" पुढे निर्दिष्ट केलेले लोक क्षत्रिय होते. पण कालान्तराने त्यांचे धार्मिक संस्कार न झाल्यामुळे व ब्राह्मणांशीं त्यांचा संबंध न आल्यामुळे त्यांना वृषलत्व किंवा शूद्रत्व प्राप्त झालें. त्या जाति येणेप्रमाणें—पौण्ड्रक, ओड्र (ओरिसांतील लोक) द्रविड, काम्बोज, यवन (ग्रीक), पारद, पह्लव (पार्थियन), चीन, किरात, दरद व खश. "

धार्मिक संस्कार न केल्यामुळे या परकी जाति मूळच्या क्षत्रिय असतांहि शूद्रत्वाप्रत गेल्या हें मत संमत झाल्यावर ते संस्कार त्यांच्याकडून

---

७ 'संशोधनमुक्तावलि', सर १, पृ. १५९–१६७ पाहा.

करवून त्यांना क्षत्रियत्वाचा दर्जा प्राप्त करवून देणें कठीण नव्हतें, हें उघड आहे. प्राचीन काळीं अशा रीतीने शकयवनहूणादि जातींना चातुवर्ण्य-व्यवस्थेंत स्थान मिळालें असलें पाहिजे.

यवन–हूणादींनाहि हिंदु समाजांत स्थान दिलें

'महाभारता'च्या शान्तिपर्वांत (अ. ६५) इंद्रमान्धातृसंवाद आला आहे. मान्धाता राजा इन्द्रास विचारतो—

यवनाः किराता गान्धाराश्चीनाः शबरबर्बराः।
शकास्तुषाराः कङ्काश्च पल्लवाश्चान्ध्रभद्रकाः ॥
पौण्ड्राः पुलिन्दा रमठाः काम्बोजाश्चैव सर्वशः ।
ब्रह्मक्षत्रप्रसूताश्च वैश्याः शूद्राश्च मानवाः ॥
कथं धर्मांश्चरिष्यन्ति सर्वे विषयवासिनः ।
मद्विधैश्च कथं स्थाप्याः सर्वे वै दस्युजीविनः ॥

यवन, किरात, गान्धार, शबर, बर्बर, शक इत्यादि दस्यु (आर्येतर) लोकांनी कसें धर्माचरण करावें, असें मान्धात्याने विचारलें असतां, इन्द्र सांगतो की, त्यांनी मातापित्यांची सेवा करावी, आचार्य, आश्रमवासी लोक, राजे यांची शुश्रूषा करावी, अहिंसा, सत्य, शान्ति इत्यादिकांचें आचरण करावें, एवढेंच नव्हे तर

वेदधर्मक्रियाश्चैव तेषां धर्मो विधीयते ।
पितृयज्ञास्तथा कूपाः प्रपाश्च शयनानि च।

"त्यांनी वैदिक यज्ञयागादि, तसेंच श्राद्धादि कर्मेंहि करावींत. तसेंच विहिरी खणणें, पाणपोई घालणें इत्यादि लोकोपयोगी कृत्येंहि करावीं."

याप्रमाणे हिंदु धर्माने शकयवनादि अनार्य लोकांना, ते म्लेच्छ म्हणून दूर न सारतां, त्यांना समाजांत योग्य स्थान देऊन व वैदिक कर्मांचा अधिकार देऊन त्यांचा आपणांत समावेश करून घेतला.

पण कालांतराने या उदार वृत्तीचा लोप झाला. हिंदु धर्मांत परकीयांना मानाने प्रवेश मिळेनासा झाला. जो जन्माने हिंदु तोच हिंदु असें मानण्यांत

येऊं लागलें. तेव्हा ज्या शक, यवन, गुर्जर, हूण आदि लोकांना पूर्वी हिंदु धर्मांत स्थान मिळालें होतें, त्यांना आपल्या परकी जातीचा उल्लेख करणें अपमानास्पद वाटूं लागलें. गुजरातेंतील गुर्जर वंशाच्या लेखांवरून ही गोष्ट स्पष्ट दिसते. या वंशाच्या आरंभींच्या लेखांत गुर्जरवंशाचा स्पष्ट उल्लेख केलेला आढळतो. उदाहरणार्थ, द्वितीय दद्द याचें गुजरातेंत खेडा येथे सापडलेले इ. स. ६२९ व ६३४ चे ताम्रपट पहा. त्यांत गुर्जरनृपतिवंशाचा स्पष्ट निर्देश आहे. पण पुढे त्याच्या वंशजांच्या लेखांत गुर्जरवंशाचा उल्लेख गाळून तो वंश महाभारतांतील कर्णापासून निघाला असें म्हटलें आहे. शकमान याच्या काळीं म्हणजे इ. स. च्या तिसऱ्या शतकांत ही संकुचित वृत्ति नव्हती म्हणून त्यानें आपल्या नाण्यांवर आपल्या वंशाचा साभिमान उल्लेख केला आहे.

शालिवाहन शक कसा बनला ?

महिष किंवा माहिषक देशाच्या शक वंशाविषयी ही माहिती अगदी अलीकडे त्यांच्या नाण्यांवरूनच मिळाली आहे. माननृपतीनंतर यश व शिवल अशा आणखी दोन राजांचीं नांवें नाण्यांवरून ज्ञात झालीं आहेत. तथापि त्यांचे कोरीव लेख अद्यापि उपलब्ध न झाल्याने त्यांच्याविषयी आपलें ज्ञान अत्यंत मर्यादित आहे. माहिषक देशांत त्यांचें राज्य इ. स. २५० ते ५५० या कालखंडांत झालें असावें. सहाव्या शतकांत बदामीच्या चालुक्यांचा उदय झाल्यावर त्यांनी या शक राजांचा पाडाव करून त्यांचा प्रदेश आपल्या राज्यांत सामील केला असें दिसतें. पण असें झालें तरी शक राजांचें जनतेस विस्मरण झालें नाही. या राजांनी आपल्या राज्यांत इ. स. ७८ मध्ये सुरू झालेल्या संवताचा प्रसार केला होता. चालुक्यांच्या उदयानंतरहि तो संवत् शकनृपतिसंवत् किंवा शकसंवत् या नांवाने प्रचलित राहिला. या संवताचे दक्षिणेंतील आरंभीचे उपलब्ध लेख चालुक्यांचे आहेत. चालुक्यांचें साम्राज्य उत्तरेस महाराष्ट्र, कोंकण, विदर्भ, आन्ध्र इत्यादि प्रदेशांवर पसरलें, तेव्हा त्या संवताचाहि प्रसार त्या देशांत झाला. शक राजे हे कोणी परकी असें मानण्याची प्रवृत्ति नसल्यामुळे त्यांच्या संवताचा उपयोग करणें अनुचित मानलें जात नसे. पुढच्या देवगिरीच्या यादवांच्या काळांत

त्या संवताचा प्राचीन शालिवाहन राजाशीं संबंध जोडण्यांत येऊन त्याला शालिवाहन शक असें नांव मिळालें.[७] त्याच शकाचा उपयोग आपण सध्याहि महाराष्ट्रांत करीत आहों. अशा रीतीने माहिषक देशांतील प्राचीन शक राजांचा आपल्या महाराष्ट्राशीं संबंध जडला आहे.

---

७. मानपुरचे राष्ट्रकूट*

बदामीच्या चालुक्यांच्या राजवटीनंतर ज्याचें साम्राज्य महाराष्ट्रांत प्रस्थापित झालें तें राष्ट्रकूट घराणें इतिहासांत सुविख्यात आहे. त्याचे कोरीव लेख इ. स. च्या आठव्या शतकापासूनचे सापडले आहेत. पण हें घराणें त्या शतकांतच प्रथम उदयास आलें किंवा त्याआधीहि त्याची पूर्वपीठिका सापडते हा प्रश्न अद्यापि अनिर्णीतच आहे. अलीकडे सापडलेल्या कांही कोरीव लेखांवरून या प्रश्नावर प्रकाश पाडण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

पूर्व राष्ट्रकूट वंशाचे ताम्रपट

आतापर्यंत या पूर्वराष्ट्रकूटवंशाचे (Early Rashtrakuta Dynasty) तीन ताम्रपट सापडले आहेत. त्यांपैकी पहिला डॉ. भाऊ दाजी यांच्या संग्रहांत होता. तो भगवानलाल इंद्रजी यांनी रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई शाखेच्या जर्नलमध्ये (पृ. १६, पु. ८८ इ.) प्रकाशित

---

७. याविषयी सविस्तर विवेचन संशोधनमुक्तावलि, सर १, यांतील आमच्या ‘शालिवाहन शकाची पूर्वपीठिका’ या लेखांत पाहा.

* ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड २ (भारत इतिहास संशोधन मंडळ), पृ. १–८ (कांही बदल करून).

केला आहे. त्यांत या वंशाला राष्ट्रकूट म्हटलें आहे. हा ताम्रपट मूळचा कोठला याविषयी माहिती मिळत नाही. तथापि त्यांत अभिमन्यु नामक राजाने उंडिकवाटिका हा गाव दान दिल्याचें नमूद असल्याने त्याला 'उंडिकवाटिका ताम्रपट' म्हणतात. दुसरा ताम्रपट कोल्हापूरजवळच्या एका खेडयांत सापडला; तो कोल्हापूरचे प्रो. कुंदनगार यांचे मार्फत म्हैसूर संस्थानच्या पुराणवस्तु संशोधन खात्याचे प्रमुख डॉ. कृष्ण यांचेकडे गेला व तो त्यांनी आपल्या खात्याच्या सन १९२९ च्या वार्षिक रिपोर्टांत (पृ. १९७ इ.) त्याच्या छापांसहित प्रकाशित केला आहे. या ताम्रपटांत पांडरंगपल्ली नामक गाव अविधेय नामक राजाने दिल्याचा उल्लेख आहे म्हणून त्याला पांडरंगपल्ली ताम्रपट नांव मिळालें आहे. तिसरा ताम्रपट भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रहीं पुष्कळ दिवसांपासून आहे. तो पुणें जिल्ह्याच्या दौंड पेटयांतील भीमा नदीचे काठीं हिंगणी बेरडी नामक गाव आहे तेथे सापडला होता. तो प्रथम कै. पां. मा. चांदोरकर[१] व नंतर डॉ. मो. गं. दीक्षित[२] यांनी संपादिला आहे. त्यांत राष्ट्रकूटवंशी विभुराजाच्या कारकीर्दीच्या तिसऱ्या वर्षी त्याच्या अनुज्ञेने त्याची माता व देवराजाची पत्नी महादेवी श्यावलाङ्गी हिने एक गाव दान दिल्याचा निर्देश आहे. या तीन ताम्रपटांवरून आपणांस या राजांची खालील वंशावळ तयार करतां येते.

मानाङ्क
|
देवराज
|
माण ऊर्फ विभुराज — अविधेय — भविष्य
|
अभिमन्यु (भविष्य याचा पुत्र)

१ भारत इतिहास संशोधक मंडळ, षष्ठ संमेलन वृत्त, पृ. ६३-६५.
२ महाराष्ट्रांतील कांही प्राचीन ताम्रपट व शिलालेख, पृ. १–८.

उंडिकवाटिका व दौंड ताम्रपटांत या वंशाला राष्ट्रकूट असें स्पष्ट म्हटलें आहे. पांडरंगपल्ली ताम्रपटांत या वंशाचें नांव आलें नाही. या तीनहि ताम्रपटांत कोणत्याहि शकाचा उपयोग केलेला नाही, फक्त त्या त्या राजांच्या राज्यारंभापासूनचीं वर्षें दिलीं आहेत. त्यामुळे या राजांचा काळ ताम्रपटांच्या अक्षरवटिकेवरून ठरविला पाहिजे. तीनहि ताम्रपटांच्या संपादकांच्या मतें या ताम्रपटांचा काळ चौथें–पांचवें शतक हा असावा.

या राजांच्या स्थलाचा शोध

आता हे राजे कोठे राज्य करीत होते याचा विचार करूं. डॉ. भाऊ दाजींना उंडिकवाटिका तामपट नक्की कोठे मिळाला तें माहीत नाही; पण तो मुंबई प्रांतांतच कोठे तरी सापडला असावा. इतर दोन तर कोल्हापूर संस्थान व दौंड पेटा यांत मिळाले आहेत. यामुळे हें घराणें दक्षिण महाराष्ट्रांत राज्य करीत होतें असें अनुमान करण्यास हरकत नाही. पांडरंगपल्ली ताम्रपटांत या वंशाचा मूळ पुरुष मानाङ्क याला 'श्रीमत्कुन्तलानां प्रशासिता' असें म्हटलें आहे. डॉ. कृष्ण यांनी या ठिकाणीं 'सात्कुन्त धरा नः प्र ई सिता' असें कांही तरी वाचून सात्कुन्त म्हणजे सातपुडा असा शोध लावून हें घराणें वऱ्हाड–मध्यप्रांतांत राज्य करीत होतें असें म्हटलें आहे, तें चूक आहे. वर दिलेल्या शुद्ध वाचनावरून मानाङ्क हा कुन्तल देशावर राज्य करीत होता, यांत संशय नाही. कुन्तल देशांत कृष्णा नदीचें खोरें व त्याच्या दक्षिणेचा कर्नाटक प्रदेश यांचा समावेश होत असे. 'विख्यातकृष्णवर्णे तैलस्नेहोपलब्धसरलत्वे। कुन्तलविषये नितरां विराजते मल्लिकामोदः॥'* हा उत्तर चालुक्यांच्या

---

* एपिग्राफिया इंडिका, पु. १२, पृ. १५३. श्लेषामुळे या श्लोकाचे दोन अर्थ होतात—

(१) काळेभोरपणाबद्दल प्रख्यात असलेल्या व तेलाच्या चिक्कणतेने सरळ झालेल्या (युवतीच्या) केशपाशांत मोगरीचा सुवास अतिशय खुलतो.

(२) ज्यामध्ये कृष्णवर्णा नामक प्रसिद्ध नदी आहे व तैलप राजाविषयीच्या निष्ठेने ज्यांतील लोक सदाचरणी झाले आहेत अशा कुन्तल देशांत (तैलपाचा नातू) मल्लिकामोद उर्फ जयसिंह अतिशय शोभतो.

नीलगुंद ताम्रपटांत तैलपाचा नातु जयसिंह ऊर्फ मल्लिकामोद याविषयी आलेला श्लेषपूर्ण सुंदर श्लोक पाहा. यांत कुन्तल देशांत कृष्णवर्णा किंवा कृष्णा ही प्रसिद्ध नदी वाहते, असा स्पष्ट निर्देश आहे. पांडरंगपल्ली ताम्रपटांत अने नदीच्या तीरावर काम्यक व जावल या वाड्यांसहित पांडरंगपल्ली गाव दिला असल्याचा निर्देश आहे. डॉ. कृष्ण यांना नदीचें नांव व गावांचीं नांवें बरोबर रीतीने वाचतां आलीं नाहीत. यांतील अने नदी ही कृष्णा नदीस मिळणारी येण्णा किंवा वेणा नदी असावी. जावल तर जावळीचें प्राचीन रूप दिसतें. काम्यक गाव जवळपास सापडतें काय पाहिलें पाहिजे. तथापि एवढया निर्देशावरून सातारा जिल्हा राष्ट्रकूट नृपति मानाङ्काच्या राज्यांत अन्तर्भूत होता, हें दिसून येईल.

उंडिकवाटिका ताम्रपटांत मानाङ्काचा पणतू अभिमन्यु हा मानपुरीं असतांना त्याने तें दान दिलें असें म्हटलें आहे. हें मानपुर मानाङ्क राजानें आपल्या नांवें स्थापून राजधानी केलेलें दिसतें व तें कित्येक पिढया या वंशाची राजधानी होतें. त्यामुळे या राष्ट्रकूटांस मानपुरचे राष्ट्रकूट म्हणण्यास हरकत नाही. हें मानपुर सातारा जिल्ह्यांतील माणगंगा नदीच्या तीरावरील माणगांव असावें. या ताम्रपटांत अभिमन्यु राजाने पेठपंगरकच्या 'दक्षिण शिव' देवास उंडिकवाटिका गाव दिल्याचा निर्देश आहे. डॉ. फ्लीटने हें दक्षिण शिवाचें देवालय मध्यप्रांताच्या होशंगाबाद जिल्ह्यांतील महादेव-पर्वतराजीवरील प्राचीन देवालय असावें असें म्हटलें होतें, पण तेंहि बरोबर दिसत नाही. या ताम्रपटाचें नक्की प्राप्तिस्थान माहीत नसल्याने डॉ. फ्लीटला त्यांत निर्दिष्ट केलेल्या स्थळांचा बरोबर पत्ता लागला नव्हता. महादेवाच्या देवळाकरिता इतकें दूर जावयास नको. सातारा जिल्ह्यांत सह्याद्रीच्या शिखरांवर अनेक ठिकाणीं प्राचीन काळापासून पवित्र गणलेलीं शिवालयें आहेत. त्यांपैकीच हें एक असावें. पेठ पंगरकाचा नक्की पत्ता अद्यापि लागलेला नाही.

वरील विवेचनावरून हा प्राचीन राष्ट्रकूट वंश इ. स. च्या चौथ्या पांचव्या शतकांत सातारा जिल्ह्यांतील मानपुर या गावीं राज्य करीत होता. त्याच्या अमलाखालीं कृष्णा नदीच्या दक्षिणेचा महाराष्ट्र हा मुलूख होता व

त्याला कुन्तलाधिपति म्हणत असत, हें दिसून येईल. आता या वंशाविषयी आणखी काय माहिती मिळते तें पाहूं.

तत्कालीन दक्षिणचे इतर राजवंश

इ. स. च्या चौथ्या पांचव्या शतकांत उत्तर कोंकण, दक्षिण गुजराथ व उत्तर महाराष्ट्र या प्रांतांत प्रथम आभीर व नंतर त्रैकूटक वंशाचें राज्य होतें. विदर्भप्रांत वाकाटकांच्या अमलाखाली होता. वाकाटक साम्राज्याचा संस्थापक प्रथम प्रवरसेन यांच्या अमलाखालीं नर्मदा व तुंगभद्रा या नद्यांमधील दक्षिण हिंदुस्थानांतील मध्यभागचा विस्तृत प्रदेश होता असें दिसतें. प्रवरसेनाच्या निधनानंतर त्याच्या चार मुलांमध्ये त्याच्या साम्राज्याची वाटणी झाली असें पुराणांतील उल्लेखांवरून दिसतें. ज्येष्ठ पातीची राजधानी प्रथम नागपुरजवळचें नन्दिवर्धन व नंतर प्रवरपुर होती व तिच्या अंमलाखालीं उत्तरविदर्भ प्रांत होता. त्यानंतर दुसऱ्या मुलाची राजधानी वत्सगुल्म (सध्यांचें अकोला जिल्ह्यांतील वाशीम) असून त्याचें राज्य दक्षिण विदर्भ प्रांतावर पसरलें होतें. त्यानंतरच्या दोन मुलांमध्ये गोदावरीच्या दक्षिणेचा व पूर्वेच्या दक्षिण कोसलाचा मुलुख असावा. पहिल्या दोन मुलांच्या वंशजांचे शिलालेख व ताम्रपट अनुक्रमें उत्तर व दक्षिण विदर्भांत (यांत पूर्वीच्या मध्यप्रांताच्या व हैद्राबाद संस्थानच्या मराठी जिल्ह्यांचाहि समावेश होतो) सापडले आहेत. पण बाकीच्या दोन मुलांचे लेख कोठेहि अद्यापि सापडले नाहीत. त्यांपैकी एक दक्षिण महाराष्ट्रांत राज्य करीत असावा. कदाचित् या मुलाचें राज्य लौकरच नष्ट झालें असावें व त्याचें मुख्य कारण या मानपुरच्या राष्ट्रकूट घराण्याचा उदय हें असावें, असें अनुमान करण्यास हरकत नाही.

पांडरंगपल्ली ताम्रपटांत मानाङ्क राजाने अश्मक व विदर्भ प्रांत जिंकले होते, असा उल्लेख आहे. अजंठ्याच्या १६ नं. च्या लेण्यांतील लेखांत प्रवरसेनाचा नातू विंध्यसेन याने कुन्तलाधिपतीचा पराभव केला होता असें वर्णन आलें आहे. मानपुरचे राष्ट्रकूट व वत्सगुल्माचे वाकाटक यांचीं राज्यें परस्परांस लागून होतीं. तेव्हा त्यांच्यामध्ये असे

खटक्यांचे प्रसंग वरचेवर उद्भवत असले तर आश्चर्य नाही. एखादी लढाई अनिर्णीत राहिली म्हणजे दोन्ही पक्ष विजयावर हक्क सांगतात तसें याहि प्रसंगीं झालें असल्यास मानाङ्क व विंध्यसेन हे समकालीन ठरतील. विंध्यसेनाचा काल अदमासें इ. स. ३६० ते ४०० असा ठरविला आहे. तोच मानाङ्काचा मानल्यास हें राष्ट्रकूट घराणें इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरीस उदयास आलें, असें म्हणतां येईल.

द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्याचा दूत कालिदास

मानाङ्काचा मुलगा देवराज हा पांचव्या शतकाच्या आरंभीं गादीवर आला. त्या वेळीं उत्तर हिंदुस्थानांत द्वितीय चंद्रगुप्त–विक्रमादित्य याचें विशाल साम्राज्य होतें. याची मुलगी प्रभावतीगुप्ता वाकाटकांच्या ज्येष्ठ पातीच्या द्वितीय रुद्रसेन नामक राजास दिली होती. लग्न झाल्यावर तो लौकरच कालवश झाल्याने प्रभावतीगुप्ता आपल्या अल्पवयस्क मुलाच्या नांवाने राज्यकारभार पाहात असे. तिला मदत करण्याकरिता चंद्रगुप्ताने आपले विश्वासू अधिकारी व मुत्सद्दी विदर्भांत पाठविले होते. या प्रसंगाने कविकुलगुरु कालिदास हाहि नन्दिवर्धन नगरीं आला होता. त्याने राजधानीजवळच्या रामगिरीवर आपलें सुंदर मेघदूत काव्य रचलें हें मी इतरत्र दाखविलें आहे. या कालिदासाला कुन्तलेशाच्या दरबारीं वकील म्हणून पाठविलें होतें असें भोजाचा 'शृंगारप्रकाश,' राजशेखराची 'काव्यमीमांसा,' क्षेमेन्द्राची 'औचित्यविचारचर्चा' इत्यादि संस्कृत ग्रंथांतील निर्देशावरून दिसतें. उज्जैनीस परत गेल्यावर कुन्तलेश काय करतो, असें चन्द्रगुप्ताने विचारतांच कालिदासाने त्याला खालील श्लोकांत उत्तर दिलें—

> **असकलहसिततत्वात्क्षालितानीव कान्त्या**
> **मुकुलितनयनत्वाद्व्यक्तकर्णोत्पलानि ।**
> **पिबति मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां**
> **त्वयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः ॥**

याचा भावार्थ 'कुन्तलेश, तुझ्यावर, म्हणजे विक्रमादित्यावर, राज्यकारभाराचा भार टाकून स्वतः सुंदर स्त्रियांशीं रममाण होण्यांत काळ घालवीत

आहे' असा आहे. विक्रमादित्यानेहि त्याच श्लोकाच्या द्वितीयार्धांत थोडा फरक करून

'पिबतु मधुसुगन्धीन्याननानि प्रियाणां
मयि विनिहितभारः कुन्तलानामधीशः ॥

'मजवर राज्याचा भार टाकून कुन्तलेश सुखोपभोगांत रममाण होवो' असें उत्तर दिलें. हा कुन्तलेश कोण याचा बरोबर पत्ता अद्याप लागला नव्हता. वाकाटकांच्या दरबारीं गुप्तांचें प्रस्थ त्या काळीं होतें असा स्पष्ट पुरावा असल्याने कित्येक संशोधकांनी वाकाटकांसच कुन्तलेश म्हटलें असावें असें अनुमान केलें होतें व त्याचाच अनुवाद प्रस्तुत लेखकाने कांही वर्षांपूर्वीं प्रकाशित झालेल्या आपल्या 'कालिदास' ग्रंथाच्या प्रथमावृत्तींत केला होता. पण आता या मानपुरच्या कुन्तलाधिपति राष्ट्रकूटांचा शोध लागल्यामुळे चन्द्रगुप्ताचा वकील म्हणून कालिदास या राष्ट्रकूटांच्या दरबारीं राहिला असावा, असें दिसतें. हा कुन्तलेश राष्ट्रकूटवंशी मानाङ्काचा मुलगा देवराज असावा. वर उल्लेखिलेल्या ताम्रपटांत याला देवराज इंद्राची उपमा दिली आहे. कदाचित् इंद्राप्रमाणे हाहि विषयासक्त असावा.

गुप्त सम्राट् द्वितीय चन्द्रगुप्त–विक्रमादित्य याचा आश्रय वाकाटक व राष्ट्रकूट या दोघांनाहि असल्यामुळे या दोन राजवंशांमध्ये स्नेहसंबंध उत्पन्न झाला तर नवल नाही. चन्द्रगुप्ताची मुलगी प्रभावतीगुप्ता हिचा नातू वाकाटक नृपति नरेन्द्रसेन याचा विवाह कुन्तलाधिपतीची कन्या अज्झितभट्टारिका हिच्याशीं झाल्याचें वाकाटकांच्या ताम्रपटावरून दिसतें. तीहि मानपुरच्या राष्ट्रकूट वंशांतली असावी. याप्रमाणे महाराष्ट्राच्या या दोन राजवंशांत प्रेम व संबंध कांही काळपर्यंत तरी वाढत गेले असावे.

यानंतर वत्सगुल्माधिपति वाकाटकनृपति हरिषेण हा उदयास आला. हा मोठा महत्वाकांक्षी व बलाढ्य राजा होऊन गेला. याने पूर्वेस दक्षिण कोसल, आन्ध्र व कलिंग, उत्तरेस अवन्ति, पश्चिमेस लाट व त्रिकूट या देशांवरहि स्वाऱ्या केल्या होत्या. याने कुन्तल देशावर स्वारी करून त्याच्या राजाचा पराजय केल्याचा उल्लेख अजंटयाच्या लेखांत आहे.

तथापि या पराजयामुळे हें राष्ट्रकूट घराणें नामशेष झालेलें दिसत नाही. उलट हरिषेणानंतर वाकाटकवंशाची इतिश्री झाल्यामुळे त्याचें सामर्थ्य वाढलें असावें. बेळगांव जिल्ह्यांतील गोकाक या गावीं राष्ट्रकूटनृपति देज्जमहाराज याच्या काळचा एक ताम्रपट सापडला आहे. त्यांतील उल्लेखावरून तो, इ. स. ५३२–३३ या वर्षी दिला असावा. (एपिग्राफिया इंडिका पु. २१ पृ. २८९ पाहा.) हा देज्जमहाराज उपरिनिर्दिष्ट अभिमन्यूचा वंशज दिसतो.

यानंतर राष्ट्रकूटांचा पत्ता लागला नाही. तथापि सुप्रसिद्ध चालुक्य सम्राट् द्वितीय पुलकेशी याने आपल्या चुलत्याचा पराभव करून बदामीची गादी हस्तगत केली त्या वेळीं चालुक्यांच्या राज्यांत सर्वत्र बंडाळी माजली होती. त्या आणीबाणीच्या प्रसंगाचा फायदा घेऊन आप्पायिक व गोविंद या दोन राजांनी भीमरथी उर्फ भीमा नदीच्या उत्तरेच्या प्रदेशावर स्वारी केली होती. त्यांपैकी गोविंदाला आपल्या बाजूला वळवून पुलकेशीने आप्पायिकाचा पराभव केला असें इ. स. ६३४ च्या ऐहोळे ताम्रपटांत म्हटलें आहे. हा गोविंद राष्ट्रकूट असावा असें डॉ. सर रामकृष्णपंत भांडारकरांनी अनुमान केलें होतें. कारण राष्ट्रकूटवंशांत गोविंद नांवाचे चार राजे होऊन गेले. महाराष्ट्रांत इ. स. च्या चौथ्या ते सहाव्या शतकापर्यंत राष्ट्रकूट राजे राज्य करीत होते याविषयी पुरावा डॉ. भांडारकरांच्या वेळीं मुळीच उपलब्ध नव्हता. पण त्यानंतर प्रकाशित झालेल्या लेखांवरून डॉ. भांडारकरांचें अनुमान बरोबर ठरत आहे.

ऐहोळे ताम्रपटांत पुढे म्हटलें आहे की या गोविंदाला पुलकेशीवर केलेल्या उपकाराचें फळ लागलीच मिळालें. तें कसें तें रविकीर्ति कवीने त्या लेखांत सांगितलें नाही. कदाचित् आप्पायिकाचा पराभव करून मिळालेल्या लुटीचा किंवा प्रदेशाचा कांही भाग पुलकेशीने गोविंदास दिला असावा. पण त्याच्या वंशजांना पुलकेशीने दक्षिण महाराष्ट्रांत राज्य करूं दिलेलें दिसत नाही. कारण पुलकेशीच्या विष्णुवर्धन नामक भावाचा सातान्यास एक ताम्रपट मिळाला आहे, त्यांत भीमाकाठचें गाव दान दिल्याचा उल्लेख आहे. त्यावरून पुलकेशीने दक्षिण महाराष्ट्र आपल्या साम्राज्यांत अंतर्भूत केला होता, असें स्पष्ट दिसतें.

यानंतरचा राष्ट्रकूट वंशाचा सविस्तर इतिहास डॉ. अळतेकर यांनी आपल्या पुस्तकांत दिला आहे. राष्ट्रकूटांच्या पूर्वपीठिकेविषयी माहिती त्यांच्या पुस्तकांत साधनाभावीं दिली नव्हती, ती उणीव भरून काढण्याचा प्रयत्न प्रस्तुत लेखांत केला आहे.

---

८. हूणविजेता यशोधर्मन् – विष्णुवर्धन*

स्थाणोरन्यत्र येन प्रणतिकृपणतां प्रापितं नोत्तमाङ्गं
यस्याश्लिष्टो भुजाभ्यां वहति हिमगिरिर्दुर्गशब्दाभिमानम् ।
नीचैस्तेनापि यस्य प्रणतिभुजबलावर्जनक्लिष्टमूर्ध्ना
चूडापुष्पोपहारैर्मिहिरकुलनृपेणार्चितं पादयुग्मम् ॥

–मन्दसोरचा स्तम्भलेख[१]

मध्यप्रदेशांत उज्जयिनीच्या वायव्येस सुमारें ७५ मैलांवर मन्दसोर नामक एक प्राचीन नगर आहे. त्याचें मूळचें नांव दशपुर. कदाचित् दहा लहान लहान पुरें किंवा गावें मिळून तें बनलें असेल. प्राचीन काळीं हें नगर सुविख्यात होतें. नाशिक लेण्यांतील ऋषभदत्ताच्या खिस्तोत्तर द्वितीय शतकांतील लेखांत याचा निर्देश आला आहे. मन्दसोर येथे सापडलेली भगवान् शंकराची गुप्तकालीन सुंदर मूर्ति आणि उत्कृष्ट कोरीव काम केलेलें दगडी तोरणहि त्या नगराच्या प्राचीन वैभवाची व कलाभिज्ञतेची साक्ष देतात. कालिदासाने तेथील स्त्रियांच्या सौंदर्याचें सुंदर वर्णन मेघदूतांतील खालील श्लोकांत केलें आहे.

---

* 'नवभारत', पुणें, आगष्ट, १९५७.

१ फ्लीट—गुप्त नृपतींचे कोरीव लेख (कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, पु. ३), पृ. १४६–४७.

तामुत्तीर्य[२] व्रज परिचितभ्रूलताविभ्रमाणां
पक्ष्मोत्क्षेपादुपरिविलसत्कृष्णशारप्रभाणाम् ।
कुन्दक्षेपानुगमधुकरश्रीमुषामात्मबिम्बं
पात्रीकुर्वन् दशपुरवधूनेत्रकौतूहलानाम् ॥

मेघदूत, श्लो. ४९.

गुप्त कालांत हें नगर अत्यंत भरभराटींत होतें. त्याचें वर्णन तेथे सापडलेल्या मालव (म्हणजे विक्रम) संवत्[३] ५२९ (सन ४७३-७४) च्या शिलालेखांत आलें आहे. मदोन्मत्त हत्तीच्या गंडस्थलांतून स्रवणाऱ्या मदबिंदूंनी ओले झालेले खडक, कमलांनी सुशोभित झालेलीं व हंसांनी भरलेलीं सरोवरें, पुष्पभारांनी लावलेले वृक्ष, मत्त मधुकरांचे गुंजारव व सदोदित जात-येत असलेल्या पुरस्त्रिया यांनी सुशोभित झालेलीं उपवनें, उत्तुंग व रम्य प्रासाद इत्यादिकांचें सुंदर वर्णन वत्सभट्टि नामक कवीने त्या शिलालेखांत केलें आहे. त्या वर्णनांत कालिदासाच्या मेघदूतांतील शब्दार्थांचें अनुकरण स्पष्ट दिसत असल्याने कालिदासाच्या कालाची अपरमर्यादा ठरविण्यास त्या लेखाचा उपयोग होतो. असो.

मन्दसोरचे प्राचीन अवशेष

पण मन्दसोर येथे प्राचीन कालचे अत्यंत महत्त्वाचे असे अवशेष कोणते असें विचारल्यास, त्या नगरापासून आग्नेयेस सुमारें तीन मैलांवर असलेल्या सोंदणी गावाच्या दोन शिलास्तंभांकडे अंगुलिनिर्देश करावा लागेल. या स्तंभांचे तुकडे पूर्वी शेतांत इतस्ततः पडले होते, ते आता एका प्लॅटफॉर्मवर जुळवून ठेवले आहेत. जवळच खणलें तेव्हा ज्या पीठावर

---

२ त्या सिंधु नदीला ओलांडून. ही नदी माळव्यांतील होय.

३ या संवतालाच पुढे दहाव्या शतकांत ‘विक्रमसंवत्’ असें नांव प्राप्त झालें. याच्या आरंभींच्या अनेक लेखांत याचें ‘कृत’ असें नांव येतें. तसेंच या संवताची कालगणना मालव गणाच्या पद्धतीनुसार केली आहे असेंहि म्हटलेलें असतें. मालव संवतांतून ५६-५७ वजा केले म्हणजे इ. स. चें वर्ष येतें.

ते उभारले होते त्यांचे अवशेष आढळले. प्रत्येक स्तंभ एकसंधि असून त्याची मूळची उंची चाळीस फूट होती. हे स्तंभ खाली चौकोनी व वर षोडशकोनी असून त्यावर कमलाकृति शीर्षक व सर्वांच्या वर सिंहाची आकृति होती. प्रत्येक स्तंभ अखंड होता, तेव्हा त्याचें वजन निदान दोनशें टन असावें. अशा तऱ्हेचा दगड जवळपास शंभर सवाशें मैलांच्या परिसरांत आढळत नाही. तेव्हा प्राचीन काळीं हल्लीच्या सारखी यांत्रिक साधनांची अनूकूलता नसतांहि अशा भारी वजनाचे हे शिलास्तंभ इतके दूर कसे आणले गेले असतील, याबद्दल आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही.

यशोधर्म्याचे विजयस्तंभ

हे दोन्ही स्तंभ विजयस्तंभ असून ते यशोधर्मन् नामक राजानें मिहिरकुल नांवाच्या हूण राजावर मिळविलेल्या विजयाचे द्योतक म्हणून उभारले होते, असें त्यांवरील लेखांवरून दिसतें. दोन्ही स्तंभांवर तोच लेख कोरला होता, पण आता तो एका स्तंभावर मात्र पूर्ण स्थितींत आहे. दुसऱ्या स्तंभावरील लेख आता त्रुटित झाला आहे. हा लेख पद्यमय असून त्याचे एकंदर नऊ श्लोक आहेत. आरंभींच्या श्लोकांत भगवान् शंकराच्या वृषांकित ध्वजाचें वर्णन असून तो ध्वज तुमच्या शत्रूंचा तेजोनाश करो, अशी प्रार्थना केली आहे. यानंतरच्या एका श्लोकांत, सर्व पृथिवी पादाक्रान्त करण्यामध्ये ज्यांचा पराक्रम दिसून आला होता अशा गुप्त नृपतींनीहि ज्या देशांचा उपभोग घेतला नव्हता आणि ज्या देशांमध्ये नृपतींच्या मुकुटां-वर आरूढ होणारी हूणाधिपतींची आज्ञा प्रवेश करूं शकली नव्हती, त्या सर्व देशांचें संरक्षण यशोधर्मा आपल्या घराच्या परड्याप्रमाणे लीलेने करतो, असें म्हटलें आहे. या वर्णनावरून यशोधर्म्याच्या विशाल साम्राज्याची कल्पना येते. उत्तर हिंदुस्थानचा बहुतेक भाग गुप्त साम्राज्यांत अंतर्भूत होता. तथापि त्यांच्या अमलाखाली काश्मीरादि कांही उत्तरेचे प्रदेश आल्याबद्दल प्रमाण नाही. याच्या उलट हूण नृपति मिहिरकुल हा पंजाबांत शाकल (सध्याचें सियालकोट) येथून राज्य करीत होता. त्याने काश्मीरचें राज्यहि गिळंकृत केलें होतें असें ह्यूएनत्संग सांगतो. यशोधर्म्याचें राज्य गुप्त व हूण नृपतींच्या राज्यांपेक्षा मोठें होतें असें प्रस्तुत लेखांत म्हटलें

असल्यामुळे त्यामध्ये हा सर्व प्रदेश अन्तर्भूत झाला होता यांत संशय नाही. याविषयी स्पष्ट निर्देश याच स्तंभलेखांतील पुढील श्लोकांत आला आहे—

आ लौहित्योपकण्ठात्तलवनगहनोपत्यकादा महेन्द्रात्
आ गङ्गाश्लिष्टसानोस्तुहिनशिखरिणः पश्चिमादा पयोधेः ।
सामन्तैर्यस्य बाहुद्रविणहृतमदैः पादयोरानमद्भिः
चूडारत्नांशुराजिव्यतिकरशबला भूमिभागाः क्रियन्ते ॥

[(उत्तरेस) ब्रह्मपुत्रा नदीपासून (दक्षिणेस) ज्याच्या पायथ्याशीं ताल-वृक्षांचीं वनें आहेत अशा (कलिंग देशांतील) महेन्द्र पर्वतापर्यंत, तसेंच ज्याच्या शिखरांना गंगानदीने वेष्टिलें आहे त्या हिमालय पर्वतापासून तों पश्चिम सागरापर्यंत, पसरलेल्या देशांचें सामन्त नृपति या यशोधर्म सम्राटाच्या बाहुबलाने हतगर्व होऊन त्याच्या चरणांना नमस्कार करीत असतां त्याच्या पुढील भूमीला आपल्या मुकुटांतील (विविध) रत्नांच्या किरणांनी चित्र-विचित्र करतात.]

त्यानंतर यशोधर्म्याच्या ज्या विजयाचें स्मारक म्हणून हे स्तंभ उभारले होते त्याचें वर्णन प्रस्तुत लेखाच्या आरंभीं उद्धृत केलेल्या श्लोकांत केलें आहे. त्यांत म्हटलें आहे की, ज्याने भगवान् शंकराखेरीज इतर कोणाहि पुढे आपलें मस्तक नमविलें नव्हतें, आणि ज्याच्या बाहूंनी वेष्टिल्यामुळे हिमालय पर्वत आपण दुर्गम आहों अशी बढाई मारूं शकत नाही, अशा मिहिरकुल नृपतीलाहि यशोधर्म्याच्या बाहुबलामुळे कष्टाने मान वाकविणें भाग पडलें, आणि त्याने आपल्या मस्तकावर धारण केलेल्या पुष्पमालांनी त्याच्या (यशोधर्म्याच्या) दोन्ही चरणांचें पूजन केलें.

यशोधर्म्याच्या विजयाचें महत्त्व

भारतीय इतिहासांत यशोधर्म्याच्या या विजयाचें अत्यंत महत्त्व आहे. ज्या हूणांच्या अधिपतींवर यशोधर्म्याने हा विजय मिळविला होता ते जागतिक इतिहासांत अत्यंत क्रूर व रानटी म्हणून प्रसिद्ध आहेत. ते जो प्रदेश आक्रमीत त्याला लुटून व जाळून बेचिराख करीत. त्यांच्या एका

टोळीने युरोपांत दूरवर स्वाऱ्या करून रोमन साम्राज्य नष्ट केलें. त्यांचा नायक ॲट्टिला याला Scourge of God (परमेश्वरी उत्पात) असें म्हणत. त्यांच्याच एका श्वेतहूण नामक टोळीने इराणवर स्वारी करून तेथील राजाला कंठस्नान घातलें. दुसऱ्या एका टोळीने भारतावर गुप्त नृपति स्कन्दगुप्त याच्या कारकीर्दीच्या आरंभीं आक्रमण केलें. स्कन्दगुप्ताने या टोळधाडीचा मोठ्या शौर्याने प्रतिकार केला. या युद्धकालांत एकदा तर त्याला नुसत्या जमिनीवर पडून रात्र घालवावी लागली होती.[4] आपल्या शत्रूवर मोठ्या शौर्याने प्राप्त झालेला विजय त्याने आपल्या मातेला कळविला तेव्हा तिचे नेत्र आनंदाश्रूंनी भरून आले असें एका कोरीव लेखांत म्हटलें आहे. कवीने या ठिकाणीं कंसवधानंतर कृष्ण देवकीला भेटावयास गेला त्या प्रसंगाची हृदयस्पर्शी उपमा दिली आहे.[5] हूणांशीं स्कन्दगुप्ताने केलेल्या भयंकर रणकंदनाने सर्व पृथ्वी कंपित झाली, असेंहि त्या लेखांत म्हटलें आहे,[6] त्यावरून त्या संग्रामाची कल्पना येईल. या खेपेस स्कन्दगुप्ताने भारतास हूणांच्या टोळधाडीपासून बचावलें तरी त्याच्या निधनानंतर (सन ४६७) हूणांनी पुनः आक्रमण करून उत्तर भारताचा बराचसा भाग काबीज केला. सागर जिल्ह्यांतील एरण या गावीं तोरमाण नामक हूण नृपतीच्या धन्यविष्णु नांवाच्या सामन्ताचा लेख सापडला आहे. त्यांत कालनिर्देश नाही, पण तेथील इतर लेखांवरून तोरमाणाने तो प्रदेश सन ४८४-८५ नंतर लौकरच, बहुधा सन ४९० च्या सुमारास

---

४. विचलितकुललक्ष्मीस्तम्भनायोद्यतेन
क्षितितलशयनीये येन नीता त्रियामा ।
भिटारी शिलालेख, कॉ. इ. इं., पु. ३, पृ. ५३.

५. जितमिति परितोषान्मातरं सास्रनेत्रां
हतरिपुरिव कृष्णो देवकीमभ्युपेतः ॥
पूर्वोक्त, पृ. ५३.

६. हूणैर्यस्य समागतस्य समरे दोर्भ्यां धरा कम्पिता ।
पूर्वोक्त, पृ. ५३.

जिंकला असावा. तोरमाणाचा पुत्र मिहिरकुल याच्या कारकीर्दीच्या पंधराव्या वर्षीं कोरलेला लेख ग्वाल्हेरच्या किल्ल्यांत सापडला आहे. त्याची राजधानी पंजाबांत शाकल येथे होती तसेंच त्याचा अंमल काश्मीर येथेहि चालत होता हें मागें सांगितलें आहेच. राजतरंगिणींतहि तोरमाण व मिहिरकुल यांचीं नावें आलीं आहेत. पण तोरमाण मिहिरकुलानंतर अठरा राजांनी राज्य केल्यावर झाला असें कल्हण सांगतो. त्यावरून त्यास त्यांच्याविषयी निश्चित माहिती होती, असें वाटत नाही.

हूणनृपति मिहिरकुल

मिहिरकुल हा अत्यंत रागीट व क्रूर होता. कल्हणाने त्याला कृतान्ताची उपमा दिली आहे. त्याचे सामन्त त्याच्या पुढे चळवळां कापत असत, असें ह्यूएनत्संग सांगतो. तो स्वतः भगवान् शंकराचा उपासक होता. त्याच्या नाण्यांवर नन्दीची आकृति असून 'जयतु वृषः' (नंदीचा विजय असो) असा लेख आढळतो. त्याने हिंदुधर्मीयांना कदाचित् त्रास दिला नसेल, पण बौद्धधर्मीयांचा अनन्वित छळ केला, यांत संशय नाही. त्याने पुरुषपुर (पेशावर) येथील बुद्धाचें भिक्षापात्र भग्न केलें होतें. कांही कारणाने त्याचा बौद्ध भिक्षूंवर रोष झाल्यामुळे त्याने बौद्ध धर्माचीं पाळेंमुळें खणून काढण्याचा निश्चय केला. त्याने आपल्या राज्यांतील १६०० स्तूप व विहार जमीनदोस्त केले आणि नऊ कोटी बौद्धधर्मीयांना कंठस्नान घातलें, असें ह्यूएनत्संग सांगतो. या वृत्तांतांत अतिशयोक्ति उघड दिसते; तथापि त्यावरून मिहिरकुलाचा रागीट स्वभाव व क्रूरपणा व्यक्त होतो.

यशोधर्म्याविषयी मर्यादित उपलब्ध माहिती

रानटी, क्रूर व प्रजेला छळणाऱ्या या मिहिरकुलाच्या मगरमिठींतून भारताला सोडविणाऱ्या यशोधर्म्याबद्दल फारच थोडी माहिती उपलब्ध आहे. सबंध संस्कृत वाङ्मयांत त्याचें नांव कोठेहि येत नाही. त्याच्या काळचे दोनच कोरीव लेख सापडले आहेत. त्यापैकी एकाची माहिती वर दिली आहे. दुसरा लेख मन्दसोर येथेच एका विहिरीला लावलेल्या शिलेवर कोरलेला सापडला आहे. त्यामध्ये यशोधर्म्याचें विष्णुवर्धन असें

दुसरें नांव[७] आणि त्याच्या ‘राजाधिराज’ व ‘परमेश्वर’ अशा सम्राट्पद-निदर्शक पदव्या यांचा उल्लेख आहे. या दुसऱ्या लेखाचा उद्देश दशपुर येथे राजस्थानीय (राजप्रतिनिधि) म्हणून अंमल चालविणाऱ्या निर्दोष नामक ‘नैगम’ वंशी अधिकाऱ्याने आपल्या अभयदत्त नांवाच्या चुलत्याच्या नांवें एक विहीर खणली हें जाहीर करण्याचा होता. या लेखांतील आरंभींच्या वर्णनावरून यशोधर्म्यांच्या वंशाचें नांव ‘औलिकर’ होतें असें समजतें. या लेखांत मालव संवत् ५८९ (सन ५३३–३४) चा उल्लेख आहे. मन्दसोरच्या या दोन्ही लेखांचा कोरक्या गोविंद हाच होता. त्यावरून यशोधर्म्याचा हूण नृपति मिहिरकुलावरील विजय सन ५३३–३४ च्या जवळपास घडून आला असें मानण्यास हरकत नाही.

यशोधर्म्याविषयी कोरीव लेखांतून माहिती मिळते ती एवढीच. मन्दसोरच्या स्तंभलेखांत ‘श्लाघ्ये जन्माऽस्य वंशे’ (याचा जन्म प्रशंसनीय कुलांत झाला आहे) असें म्हटलें आहे. पण त्याच्या औलिकर कुलाविषयी कांहीच माहिती उपलब्ध नव्हती. त्यामुळे एखाद्या धूमकेतूप्रमाणे यशोधर्म्याचा उदय भारतांत झाला असें मानण्यांत येत असे. तसेंच त्याचे विजयस्तंभ मन्दसोरजवळच्या गावीं सापडल्यामुळे तो दशपुर येथे राज्य करीत होता असेंहि समजलें जात असे. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या कांही कोरीव लेखांवरून व इतर साधनांवरून यशोधर्म्याविषयी कोणती नवी माहिती मिळते हें प्रस्तुत लेखांत पाहावयाचें आहे.

माळव्यांतील अलीकडे सापडलेला शिलालेख

यशोधर्म्याच्या औलिकरवंशाचा उल्लेख मागे आला आहे. या वंशाचें नांव इतरत्र कोठे आलें नव्हतें, पण सन १९३८ मध्ये माळव्यांतील विहारकोत्रा गावीं (मालव) संवत् ४७४ चा महाराज नरवर्मन् नामक नृपतीचा एक शिलालेख सापडला.[८] त्यामध्ये ‘श्रीमहाराजनरवर्मणः

७. या लेखाचें संपादन करीत असतां फ्लीटने यशोधर्मन् हा विष्णुवर्धनाहून भिन्न होता असें म्हटलें होतें, पण तें चूक आहे.

८. एपिग्राफिया इंडिका, पु. २६, पृ. १३१.

औलिकरस्य राज्यसंवत्सरे' असा उल्लेख आढळला. या नरवर्म्याच्या वंशजांचे कांही लेख मंदसोरच्या सभोवारच्या प्रदेशांत सापडले आहेत. त्यावरून हें घराणें मंदसोरला बराच काळ राज्य करीत होतें असें दिसतें. आतापर्यंत सापडलेल्या या वंशाच्या लेखांवरून खालील वंशावळ ज्ञात झाली आहे. (ज्ञात वर्षें कंसांत दिलीं आहेत.)

जयवर्मन्
|
सिंहवर्मन्
|
नरवर्मन् (मालव संवत् ४६१ व ४७४)
|
विश्ववर्मन् (मा. सं. ४८०)
|
बंधुवर्मन् (मा. सं. ४९३)
|
यशोधर्मन्–विष्णुवर्धन (मा. सं. ५८९)

बन्धुवर्मन् हा गुप्तनृपति प्रथम कुमारगुप्त (सन ४१३ ते ४५५) याचा मांडलिक म्हणून दशपुर येथे राज्य करीत होता हें वत्सभट्टीच्या मालव संवत् ५२९ च्या शिलालेखावरून समजतें.[१] त्याचे पूर्वज नरवर्मन् व विश्ववर्मन् यांच्या लेखांत मात्र गुप्त सम्राटांचा नामनिर्देश नाही. तसेंच या सर्व राजांच्या कोरीव लेखांत मालव (विक्रम) संवताचाच उपयोग कालनिर्देशाकरिता केला आहे. तत्कालीन गुप्त सम्राटांच्या इतर मांडलिकांच्या लेखांत याहून भिन्न परिस्थिति दृष्टीस पडते. त्यांच्या लेखांत गुप्त सम्राटांची वंशावळ किंवा निदान तत्कालीन सम्राटाचें नांव दिलेलें असतें. तसेंच त्यांत गुप्त संवताचाच उपयोग केलेला असतो. तेव्हा या बाबतींत गुप्त सम्राट् विशेष आग्रह धरीत असें दिसतें. असें असतांहि या औलिकर वंशाच्या

१. कॉ. इ. इं, पु. ३, पृ. ७९ इ.

अनेक लेखांत गुप्त सम्राटांचा किंवा संवताचा निर्देश नाही. त्यावरून हें घराणें दशपुर येथे दृढमूल झालें असून बरेंच प्रबळ होतें, असें अनुमान करण्यास हरकत नाही.

बन्धुवर्म्यानंतरच्या सुमारें शंभर वर्षांच्या काळांत दशपुर येथे कोण राजे राज्य करीत होते याविषयी माहिती आपणांस नव्हती. वत्सभट्टीच्या मालव संवत् ५२९ च्या लेखांत मालव संवत् ४९३ पासून ५२९ पर्यंतच्या केवळ छत्तीस वर्षांच्या अल्प काळांत दशपुर येथे अनेक राजे होऊन गेले व तेथे मा. सं. ४९३ मध्ये बांधलेलें सूर्याचें मंदिर इतकें विशीर्ण झालें की त्याचा जीर्णोद्धार करावा लागला, असें म्हटलें आहे.[१०] या लेखांतील वर्णनावरून तत्कालीन अस्थिर परिस्थिति अजमावतां येते. मालव संवत् ५२४ चा आणखी एक लेख अलीकडे मंदसोरला सापडला आहे.[११] त्यांत प्रभाकर नामक नृपतीने गुप्तांच्या शत्रूंचा पाडाव केला असें म्हटलें आहे. हा प्रभाकर बहुधा औलिकरवंशी असावा. त्याने पराजित केलेले गुप्तांचे शत्रु कोण होते याचा निर्देश मात्र त्या लेखांत आला नाही. तथापि ते हूणच असावे असें वाटतें.

मंदसोरच्या सामंतांचे लेख

प्रभाकरानंतर दशपुर येथील राजकीय परिस्थितीवर प्रकाश पडणारे दोन शिलालेख नुकतेच एपिग्राफिया इंडिकांत[१२] डॉ. दिनेशचंद्र सरकार यांनी प्रकाशित केले आहेत. त्यांपैकी एक मंदसोरच्या उत्तरेस पंचवीस मैलांवरच्या नीमच स्टेशनजवळच्या छोटी सादडी नामक गावांत सापडला होता. त्या लेखाचा उद्देश मानवायनि कुलांतील महाराज गौरि याने त्या गावीं देवीचें देवालय बांधलें हें जाहीर करण्याचा होता. या लेखांत महाराज गौरीची वंशावळ खाली दिल्याप्रमाणे दिली आहे—

१०. बहुना समतीतेन कालेनान्यैश्च पार्थिवैः ।
व्यशीर्यतैकदेशोऽस्य भवनस्य ततोऽधुना ॥ पूर्वोक्त, पृ. ८३

११. ए. इं., पु. २७, पृ. १४५ इ.

१२. पूर्वोक्त, पु. ३०, पृ. १२० इ.

पुण्यसोम
|
राज्यवर्धन
|
राष्ट्र (अर्थात् राष्ट्रवर्धन)
|
यशोगुप्त
|
महाराज गौरि

या लेखाचा काल (मालव) संवत् ५४७ असा आहे. याच महाराज गौरीचा दुसरा लेख मन्दसोर येथे सापडला आहे. तो खंडित झाला आहे तरी त्यापासून कांही महत्त्वाची माहिती मिळते. लेखाच्या आरंभीं मंगल-श्लोकानंतर आदित्यवर्धन नामक राजाचें वर्णन आलें आहे. त्यांत त्याने आपल्या शत्रूवर विजय मिळविल्याचा उल्लेख आहे. हा राजा राज्य करीत असतां (नरव्याघ्रे नरेन्द्रादित्यवर्धनि) मानवायनिवंशी महाराज गौरीने दशपुर येथे आपल्या मृत मातेच्या पुण्योपार्जनाकरिता एक तलाव खोदला, असें म्हटलें आहे. या लेखांत महाराज गौरीची वंशावळ खालीलप्रमाणे दिली आहे—

राष्ट्रवर्धन
|
यशोगुप्त
|
महाराज गौरि

ही वंशावळ छोटी सादडी येथील लेखांतल्या प्रमाणेच आहे. पण या लेखाच्या आरंभीं ज्या आदित्यवर्धन नामक नरेन्द्राचा उल्लेख आला आहे, त्याचा आणि महाराज गौरीचा कसा संबंध होता हें या शिलालेखावरून स्पष्ट नाही. प्राचीन काळीं मांडलिक राजांच्या लेखांच्या आरंभीं तत्कालीन सम्राटाच्या नांवाचा उल्लेख करण्याची पद्धत होती.[१३] तेव्हा आदित्यवर्धन

१३. कॉ. इ. इं., पु. ४, पृ. १३४.

हा महाराज गौरीचा सम्राट् असावा. डॉ. सरकार यांनी आदित्यवर्धन हें महाराज गौरीचें दुसरें नांव असावें असा एक पक्ष मांडला आहे. पण तसें असतें तर त्या नांवाचा उल्लेख छोटी सादडीच्या अखंडित लेखांत आला असता. तसेंच, हा आदित्यवर्धन दशपुर येथे राज्य करीत असावा व महाराज गौरीने दशपुर येथे (आपल्या राज्याबाहेर) तलाव खोदविला याचें कारण त्याची माता तेथे निधन पावली असावी, असा दुसरा एक तर्क डॉ. सरकार यांनी केला आहे तोहि बरोबर दिसत नाही. उलटपक्षीं महाराज गौरि हा स्वतःच दशपुर येथे राज्य करीत होता आणि म्हणूनच त्याने तेथे तो तलाव खोदला असें मानणें अधिक सयुक्तिक दिसेल.

वराहमिहिराने दिलेली माहिती

मानवायनिवंशी महाराज गौरि दशपुर येथे राज्य करीत होता असें मानल्यास तेथे पूर्वी अनेक पिढया राज्य करीत असलेल्या औलिकर वंशाचें काय झालें, असा प्रश्न उपस्थित होतो. त्यावर वराहमिहिराच्या 'बृहत्संहितें'-तील (अध्याय ८६) खालील उताऱ्यावरून कांही प्रकाश पडतो—

यच्छक्रशुक्रवागीशकपिष्ठलगरुत्मताम् ।
मतेभ्यः प्राह ऋषभो भागुरेर्देवलस्य च ।।१।।
भारद्वाजमतं दृष्ट्वा यच्च श्रीद्रव्यवर्धनः ।
आवन्तिकः प्राह नृपो महाराजाधिराजकः ।।२।।
सप्तर्षीणां मतं यच्च संस्कृतं प्राकृतं च यत् ।
यानि चोक्तानि गर्गाद्यैर्यात्राकारैश्च भूरिभिः ।।३।।
तानि दृष्ट्वा चकारेमं सर्वशाकुनसंग्रहम् ।
वराहमिहिरः प्रीत्या शिष्याणां ज्ञानमुत्तमम् ।।४।।

या उताऱ्यांत वराहमिहिराने आपल्या पूर्वीच्या ग्रंथकारांनी शकुनांवर जे ग्रंथ लिहिले होते त्यांचा निर्देश केला आहे. त्यांमध्ये अवन्तीचा महाराजाधिराज द्रव्यवर्धन याने भारद्वाजमुनीच्या मताचा विचार करून जो ग्रंथ लिहिला होता त्याचाहि उल्लेख आहे. 'हा द्रव्यवर्धन कोणत्या

वंशाचा व तो कोणत्या काळीं होऊन गेला हें पुरातत्त्ववेत्त्यांनी निश्चित केल्यास तें फार उपयुक्त होईल' असें म. म. डॉ. पां. वा. काणे यांनी वराहमिहिरावरील आपल्या लेखांत म्हटलें आहे[१४] आतापर्यंत याविषयी निश्चितपणें लिहिणें कठीण होतें. पण आता कांही सयुक्तिक अनुमानें करतां येतात.

वराहमिहिराने मागे दिलेली माहिती अत्यंत महत्त्वाची आहे. ती केवळ ऐकीव नाही. वराहमिहिर स्वतः उज्जयिनीस राहत होता. त्याने उज्जयिनीच्या महाराजाधिराज द्रव्यवर्धनाचा शकुनविषयक ग्रंथ पाहिला होता इतकेंच नाही, तर स्वतःच्या 'बृहत्संहितें'तील शाकुनिकप्रकरणाकरिता त्याचा उपयोगहि केला होता. तेव्हा त्याच्या काळापूर्वी महाराजाधिराज द्रव्यवर्धन हा उज्जयिनीस राज्य करीत होता यांत संशय नाही. वराहमिहिराने आपला 'पंचसिद्धान्तिका' हा ग्रंथ शक संवत् ४२७ (इ. स. ५०५) यावर्षी लिहिला असा त्यांत स्पष्ट उल्लेख आहे. हा त्याचा पहिला ज्ञात ग्रंथ. तेव्हा तो खिस्तोत्तर सहाव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला हें निश्चित आहे. तेव्हा महाराजाधिराज द्रव्यवर्धन हा निदान इ. स. ५०० (विक्रम संवत् ५५६) च्या पूर्वी झाला असावा.

द्रव्यवर्धनाचा काल

द्रव्यवर्धनाच्या कालाची पूर्वमर्यादाहि निश्चित करणें कठीण नाही. खिस्तोत्तर पहिल्या चार शतकांत उज्जयिनी येथे पश्चिम क्षत्रपांचें राज्य होतें. उज्जयिनीस चष्टन नामक क्षत्रप राज्य करीत होता हें ग्रीक ग्रंथकारांनी नमूद करून ठेवलें आहे. सन ३९५ च्या सुमारास द्वितीय चन्द्रगुप्ताने क्षत्रपांचा पाडाव करून माळवा व काठेवाड हे प्रांत आपल्या राज्यास जोडले आणि उज्जयिनी ही आपली दुसरी राजधानी केली. सन ४६७ मध्ये

---

१४. 'It would be very useful if antiquarians can find out this king Dravyavardhana of Ujjayini.' जर्नल ऑफ् दि बॉंबे ब्रँच् ऑफ् रॉयल एशियाटिक सोसायटी, पु. २४–२५, पृ. १ इ०

स्कन्दगुप्ताचें निधन होईपर्यंत तरी उज्जयिनी गुप्तांच्या स्वाधीन राहिली असावी. क्षत्रप व गुप्त यांच्या कालांत महाराजाधिराज द्रव्यवर्धनानें उज्जयिनीस राज्य केलें असणें शक्य नाही. तेव्हा तो सन ४६७ ते ५०० या काळांत झाला असावा.

'द्रव्यवर्धन' हें नांव 'आदित्यवर्धन' व 'विष्णुवर्धन' या नांवांसारखें 'वर्धन' शब्दान्त आहे. तेव्हा हे तीनहि राजे एकाच वंशाचे असण्याचा संभव आहे.

आदित्यवर्धन (मा. सं. ५४७)
|
द्रव्यवर्धन (सुमारें मा. सं. ५५६)[१५]
|
यशोधर्मन्-विष्णुवर्धन (मा. सं. ५८९)

द्रव्यवर्धन हा सम्राट् असून उज्जयिनीस राज्य करीत होता हें 'बृहत्संहिते'वरून स्पष्ट आहे. त्याच्याप्रमाणे दुसरे दोघेहि सम्राट् होते हें कोरीव लेखांवरून समजतें. तेव्हा तेहि उज्जयिनीसच राज्य करीत असण्याचा संभव आहे. खिस्तोत्तर पांचव्या शतकाच्या अखेरीस हूणांच्या आक्रमणामुळे गुप्त साम्राज्य खिळखिळें झालें त्या वेळीं दशपुरच्या औलिकरवंशीय आदित्यवर्धनानें उज्जयिनीवर चाल करून तें नगर काबीज केलें असावें. तेथे त्याच्यानंतर द्रव्यवर्धन राज्य करीत होता. त्याच्यानंतर उदयास आलेला यशोधर्मन्-विष्णुवर्धन हा कोठे राज्य करीत होता याचा उल्लेख नाही. तथापि तोहि द्रव्यवर्धनासारखा उज्जयिनीसच राज्य करीत होता असें मानण्यास हरकत नाही. द्रव्यवर्धन व यशोधर्मन्-विष्णुवर्धन यांच्या कालांमध्ये फारसें अंतर नसल्यामुळे त्यांचें परस्पर नातें पितापुत्राचेंहि असण्याचा संभव आहे.

यशोधर्म्याची राजधानी उज्जयिनी

मंदसोरजवळ सोंदणी गावीं यशोधर्मन्-विष्णुवर्धनाचे विजयस्तंभ सापडले असल्यामुळे तो मन्दसोर (दशपुर) येथे राज्य करीत होता असें

१५. इ. स. ५०० म्हणजे मालव संवत् ५५६.

मानलें जातें, पण तें बरोबर दिसत नाही. औलिकरवंशी राजांनी आपली राजधानी दशपुराहून उज्जयिनीस नेल्यावर दशपुर येथे आपले सामंत मानवायनिवंशी राजांची स्थापना केली असें दिसतें. म्हणूनच त्या वंशाच्या महाराज गौरीचा पूर्वोक्त शिलालेख मन्दसोर येथे सापडला आहे. यशोधर्मन्–विष्णुवर्धनाच्या काळीं तेथे एक दुसरेंच घराणें राजस्थानीय म्हणून राज्य करीत होतें, हें मन्दसोर येथे सापडलेल्या व यशोधर्म्याच्या काळच्या मालव संवत् ५८९ (सन ५३३–३४) च्या शिलालेखांतील श्लोकावरून दिसून येईल[१६]—

> **विन्ध्यस्यावन्ध्यकर्मा शिखरतटपतत्पाण्डुरेवाम्बुराशे-**
> **र्गोलाङ्गूलैः सहेलं प्लुतिनमिततरोः पारियात्रस्य चाद्रेः ।**
> **आसिन्धोरन्तरालं निजशुचिसचिवाध्यासितानेकदेशं**
> **राजस्थानीयवृत्त्या सुरगुरुरिव यो वर्णिनां भूतयेऽपात् ॥**

या श्लोकांत विन्ध्य व पारियात्र (अरवलि) या पर्वतांमधील व पश्चिमेस समुद्रापर्यंत पसरलेल्या प्रदेशावर यशोवर्म्याने किंवा त्याच्या पूर्वजाने राजस्थानीय म्हणून नेमलेला नैगमवंशी अभयदत्त राज्य करीत होता असें म्हटलें आहे. दशपुरचा प्रदेश याच भागांत मोडतो. तेव्हा दशपुर येथे यशोधर्मन्–विष्णुवर्धनाची राजधानी नव्हती हें उघड आहे. ती दुसरीकडे कोठे तरी—बहुधा उज्जयिनीसच—असावी.

दशपुराजवळ हूणांचा पाडाव

यशोधर्मा दशपुर (मन्दसोर) येथे राज्य करीत नव्हता तर त्याचे विजयस्तंभ त्या नगराजवळ कां उभारले, असा कोणी प्रश्न केल्यास त्याचें उत्तर देणें कठीण नाही. यशोधर्मा आणि मिहिरकुल यांची जी घनघोर लढाई झाली आणि जिच्यामध्ये मिहिरकुलाचा पूर्णपणें पाडाव होऊन त्याला आपली मान यशोधर्म्यापुढे वांकवावी लागली, ती लढाई दशपुराजवळ झाली असावी. आणि म्हणूनच हे विजयस्तंभ मन्दसोरजवळच्या सोंदणी गावीं उभारले होते, असें दिसतें.

---

१६. कॉ. इ. इं., पु. ३, पृ. १५४.

एक सर्वश्रेष्ठ राजा

वरील विवेचनावरून यशोधर्मन्–विष्णुवर्धन याचे उदयास्त एखाद्या धूमकेतूच्या प्रमाणे झाले नव्हते, तर त्याच्या लेखांत म्हटल्याप्रमाणे त्याचा जन्म श्लाघ्य अशा वंशांत झाला होता. तो वंश प्रथम दशपुर येथे व नंतर उज्जयिनी येथे दीर्घकाळ राज्य करीत असून अत्यंत प्रबळ होता. म्हणूनच यशोधर्म्याला मिहिरकुलासारख्या बलाढ्य हूण नृपतीच्या मगरमिठींतून भारताला मुक्त करतां आलें. भारताच्या सर्वश्रेष्ठ राजांच्या मालिकेंत त्याची गणना होईल.

औलिकर वंशाच्या राजांची वंशावळ ज्ञात वर्षांसह खाली दिली आहे—

औलिकर राजवंश

जयवर्मन्
|
सिंहवर्मन्
|
नरवर्मन् (मा. सं. ४६१ व ४७४)
|
विश्ववर्मन् (मा. सं. ४८०)
|
बंधुवर्मन् (मा. सं. ४९३)
|
प्रभाकर (मा. सं. ५२४)
|
आदित्यवर्धन (मा. सं. ५४७ च्या सुमारास)
|
द्रव्यवर्धन (मा. सं. ५५६ च्या सुमारास)
|
यशोधर्मन्–विष्णुवर्धन (मा. सं. ५८९)

यशोधर्म्याचे वंशज फार काळ उज्जयिनीस राज्य करीत होते असें दिसत नाही. इ. स. ५५० च्या सुमारास उदयास आलेल्या कलचुरिवंशी कृष्णराजाने माळवा काबीज केला. त्याचीं नाणीं बेसनगर (प्राचीन विदिशा) येथे सापडलीं आहेत. त्याचा मुलगा शंकरगण याच्या ताम्रपटांतील वर्णनांत गुप्त राजांच्या लेखांतील कित्येक विशेषणें जशींच्या तशीं घेतलेलीं दिसतात. तेव्हा ते लेख उज्जयिनीच्या सचिवालयांत लिहिले असावे. तेव्हा यशोधर्म्यानंतर लौकरच औलिकर वंशाचा अस्त होऊन उज्जयिनी कलचुरींच्या आधिपत्याखाली गेली, असें दिसतें.

---

९. 'पृथ्वीराजविजयां'तील कलचुरिविषयक उल्लेख*

संस्कृत वाङ्मयांत जीं थोडीं ऐतिहासिक काव्यें उपलब्ध झालीं आहेत त्यांपैकी जयानक कवीचें 'पृथ्वीराजविजय' हें एक अत्यंत महत्त्वाचें आहे. या काव्याचें एकच भूर्जपत्रावर लिहिलेलें हस्तलिखित असून तें डॉ. बुल्हरला सन १८७६ मध्ये, तो संस्कृत ग्रंथांचा शोध करण्याकरिता काश्मीरला गेला असतां, सापडलें होतें. तें सध्या भांडारकर प्राच्यविद्यासंशोधनमंदिरांत सुरक्षित ठेवलें आहे. हें हस्तलिखित अपूर्ण असून अत्यंत जीर्णावस्थेंत आहे. त्याचा आरंभींचा व अखेरचा भाग नष्ट झाला आहे. अवशिष्ट भागांत या काव्याचे बारा सर्ग आले आहेत. पहिल्या सर्गाचे आरंभींचे कांही श्लोक व बाराव्याचे शेवटचे कांही श्लोक गेले आहेत. या काव्याचे एकूण किती सर्ग होते हेंहि माहीत नाही. राहिलेल्या हस्तलिखिताच्या भागांतहि भूर्जपत्रें जोडण्याकरिता मध्य भागीं छिद्रांतून घातलेल्या दोरीच्या घर्षणाने कांही अक्षरें नष्ट झालीं आहेत. कांही भूर्जपत्रांचा खालचा भाग मोडून नष्ट झाल्यामुळे कित्येक सर्गांतील अनेक श्लोक गेले आहेत.

---

* हा निबंध भारत इतिहास संशोधन मंडळाच्या ४४ व्या वार्षिक संमेलनप्रसंगीं (१ जून १९५७ रोजीं) वाचला होता.

तथापि या काव्याचा अवशिष्ट भागहि अत्यंत महत्त्वाचा आहे. म्हणून याच्या दोन आवृत्त्या आतापर्यंत प्रसिद्ध झाल्या आहेत. पहिली आवृत्ति डॉ. श्री. कृ. बेलवलकरांनी कलकत्त्याच्या बिब्लिऑथेका इंडिका या ग्रंथमालेंत सन १९१४ ते १९२२ या अवधींत तीन खंडांत प्रसिद्ध केली. या आवृत्तींत पहिल्या आठ सर्गांचाच भाग आला आहे. त्यांनी पुढील भाग कां प्रकाशित केला नाही, हें समजत नाही. या आवृत्तीला प्रस्तावना नाही. त्यानंतर सन १९४० मध्ये म. म. गौरीशंकर हीराचंद ओझा व श्री. चंद्रशेखर गुलेरी यांनी दुसरी आवृत्ति अजमेर येथे प्रसिद्ध केली. म. म. ओझांनी या आवृत्तीला लहानशी प्रस्तावना जोडली आहे. ही आवृत्तिहि भांडारकर संशोधन मंदिरांतील हस्तलिखिताची नक्कल मागवून तिजवरूनच संपादिली होती. हींत बारा सर्गांचा भाग आला आहे. पण बेलवलकर आवृत्तींतील कांही त्रुटित श्लोक यांत दिसत नाहीत. बेलवलकरांनी स्वतः हस्तलिखित पाहून आपली आवृत्ति तयार केल्यामुळे तींत पहिल्या आठ सर्गांतील त्रुटित श्लोकहि आले आहेत. ओझांची आवृत्ति दुसऱ्याने केलेल्या नक्कलीवर आधारलेली आहे. नक्कलकाराने कांही जीर्ण पानांवरचा भाग न घेतल्यामुळे ओझांच्या आवृत्तींत तो गळला आहे. ओझांनी बेलवलकरांची आवृत्ति पाहिली होती, असें दिसत नाही. बेलवलकरांनी त्रुटित श्लोक अनुमानानें पूर्ण करण्याचा प्रयत्न केला नाही; पण ओझांनी तो अनेक ठिकाणीं केला आहे. असे या दोन आवृत्तींचे गुणदोष आहेत.

कै. हरविलास सारडा यांनी या काव्याचें ऐतिहासिक महत्त्व रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलच्या १९१३ च्या अंकांत दाखविलें होतें. ओझांनीहि तें नागरी प्रचारिणी पत्रिकेंतील (प्रथम वर्ष) आपल्या लेखांत सिद्ध केलें आहे.

'पृथ्वीराजविजया'चा कर्ता

या काव्याचा कर्ता जयानक कवि हा मूळचा काश्मीरांतील. बिल्हणाप्रमाणे हाहि राजाश्रयाकरिता फिरत फिरत अजमेरच्या तृतीय पृथ्वीराजाच्या दरबारीं आला. पृथ्वीराजानें त्याचा आदरसत्कार करून त्याला आपलें

यशोगान करण्यास सांगितलें. तेव्हा कवीने आपलें काव्य पृथ्वीराजासमोर वाचून दाखविलें. हें काव्य पृथ्वीराजाने शहाबुद्दीन घोरीवर सन ११९१ मध्ये जो विजय मिळविला तद्वर्णनार्थ लिहिलें असावें. पुढे दोन वर्षांनी दैवाचा फासा उलट पडला आणि पृथ्वीराजाचा घोरीकडून पराजय होऊन शिरच्छेद झाला. त्या काळच्या दंगलींत जयानक कवि काश्मीरास परत गेला असावा. त्याचें काव्य फार लोकप्रिय झालें होतें, असें दिसतें. कारण ख्रिस्तोत्तर पंधराव्या शतकांत होऊन गेलेल्या जोनराजाने या काव्यावरच्या आपल्या टीकेंत पाठांची चर्चा केली आहे. बेलवलकर व ओझा यांच्या आवृत्तींत जोनराजाची टीकाहि दिली आहे, पण मूळ काव्याप्रमाणे तिचाहि कांही भाग नष्ट झाला आहे. जोनराज हा द्वितीय राजतरंगिणीचा कर्ता म्हणून सुविख्यात आहे.

‘ पृथ्वीराजविजयाचें ’ ऐतिहासिक महत्त्व

प्रस्तुत काव्याचा कर्ता पृथ्वीराजाचा समकालीन असल्याने त्याच्या वर्णनाचें ऐतिहासिक महत्त्व फार आहे. इतर ऐतिहासिक काव्यांच्या कर्त्यांप्रमाणे जयानकाने आपल्या काव्यांत ऐतिहासिक व काल्पनिक गोष्टींचें मिश्रण करून आपल्या वर्णनांत रंग भरला आहे. उदाहरणार्थ, शाकम्भरी येथील चाहमान घराण्याचा आदि पुरुष वासुदेव याच्या एका विद्याधराशीं झालेल्या भेटीचें वर्णन पाहा. पृथ्वीराज आणि त्याचा भाऊ हरिराज यांना राम व लक्ष्मण यांचे अवतार मानून तदनुसार त्यांचें वर्णन कवीने केलें आहे. तथापि एकंदरींत त्याच्या काव्यांत ऐतिहासिक भाग पुष्कळच असून तो तत्कालीन कोरीव लेखांतील उल्लेखांशीं चांगला जुळणारा अत एव विश्वसनीय आहे, हें डॉ. बुल्हर, सारडा आणि म. म. गौरीशंकर ओझा यांनी आपापल्या लेखांत दाखविलें आहे. या काव्यांत कलचुरिविषयक उल्लेखहि कांही ठिकाणीं आले आहेत. त्यांची चर्चा मात्र कोणी केलेली माहीत नाही. अलीकडे डॉ. दिनेशचंद्र सरकार यांनी या काव्याच्या सहाव्या सर्गांत आलेल्या कलचुरि नृपति साहसिक याच्या कथेकडे विद्वानांचें लक्ष वेधलें आहे. ही कथा खरी असून तिजवरून कलचुरींच्या कोरीव लेखांत अनेकदा येणाऱ्या ‘वामदेवपादानुध्यात ’ या कलचुरि नृपतींच्या विशेषणाच्या

खऱ्या अर्थावर प्रकाश पडतो असें त्याचें म्हणणें आहे. म्हणून प्रस्तुत लेखांत त्या कथेच्या ऐतिहासिकत्वाची चर्चा करण्याचें योजिलें आहे.

पृथ्वीराजाचें नांव त्याच्या शौर्यामुळे व शहाबुद्दीन घोरीच्या आक्रमणाला कांही काळ त्याने केलेल्या यशस्वी प्रतिकारामुळे भारतीय इतिहासांत सुवर्णाक्षरांनी लिहिलें गेलें आहे. कनोजनृपति जयचंद याच्या संयोगिता नामक कन्येच्या स्वयंवरांत त्याने केलेल्या धाडसामुळे तर त्याचें नांव प्रणयकथांत गोवलें जाऊन आबालवृद्धांस परिचित झालें आहे. पृथ्वीराज व त्याचे पूर्वज हे प्रथम शाकंभरी (सांभर) व नंतर अजयमेरु (अजमेर) येथून राज्य करीत होते. त्यांच्या वर्णनांत त्रिपुरीच्या कलचुरींचा उल्लेख येण्याचें कारण पृथ्वीराज व हरिराज यांची माता कर्पूरदेवी ही कलचुरि राजकन्या होती, हें होय. प्रस्तुत काव्याच्या सहाव्या सर्गांत कलचुरि नृपति साहसिक याची कथा खालीलप्रमाणे आली आहे.

कलचुरि नृपति साहसिक याची कथा

गुजराथचा राजा सिद्धराज जयसिंह याच्या दरबारच्या एका ज्योतिष्याने एके दिवशीं राजाला म्हटलें की 'महाराज, आपला दौहित्र सोमेश्वर याचा मुलगा हा भगवान् रामचंद्राचा अवतार होईल.' हें ऐकतांच जयसिंहाने सोमेश्वराला आपल्या राजधानीस आणविलें.

उत्पत्स्यते कञ्चन कार्यशेषं
निर्मातुकामस्तनयोऽस्य रामः ।
सांवत्सरैरित्युदितानुभावं
मातामहस्तं स्वपुरं निनाय ॥

पुढे एके दिवशीं तो ज्योतिषी म्हणाला, 'महाराज, कौसल्या या पृथ्वीवर अवतार घेणार असून तिला सोमेश्वरापासून राम व लक्ष्मण यांचे अवतार असे दोन पुत्र होणार आहेत.' राजाला ज्योतिष्याचें म्हणणें खरें वाटेना. म्हणून कौसल्या ज्या त्रिपुरीच्या कलचुरि राजवंशांत जन्म घेणार होती त्याचा मूळ पुरुष साहसिक याची कथा सांगण्यास ज्योतिष्याने आरंभ केला.

कलचुरिवंशाच्या वर्णनास सहाव्या सर्गांतील ७० व्या श्लोकापासून सुरवात होते. त्रिपुरीचे कलचुरि आपणांस सोमवंशी म्हणवत. म्हणून आरंभींच्या ७० ते ९१ या श्लोकांत त्यांच्या चंद्र, बुध, पुरूरवस्, भरत व कार्तवीर्य या पुराणप्रसिद्ध पूर्वजांचें वर्णन आलें आहे. कार्तवीर्य सहस्रार्जुन याला कलचुरि असें नांव प्राप्त झालें होतें; कारण कलि ज्याचें अपहरण करण्यास टपलेला होता त्या कृतयुगाला त्या राजाने रक्षण दिलें होतें, असें कवीने म्हटलें आहे.

कलिर्जजागार चुरिक्रियायां
कृतस्य दत्ताभय एष राजा।
तेनास्य पृथिवीवलयप्रसिद्धि-
प्राचुर्यसूहे कलिचुर्युपाख्या ॥ ६, ९३.

या कार्तवीर्याचे वंशज कालीवनामध्ये राज्य करीत होते, असें खालील श्लोकांत सांगितलें आहे.

तदीयसेवाभरणायमानं
क्रमागतं नाम समुद्वहन्तः।
आसन् प्रवृत्ते कलिधर्मकाले
कालीवने केचन भूमिपालाः ॥ ६, ९४.

त्यांमध्ये साहसिक नामक राजा आपल्या शौर्यामुळे श्रेष्ठ असा होऊन गेला (श्लो. ९५). यापुढील ९६वा श्लोक बहुतेक पूर्णपणें नष्ट झाला आहे. पण त्यावरील टीकेंतील खालील एक ओळ मात्र अवशिष्ट राहिली आहे—

[क्षीय*][1]माणवयास्स साहसिकस्तपस्विने वामदेवनाम्ने निजराजलक्ष्मीं गुरुदक्षिणाय दत्वा सर्वां भूमिं जेतुं प्रस्थितवान्।

[ज्याचें तारुण्य जात चाललें आहे असा तो साहसिक नृपति वामदेव नामक तपस्व्याला आपली राजलक्ष्मी गुरुदक्षिणा म्हणून देऊन सर्व पृथ्वी जिंकण्यासाठी निघाला.]

---

१ या व इतर ठिकाणीं अनुमानाने बसविलेलीं अक्षरें तारकांकित केलीं आहेत.

साहसिक नृपति दिग्विजय करीत चालला असतां एके दिवशीं सायंकाळीं तो त्रिपुरी नामक नगरीस येऊन पोचला.

विधास्यतस्साहसमानुचर्या–
च्छायामपि च्छेतुमिवास्य रात्रौ ।
विरोचने चुम्बति पश्चिमायां (? शां)
पपात जातु त्रिपुरी पुरस्तात् ॥ ६, १००.

तितक्यांत वादळ होऊन भयंकर घनगर्जना होऊं लागल्या. त्यांतच राजाला एक किंकाळी ऐकूं आली. तिच्या अनुरोधाने जात असतां त्रिपुरी नगरीच्या खंदकांतील श्मशानांत राजा जाऊन पोचला, तोंच त्याला महाकालासमोर मारल्या जाणाऱ्या एका नरबलीचे खालील करुण शब्द ऐकूं आले—

यः कोऽपि वा साहसिकोऽस्ति लोके
यस्यास्ति वा क्षत्रियतावदाता ।
कृपाकृपाणाभरणोऽस्ति यो वा
स पातु मां मृत्युभयादमुष्मात् ॥६, ११०.

[जो कोणी या जगांत साहसिक असेल, ज्याच्या अंगीं विशुद्ध क्षत्रियत्व वसत असेल, ज्याची दया व कृपाण (तरवार) हीं भूषणें असतील, तो माझें मृत्युभयापासून संरक्षण करो !]

तें आर्त क्रंदित ऐकल्याबरोबर साहसिक नृपति एकदम पुढे झाला आणि त्या नरबलीला ठार मारणाऱ्या मारेकऱ्यास उद्देशून म्हणाला—

[अरे वराकाः करुणा*]प्रलापं
भाग्यैर्दृशोर्गोचरमागतं मे ।
विमुञ्चतैनं द्रुतमन्यथा व–
स्तदा ⏑ – – ⏑ ⏑ – ⏑ दस्मिन् ॥७, ११२.

[हे क्षुद्र पुरुषांनो ! माझ्या सुदैवाने प्राप्त झालेल्या या करुणाक्रंदन करणाऱ्या पुरुषाला लागलीच मुक्त करा. नाही तर मी तुम्हांसच येथे बलि म्हणून अर्पण करीन (युष्मानुपहरामि)].

ओझांच्या आवृत्तींत या ११२ व्या श्लोकानंतरचा सहाव्या सर्गाचा भाग दिला नाही. 'अत ऊर्ध्वं त्रिचतुराणि पत्राणि गलितानीति भाति' असे नक्कल करणाऱ्याचे शब्द तळटीपेंत दिले आहेत. बेलवलकरांच्या आवृत्तींत यापुढेहि आणखी एकोणीस श्लोकांचे त्रुटित अंश दिले आहेत. तशीच त्यांवरची टीकाहि त्रुटित रूपांत थोडीबहुत दिली आहे. या श्लोकांच्या साहाय्याने कथानकाच्या पुढील भागाची कल्पना करतां येते.

त्रिपुरीच्या महाकाल देवळांतील नरबलि

नंतर साहसिक नृपति त्या महाकालाच्या देवळांत शिरला आणि त्याने मारेकऱ्यांना दरडावलें. त्याच्या आवाजाचे प्रतिध्वनि मेघगर्जनेच्या रूपाने उमटले. ते ऐकतांच राजाची तरवार मारेकऱ्यांच्या प्रकोष्ठांवर पडण्यापूर्वीच त्यांच्या हातांतील शस्त्रें गळून पडली.

श्रुत्वैव तं मारकसैनिकानां
भ्रंशाय कौक्षेयककर्तरीणाम् ।
विहस्तताजायत पार्थिवेन
खड्गे प्रकोष्ठेष्वनिपातितेऽपि ॥ ६, ११६.

साहसिकाने नंतर त्या नरबलीला अभय वचन दिलें. तें पाहून त्या मारेकऱ्यांचा म्होरक्या यातुधान (राक्षस) राजाला म्हणाला, 'भगवान् महाकालाला नरबलि देऊन त्या यज्ञांतील अवशिष्ट भागाचें नित्य सेवन करणाऱ्या आम्हांस अडविणारा तूं कोण ?'[२] राजाने त्यावर उत्तर दिलें, 'जरी तुम्हांला आपलें नित्यकर्म टाकणें कठीण जात असलें तरी मी तुमच्या घरीं आलों आहें. तेव्हा आतिथ्यधर्मास्तव तरी तुम्ही याला मारूं नये.' पण त्या यातुधानाला मुळीच दया आली नाही. त्याने आपल्या अनुचराच्या हातांतून तरवार हिसकावून घेऊन राजावरच हल्ला केला. पण राजाने एकाच वाराने त्याला महाकालासमोर बलि दिलें. (एकप्रहारेण राजा तमेवेश्वरोपहारमकरोत् । टीका.) तेव्हा एक देवता तेथे प्रगट होऊन राजाला

---

२. यः श्रीमहाकालनरोपहार-
यज्ञावशिष्टाशननित्यनिष्ठात् । श्लो. ११८

म्हणाली—'या पृथ्वीला राक्षसरहित करून प्रजेचें रक्षण करावें या हेतूने मी स्वतःच निःस्पृह अशा वामदेवाला आपलें राज्य गुरुदक्षिणा म्हणून मागण्यास प्रवृत्त केलें (वामदेवमहं प्रजारक्षार्थेऽचोदयम्। टीका). पूर्वी भगवान् शंकरांनी मंदरादिकांच्या साहाय्याने असुरांचीं तीन पुरें जिंकलीं. तूं मात्र एकट्याने ही त्रिपुरी जिंकली आहेस. (त्रिलोचनोऽपि त्रिपुरीं जिगाय, त्वया[सहायेन*] पुरी जितेयम्। श्लो. ११९). नंतर ती म्हणते—

एतामधिष्ठाय करिष्यतस्ते
[ससा*]गरां हस्तगतां धरित्रीम्।
अहं कृपाणे कृतसंनिधाना
कीर्तिश्रियोर्मध्यगता [भवेयम्*]॥ ६, १२९.

[या त्रिपुरी नगरींत आपली राजधानी स्थापून समुद्रापर्यंत पृथ्वीवर आपलें राज्य वाढविण्याचा प्रयत्न करणाऱ्या तुझ्या खड्गावर कीर्ति आणि लक्ष्मी यांबरोबर मी (विजयश्रीहि) राहीन.]

यानंतरचा श्लोक फारच नष्ट झाला आहे. तरी त्यांत 'कर्पूरदेवी'चें नांव आलें होतें हें स्पष्ट दिसतें. यानंतर सुमारें पंधरा श्लोक व त्यांवरची टीका नष्ट झाली आहे, असें बेलवलकर एका तळटीपेंत सांगतात. या श्लोकांत कर्पूरदेवीच्या पूर्वजांचें व नंतर त्या वंशांत झालेल्या तिच्या जन्माचें वर्णन आलें असावें.

कथेच्या ऐतिहासिक महत्त्वाची चर्चा

वरील कथेंत कलचुरि नृपति साहसिक याने वामदेव नामक तपस्व्याला आपलें राज्य गुरुदक्षिणा म्हणून दिलें असें वर्णन आलें आहे. कलचुरि नृपति कर्ण (सन १०४१ ते १०७३) व त्याचे वंशज यशःकर्ण, नरसिंह, जयसिंह आणि विजयसिंह यांच्या ताम्रपटांत आणि क्वचित् शिलालेखांतहि तत्कालीन राज्यकर्त्यांला 'परमभट्टारकमहाराजाधिराजपरमेश्वरश्रीवामदेवपादानुध्यात' असें विशेषण लावलेलें आढळतें. 'पादानुध्यात' (पायांचें चिन्तन करणारा) हें विशेषण पितापुत्रांचें किंवा भावाभावांचें नातें सांगण्याकरिता मुलाच्या किंवा लहान भावाच्या नांवामागे लावण्याची

पद्धत प्राचीन ताम्रपटांत आढळते, पण 'वामदेवपादानुध्यात' हें विशेषण पांच कल्चुरिनृपतींच्या बाबतींत योजिलें असल्यामुळे त्याचें स्पष्टीकरण वरीलप्रमाणे होऊं शकत नाही. कारण वामदेव हा या सर्व नृपतींचा पूर्वाधिकारी असणें शक्य नाही. या कारणास्तव संशोधकांनी या विशेषणाचे भिन्न भिन्न अर्थ सुचविले आहेत. 'वामदेव म्हणजे शिव. कल्चुरि नृपति शिवोपासक होते. तेव्हा त्यांचें वामदेवपादानुध्यात हें विशेषण सार्थ आहे' अशी एक उपपत्ति आहे. पण ती मान्य करतां येत नाही; कारण कांही कोरीव लेखांत 'परमभट्टारक' इत्यादि सम्राट्पदव्यांप्रमाणे वामदेवाला 'परममाहेश्वर' (भगवान् शंकराचा एकनिष्ठ उपासक) हें विशेषण लावलेलें आढळतें. तेव्हा वामदेव व शंकर एक असणें शक्य नाही. अलीकडे डॉ. दिनेशचंद्र सरकार यांनी 'वामदेव हें एका शैव मुनीचें नांव होतें,' अशी उपपत्ति सुचविली आहे. या उपपत्तीला आधार म्हणून त्यांनी 'पृथ्वीराजविजयां'तील उपरिनिर्दिष्ट साहसिकाच्या गोष्टीचा उल्लेख केला आहे. "कल्चुरि नृपति साहसिक हा सुमारें सन १०१५ ते १०४१ या अवधींत राज्य केलेला गांगेयदेव होय. या गांगेयदेवाने विक्रमादित्य ही पदवी धारण केली होती असें त्याचा नातु यशःकर्ण याच्या ताम्रपटांवरून समजतें.[३] विक्रमादित्याचें 'साहसांक' हें एक बिरुद होतें. 'साहसिक' व 'साहसांक' एकच. तेव्हा गांगेयदेव हाच वरील कथेंतील साहसिक होय. त्याने आपलें सर्व राज्य वामदेव नामक शैव मुनीला गुरुदक्षिणा म्हणून दिलें होतें. रामदासांनी शिवाजीला त्याचें राज्य परत केलें तसें वामदेवाने गांगेयदेवाच्या कडून गुरुदक्षिणा म्हणून मिळालेलें राज्य त्याला परत केलें असें दिसतें. म्हणून गांगेयदेव व त्याचे कर्ण, यशःकर्ण इत्यादि वंशज यांनी स्वतःस त्याचे प्रतिनिधि किंवा दिवाण समजून राज्य केलें व हें दर्शविण्याकरिता आपल्या कोरीव लेखांत वामदेवाच्या नांवामागे परमभट्टारक, महाराजाधिराज व परमेश्वर या सम्राट्पदवीनिदर्शक पदव्या लावून स्वतःचें 'त्याच्या पायांचें चिंतन करणारा' असें वर्णन केलें आहे."

---

३. वा. वि. मिराशी—कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, पु. ४ (कल्चुरि-चेदि-संवताचे लेख), क्र. ५६ व ५७ पाहा.

अशी उपपत्ति डॉ. सरकार यांनी 'वामदेवपादानुध्यात' या विशेषणाची लावली आहे.[४]

साहसिकाची कथा केवळ काल्पनिक

'पृथ्वीराजविजयां'तील मागे दिलेल्या 'साहसिका'च्या कथेचें जरा चिकित्सक दृष्टीने निरीक्षण केल्यास या उपपत्तींत कांही तथ्य नाही हें दिसून येईल. ही कथा निव्वळ काल्पनिक दिसते. ती जयानक कवीला भवभूतीच्या 'मालतीमाधव' नाटकावरून सुचलेली असावी. 'मालतीमाधवां'त माधव एका श्मशानांत कापालिक अघोरघंटाने कराला देवींपुढे बळी देण्याकरिता आणलेल्या मालतीला त्याचा वध करून सोडवितो, तसाच प्रकार साहसिकाच्या गोष्टींत आढळतो. अशा काल्पनिक गोष्टीचा उपयोग ऐतिहासिक लेखांतील कोडीं सोडविण्याकरिता करणें योग्य होणार नाही.

'वामदेवपादानुध्यात' या विशेषणाची उपपत्ति

साहसिकाच्या कथेंत कांही ऐतिहासिक तथ्य आहे असें मानलें तरी त्यायोगें कर्णादिकांच्या 'वामदेवपादानुध्यात' या विशेषणाची उपपत्ति लागत नाही. साहसिकाच्या कथेंतील घटना त्रिपुरी येथील कलचुरिराज्यस्थापनेपूर्वी झाल्या, असें कवीने वर्णिलें आहे. साहसिक व त्याचे पूर्वज कालीवन येथे राज्य करीत होते असें तो सांगतो. हें कालीवन कोठे होतें याचा निर्देश 'पृथ्वीराजविजयां'त नाही. कलचुरि आरंभीं कालञ्जर येथून राज्य करीत होते असें कांही कोरीव लेखांवरून दिसतें. ही परंपरागत समजूत कवीला माहीत असावी आणि 'कालीवन' शब्दाने त्याला कालञ्जर हेंच विवक्षित असावें असें वाटतें. मत्स्य पुराणांत 'कालञ्जर येथे कालीदेवीचें वास्तव्य असतें' असें वर्णिलें आहे. त्यावरूनहि वरील समीकरण सयुक्तिक दिसेल. तें कसेंहि असलें तरी साहसिकाची कथा कलचुरि नृपति गांगेयदेवाच्या कालासंबंधी असणें शक्य दिसत नाही. त्या कथेंत साहसिकाने त्रिपुरी येथे राज्य कसें स्थापलें हें वर्णिलें आहे. पण गांगेयदेवाच्या कालापूर्वी कलचुरींच्या निदान आठ पिढ्या त्रिपुरीस राज्य करीत होत्या असें

४. एपिग्राफिया इंडिका, पु. ३०, पृ. ४६ इ.

कोरीव लेखांवरून सिद्ध झालें आहे. तेव्हा साहसिक हा गांगेयदेव असणें शक्य नाही.

साहसिकानें आपलें राज्य वामदेवाला गुरुदक्षिणा म्हणून देणें आणि नंतर त्याने त्रिपुरी येथे राज्य स्थापणें या घटनांचा इतका घनिष्ठ संबंध आहे की पहिली घटना तेवढी खरी आणि दुसरी मात्र काल्पनिक, असें डॉ. सरकार यांना म्हणतां येणार नाही. तसें केल्यास 'अर्धजरतीयन्याया'चा दोष पदरीं येईल. गांगेयाच्या गुरुदक्षिणेची कथा सत्य असती तर ती त्याच्या कोरीव लेखांत किंवा त्याच्या वंशजांच्या लेखांतील तद्वर्णनपर श्लोकांत कोठे तरी उल्लेखिली गेली असती. पण कोठेहि तिचा स्पष्टास्पष्ट उल्लेख नाही.

साहसिक नृपतीच्या कथेची उपपत्ति

मग 'पृथ्वीराजविजयां'तील साहसिकाच्या कथेची उपपत्ति कशी लावावयाची ? जयानक कवीनें कल्चुरि नृपति स्वतःचें 'वामदेवपादानुध्यात' असें वर्णन करतात, असें ऐकलें असावें. त्यावरून वामदेव हा कालंजर येथून त्रिपुरी येथे राजधानी हलविणाऱ्या कल्चुरि नृपतीचा गुरु होता व राजधानी हलविण्याचें कारण त्या राजाने कालञ्जरचें राज्य वामदेवाला गुरुदक्षिणा म्हणून दिलें अशी कल्पना करून त्याने आपल्या काव्यांत साहसिकाची कथा घातलेली दिसते. तथापि त्यावरून त्रिपुरीच्या कल्चुरींनी स्वतःचें 'वामदेवपादानुध्यात' असें वर्णन कां करावें याची सयुक्तिक उपपत्ति लागत नाही. कारण त्या कथेंत वर्णिल्याप्रमाणे वामदेवाला राज्य मिळालें तें कालञ्जरचें, त्रिपुरीचें नव्हे. वास्तविक, जयानक कवीला कल्चुरींच्या इतिहासाची यथातथ्य माहिती होती असें दिसत नाही. त्याने पृथ्वीराजाची माता कर्पूरदेवी ही कल्चुरि नृपति अचल याची कन्या होती असें म्हटलें आहे.[५] टीकाकाराने एका ठिकाणीं अचल बद्दल तेजल[६] असें राजनाम दिलें

५. पृथ्वीराजविजय, सर्ग ९, श्लोक ८७.

६. पूर्वोक्त, सर्ग ७, श्लोक १६, टीका.

आहे. पण हीं दोन्ही नांवें कलचुरींच्या वंशावळींत कोठेहि दिसत नाहीत. प्रत्यक्ष आपल्या काव्यनायकाच्या मातेच्या वंशावळीविषयी जो कवि विश्वसनीय दिसत नाही त्याने वर्णिलेल्या राजवंशाच्या शेंकडो वर्षांपूर्वीच्या घटनांवर विश्वस्त कसा ठेवावयाचा ?

आतापर्यंत डॉ. सरकार यांची 'वामदेवपादानुध्यात' या विशेषणाची उपपत्ति कशी अग्राह्य आहे हें दाखविलें. आता आमचें तद्विषयक स्पष्टीकरण देतों.

'वामदेवपादानुध्यात' याचा खरा अर्थ

सुमारें वीस वर्षांपूर्वीं मध्यप्रदेशांतील सागर या गावीं असलेल्या कलचुरींच्या अत्यंत प्राचीन लेखाविषयी आम्ही 'प्रो. थामस गौरवग्रंथां'त माहिती दिली होती.[६] हा लेख परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर वामराजदेव याच्या पायांचें चिंतन करणाऱ्या श्रीशंकरगण नामक नृपतीचा आहे. लेखाच्या अक्षरवटिकेवरून तो खिस्तोत्तर आठव्या शतकाच्या मध्याचा दिसतो. त्रिपुरीच्या कलचुरींच्या उपलब्ध कोरीव लेखांत हा सर्वांत प्राचीन आहे. या लेखांत आलेलें 'वामराजदेव' हें राजनाम विशेष उल्लेखनीय आहे. कलचुरींच्या इतर कांही लेखांवरून कालंजर येथे राज्य करणाऱ्या एका राजाने आपल्या धाकट्या भावास शरयूपार प्रदेशाचें राज्य दिलें व आपण त्रिपुरी येथे राज्य स्थापलें असें दिसतें.[७] या राजाचें नांव त्या लेखांत आलें नाही, तथापि तें वामराजदेव होतें असें मानण्यास हरकत नाही. त्रिपुरीच्या राज्याची उत्तरोत्तर भरभराट होत गेली. म्हणून तें राज्य स्थापणाऱ्या वामराजदेवाविषयी त्रिपुरीच्या सर्व कलचुरि नृपतींना

---

६. हा लेख आता आमच्या 'इन्स्क्रिप्शन्स् ऑफ दि कलचुरि–चेदि ईरा', पृ. १७५ आणि 'कलचुरि नृपति आणि त्यांचा काल', पृ. १३० वर प्रसिद्ध झाला आहे.

७. 'कलचुरि नृपति आणि त्यांचा काल', पृ. ९–११ पाहा.

पराकाष्ठेचा आदर वाटत असल्यास आश्चर्य नाही. हा आदर त्यांनी स्वतःचें 'वामराजदेवपादानुध्यात' असें वर्णन करून दर्शविला होता, असें दिसतें. कालान्तराने 'वामराजदेव' याचें 'वामदेव' असें संक्षिप्त रूप प्रचलित झालें. तेंच उत्तरकालीन कलचुरींच्या लेखांत आढळतें.

वरील उपपत्ति मान्य केली तरी 'वामदेवपादानुध्यात' हें राजनामाचें विशेषण खिस्तोत्तर अकराव्या शतकाच्या मध्यापासूनच्या लेखांतच कां आढळावें, तत्पूर्वीच्या लेखांत कां सापडूं नये, अशी शंका कोणास येईल. पण तिचें निराकरण करणें कठीण नाही. 'वामदेवपादानुध्यात' हें राजनामाचें विशेषण बहुधा दानपत्रांत आढळतें. शिलालेखांत तें क्वचितच दिसतें. त्रिपुरीच्या कलचुरींचे प्राचीन काळचे ताम्रपट आपणांस अद्यापि मिळाले नाहीत. त्यांचा पहिला ताम्रपट इ० स० १०४२ चा कर्ण नृपतीचा आहे. त्यांत हें विशेषण आहे हें मागे सांगितलें आहेच, यानंतरच्या सर्व ताम्रपटांत व क्वचित् शिलालेखांत तें आढळतें. यावरून कलचुरि नृपतींनी वामराजदेवाचें स्मरण अखेरपर्यंत ठेवलें होतें यांत संशय नाही.

प्राचीन भारतीय कोरीव लेख

१०. सेंद्रक नृपति जयशक्ति याचा मुंदखेडे ताम्रपट*

उपलब्धि—हा ताम्रपट पुष्कळ वर्षांपूर्वी पूर्व खानदेश जिल्ह्याच्या चाळिसगाव तालुक्यांतील मुंदखेडे नामक गावीं एका पाटलाच्या घरीं सापडला. तो पूर्वी कै. गो. कृ. चांदोरकर यांनी प्रथम धुळयाच्या 'प्रभात' मासिकांत (पु. १, अंक १२, फाल्गुन, शके १८२८)[१] व नंतर भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३४ च्या वार्षिक वृत्तांतांत (पृ. १६१-१७७) असा दोनदा प्रसिद्ध केला आहे. या दोन्ही ठिकाणीं लेखाबरोबर ताम्रपटाच्या पत्र्यांचे छाप प्रसिद्ध झाले नसल्याने कै. चांदोरकरांचें वाचन पडताळून पाहण्यास साधन नव्हतें. कांही वर्षांपूर्वी सेन्द्रकांच्या बगुम्रा येथे सापडलेल्या ताम्रपटाचा अभ्यास करीत असतां या मुंदखेडे ताम्रपटाकडे माझें लक्ष गेलें व तो मिळविण्याचा मी पुष्कळ प्रयत्न केला. पण त्यांत यश आलें नाही. तेव्हा चांदोरकरांचें वाचन शुद्ध असावें असें गृहीत धरून त्यांतील गावांचा मी शोध केला व त्यावर भारत इतिहास संशोधक मंडळाच्या वार्षिक संमेलनांत एक टिप्पण वाचलें. तें पुढे त्या मंडळाच्या त्रैमासिकांत (पु. १७, पृ. ५२) प्रसिद्ध झालें आहे. अलीकडे डॉ. मो. गं. दीक्षित यांनी या ताम्रपटाच्या छापांची लहानशी फोटो झिंको प्रत मजकडे पाठविली. ताम्रपटाचे छाप प्रसिद्ध झाले

---

* हा निबंध भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ४० व्या संमेलन-प्रसंगीं (३१ मे १९५३ रोजीं) वाचला होता.

१. या अंकाच्या मुखपृष्ठावर फाल्गुन १८२९ आहे पण तें बरोबर नाही.

नव्हते अशी इतरांप्रमाणे माझीहि समजून असल्यामुळे त्यांची फोटो झिंको प्रत पाहतांच मला सानंदाश्चर्य वाटलें. त्या प्रतीवरील छापील निर्देशावरून ती प्रभात मासिकांत चैत्र, शके १८२९ च्या अंकांत--म्हणजे चांदोरकरांनी ताम्रपट प्रसिद्ध केल्यानंतर पुढील महिन्याच्या अंकांत--प्रसिद्ध झाली होती, असें दिसतें. प्रभात मासिकाचे अंक आता अत्यंत दुर्मिळ झाले आहेत. सेन्द्रक जयशक्तीचा हा एकच ताम्रपट उपलब्ध आहे. छापावरून पाहतां चांदोरकरांच्या वाचनांत कांही महत्त्वाच्या ठिकाणीं चुका झालेल्या दिसतात. शिवाय गेल्या कांही वर्षांत सेंद्रकांचे आणखी दोन ताम्रपट सापडले असून ते श्री. ग. ह. खरे यांनी प्रकाशित केले आहेत. तेव्हा त्या सर्वांचा साकल्याने विचार करणें अवश्य झालें आहे. म्हणून प्रस्तुत ताम्रपट मी पुनः प्रसिद्ध करीत आहें.[२]

वर्णन—या ताम्रपटाचे दोन पत्रे असून ते आंतील बाजूस कोरले आहेत. त्यांचा आकार व वजन हीं चांदोरकरांनी नमूद करून ठेवलीं नसल्यामुळे आता समजण्यास मार्ग नाही. दोन्ही पत्र्यांत कडीकरिता छिद्र होतें. त्या कडीवर 'श्रीजयशक्ति' अशीं उठावदार अक्षरें असलेली मुद्रा होती अस चांदोरकर सांगतात, पण त्या मुद्रेचा छाप त्यांनी प्रसिद्ध केला नसावा, असें वाटतें.

या लेखाच्या चोवीस ओळी असून प्रत्येक पत्र्यावर बारा ओळी कोरल्या आहेत. हा लेख चांगल्या स्थितींत होता असें दिसतें. तथापि तो किंचित् निष्काळजीपणानें लिहिला किंवा कोरला असल्यामुळे कांही चुका झालेल्या दिसतात.

अक्षरवटिका—या लेखाची लिपी सेंद्रकांच्या इतर लेखांतल्याप्रमाणे दक्षिणी वळणाची आहे. विशेष लक्षांत ठेवण्यासारखीं अक्षरें म्हणजे (१) 'एष' (ओळ १४) मधील 'ए' हा 'ल' सारखा आहे; पण त्याचा उजवा भाग डावीकडे वळलेला नाही. चांदोरकरांनी येथे 'ए' बद्दल 'ल' वाचला होता.

---

२. या ताम्रपटाचे छाप मी एपिग्राफिया इंडिका, पु. २९ मध्ये प्रसिद्ध केले आहेत.

(२) 'न' या अक्षराला सामान्यतः गांठ आहे, पण 'सूनो–' (ओ.१६) येथे ती दिसत नाही. (३) ओळ १० मधील जिह्वामूलीयहि उल्लेखनीय आहे.

भाषा—भाषा संस्कृत असून शेवटच्या चार श्लोकांखेरीज सर्व भाग गद्यांत आहे. पूर्वी दिलेल्या बगुम्रा, नागद व कासारें ताम्रपटांतून कांही विशेषणें या ताम्रपटाच्या राजप्रशस्तींत घेतलेलीं दिसतात. उदाहरणार्थ, सेन्द्रकराजवंश, भानुशक्ति, आदित्यशक्ति यांचीं वर्णनें पहा. **लेखनपद्धतींत** न् बद्दल ण्, र् च्या पुढील आणि र् व य् यांच्या मागील अक्षरांचें द्वित्व हे विशेष उल्लेखनीय आहेत.

विषय—हा ताम्रपट सेन्द्रकवंशी जयशक्ति याने जयपुरद्वारी या ठिकाणीं दिला होता. चांदोरकरांनी 'जयपुरद्धारितो' (ओ. १) असें वाचून 'जयपुरच्या द्वारापासून' किंवा 'जयपुरचा उद्धार करणाऱ्याने' असे दोन अर्थ सुचविले आहेत, पण 'जयपुरद्वारीतो' हेंच वाचन बरोबर आहे. 'जयपुरद्वारी' हें स्थलनाम नागद ताम्रपटांतल्या 'नान्दीपुरद्वारी' या नांवासारखें आहे. या ताम्रपटाने दान दिलेल्या गावाचें नांव चांदोरकरांनी 'सेणाणकलषग्रामः' असें वाचलें होतें, पण त्या ठिकाणीं 'सेणाणा एष ग्रामः' असें वाचलें पाहिजे.[३] तेव्हा सेणाणा नामक गाव दान दिला होता असें दिसतें. हा गाव 'कुन्दलिकामल' नामक विषयांत किंवा जिल्ह्यांत होता. ज्याला दान दिलें तो बप्पस्वामी नामक ब्राह्मण कल्लिवनचा रहिवासी असून तैत्तिरीय हिरण्यकेशी शाखेचा व काश्यपगोत्री होता. त्याच्या पित्याचें नांव रेवस्वामी असें होतें. हें दान एका अनिर्दिष्ट संवताच्या ६०२ या वर्षीं फाल्गुन कृष्ण दशमीस सूर्याच्या मीनराशिसंक्रमणाच्या वेळीं दिलें होतें. प्रस्तुत ताम्रपटांत संवताचा स्पष्ट निर्देश नसला तरी तो शकसंवतच मानला पाहिजे. कारण जयशक्तीचा पिता अल्लशक्ति याचा ताम्रपट शक

३. या सारखा शब्दप्रयोग इतर ताम्रपटांतहि आढळतो. उदाहरणार्थ, कलचुरि बुद्धराजाच्या वडनेर ताम्रपटांतील 'कोणियाणां एष ग्रामः' व सरसवणी ताम्रपटांतील 'कुमारीवडओ एष ग्रामः' हे शब्दप्रयोग पाहा.

संवताच्या ५७७ व्या वर्षीं दिला होता. त्याच्या व प्रस्तुत ताम्रपटाच्या वर्षांतील अंतर २५ वर्षांचें आहे. तें एका पिढीस योग्य असेंच आहे. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटांतील वर्ष शकसंवताचेंच असलें पाहिजे हें उघड आहे. शके ६०२ म्हणजे इ. स. ६८०–८१. या वर्षीं सूर्याचें मीनराशिसंक्रमण १७ फेब्रुवारी इ. स. ६८१ या दिवशीं मध्यमसूर्योदयापासून २० तास ४० मिनिटांनी झालें. संक्रान्तिनिमित्त दानधर्म दुसऱ्या दिवशीं सूर्योदयानंतर केला असावा. त्या दिवशींची तिथि ताम्रपटांत सांगितल्याप्रमाणे फाल्गुन वद्य दशमी होती. तो फाल्गुन महिना अमान्त होता. या ताम्रपटावरून त्या काळींहि महाराष्ट्रांत सध्याप्रमाणे अमान्त पद्धति प्रचलित होती असें दिसतें. हा ताम्रपट सान्धिविग्रहिक (परराष्ट्रमन्त्री) राम याने लिहिला असें शेवटीं सांगितलें आहे.

चर्चा—प्रस्तुत ताम्रपटांत खालील वंशावळ दिली आहे—

भानुशक्ति (श्रीवल्लभ)
|
आदित्यशक्ति
|
निकुम्भाल्लशक्ति (सत्याश्रय, पृथिवीवल्लभ)
|
जयशक्ति (सत्याश्रय, पृथिवीवल्लभ, विक्रमादित्य, निकुम्भ)

या वंशावळींतील तिसरें राजनाम चांदोरकरांनीं निकुम्भल्लशक्ति वाचलें होतें. पण नवव्या ओळींत तें नांव निकुम्भाल्लशक्ति असें स्पष्ट दिसतें. बुल्हरने प्रकाशित केलेल्या बगुम्रा ताम्रपटांत हें नांव लेखकाच्या प्रमादामुळे निकुम्भल्लशक्ति असें आलें आहे,[४] पण कासारें ताम्रपटावरून त्या सेन्द्रक राजाचें खरें नांव अल्लशक्ति होतें असें दिसतें[५] व तसें तें त्या

४. इंडियन अँटिक्वरी, पु. १८, पृ. २६५ इ.; वा. वि. मिराशी–इन्स्क्रिप्शन्स् ऑफ दि कलचुरि चेदि ईरा, भाग १, पृ. १२०.

५. इ. ऑ. क. चे. ई., भाग १, पृ. ११३.

ताम्रपटाच्या मुद्रेवरहि आलें आहे. ' निकुम्भ ' हें बिरुद असून तें राजनामापूर्वी जोडलें होतें. प्रस्तुत ताम्रपटांत तें बिरुद अल्लशक्तीचा मुलगा जयशक्ति यानेहि धारण केलेलें दिसतें. नागद ताम्रपटांतहि निकुम्भाल्लशक्ति असेंच राजनाम आलें आहे[६] हें लक्षांत घेतलें पाहिजे.

' निकुम्भ ' हें बिरुद अल्लशक्ति व जयशक्ति यांनी कां धारण केलें याचीहि उपपत्ति आता लावतां येते. कासारें ताम्रपटांत अल्लशक्तीच्या पितामहाचें नांव निकुम्भ असें दिलें आहे. त्याचें दुसरें नांव आदित्यशक्ति असें होतें व तें सेंद्रकांच्या इतर तीन ताम्रपटांत आलें आहे. या सर्व ताम्रपटांत आदित्यशक्ति उर्फ निकुम्भ यापासून वंशावळ सुरू होते. तेव्हा तो या गुजराथ-महाराष्ट्रांतील सेंद्रक घराण्याचा मूळ पुरुष दिसतो. म्हणूनच त्याच्या वंशजांनी त्याचें उपनाम बिरुद म्हणून धारण केलें असावें.

चांदोरकरांनी प्रस्तुत ताम्रपटावरील आपल्या दुसऱ्या लेखांत चालुक्य व सेन्द्रक यांच्या परस्पर संबंधाविषयी बराच ऊहापोह केला आहे. त्यांचें म्हणणें असें— " चालुक्य हे मूळचे उत्तरेंतील अयोध्येचे. ते तेथून निघाले ते दक्षिणेंत राष्ट्रकूटांचा पराभव करून स्वतंत्र किंवा मांडलिक म्हणून राहिले. प्रस्तुत ताम्रपटांत भानुशक्तीचें 'प्रणताशेषसामन्तशिरोमकुटनिघृष्टपादपंकजः' असें वर्णन केलें आहे त्यावरून तो सम्राट् होता असें दिसतें. त्याने चालुक्य पहिला पुलकेशिन् यास साहाय्य देऊन कर्णाटकांत पाठविलें. तेथे त्याने पल्लवांशीं युद्ध करून वातापि (बदामी) येथे राज्य स्थापलें. पुलकेशिबरोबर सेन्द्रकहि कर्णाटकांत गेलेले असावे." येथे चांदोरकरांच्या मताचें सविस्तर परीक्षण करणें शक्य नाही. थोडक्यांत असें सांगतां येईल की ऐतिहासिक घटना ते म्हणतात त्याच्या उलट घडल्या असाव्या. चालुक्य उत्तरेंतून दक्षिणेंत आले याला निश्चित पुरावा नाही. तसें विधान इ. स. च्या दहाव्या शतकांतील गुजराथ चालुक्यांच्या कांही ताम्रपटांत केलें आहे खरें, पण तें नंतरच्या काळांतलें—ज्या काळीं प्रत्येक

६. न्यू इंडियन् अँटिक्वरी, पु. १, पृ. ७४७ इ. पाहा.

राजवंश आपण उत्तरेंतून आलों असें सांगण्यांत भूषण मानूं लागला त्या काळचें—आहे. सेन्द्रक हे कधीहि सम्राट् नव्हते. ते प्रथम कदंबांचे व नंतर चालुक्यांचे मांडलिक होते. प्रस्तुत ताम्रपटांत अल्लशक्तीचें 'समधिगतपञ्चमहाशब्दः' असें वर्णन केलें आहे त्यावरूनहि हीच गोष्ट सिद्ध होते. असें वर्णन सामान्यतः मांडलिक राजांच्याचविषयी आढळतें. राजप्रशस्तींतील इतर वर्णन अतिशयोक्तिपूर्ण आहे. द्वितीय पुलकेशीने कलचुरि राजांकडून महाराष्ट्र व लाट देश जिंकले त्या वेळीं त्याने गुजराथ व खानदेश या प्रांतांवर आपल्या विश्वासू सेन्द्रक सरदारांची नेमणूक केली. अल्लशक्तीचा आजा भानुशक्ति हा द्वितीय पुलकेशीचा समकालीन दिसतो. तो गुजराथ–खानदेशच्या सेन्द्रक घराण्याचा मूळ पुरुष असावा. त्याचे व त्याचा मुलगा आदित्यक्ति याचे कोरीव लेख गुजराथ–खानदेशांत अद्यापि सापडले नाहीत, पण आदित्यशक्तीचा मुलगा अल्लशक्ति याचे तीन ताम्रपट सापडले आहेत. त्यांपैकी दोन खानदेशांतले व एक गुजराथेंतील आहे. यांतील पहिला ताम्रपट कासारें येथील असून तो कलचुरि संवत् ४०४ (इ. स. ६५३) चा आहे.[७] त्यांत पिप्पलिखेट–पश्चिम खानदेशांतील पिंपळनेर–हें गाव दान दिल्याचा निर्देश आहे. त्यानंतरचा बगुम्रा ताम्रपटहि कलचुरि संवताचाच आहे. त्यांत कलचुरि संवत ४०६ (इ. स. ६५६) या वर्षीं दक्षिण गुजराथेंतील बलिस (सध्याचें वनेसा) गाव दिल्याचा उल्लेख आहे. तिसरा ताम्रपट खानदेशांत नागद येथे सापडला होता. तो शक संवत् ५७७ (इ. स. ६५५–५६) या वर्षाचा असून त्याने नान्दीपुरद्वारी (सध्याचें नंदुरबार) या विषयांतील गाव दिलें आहे. या तीन ताम्रपटावरून अल्लशक्ति गुजराथ–खानदेश या भागावर निदान इ. स. ६५६ पर्यंत राज्य करीत होता यांत संशय नाही.

यानंतर लौकरच सेन्द्रकांना गुजराथ सोडावें लागलें असें दिसतें. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या मानोर ताम्रपटावरून[८] असें दिसतें की इ० स०

---

७. कलचुरि संवताच्या वर्षांत २४९–२५० मिळविले म्हणजे खिस्ती संवताचें वर्ष येतें.

८. ए. इं., पु २८, पृ. १७ इ.

६७१ मध्ये चालुक्य सम्राट् प्रथम विक्रमादित्य याने आपला चुलता धरा-श्रय-जयसिंह यास गुजराथ-कोकण-नाशिक या प्रदेशाचा अधिपति नेमलें. जयसिंहाचा मुलगा युवराज श्र्याश्रय शीलादित्य याचा सुरत येथे सापडलेला ताम्रपट याच वर्षांचा म्हणजे इ. स. ६७१ चा आहे.[9] त्यांत दक्षिण गुजराथेंतील आसट्टिग्राम दान दिल्याचा उल्लेख आहे. त्यावरूनहि सेन्द्रकांचें गुजराथेंतून उच्चाटन झालेलें दिसतें.

त्यानंतर सेंद्रकांचा अंमल खानदेशापुरता मर्यादित झालेला दिसतो.[10] अल्लशक्तीचा मुलगा जयशक्ति याने दिलेल्या प्रस्तुत ताम्रपटांतील गावें पुढे दाखविल्याप्रमाणे खानदेशच्या पश्चिम सीमेजवळ आढळतात.

सेंद्रकांच्या ताम्रपटांत भानुशक्ति, अल्लशक्ति व जयशक्ति यांच्या नांवामागे लावलेलीं बिरुदें बदामीच्या चालुक्य सम्राटांच्या बिरुदासारखीं आहेत. ज्या वर्षीं (म्हणजे इ. स. ६८१ मध्ये) जयशक्तीने प्रस्तुत ताम्रपट दिला त्याच्या पूर्वीच्याच वर्षीं चालुक्य सम्राट् प्रथम विक्रमादित्य निधन पावला होता. तेव्हा सेन्द्रकांनी चालुक्यांचा पाडाव केला असावा किंवा त्यांचें स्वामित्व झुगारून दिलें असावें असें चांदोरकरांनी सूचित केलें आहे. पण तसा कांही प्रकार दिसत नाही. सम्राटांची बिरुदें मांडलिक राजेहि धारण करीत असें इतर ताम्रपटांवरून दिसतें. अलीकडे सापडलेल्या मानोर ताम्रपटांत धराश्रय-जयसिंह याचा मुलगा मंगलरस याने विनयादित्य हें बिरुद धारण केलें आहे. त्याचा सम्राट् बदामीचा चालुक्यवंशी विनया-दित्य हाच होता, त्यावरूनहि ही गोष्ट स्पष्ट होईल.

जयशक्तीनंतर सेंद्रकांचे ताम्रपट सापडत नाहीत. तेव्हा पुढे त्या वंशाचें काय झालें तें समजण्यास मार्ग नाही. तथापि खानदेशमध्ये इ. स. च्या दहाव्या शतकांत राज्य करणारे सिंदराजे याच वंशाचे असावे. सेन्द्रकां-

९. इ. ऑ. क. चे. ई., भाग १, पृ. १३२ इ.

१०. नाशिक जिल्ह्याचा पश्चिम भाग धराश्रय जयसिंहाच्या अंमलाखाली होता. जयसिंहाचा नाशिक ताम्रपट पाहा. पूर्वोक्त, भाग १, पृ. १२७ इ.

प्रमाणे तेहि आपण फणीन्द्र किंवा नाग वंशाचे आहों असें आपल्या लेखांत सांगतात. तेव्हा ते सेन्द्रकांचे वंशज असण्याचा संभव आहे.

स्थलनिश्चय–प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेलीं कांही गांवें अद्यापि अस्तित्वांत आहेत. **कुन्दलिकामल** हें नाशिक जिल्ह्यांत नान्दगांवच्या पश्चिमेस १४ मैलांवर असलेलें कुन्दलगांव असावें.' '**सेणाणा**' सारखें गांव त्या भागांत दिसत नाही. कदाचित् कुन्दलगांवच्या वायव्य दिशेस दहा मैलांवरचें सौंदणें हें तें गांव असेल. **जयपुरद्वारी** हें नान्दगांवच्या उत्तरेस १० मैलांवर असलेलें जेऊर असावें **कलिवनचा** उल्लेख अनेक प्राचीन ताम्रपटांत येतो. त्याचें सध्याचें नांव कळवण असून तें नाशिक जिल्ह्याच्या कळवण तालुक्याचें मुख्य ठिकाण आहे.

ताम्रपटाचें वाचन[१]

ओळ

पहिला पत्रा

१ **सिद्धम्[२] [।*] स्वस्ति[।*] जयपुरद्वारीतो मेरुमही[ध]रशिखर[स्थि]ररुचिरसमुन्नते विकसितयशस(सि) [म]हति सेन्द्रकरा[ज्ञा](जाना)म–**

२ **न्वयेनेकचातुर्दन्तगजघटाटो[प]समरसंघट्टलब्धविजयी(यो) विजिताशेषरिपुगण: स्वविक्रम(मा)–**

३ **क्रान्तमहीमण्डल: प्रणताशेषसामन्तशिरोमकुटनिघृष्टपा[द]पंकजो नयविनयदमदयादानदाक्षिण्यश्री–**

---

१. कै. चांदोरकरांनी प्रभात (चैत्र, शके १८२९) च्या अंकांत छापलेल्या ताम्रपटाच्या छापावरून. हा छाप आता एपिग्राफिया इंडिका, पु. २९, पृ. १२० समोर छापला आहे.

२. हा शब्द चिह्नाने दर्शविला आहे.

४ संपदुपेतः शरदमलशशांकमण्डलामलयशस:(यशा:[3]) श्री-
वल्लभश्रानुशक्तिस्तस्य पुत्रस्तत्पादानुद्धचातः स्वभुण-
(ज)म-

५ णिमयूखचक्कबलप्रकाशिताशेषदिक्चक्कश्चक्कवर्तिलक्ष-
णोपेतो विपुलघनपृथुयशसः(यशः)कुसुमनिकरो-

६ पशोभितसकलवसुधातलः समुद्र इव क्षितिस्थितिराजक-
भूभृत्पालनपरः परमगा(ग)भीरो देवद्विजातिस्वजनबां-

७ धवोपभुज्यमानविभवो भवसूनुरिवाप्रतिहतशक्तिः[4] श्री-
मदादित्यशक्तिस्त[स्य] पुत्रस्तत्पादानुद्धचातो व्यपग[तस]-

८ जलजलधरव्योमतलशरदिन्दुकिरणधवलतरयशोवितानलं-
घितांभोधिपरापरः(पारावारः) सेन्द्रककुलगगनचं[द्र]-

९ मा[:*] समधिगतपञ्चमहाशब्दः सत्याश्रयपृथिवीवल्लभ-
श्रीनिकुम्भाल्लशक्तिस्तस्य पुत्रस्तत्पादानुद्धचातो
विगतघन-

१० पटलेन्दुमण्डलामलकुलतिलकXकृतयुगनरपत्यतिशयितस्स-[5]
(स)च्चरितः शरणागतार्त्तिहरः प्रसभाभिकृष्टान्य-

११ राजश्रीः समधिगतपञ्चमहाशब्दस्सत्याश्रयपृथिवीवल्लभ-
विक्कमादित्यनिकुंभश्रीजयशक्तिः

---

३. हें सामासिक विशेषण बगुम्रा ताम्रपटांत आदित्यशक्तीच्या, आणि कासारें ताम्रपटांत अल्लशक्तीच्या, वर्णनांत येतें.

४. हें विशेषण बगुम्रा व नागद ताम्रपटांत अल्लशक्तीच्या वर्णनांत येतें.

५. चांदोरकरांनी येथे तिलकङ्कृत-असें वाचलें होतें, पण 'कृ'वर कोरलेलें चिह्न जिह्वामूलीयाचें आहे.

१२ सर्व्वानेव राजसाम[न्त]भोगिकविषयपतिराष्ट्रग्रामकूटा-
युक्तकमहत्तराधिकारिकादी[न्*] समनुबोध-

दुसरा पत्रा

१३ यत्यस्तु वः संविदितं मया परलोकाप(पे)क्षत्वम(मं)गी-
कृत्य महत्फल(लं) चा(च) श्रु[त्वा] [ततः] कुन्दलिका-
मलविषयान्त-

१४ र्गतसेणाणा[६] एष ग्रामः सोद्रङ्गः सपरिकरः सव्वादानदि-
त्यविष्टिप्रातिभे[दि]कापरिहीणा[भ्यन्तर]सि[द्धि]-

१५ कः भूमिच्छिद्रन्यायेनाचाटभटप्रवेश्य[:] आचन्द्रार्क्कार्ण-
वक्षितिसमकालीनः पुत्रपौत्र(त्रा)न्वयक्रमोप-

१६ भोग्यः कल्लिव[न]वास्तव्यकाश्यपसगोत्रतित्तिरिक[७]हिरण्य-
केशिब्राह्मणरेवस्वामिसूनोर्ब्बप्पस्वामिने[८] बलिचरुवैश्वद(दे)-

१७ [*वा]ग्निहोत्रपञ्चमहायज्ञादिक्रिय(यो)त्सर्प्पणार्त्थं(र्थं)
मातापित्रोरात्मनश्च पुण्ययशोभिवृद्धये ब्राह्मणमह(हा)-
जनसमेताय

१८ [फा]ल्गुण(न)बहुलदशम्यां पुण्ये तिथौ[९] भगवति सवितरि
मि(मी)नराशि संक्रान्ते उदकातिसर्ग्गेण प्रतिपादितो
यतोस्मद्वंश्यैर-

---

६. चांदोरकरांनी येथे 'सेणाणकलषग्रामः' असें वाचलें आहे, पण तें बरोबर नाही. कलचुरि ताम्रपटांतील येथीलप्रमाणे ग्रामनिर्देश मागे दाखविले आहेत ते पहा.

७. '–तैत्तिरीय–' असें वाचावें.

८. '—सूनुबप्पस्वामिने—' असें वाचावें.

९. 'पुण्यतिथौ' असें वाचावें

१९ न्यैर्व्वा[गाम्नि]भूपतिभिर्न्नलवेणुकदलि(ली)सार(रं) संसार(रं) जलबुद्बुदोपमं च जीवितमवधार्य्य शिरीषकुसुम-सदृशापायं [च]

२० यौवन(नं) गिर(रि)नदीसलिलगत्वराणि चैश्वर्य्याण्याकल्यां[10]-स्मद्दायोनुमंतव्य: पालयितव्यश्चेत्युक्तञ्च भगवता वेद-व्यास(से)न

२१ व्यासेन [।*] व(ष)ष्टिवर्ष्ष(र्ष)सहस्राणि स्वर्ग्गे मोदति भूमिद: [।*] आच्छेत्ता चानुम(मं)ता च तान्येव नरके वसेत्[11] [॥१*॥] विंध्याटवीष्वतोया-

२२ सु शुष्ककोटरवासिन: [।*] कृष्णाहयो हि जायन्ते भूमिदायं हरन्ति ये ।[।२॥*] बहुभिर्व्वसुधा भुक्ता राजभि: सगरा-दिभि: [।*] यस्य य-

२३ स्य यदा भूमिस्तस्य तस्य तदा फल(लम्) [॥३॥*] पूर्व्व-दत्तां द्विजातिभ्यो यत्नाद्रक्ष युधिष्ठिर [।*] महीं महीमतां श्रेष्ठ दानाच्छ्रेयोनुपा-

२४ लन(नम्) [॥४॥*] संवत्सरशतषट्के द्व्युत्तरके फाल्गुण(न)-बहुल:[12] दशम्यां लिखित(तं) चैतत्सान्धिविग्रहिकरा[मे]ने-(णे)ति ✳[।*]

---

१०. '-ण्याकलय्या-' असें वाचावें.

११. श्लोक १-४ यांचें वृत्त अनुष्टुभ्.

१२. '-बहुल-' असें वाचावें.

११. राष्ट्रकूट नृपति दन्तिदुर्गाचा मानोर ताम्रपट*

उपलब्धि--हा ताम्रपट सुमारें पंधरा वर्षांपूर्वी ठाणा जिल्ह्याच्या पालघर तालुक्यांतील मानोर गावीं शेतांत खणत असतांना सापडला. याच्या बरोबर बदामीच्या चालुक्य सम्राटाच मांडलिक विनयादित्य मंगलरस याचाहि शके ६१३ (सन ६९१)चा आणखी एक ताम्रपट सापडला होता. तो पुरातत्त्वखात्याचे सुपरिंटेंडंट श्री. कृष्णदेव यांनी कांही वर्षांपूर्वी एपिग्राफिया इंडिका (पु. २८, पृ. १७-२२) मध्ये प्रसिद्ध केला आहे. पण हा ताम्रपट मात्र अद्यापि अप्रकाशित राहिला आहे. सुमारें दहा वर्षांपूर्वी राष्ट्रकूटांच्या दुसऱ्या एका ताम्रपटाचा अभ्यास करीत असतां यांतील माहिती पाहण्याची मला इच्छा झाली. तेव्हा माझ्या विनंतीवरून श्री. कृष्णदेव यांनी मला त्याचा एक छाप पाठविला होता. तो अद्यापि माझ्या संग्रहीं आहे. कांही दिवसांपूर्वी जुने कागद चाळीत असतां तो माझ्या दृष्टीस पडला. हा ताम्रपट सापडल्यास आज सुमारें पंधरा वर्षें झालीं असतांहि तो कोणीहि अद्यापि प्रकाशित केला नाही. त्यांतील माहिती महाराष्ट्राच्या --विशेषतः कोकणच्या--इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाची असल्याने श्री. कृष्णदेव यांच्या अनुज्ञेने तो मी येथे प्रकाशित करीत आहें.

वर्णन—या ताम्रपटाचे दोन पत्रे असून त्यांच्या आंतील बाजूंवरच प्रस्तुत लेख कोरला आहे. त्याची लिपि दक्षिणभारतीय असून, भाषा संस्कृत आहे. यांत म्हटलें आहे की शक संवत् ६७१ (इ० स० ७४९-५०) या वर्षी समधिगतपञ्चमहाशब्द (ज्याने पंच महावाद्यांचा[1] अधिकार प्राप्त करून घेतला आहे असा), पृथिवीवल्लभ व खड्गावलोक दन्तियदुर्ग (अर्थात् दन्तिदुर्ग) हा राज्य करीत असतां त्याचा अधिकारी अनिरुद्ध हा

---

* 'युगवाणी' नागपूर, मे १९५८.

१. हीं पंचमहावाद्यें अशीं—शृंग, तम्मट, शंख, भेरी आणि जयघंटा.

श्रीपुर येथे कारभार पाहत होता. त्या वर्षी श्रीपुर येथील त्रैविद्य महाजनांचे (ब्राह्मणांचे) पुढारी बोडवर्म भोगिक, दुर्ग भोगिक, देवम्म भोगिक, गोवियसंग भोगिक, गोविय (गोविंद) इत्यादि ज्यांमध्ये प्रमुख आहेत अशा महाजन सभेने भगवान् ब्रह्मदेवाच्या पादुकांच्या जवळ (पादमूले) कौंडिन्यगोत्री स्वामी धर्मभट्टाचा पुत्र बादडि भोगिक याने बांधलेल्या बादेश्वर नामक देवालयास तंबसाहिका नामक गाव दान दिला त्या प्रसंगीं हा ताम्रपट दिला होता. या दानाचा उद्देश वेळोवेळीं बादेश्वर देवळाची दुरुस्ती करण्यास लागेल तो खर्च त्यांतून भागविणें हा होता. या दानांत कोणी व्यत्यय आणूं नये, आणल्यास त्यास पंचमहापातकें लागतील असें शेवटीं म्हटलें आहे. हा ताम्रपट महाजनाने दिला असल्यामुळे राजशासनांत नेहमी आढळणारी भावी राजांना केलेली विनंती[२] यांत दिसत नाही. तसेंच यांत शेवटीं राजाची सही नसून कांही साक्षीदारांच्या नांवांचा मात्र निर्देश आहे. हाहि या ताम्रपटाचा आणखी एक विशेष आहे.

राष्ट्रकूट राजवंश—दन्तिदुर्ग हा महाराष्ट्रांतील बलाढ्य राष्ट्रकूट संस्थेचा संस्थापक म्हणून विख्यात आहे. याच्या पूर्वी याच्या वंशाच्या खाली दिल्याप्रमाणे पांच पिढ्या होऊन गेल्या होत्या.[३]

---

२. उदाहरणार्थ खालीलसारखे श्लोक—

बहुभिर्वसुधा भुक्ता राजभिः सगरादिभिः।
यस्य यस्य यदा भूमितस्य तस्य सदा फलम् ॥१॥

स्वदत्तां परदत्तां वा यो हरेत वसुन्धराम्।
गवां शतसहस्रस्य हन्तुः प्राप्नोति किल्बिषम् ॥२॥

दत्त्वा भूमिं भाविनः पार्थिवेन्द्रान् भूयो भूयो याचते रामभद्रः।
सामान्योऽयं धर्मसेतुर्नृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः ॥३॥

३. पुढील यादींतील राजांच्या कारकीर्दीचीं वर्षे अनुमानानें दिलीं आहेत. यांतील पहिल्या पांच राजांचे कोरीव लेख सापडले नाहीत.

दन्तिवर्मा (सन ६२०-६३०)

|

प्रथम इन्द्र (सन ६३०-६५०)

|

प्रथम गोविंद (६५०-६७०)

|

प्रथम कर्क (सन ६७०-६९०)

|

द्वितीय इन्द्र (सन ६९०-७१०)

|

दन्तिदुर्ग (सन ७१०-७५५)

हें राजघराणें मूळचें औरंगाबाद जिल्ह्यांतलें असून तें प्रथम माहिष्मतीच्या कलचुरींचें व नंतर बदामीच्या चालुक्यांचें मांडलिक होतें. दन्तिदुर्गानें अनेक विजय संपादन करून आपल्या घराण्याची प्रतिष्ठा वाढविली. वेरूळच्या दशावतार लेण्यांत त्याने कांची, कोसल (छत्तीसगड), कलिंग, श्रीशैल, मालव, टंक आणि लाट (मध्य व दक्षिण गुजरात) यांच्या नृपतींचा तसेंच बदामीच्या चालुक्य सम्राटाचाहि पराभव केल्याचा निर्देश आहे. पुढे या घराण्यांत ध्रुव, तृतीय गोविंद, तृतीय इन्द्र, तृतीय कृष्ण यांसारखे उत्तरोत्तर महाप्रतापी राजे उत्पन्न होऊन त्यांनी उत्तरकालीन मराठ्यांप्रमाणे भीमथडीच्या तट्टांना गंगायमुनांचें पाणी पाजलें व हिमालयापर्यंत दिग्विजय केले. या वंशांतील राजांचा धर्माला, विद्येला व स्थापत्यादि कलांना उदार आश्रय होता. वेरूळचें दशावतार लेणें दन्तिदुर्गानें व अखिल जगतांतील आश्चर्य म्हणून गणलें गेलेलें कैलास लेणें प्रथम कृष्णानें कोरविलें होतें. या लेण्यांवरून त्यांची कीर्ति चिरकाल टिकेल.

चर्चा—दन्तिदुर्गाच्या काळचे तीनच कोरीव लेख आतापर्यंत सापडले होते. त्यांपैकी एक लेण्यांतील लेख असून दुसरे दोन ताम्रपट आहेत. दशावतार लेण्यांतील पूर्वोक्त लेखांत दन्तिदुर्गाच्या अनेक विजयांचा उल्लेख आहे. ताम्रपटांपैकी एक माजी कोल्हापूर संस्थानांतील सामानगड

किल्ल्यांत सापडला होता.[४] त्याची मिती शककालसंवत्सर ६७५ (सन ७५३) अशी दिली आहे. हा ताम्रपट अक्षरवटिकेवरून तसेंच त्यांत वर्षसंख्या दर्शविण्याकरिता योजिलेल्या दशमान पद्धतीवरून बनावट गणला जातो.[५] दुसरा ताम्रपट वेरूळ येथे सापडला होता.[६] तो खरा आहे पण त्याच्या मितीविषयी मतभेद आहे. त्याचे संपादक श्री. स. का. दीक्षित यांच्या मतें त्याची मिती (शक संवत्) ६६३ (सन ७४१) अशी आहे. मी ही मिती (कलचुरि संवत्) ४६३ (सन ७१५) अशी वाचतों.[७] प्रस्तुत ताम्रपट शकसंवत् ६७१ (सन ७४९–५०) चा असून दन्तिदुर्गाच्या कारकीर्दीच्या अखेरीचा आहे यानंतर थोड्याच वर्षांनी त्याचें देहावसान झालें असावें; कारण यानंतर नऊ वर्षांनी शकसंवत् ६८० (सन ७५८–५९) मध्ये त्याचा चुलता व उत्तराधिकारी प्रथम कृष्ण याने पुणें जिल्ह्यांतील ब्रोपखल येथे सापडलेला आपला ताम्रपट दिला होता. या कृष्ण राजाचा दुसरा एक ताम्रपट विदर्भाच्या चांदा जिल्ह्यांतील भांदक गावीं सापडला आहे. तो शकसंवत् ६९४ (सन ७७२) या वर्षी दिला होता.

प्रस्तुत ताम्रपटाचें महत्त्व—हा ताम्रपट दन्तिदुर्गाच्या काळच्या अखेरीचा असला तरी त्यांत त्याच्या एकाहि विजयाचा उल्लेख नाही. याचें कारण हा ताम्रपट त्याने दिलेला नसून त्याच्या राज्यांतील श्रीपुर-नगरच्या महाजनांनी दिला आहे. प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेल्या 'समधिगतपञ्चमहाशब्द,' 'पृथिवीवल्लभ' व 'खड्गावलोक' या दन्ति-दुर्गाच्या पदव्या त्याच्या वेरूळच्या ताम्रपटांतहि आढळतात.

प्रस्तुत ताम्रपटांत राजकीय बाबींचे उल्लेख नसले तरी इतर दृष्टींनी त्याचें महत्त्व आहे. उदाहरणार्थ, त्यांतील ब्रह्मदेवाच्या देवळाचा उल्लेख

---

४. इंडियन अँटिक्वरी, पु. ११, पृ. १२.

५. यापूर्वीच्या पद्धतींत संख्या चिह्नांनी दर्शविल्या जात.

६. एपिग्राफिया इंडिका, पु. २५, पृ. २५ इ.

७. जर्नल ऑफ दि बाँबे ब्रँच ऑफ दि रॉयल एशियाटिक सोसायटी, पृ. २६, पृ. १६३ इ.

पाहा. सध्या ब्रह्मदेवाचीं देवालयें क्वचितच आढळतात. अजमेरजवळ पुष्कर क्षेत्रीं ब्रह्मदेवाचें सुप्रसिद्ध देवालय आहे. पण इतरत्र मात्र त्याच्या मूर्ति देवळाच्या सभोवारच्या भिंतीवरच दिसतात. कल्याणजवळच्या अम्बरनाथ येथील श्रीशंकराच्या देवळाच्या भिंतींवर अशा मूर्ति आहेत. तथापि एके काळीं ब्रह्मदेवाचीं देवालयें बरींच होतीं. उत्तर कोकणांत श्रीपुर येथे तसें एक देवालय होतें व त्यांत ब्रह्मदेवाची पूजा मूर्तिरूपाने होत नसून पादमूलांच्या (पादुकांच्या) रूपानें होत असे, ही प्रस्तुत ताम्रपटांतील माहिती महत्त्वाची आहे. दुसरी गोष्ट ही की यांत उल्लेखिलेलें ग्रामदान कोणी राजाने किंवा राजाधिकाऱ्याने दिलें नसून श्रीपुरनगरच्या महाजनसभेने दिलें होतें. हे महाजन म्हणजे त्या नगरांतील लोकांनी निवडलेले प्रतिनिधि असून त्यांची समिति इतर कामांप्रमाणे दानधर्माचेंहि काम पाहात असे, असें दिसतें. या समितीला श्रीपुरनगरच्या आजूबाजूंच्या गावांची मालकी असावी; नाही तर, त्यांतील एक सबंध गाव तिला दान देतां आला नसता. प्राचीन नगरांच्या आजूबाजूंच्या गावांचा मिळून एक घटक होत असे व त्या गावांचें उत्पन्न सध्याच्या जिल्हाबोर्डाप्रमाणे निवडून दिलेल्या प्रतिनिधींची महाजनसभा खर्च करीत असे. त्या महाजन सभेला त्यांतील एखादा गाव धर्मादाय म्हणून देतां येत असे, ही या ताम्रपटावरून मिळणारी माहिती महत्त्वाची आहे. अशा तऱ्हेचे उल्लेख क्वचित् इतरत्रहि आढळतात. उदाहरणार्थ, नाशिकच्या अठराव्या लेण्यांतील लेखावरून[८] नाशिकच्या लोकांनी धंभिक नामक गाव बौद्ध भिक्षूंना दिला होता असें कळतें. दक्षिण भारतांतील उक्कल गावीं सापडलेल्या दुसऱ्या एका शिलालेखांत त्या गावच्या महाजनसभेने एका देवळांतील देवाच्या पूजेकरता एक गाव दान दिल्याचा व त्यायोगें त्या गावांतील लोकांकडून वेठ बिगारीने काम करून घेण्याचा आपला हक्क सोडून दिल्याचा उल्लेख आहे. ताम्रपटांत उल्लेखिलेलीं ग्रामदानें व भूमिदानें सामान्यतः राजांनी किंवा राजाधिकाऱ्यांनी दिलेलीं असतात. पण क्वचित्

---

८. 'नासिककनं धंभिकगामस दानं' (नाशिकच्या लोकांनी दिलेलें धंभिक गावाचें दान).

गणांनी (व्यापाऱ्यांच्या संघांनी) किंवा नगराच्या महाजनसभेने दिलेल्या ग्रामदानांचेहि उल्लेख आढळतात. तसा उल्लेख प्रस्तुत ताम्रपटांत आहे, यांत त्याचें वैशिष्ट्य आहे.

राष्ट्रकूटांचे मांडलिक—प्रस्तुत ताम्रपटावरून राष्ट्रकूट नृपति दन्तिदुर्गाने कोंकण प्रदेश जिंकला होता असें कळतें. दशावतार लेण्यांतील लेखांत या प्रदेशाचा उल्लेख नाही. प्रस्तुत ताम्रपटांत श्रीपुर येथें दन्तिदुर्गाने नेमलेला अनिरुद्ध नामक अधिकारी राज्यकारभार पाहात होता असें म्हटलें आहे, अनिरुद्धाच्या नांवामागे ‘सामन्त’, ‘माण्डलिक’ किंवा ‘समधिगतपञ्चमहाशब्द’ यासारखें बिरुद योजिलेलें नसल्यामुळे तो एक सामान्य राजाधिकारी दिसतो. यानंतर सुमारें ५० वर्षांनी, इ. स. ८०० च्या सुमारास, राष्ट्रकूट सम्राटांनी शिलाहारवंशी कपर्दी नामक मांडलिकाची स्थापना उत्तर कोकणांत केली. हा राजवंश सुमारें साडेचारशें वर्षें उत्तर कोकणांत राज्य करीत होता. तो राष्ट्रकूटांशीं शेवटपर्यंत राजनिष्ठ राहिला.

स्थलनिश्चय—प्रस्तुत ताम्रपटांत **श्रीपुर** व **तंबसाहिका** ह्या दोनच स्थलनामांचा निर्देश आहे. श्रीपुरला ‘श्रीनगर’ असेंहि म्हटलें आहे. याला तंतोतंत जुळेल असें स्थलनाम मानोरजवळच्या प्रदेशांत आढळत नाही; पण मानोरच्या पश्चिमेस सुमारें १४ मैलांवर व पालघरपासून सुमारें ४ मैलांवर समुद्रकाठीं शिरगाव नामक गाव आहे, तें कदाचित् प्राचीन श्रीपुर किंवा श्रीनगर असेल. तेथे एक किल्लाहि आहे असें समजतें. तंबसाहिका याला जुळेल असें स्थलनाम मानोरजवळ आढळत नाही. पालघरच्या दक्षिणेस १२ मैलांवर तंभीखोडवें नांवाचें गाव आहे. तें कांहीसें त्यासारखे दिसतें. अम्बरनाथचे श्री. द. धों. वझे कळवितात की मानोरपासून दोन मैलांवर तमसाई नामक गाव आहे, पण तें मला सर्व्हे ऑफ इंडियाच्या विस्तृत नकाशांतहि आढळलें नाही. तथापि गाव तें मानोरजवळ असल्यास तें प्राचीन तंबसाहिका असण्याचा बराच संभव आहे.

वाचन[९]

ओळ

पहिला पत्रा

१ सिद्धम् स्वस्ति [।*] संवत्सरशतेषु षट्सु एका(क)सप्त-त्यधिकेषु सं

२ ६०० [+] ७० [+] १ समधिगतपंचमहाशब्दप्रि(पृ)-थिवीवल्लभख-

३ ड्गावलोकश्रीदन्तियदुर्ग्गराज[१०]प्रवर्द्धमानराज्ये तत्पा-

४ दानुद्धयातश्रि(श्री)अनिरुद्धप्रभुज्यमाने श्रीपुर(रे) भगवतो

५ ब्रह्मणऽपादमूले तत्रित्य[११]त्रैविद्यमहाजनप्रमुख-

६ बोडवर्म्मभोगिकदुग्ग(र्ग्ग)भोगिकदेवस्मभोगिकगोवियसं-

दुसरा पत्रा

७ गभोगिकगोवियप्रमुखमहाजनेन कौण्डिन्यसगोत्रस्वामि[ध]-

८ र्म्मभट्टतत्पादानुद्धयातबादडिभोगिककारितबादेश्वरदेवा-यतनाय

९ श्रीपुरविषयो(या)न्तर्ग्गततंबसाहीकाग्रामो(मः) खण्ड-स्फुटितसंस्कारा[र्थं*] उ-

१० दकपूर्व्वकेण दक्तः(त्तः।) तत्कालेपि गच्छता[१२] न कैश्चिव्या-(द्वया)सेधः कार्य्यः [।*]य-

---

९. श्री कृष्णदेव यांनी पाठविलेल्या ठशांवरून.

१० 'दन्तिदुर्गराज' असें वाचावें.

११. 'तत्रत्य-' असें वाचावें.

१२. 'तत्काले गच्छति' असें वाचावें.

२१ ऽकश्चिक्कु(त्कु)बु[ब्या](द्धया)वमानी विवदते[13] स पंचभि-
र्म्महापातकैः संयुक्तो भव-
२२ ति [।*] संगभोगिकसंगआचडिवैरमकुण्णस्मश्रीनगरप्रमु-
[ख]दत्तबो-[14]
२३ दडिभोगिकोत्र सामान्या[15]॥ सोनार चण्डहरि। लिखितं
चेदं देवकत्रि-
२४ भोगिकेण[।*]

---

१२. राष्ट्रकूटांचा अरब मांडलिक सुगतिप याचा चिंचणी ताम्रपट*

उपलब्धि—सुमारें तीन वर्षांपूर्वी ठाण्याच्या कलेक्टरने ठाणा जिल्ह्याच्या डहाणू तालुक्यांतील चिंचणी गावीं सापडलेले पांच ताम्रपट मुंबईच्या प्रिन्स् ऑफ वेल्स् म्यूझियमकडे वाचनार्थ पाठविले होते. बडोद्याच्या ओरिएंटल इन्स्टिटयूटचे डॉ. यू. पी. शहा यांनी ते वाचून त्यांविषयी एक लहानसें टिप्पण मुंबईच्या सेक्रेटरिएट रिकॉर्ड ऑफीसच्या सन १९५५–५६ च्या अहवालांत छापलें आहे. त्याबरोबरच या ताम्रपटांचे छापहि दिले आहेत. कोणत्याहि ताम्रपटाचें संपूर्ण वाचन मात्र त्यांनी दिलें नाही किंवा त्यांतील मजकुराची फारशी चर्चाहि केली नाही. त्यांतील

---

१३. या शब्दांतील 'द' या अक्षरावरील मात्रा खोडली आहे.

१४. 'श्रीनगरप्रमुखैर्दत्तम्' असें विवक्षित असेल; किंवा 'श्रीनगरप्रमुखदत्तबोदडि–' असेंच शुद्ध असेल.

१५. '–भोगिका अत्र सामान्याः' असें वाचावें.

* 'नवभारत', मुंबई, जुलै १९५८.

कांही ताम्रपट कोकणच्या प्राचीन इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत. सुदैवाने त्यांचे उत्कृष्ट छाप पूर्वोक्त अहवालांत छापले असल्याने त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणें शक्य झालें आहे. प्रस्तुत लेखांत त्यांतील एका ताम्रपटाची माहिती देऊन त्यांतील मजकुराची चर्चा करावयाची आहे.

प्रस्तुत ताम्रपटाचे तीन पत्रे आहेत असें दिसतें. पहिल्या व शेवटच्या पत्र्याच्या आंतील बाजूवर व मधल्या पत्र्याच्या दोन्ही बाजूंवर लेख कोरला आहे. या लेखाची लिपी प्राचीन नागरी आणि भाषा संस्कृत असून आरंभींचा राजवंशवर्णनपर भाग पद्यांत व नंतरचा दानविषयक भाग गद्यांत असून शेवटीं ह्या दानाचें भावी राजांनी पालन करावें म्हणून कांही शापाशीर्वादात्मक श्लोक इतर ताम्रपटांतल्याप्रमाणे आले आहेत. कांही नवीन श्लोक सुंदर असून त्यांत कवीचें कल्पनाचातुर्य व अलंकारनैपुण्य दिसून येतें.

ताम्रपटाचें वैशिष्ट्य—या ताम्रपटाचें वैशिष्टय हें की तो एका अरब सामन्ताने दिला असतांहि सुंदर संस्कृत भाषेंत लिहिला आहे. इ. स. ७११ मध्ये अरबांनी मुहम्मद बिन कासीमच्या नेतृत्वाखाली सिंधवर आक्रमण केलें व नंतर सुमारें पंचवीस वर्षांच्या अवधींत सैन्धव, कच्छेल्ल, सौराष्ट्र, चावोटक, मौर्य, गुर्जर इत्यादि राजांचा पराभव करून दक्षिणच्या राज्यांवर आक्रमण करण्याकरिता नवसारीपर्यंत चाल केली. त्या वेळीं नवसारी येथे बदामीच्या चालुक्यांचा नातलग व मांडलिक अवनिजनाश्रय पुलकेशी हा राज्य करीत होता. त्याने मोठ्या शौर्याने प्रतीकार करून त्यांचा पूर्ण पाडाव केला आणि दक्षिण भारताला त्यांच्या टोळधाडीपासून वाचविलें. या घनघोर लढाईचें रोमहर्षक वर्णन त्या पुलकेशीच्या सन ७३९ मध्ये दिलेल्या नवसारी ताम्रपटांत आलें आहे.[१] यानंतर गजनीच्या महमुदाच्या स्वाऱ्या होईपर्यंत सुमारें तीनशें वर्षे भारताला मुसलमानांचा फारसा उपसर्ग झाला नाही. या कालांत त्यांनी भारताचा कांही भाग आक्रमिला होता व त्यांचे कनोजच्या प्रतीहार सम्राटांशीं वारंवार खटकेहि उडत. पण

---

१. वा. वि. मिराशी—' इन्स्क्रिप्शन्स् आफ दि कलचुरि–चेदि ईरा ,' भाग, १, पृ. १४०–१४१ पाहा.

दक्षिणच्या राष्ट्रकूट राजांशीं त्यांचे संबंध सलोख्याचे होते. त्या काळीं व्यापाराकरिता दक्षिणेंत आलेल्या मुसलमानांनी म्हटलें आहे की 'सिंध व हिंदमध्ये बल्हारा राजाप्रमाणे इतर कोणीहि राजा मुसलमानांना मानानें वागवत नाही.' बल्हारा हें वल्लभराज याचें अपभ्रष्ट रूप असून तें राष्ट्रकूट नृपतींचें द्योतक आहे. कारण राष्ट्रकूट राजे 'वल्लभराज' ही पदवी धारण करीत असत. कांही मुसलमान लेखकांनी असेंहि म्हटलें आहे की वल्लभराजाने कांही मुसलमानांना आपल्या राज्यांतील नगरांचे अधिपति नेमलें होतें. आतापर्यंत याचा प्रत्यक्ष पुरावा मिळाला नव्हता. प्रस्तुत ताम्रपटाने तो प्रथमच मिळत आहे यांत त्याचें महत्त्व आहे.

विषय व काल—प्रस्तुत ताम्रपटाचा उद्देश ताजिक (अरब) वंशी सुगतिप याने संयान (हल्लीचें संजान) येथील देवीच्या देवालयाला कोलिमहार नामक विषयांतील (जिल्ह्यांतील) काणाडुक नामक गाव व देवी-हर नामक दुसऱ्या एका गावांतील कांही जमीन आपला सम्राट् राष्ट्रकूट नृपति तृतीय इंद्र उर्फ नित्यवर्ष याच्या संमतीने दिली, हें नमूद करण्याचा होता. हें दानपत्र शकवर्ष ८४८, व्यय संवत्सर, वैशाख शुक्ल तृतीया—अक्षय तृतीया—या तिथीस सोमवारीं लिहिलें असें यांत म्हटलें आहे. या मितीची इंग्रजी तारीख १७ एप्रिल सन ९२६ अशी येते. त्या दिवशीं सोमवार होता. तृतीयाहि मध्यम मानाने सूर्योदयापासून ४५ मिनिटांनी लागली होती. शके ८४८ ला व्ययसंवत्सर हेंच नांव होतें. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटाची तिथि पूर्णपणें जुळत आहे. शिवाय हें वर्ष तृतीय इंद्राच्या कारकीर्दींत पडतें कारण त्याने सन ९१५ ते ९२८ पर्यंत राज्य केलें, असें त्याच्या कारकीर्दीच्या अन्य कोरीव लेखांवरून सिद्ध झालें आहे. तेव्हा प्रस्तुत ताम्रपटाच्या खरेपणाविषयी संशय राहत नाही.

प्रस्तुत ताम्रपटांतील लेखाचा आरंभ दोन मंगल श्लोकांनी झाला आहे. त्यांपैकी पहिला भगवान् शंकराच्या अर्धनारीनटेश्वररूपाच्या वर्णन-पर आहे.

गिरिसुताहरयोरविभिन्नयोर्विहरतोर्नियमार्थमवन्तु वः ।
सरसयावकभस्मविचित्रितास्त्रिपथगापुलिने पदपंक्तयः ॥

[एकाच देहांत संयुक्त झालेले पार्वती व शंकर स्नानादिकांकरता गंगानदीच्या वाळवंटांतून जात असतां त्यांचीं कांही पदचिह्नें ओल्या अलक्तक रसाचीं तर कांही भस्मयुक्त अशीं उमटलीं. त्या पदचिह्नांच्या रांगा तुमचें रक्षण करोत !]

ताम्रपटांतील आरंभीचे श्लोक—प्रस्तुत ताम्रपटांत भगवतीला दिलेल्या ग्रामदानाचा उल्लेख आहे. या भगवती देवीचें देवालयहि संजान येथे होतें. अद्यापिहि कोकणांत सर्वत्र महालक्ष्मीची पूजाअर्चा केली जाते. तेव्हा ताम्रपटांतील दुसरा श्लोक महिषासुरमर्दिनीच्या स्तुतिपर असला तर आश्चर्य नाही. तो असा—

शूलभिन्नस्य विन्यस्तो महिषस्य बलाद् गले ।
दुर्गायाः पातु वः पादस्तद्रक्तालक्तकांकितः ।।

[भगवती दुर्गादेवीने आपल्या शूलाने महिषासुराला भोसकून त्याच्या गळयावर बळाने पाय दिला. तेव्हा तो पाय त्या महिषाच्या रक्तरूपी अलक्तकाने लाल झाला. तो पाय तुमचें रक्षण करो !]

तिसरा श्लोक दुर्गम विंध्य पर्वत ओलांडण्याचा मार्ग दाखवून ज्याने दक्षिण दिशेचा प्रदेश आर्यांस खुला केला त्या अगस्त्यऋषीविषयी आहे—

पायान्मुनिरगस्त्यो वः चुलुकापीतवारिधिः ।
दक्षिणाशामुखे तुंगभूभृत्पालितशासनः ।।

[ज्याने सागराला आपल्या ओंजळींत घेऊन त्याचें प्राशन केलें व दक्षिण दिशेस आरंभींच असणाऱ्या उत्तुंग विंध्य पर्वताने ज्याची आज्ञा पालन केली तो अगस्त्य ऋषि तुमचें पालन करो !]

या तीन श्लोकांवरून हा लेख रचणाऱ्या कवीच्या कवित्वशक्तीची कल्पना येईल.

त्या काळीं कोकणांत सर्व धार्मिक कारभाराची व्यवस्था लोकांच्या प्रतिनिधींमार्फत होत असे. या प्रतिनिधींच्या सभेला ग्रामीण विभागांत पञ्चकुल (पञ्चायत) आणि नागर विभागांत पर्षद् असें नांव असे. तिच्या सभासदांस 'महाजन' म्हणत. मानोरच्या ताम्रपटांत श्रीपुरच्या

महाजनांनी तेथील ब्रह्मदेवाच्या देवळाला दिलेल्या ग्रामदानाचा उल्लेख आहे हें मी दाखविलें आहे.[२] या परिषदेमार्फत दानधर्माची व्यवस्था होत असल्यामुळे चौथा श्लोक तिच्या स्तुतिपर आहे. तो असा—

जयतामार्यदेशीया महापर्षदनिन्दितैः ।
विनयाचारसौजन्यधर्मोपशमिभिर्गुणैः ॥

[आर्य देशांतील या महापरिषदेचा विनय, शुद्ध आचार, सौजन्य, धार्मिकपणा व शांति या स्तुत्य गुणांच्या योगाने जयजयकार होवो !]

आपल्या नगरपालिकांच्या सभासदांच्या अंगीं कोणते गुण आवश्यक आहेत हें या श्लोकांत उत्तम रीतीने सांगितलें आहे

राष्ट्रकूट सम्राटांची वंशावळ

प्रस्तुत ताम्रपट देणारा अरब अधिपति सुगतिप हा राष्ट्रकूट नृपति तृतीय इन्द्र-नित्यवर्ष याचा मांडलिक होता. म्हणून कोरीव लेखांच्या पद्धतीप्रमाणे यांतील लेखाच्या आरंभीं राष्ट्रकूट राजांची आरंभापासून वंशावळ दिली आहे. राष्ट्रकूट नृपति स्वतःस चन्द्रवंशी म्हणवत असत. म्हणून या वंशाची उत्पत्ति चन्द्र, बुध, पुरूरवा, आयु—त्याच्या वंशांत ययाति व नंतर यदु अशा रीतीने वर्णिली आहे. राष्ट्रकूट स्वतःस यादववंशी समजत. नंतर ऐतिहासिक कालांतील पुढील नृपतींचा उल्लेख आला आहे—प्रथम गोविंद; त्याचा मुलगा प्रथम कक्क; त्याचा मुलगा प्रथम इन्द्र; त्याचा मुलगा दन्तिदुर्ग; त्यानंतर त्याचा चुलता प्रथम कृष्णराज; नंतर त्याचा मुलगा द्वितीय गोविंद; नंतर त्याचा धाकटा भाऊ ध्रुव; त्यानंतर जगत्तुंग (किंवा तृतीय गोविंद); पुढे प्रथम अमोघवर्ष; नंतर त्याचा मुलगा द्वितीय कृष्ण; नंतर त्याचा नातू तृतीय इन्द्र— अशी वंशावळ आली आहे.

इन्द्र राजाचे विजय

वरील राजांच्या कारकीर्दीतील घटनांविषयी कांही माहिती नाही. पण तृतीय इन्द्राच्या कालींच प्रस्तुत ताम्रपट दिला असल्याने त्याच्या मात्र कांही विजयांचें वर्णन यांत आलें आहे. खालील श्लोक पाहा—

२. मागे, पृ. १४६ पाहा.

अभ्युद्धृतोर्वरभरो हठदारितारिः
सच्चक्रनन्दनकरो नरकस्य शत्रुः ।
निर्मथ्य वरिवरवारिधिमाप्तलक्ष्मीः
साक्षादुपेन्द्र इव सोऽभवदिन्द्रराजः ।।

या श्लोकांत तृतीय इन्द्राची उपेन्द्र किंवा विष्णु याच्याशीं तुलना केली आहे. विष्णूप्रमाणे इन्द्रराजानें आपल्या बळानें शत्रूंचा निःपात करून पृथ्वीचा भार नाहीसा केला आहे. विष्णु आपल्या हातांत सुंदर सुदर्शन चक्र व नंदन खड्ग धारण करतो तसें हा इन्द्र राजाहि सज्जनांच्या समूहास आनंदित करतो. विष्णु नरकासुराचा शत्रु होता तसा हाहि नरकाचा वैरी आहे. विष्णूप्रमाणे यानें श्रेष्ठ वैरीरूपी समुद्रांचें मन्थन करून लक्ष्मी हस्तगत केली आहे व अशा रीतीनें हा साक्षात् भगवान् विष्णूच झाला आहे.

या श्लोकांत इन्द्रराजाच्या एखाद्या विशिष्ट विजयाचा उल्लेख नाही. पण तसे उल्लेख पुढील श्लोकांत आले आहेत—

यो नाशितकामात्मा गृहीतडाहालनायककपालः ।
उत्तरदिग्बद्धरुचो राजति लोके महेश्वरवत् ।।

या श्लोकांत श्लेषांच्या योगानें इंद्रराजाची भगवान् शंकराशीं तुलना केली आहे. भगवान् शंकरांनी कामात्म्याचा म्हणजे मदनाचा नाश केला, ते हातांत भिक्षाकपाल धारण करतात व त्यांना उत्तरदिशेंत (कैलासपर्वतावर) राहण्याची आवड आहे. त्याप्रमाणेच इन्द्र राजानें आपल्या कामरूपी मनोविकाराचा नाश केला, डाहाल देशाधिपतीचें मुंडकें उडवून तें हातांत घेतलें आणि उत्तर दिशेंत स्वाऱ्या करण्याविषयी मनांत इच्छा धरली. आणि याप्रमाणे तो जगतांत भगवान् शंकराप्रमाणे शोभूं लागला आहे.

या श्लोकांत इन्द्रानें डाहलाधिपतीवर मिळविलेल्या विजयाचा प्रथमच उल्लेख आला आहे. डाहल म्हणजे प्राचीन चेदि देश, ज्यामध्ये सध्याचा जबलपुर, दमोह, सागर आणि विन्ध्यप्रदेश किंवा बघेलखंड यांचा अंतर्भाव होत असे. या काळीं या प्रदेशावर कलचुरींचें राज्य होतें. त्यांची राजधानी त्रिपुरी ही सध्या जबलपुरापासून सहा मैलांवर तेवर नामक खेड्याच्या

रूपाने अवशिष्ट आहे. कलचुरि व राष्ट्रकूट यांचे संबंध सलोख्याने असून या दोन राजवंशांमध्ये अनेक पिढ्या वैवाहिक नातींहि उत्पन्न झालीं होतीं. त्यांचें एकमेकांस साहाय्य होत असे. स्वतः इन्द्रराजाची माता व पत्नी याहि त्रिपुरीच्या कलचुरि कुलांतील होत्या. आतापर्यंत या दोन कुलांमध्ये वैर असल्याचा एकहि निश्चित उल्लेख मिळाला नव्हता. म्हणून 'इन्द्र-राजानें डाहलाधिपतीचा शिरश्छेद केला' हें प्रस्तुत श्लोकांतील विधान सकृद्दर्शनीं अविश्वसनीय वाटतें. पण प्रस्तुत ताम्रपट फार काळजीपूर्वक लिहिला असल्याने त्यांतील माहितीहि त्याज्य वाटत नाही. कलचुरींच्या राजवंशांत या काळीं बालहर्ष नामक राजा गादीवर होता. त्याच्या विषयी कांहीच माहिती उपलब्ध नाही. एका वंशावळींत तर त्याचें नांवहि गाळलें आहे. या बालहर्षाची इन्द्रराजाशीं कांही कुरबुर उत्पन्न होऊन झालेल्या युद्धांत बालहर्ष मारला गेला असावा असें अनुमान करणें शक्य आहे.[३]

'इन्द्रराजाला उत्तरेंत स्वाऱ्या करण्याची आवड होती' हें वर्णन मात्र इतर लेखांवरून समर्थित होतें. ध्रुव व तृतीय गोविंद या इन्द्राच्या पूर्वजांनी उत्तरेंत स्वाऱ्या करून भीमथडीच्या तट्टांना गंगा यमुनांचें पाणी पाजलें होतें व अनेक विजय संपादन केले होते. इन्द्राने त्यांचें अनुकरण करून उत्तरेंत कनोजपर्यंत चाल केली आणि तेथील प्रतीहार नृपति महीपाल यास पदच्युत करून कनोज नगर उध्वस्त केलें. त्याचें सुंदर वर्णन कोरीव लेखांतील खालील श्लोकांत आलें आहे—[४]

यन्माद्यद्द्विपदन्तघातविषमं कालप्रियप्राङ्गणं
तीर्णा यत्तुरगैरगाधयमुना सिन्धुप्रतिस्पर्धिनी ।
येनेदं हि महोदयारिनगरं निर्मूलमुन्मूलितं
नाम्नाद्यापि जनैः कुशस्थलमिति ख्यातिं परां नीयते ॥

---

३. कदाचित् 'भगवान् शंकर जसें कपाल धारण करतात तसें इन्द्रनृपतीने डाहल देशाच्या अधिपतीला आपल्या पक्षांत घेतलें' एवढाच अर्थ विवक्षित असेल.

४. एपिग्राफिया इंडिका, पु. ७, पृ. ३८. याचा अर्थ मागे पृ. ३८–३९ वर दिला आहे.

राष्ट्रकूटांचा मांडलिक ताजिकवंशी सुगतिप

हा तृतीय इन्द्र राज्य करीत असतां त्याच्या सुगतिप नामक अरब मांडलिकाने प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेलें ग्रामदान व भूमिदान दिलें. म्हणून नंतर त्याची वंशावळ दिली आहे. त्यांत म्हटलें आहे की द्वितीय कृष्ण राजाच्या कृपेने ताजिकवंशी मधुमति संपूर्ण संयान मंडलाचा अधिपति झाला. त्याने समुद्रतीरच्या सर्व अधिपतींचा पराभव करून सर्वत्र आपलीं ठाणीं बसविलीं. त्याचा मुलगा सहियारहार याला सुगतिप नांवाचा पुत्र झाला. याचेंच मधुमति असें दुसरें नांव पुढे आलें आहे. याने संजान येथे एक अन्नसत्र स्थापिलें. संजानजवळच्या दोन नद्यांना पार करण्याकरिता त्याने धर्मतरींची व इतर नद्यांकरिता मंचांची (साकवांची) सोय केली होती. त्यायोगे संजानमध्ये येऊन सूप, घृत, षड्रसयुक्त साळीचा भात इत्यादिकांचें त्या अन्नसत्रांत सेवन करून नानादेशांचे पांथ त्या सुगतिपाच्या उज्ज्वल कीर्तीचें मोठ्याने वर्णन करीत असत.

> क्रान्त्वा धर्मतरीद्वयेन सरितौ मंचप्रपंचैः पराः
> शाल्यन्नं प्रतिभुज्य सूपघृतवत्सत्त्रे समं षड्रसैः ।
> नित्यं यस्य नितान्तहृष्टमनसः कीर्ति शशाङ्कोज्ज्वलां
> नानादेशविशेषवेदिपथिकाद्या वर्णयन्त्युच्चकैः ॥

नंतर सुगतिपाचा मंत्री पुव्वैय याचें वर्णन आलें आहे.

देवीच्या देवळाला ग्रामदान व भूमिदान

संजान येथे मैत्रायणीय शाखी व भारद्वाज गोत्री वासुदेव नामक ब्राह्मणाचा नातू व नारायणभट्टाचा पुत्र अन्नैय किंवा आन्नेय याने देवीची मठिका किंवा देऊळ बांधलें होतें. त्या देवळाच्या डागडुजीकरिता तसेंच संजान येथील पंचगौडीय परिषदेच्या नऊ सभासदांच्या तसेंच भगवती देवीच्या सर्वोपकरणांनी युक्त अशा उपभोगाकरिता अन्नैयाच्या आग्रहावरून सुगतिप ऊर्फ मधुमति याने राष्ट्रकूटवंशी परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर श्रीइन्द्रराजाला विनंती केली आणि त्याच्या संमतीने कोलिमहार नामक विषयांतील म्हणजे जिल्ह्यांतील काणाडुक नामक गाव दान

दिला. या गावाच्या चतुःसीमा सांगतांना त्याच्या पश्चिमेस असलेल्या कल्लग्रामाचा उल्लेख आला आहे. तसेंच देवीहर नामक गावांतील कांही भूमिहि त्याने दान दिली. या गावांत चाट, व भट या राजसेवकांनी प्रवेश करूं नये, यांत अधिकाऱ्यांना वेठबिगारीचा हक्क आहे, तसेंच यांतील करभार घेण्याचा हक्क, लहानसहान खटले चालविण्याचा अधिकार हेहि त्यांत अंतर्भूत होतात, असेंहि म्हटलें आहे. यानंतर भावी राजांनी या दानाचें पालन करावें म्हणून अनेक शापाशीर्वादात्मक श्लोक घातले आहेत. शेवटीं पूर्वोक्त कालनिर्देश करून हें राजशासन परमभट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर अकालवर्षदेव (द्वितीय कृष्ण) याच्या चरणांचें चिंतन करणाऱ्या श्रीनित्यवर्षदेवाच्या (तृतीय इन्द्राच्या) अनुमतीने व श्रीसुगतिपाच्या आज्ञेने संजान येथील ध्रुव (महसूलाधिकारी) वथैयाच्या संमतीने श्रीध्रुवराज व सांधिविग्रहिक (परराष्ट्रमंत्री) अजित याचा पुत्र सुगत याने लिहिलें असें म्हटलें आहे. नंतर हीं दानें देणारा सुगतिप, त्याचा मित्र आन्नेय, तसेंच रेवण व कौतुक असे इतर दोघेजण हे अमरगिरीवर (कैलासावर) सदैव वास करोत व हें ताम्रशासन कल्पांतापर्यंत टिको, अशी आशा व्यक्त करून 'मंगलं महती श्रीः' या मंगलवाचक शब्दांनी ताम्रशासनाचा शेवट केला आहे.

ताम्रपटाचें महत्त्व

प्रस्तुत ताम्रशासन अनेक दृष्टींनी महत्त्वाचें आहे. तें तृतीय इन्द्राच्या कारकीर्दींत सन ९२६ मध्ये दिलें होतें हा ताम्रपटांतील निर्देश उल्लेखनीय आहे. तृतीय इन्द्राने किती वर्षें राज्य केलें हा प्रश्न वादग्रस्त झाला आहे, डॉ. अळतेकरांनी सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी लिहिलेल्या 'राष्ट्रकूट नृपति आणि त्यांचा काळ' या आपल्या पुस्तकांत तृतीय इन्द्राने फक्त तीन वर्षें (सन ९१५ ते ९१७) राज्य केलें असें म्हटलें होतें. त्यानंतर इन्द्र नित्यवर्षाच्या कारकीर्दींतील शके ८४२ ते ८५० (सन ९२० ते ९२८) पर्यंतचे कोरीव लेख कर्नाटकांत सापडले आहेत.[५] त्यावरून तृतीय इन्द्राने सन ९१५ ते ९२८ पर्यंत राज्य केलें असें एका विद्वानाने दाखविलें आहे.

---

५. एपिग्राफिया इंडिका, पु. २६, पृ. १६२.

तरीहि भारतीय विद्याभवनाने प्रसिद्ध केलेल्या भारतीय इतिहासांतील राष्ट्रकूटांवरील आपल्या लेखांत 'इन्द्राने सन ९१५ ते ९२२ पर्यंतच राज्य केलें', असें डॉ. अळतेकर म्हणतात. प्रस्तुत ताम्रपट तृतीय इन्द्राच्या काळीं शके ८४८ (सन ९२६) मध्ये दिला असल्याने तो राजा निदान सन ९२६ पर्यंत राज्य करीत होता यांत संशय नाही. या दृष्टीने प्रस्तुत ताम्रपटाचें महत्त्व आहे.

दुसरी गोष्ट ही की प्रस्तुत ताम्रपट तृतीय इन्द्राच्या एका अरब मांडलिकाने दिला असून तो संस्कृतांत लिहिला आहे. मधुमति, सहियारहार व सुगतिप ही नांवें अनुक्रमें महम्मद, शहरियर व सुबक्त या अरबी नांवांचीं संस्कृत रूपांतरें दिसतात. सुगतिप हा ताजिकवंशी किंवा अरब होता असें प्रस्तुत ताम्रपटांत स्पष्ट म्हटलें आहे. अरबांनी कांही काळ आक्रमक धोरण अवलंबिलें असलें तरी नंतर तें फलदायी होत नाही असें पाहून त्यांनी भारतीय राजांच्या पदरीं नोकरी स्वीकारली असें दिसतें. त्यांपैकी कांहींनी भारतीय नृपतींच्या युद्धांत मर्दुमकी गाजविल्यावर त्यांना त्यांच्या कडून प्रांताधिपतीचें पदहि मिळालें असावें. प्रस्तुत ताम्रपट देणाऱ्या सुबक्त ऊर्फ सुगतिपाचा आजा महम्मद ऊर्फ मधुमति याला राष्ट्रकूट सम्राट् द्वितीय कृष्ण याच्या कृपेने संयान मंडळाचें राज्य मिळालें होतें.[७] त्याने समुद्रकाठच्या सर्व अधिपतींना जिंकून त्यांच्या देशांत आपलीं ठाणीं बसविलीं असें प्रस्तुत ताम्रपटांत म्हटलें आहे. हा प्रदेश त्याने आपल्या सम्राटाकरिता जिंकला असावा. या ताजिक मांडलिकांच्या निदान तीन पिढ्या संजान येथे झालेल्या दिसतात. शेवटच्या सुगतिपाने संजान येथे प्रवाशांकरिता अन्नसत्र स्थापिलें होतें व एका गृहस्थाच्या विनंतीवरून आपल्या सम्राटाची संमति मिळवून भगवती देवीच्या देवळाकरिता ग्रामदान व भूमिदानहि दिलें होतें. त्याचा मन्त्री पुव्वैय, महसूलमन्त्री वथैय आणि सान्धिविग्रहिक (परराष्ट्र मन्त्री) अजित असे होते. त्यावरून त्याच्या राज्यांतील अधिकाराच्या जागा मुसलमानांना दिल्या नसून त्यांवर हिंदु अधिकारीच होते हें उघड आहे.

---

७. कृष्णराजदयावाप्तकृत्स्नसंयानमण्डलः ।
आसीन्मधुमतिः श्रीमान् नृपतिस्ताजिकान्वये ।। श्लोक १७.

राष्ट्रकूटांचें मुसलमानविषयक धोरण

कांही मुसलमान लेखकांनी म्हटलें आहे की उत्तरेंतील कनोजच्या प्रतीहारांचें मुसलमानांशीं वैर असलें तरी राष्ट्रकूट राजे मात्र त्यांच्या बाबतींत पक्षपात करीत असत. मुसलमान प्रजेवर अधिकार चालविण्याकरिता मुसलमान अधिकारीच नेमले जात, असेंहि अल् इस्तखी व इब्न् हौकल या लेखकांनी मोठया आढयतेने म्हटलें आहे; तेंहि बरोबर नाही. संजान प्रांत एका मुसलमान सामन्ताच्या अधिकाराखाली होता. त्याच्या राज्यांत बरीच प्रजा मुसलमानधर्माची असावी. तथापि त्याचे प्रमुख अधिकारी मुसलमान होते असें प्रस्तुत ताम्रपटावरून दिसत नाही. स्वतः सुगतिप राष्ट्रकूट सम्राटाचें आधिपत्य स्वीकारीत होता इतकेंच नाही, तर स्वतःच्या प्रांतांतील एखादें गाव व थोडीशी जमीन आपल्या इच्छेप्रमाणे देण्याचाहि त्याला अधिकार नव्हता. त्याकरिता त्याला आपल्या हिंदु सम्राटाची संमति घ्यावी लागे ही गोष्टहि प्रस्तुत ताम्रपटावरून स्पष्ट आहे.

प्रस्तुत ताम्रपटांतील दान भगवती देवीच्या देवळाकरिता दिलें होतें व त्याचा लेख संस्कृत भाषेंत लिहिला आहे हेंहि उल्लेखनीय आहे. त्यावरून या अरब मांडलिकाच्या अंगीं या बाबतींत मुळीच ताठा नव्हता आणि तो इतर हिंदु सामंतासारखाच राज्य करीत होता हेंहि स्पष्ट आहे. तेव्हा राष्ट्रकूट राजे मुसलमान लोकांच्या बाबतींत पक्षपात करीत असत व त्यांना स्वेच्छेने वागण्याचें स्वातंत्र्य असे असें दिसत नाही. डॉ. अळतेकरांनी म्हटल्याप्रमाणे राष्ट्रकूटांच्या साम्राज्यांत इतर व्यापाऱ्यांप्रमाणे अरब व्यापाऱ्यांना व्यापाराकरिता कांही सवलती दिल्या असतील. तसेंच त्यांच्या धार्मिक वादांचा निर्णय काजींमार्फत केला जात असेल. पण एवढयावरून त्यांच्या बाबतींत पक्षपात केला जात होता असें म्हणतां येणार नाही.

संजान येथील महिषासुरमर्दिनी देवीचें देवालय

ज्या भगवती देवीच्या देवळाला प्रस्तुत ताम्रपटांतील दान दिलें होतें तिचें नांव त्यामध्ये आलें नाही. परंतु चिंचणीला सापडलेल्या इतर ताम्रपटांत त्या देवळाचें नांव कौतुकमठिका किंवा कवतिकमठिका असें

आलें आहे. त्यावरून त्या देवीचें नांव कौतुकदेवी असें असावें. तिचें स्वरूप महिषासुरमर्दिनीचें होतें हेंहि प्रस्तुत ताम्रपटांतील दुसऱ्या श्लोकावरून स्पष्ट आहे.

संज़ानचे अधिकारी कर्णाटकीय होते काय ?

प्रस्तुत ताम्रपटांत आन्नेय किंवा अन्नमैय, पुव्वैय, वथैय, यांसारखीं कांही नांवें आलीं आहेत. अशीं नांवें शिलाहाराच्या ताम्रपटांतहि आढळतात. त्यांवरून शिलाहारांनी आपल्या राज्यांत अधिकारांच्या जागीं कन्नडिगांची भरती केली होती असें अनुमान कांहींनी केलें आहे. पण तें बरोबर दिसत नाही. शिलाहार स्वतः 'तगरपुरा'हून (मराठवाड्यांतील सध्याच्या तेरहून) कोकणांत आले होते म्हणून ते आपणांस 'तगरपुरपरमेश्वर' म्हणवीत असत. त्यांना कर्णाटकीयांना मुद्दाम नेमण्याचें कारण नव्हतें. त्यांनी ज्यांना दानें दिलीं त्यांमध्ये कांही कार्णाट ब्राह्मण होते यांत संशय नाही. त्यांच्या नांवांमागे बहुधा कर्णाट किंवा कार्णाट असें उपपद लावलें असे. पण इतर अनेक ब्राह्मण करहाटहून (सध्याच्या कऱ्हाडहून) आले असतांहि त्यांचीं नांवें 'ऐय' किंवा 'अय्य' पदान्त होतीं हें ध्यानांत घेण्यासारखें आहे. उदाहरणार्थ, मुम्मुणिराजाच्या ठाण्याच्या ताम्रपटांत उल्लेखिलेलीं तिक्कपैय, दांउपैय, रिसिपय, उपैय, दिवाकरैय, सिद्धपैय इत्यादि कऱ्हाडे ब्राह्मणांचीं नांवें पाहा. अय्य हें 'आर्य' याचें अपभ्रष्ट रूप आहे. गणार्य, वात्स्यदेवार्य, महेश्वरार्य, कुमारशर्मार्य अशीं आर्यपदान्त अनेक ब्राह्मणनामें विदर्भाधिपति वाकाटकांच्या ताम्रपटांत आढळतात.[८] तीं कर्णाटकीय ब्राह्मणांचीं होतीं असें मानण्यास साधन नाही.

संजान येथील पंचगौडीय महापरिषद्

प्रस्तुत ताम्रपटांत उल्लेखिलेलें भगवती देवीचें देवालय मैत्रायणीय शाखी, भारद्वाजगोत्री अन्नमैय याने बांधलें होतें, तरी त्याची व्यवस्था

---

८ वा. वि. मिराशी–'वाकाटक नृपति आणि त्यांचा काळ', पृ. २२६ पाहा.

संजानच्या पंचगौडीय महापर्षदेकडे सोपविली होती. पंचगौडीय महापरिषदेचा प्रस्तुत उल्लेख अत्यंत महत्त्वाचा आहे. सांप्रत ब्राह्मणांचे पंचद्राविड व पंचगौड असे दोन विभाग करण्यांत येतात. द्राविड ब्राह्मणांचे आन्ध्र, द्रविड, कर्णाट, महाराष्ट्र व गुर्जर असे पांच प्रकार आहेत तर गौडांचे सारस्वत, कान्यकुब्ज, गौड, मैथिल व उत्कल असे पांच भेद आहेत. इ. स. च्या दहाव्या शतकांत संजान येथे नऊ सभासदांची पंचगौडीय महा-परिषद् होती व तिच्याकडे धार्मिक व्यवस्थेचें काम होतें, ही प्रस्तुत ताम्र-पटावरून मिळणारी माहिती महत्त्वाची आहे. त्या काळीं कोकणांत—विशेषत: संजान येथे—गौड ब्राह्मणांची पुष्कळच वसती होती व तेथील धार्मिक व्यवस्थेंत त्यांचें प्राबल्य होतें असें दिसतें. अद्यापिहि कोकणांत सारस्वत ब्राह्मणांची बरीच वसती आहे.

ताम्रपटांतील स्थलनामें

प्रस्तुत ताम्रपटांत कोलिमहार, काणाडुक, कल्लग्राम व देवीहरग्राम या चार स्थलनामांचा उल्लेख आहे. यांपैकी कोणत्याहि गावाचा शोध डॉ. शहा यांनाहि लावता आला नव्हता. दान दिलेलें **काणाडुक** हें संजानच्या दक्षिणेस सुमारें बारा मैलांवरचें कैनाड असेल. पण त्याच्या जवळपास **कल्लग्रामा**सारखें गाव दिसत नाही. **कोलिमहार** व **देवीहर** यांना जुळतील अशींहि गावें जवळपास आढळत नाहीत.

अरब मांडलिकांचा अस्त

संजानचें अरब मांडलिक राज्य शके ८४८ (सन ९२६) नंतर कांही काळ टिकलें असें दिसतें. संजान प्रदेशाच्या दक्षिणेस शिलाहारांचें राज्य होतें. तेहि मान्यखेटाच्या राष्ट्रकूटांचें मांडलिक असल्याने त्यांच्या अनेक ताम्रपटांत राष्ट्रकूटांची वंशावळ येते. संजानचे अरब व पुरीचे शिलाहार हे दोघेहि राष्ट्रकूटांचे मांडलिक होते तरी त्यांची आपसांत कुरबुर चालत असे, असें दिसतें. सुगतिपाचा पूर्वज मधुमति (मुहम्मद) याने ज्या समुद्रकाठच्या राजांचा पराजय केला होता त्यांमध्ये शिलाहारहि असावे.

सन ९७३ च्या सुमारास उत्तर चालुक्यांनी राष्ट्रकूटांचा उच्छेद केल्यावर शिलाहारांनी आपलें स्वातंत्र्य पुकारलें व नंतर लौकरच त्यांनी संजान प्रदेशावर चाल करून तेथील अरब सामन्ताला पदच्युत केलें आणि तो प्रदेश आपल्या राज्यांत सामील केला. त्यानंतर दिलेल्या अनेक ताम्रपटांत शिलाहार नृपतींनी आपली आज्ञा जशी आपल्या अधिकाऱ्यांना व प्रजाजनांना कळविली त्याप्रमाणेच 'हंयमननगरपौरत्रिवर्गप्रभृतीं'नाहि (हंयमन नगरांतील ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्यादि लोकांनाहि) कळविली होती. हंयमन म्हणजे संजान. या ठिकाणीं सन ७६६ मध्ये इराणांतून येऊन कांही पारशांनी वसती केली होती असें सतराव्या शतकांत लिहिलेल्या 'किस्सा-इ-संजान' या फारसी काव्यांत म्हटलें आहे. तथापि या नगराचा उल्लेख प्रामुख्याने शिलाहारांच्या ताम्रपटांत कां यावा हें कोडें संशोधकांना पुष्कळ काळ पडलें आहे. डॉ. फ्लीटने या प्रश्नाची चर्चा करतांना हंयमन हें शिलाहारांच्या राज्यशासनाचें मुख्य ठिकाण असावें व त्या ठिकाणीं त्यांचे कागदपत्र ठेवले जात असावे म्हणून त्या नगराचा उल्लेख त्यांच्या ताम्रपटांत आला असावा असें म्हटलें होतें.[८] पण हें कारण सयुक्तिक वाटत नाही. प्रस्तुत ताम्रपटावरून इ. स. च्या नवव्या दहाव्या शतकांत संजान प्रदेशांत राष्ट्रकूटांच्या अरब सामन्तांचें राज्य होतें हें उघड आहे. राष्ट्रकूटांच्या विनाशानंतर शिलाहारांनी हा प्रदेश जिंकून घेतला असावा. म्हणून त्यांतील पौरजनांचा उल्लेख त्यांच्या ताम्रपटांत मुद्दाम केलेला दिसतो. असा उल्लेख शिलाहार नृपति अरिकेसरी याच्या शकसंवत् ९३९ (सन १०१७) च्या ताम्रपटांत प्रथम आढळतो.[९] त्यापूर्वीच्या शकसंवत् ९१९ (सन ९९७) च्या अपराजित देवाच्या भादान दानपत्रांत तो आढळत नाही.[१०] म्हणून अरिकेसरीनें सन १०१५ च्या सुमारास हंयमन (संजान) जवळचा प्रदेश मुसलमानांकडून जिंकून घेऊन आपल्या राज्यास जोडला असावा. यापुढील शिलाहारांच्या अनेक ताम्रपटांत हंयमनाचा

८. एपिग्राफिया इंडिका, पु. १२, पृ. २५८-५९.
९. एशिसाटिक रीसर्चेस, पु. १, पृ. ३५७ इ.
१०. एपिग्राफिया इंडिका, पु. ३, पृ. २६७ इ.

पूर्वोक्त निर्देश आला आहे. पुढे शिलाहारनृपति छित्तराजाने हंयमनजवळचा प्रदेश चामुंडराज नामक मांडलिकास दिला होता हें सन १०३४ च्या चिंचणी ताम्रपटावरून ज्ञात झालें आहे.

यात्रमाणे प्रस्तुत ताम्रपटावरून कोंकणच्या प्राचीन इतिहासावर पुष्कळच महत्त्वाचा प्रकाश पडत आहे.

वाचन*

ओळ

पहिला पत्रा

१ सिद्धिः । गिरिसुताहरयोरविभिन्नयोव्वि(र्व्वि)हरतोर्न्नि-
यमाथ(र्थं)मवन्तु वः । सरसयावकभस्मविचित्रितास्त्रि-

२ पथगापुलिने पदपंक्तयः[1] ।। [१।।*] शूलभिन्नस्य विन्यस्तो
महिषस्य व(ब)लाद्गले । दुर्ग्गायाः पातु वः पादस्त-

३ द्रक्तालक्तकांकितः[2] ।।[२।।*] पायान्मुनिरगस्त्यो वः चुलु-
कापीतवारिधिः । दक्षिणाशामुखे तुंगभूभृत्पालि-

४ तशासनः ।।[३।।*] जयतामार्यदेशीया महापर्षदनिन्दितैः ।
विनयाचारसौजन्यधर्म्मोपशमिभिगुणै-

५ : ।।[४।।*] अभूद्दुर्गजटाज(जू)टविसं(शं)कटकुटीचरः ।
चन्द्रमा जगदानन्दकन्दकन्दलनक्षमः ।।[५*।।] तस्माद्वु-
(द्बु)धो वु(बु)धाधीश-

६ स्ततश्चाभूत्पुरूरवाः । तस्मादायुरनल्पायुस्ततोन्ये चक्र-
वर्तिनः ।।[६।।*] एवमच्छिन्नसन्तानजायमानेषु राजसु ।

१. वृत्त-द्रुतविलम्बित.

२. श्लोक २-७ यांचें वृत्त-अनुष्टुभ्.

७ ययातिरभवत्सोपि सुतं यदुमजीजनत् ।।[७।।*] ततस्त्रि-
लोकीतिलकायमानः प्रावर्त्ततासौ यदुसंज्ञवं[शः] ।

८ यत्राभिलेभे हरिरात्मजन्म जन्मान्तरोच्छित्तिकरः प्रजा-
नाम्[3] ।।[८।।*] सद्राष्ट्रकूटापरनाम्न्यमुष्मिन्व(न्वं)शे
य[दू]ना–

९ मजनि क्षतारिः । गोविन्दरा[ज]श्चतुरव्धि(ब्धि)वेलाकांची-
गुणायाः पतिरुर्व्वरायाः[4] ।।[९।।*] श्रीकक्क(क्क)राजोस्य
सुतो

१० हतारिस्तस्मादभूदिन्द्र इवेन्द्रराजः । श्रीदन्तिदुर्गोस्य सुतो
व(ब)भूव श्रीकृष्णराजोनु पितृव्य आसीत् ।।[१०।।*] गो–

११ विन्दराजो भवदस्य पुत्रः तस्यानुजो[भू]द्ध्रुवराजदेवः ।
तस्माज्जगत्तुङ्गधराधरेन्द्रस्तस्यात्मजः श्रीमदमो–

१२ घवर्षः ।।[११।।*] तस्माच्छ्रीकृष्णराजोभूदकृष्णचरितो
विभुः । धुरन्तस्योढवान्नप्ता जगत्तुंगात्मजो नृपः[5]
।।[१२।।*] अ–

१३ भ्युद्धृतोर्व्वरभरो हठदारितारि[:*] सच्चक्रनन्दककरो
नरकस्य शत्रुः । निर्म्मथ्य वैरिवरवारिधिमाप्तल–

१४ क्ष्माः(क्ष्मीः) साक्षादुपेन्द्र इव सोभवदिंद्रराजः[6] ।।[१३।।*]
यो नासि(शि)तकामात्मा ग(गृ)हीतडाहालनाय–

---

३. वृत्त–उपजाति.

४. श्लोक ९–११ यांचें वृत्त–इंद्रवज्रा.

५. वृत्त–अनुष्टुभ्.

६. वृत्त–वसन्ततिलका.

१५ ककपालः । उत्तरदिग्व(ग्ब)द्धरुची राजति लोके महेश्वर-
वत्[७] ।।[१४।।*] श्वेतिम्ना मेदुरेण प्रवर-
१६ गजघटा दिव्यमातंगयंती शैलान्कैलाश(स)यन्ती गगन-
तलगतान्हंसयन्ती स(श)कुंतान् ।

दुसरा पत्रा : पहिली बाजू

१७ पाताले शेषयन्ती फणिकुलमखिलं गंगयन्ती श्र(स्र)वन्ती-
रब्धी(ब्धी)न्दुग्धोदयन्ती भ्रमति निजगु-
१८ णैः संभृता यस्य कीर्त्तिः[८] ।।[१५।।*] तस्मिन्प्रशासति
महीन्स(हीं स) महीधरेन्द्रामिन्दुद्युतौ चतुरुदन्वद-
१९ निन्ध्यकांचीं(चीम्) । खड्गाभिघातविजिताहितराजराज-
सामन्तमाण्डलिकवन्दितपादपद्मे[९] ।।[१६।।*] [कृ]ष्णरा-
२० जदयावाप्तकृत्स्नसंयानमण्डलः । आसीन्मधुमति[:*]
श्रीमा[न्*] नृपतिस्ताजिकान्वये[१०] ।।[१७।।*] विजित्य कर-
दण्डेन सर्व्ववेलाकु-
२१ लाधिपान् । न्यवीविशत्समं कीर्त्या सर्वत्र करणानि यः
।।[१८।।*] रुच्या रंजितभुवनोरुणमणिरिव सुगतिपो
धरावध्वाः [।*]
२२ भूषणभूतस्याभूत्तत्सुतसहियारहारस्य[११] ।।[१९।।*] क्रान्त्वा
धर्म्मतरीद्वयेन सरितौ म(मं)चप्प्रपंचैऽपराः शाल्यन्नं
प्रविभ-

---

७. वृत्त–आर्या.
८. वृत्त–स्रग्धरा.
९. वृत्त–वसन्ततिलका.
१०. श्लोक १७ व १८ यांचें वृत्त–अनुष्टुभ्.
११. वृत्त–आर्या.

२३ ज्य सूपघृतवत्सत्रे(त्त्रे) समं षड्रसैः । नित्यं यस्य नितांत-
हृष्टमनसः कीर्ति शशांकोज्व(ज्ज्व)लां नानादेशविशेषवेदि-
२४ दिपथिका[12] व्यावर्ण्णयंत्युच्चकैः[13] ॥[२०॥*] अतुल्यवुध्य-
(बुद्ध्य)तिशयानुकृतामरराड्गुरुः । श्रीपुवैय्योभवद्यस्य
मन्त्री मन्त्रविदा-
२५ म्वरः[14] ॥[२१॥*] भारद्वाजकुलस्य मण्डनविधिः श्रीवासु-
देवात्मजः श्रीनारायणभट्ट इत्यभिहितस्तस्यात्मजो
जातवान् ।
२६ आत्रेयोभवदस्य मित्रमसमं श्रीनित्यवर्षानुगः । संयाने
मठिकाभिधानमतुलं योचीकरन्मण्डनम्[15] ॥[२२॥*] तेना-
२७ निलविलुलितवीचिजले विभवजीविते मत्वा । विज्ञप्य
नित्यवर्षं प्रवर्त्तितो भूमिदायोयं(यम्)[16] ॥[२३॥*] तेनायं
श्रीमधु-
२८ मत्यपरनाम्ना श्रीसुगतिपेन भारद्वाजमहर्षिगोत्रतिलकाय-
मानमैत्रायणि(णी)शाखयोपलक्षितसव्र(ब्र)ह्मचारिश्री-
२९ वासुदेवात्मजश्रीनारायणभट्टसुतश्रीमदन्नमैयोपरोधादेत-
त्कृतमठिकासंस्कारार्थ(र्थं) तथात्रनिवासिपंचगौ-
३० डीयमहापर्षदो नवजनानां दशम्याश्च भगवत्या वराकार-
न्यायेन सर्व्वोपकरणोपभोगार्थ(र्थं) तथा प(ध)र्म्मचि-
३१ रस्थितये परमभट्टारकमहाराजाधिराजपरमेश्वरश्रीमदि-
न्द्रराजदेवं विज्ञप्य तदनुमतेन श्रीसंया-

---

१२. हें अक्षर निरर्थक आहे.
१३. वृत्त-शार्दूलविक्रीडित.
१४. 'मंत्रविदां वरः' असें वाचावें. वृत्त-अनुष्टुभ्.
१५. वृत्त-शार्दूलविक्रीडित.
१६. वृत्त-आर्या.

३२ नहंयमनपौरध्रुवबिषयिकाधिकारिकान्मेलयित्वेहैव कोलि-
सहारविषयान्तर्व्वर्त्तिकाणाडुकाभिधान-

३३ ग्रामः शासितो यत्राघाटनानि पूर्व्वतः पर्व्व[तो]परवारि-
प्लवः। दक्षिणेनैतन्नगनिर्ग्गतनदीमारभ्य पाषाणसेम्ब-
(म्ब)का-

३४ परभम्म(स्म)डो(डों)गरिकादक्षिणभागः। पश्चिमतो
भस्म(स्म)डोंगरिकामारभ्य कल्लग्रामपूर्व्वसीमान्तपद्र-
मधूककु[म्भि]क-

३५ चि[ह्ना]वुहिंगवारदक्षिणनदी(दीं) यावदन्तरतो दिगुवार-
चव माताधवारा[१७] दक्षिणवाहिनी पूर्व्वागभवा नदी

दुसरा पत्रा : दुसरी बाजू

३६ एवं चतुराघाटनोपलक्षितः सोद्रंगः सपरिकरः सभोगभागः
सदण्डदशापराधः सधान्यहि-

३७ रण्यादेयः सोत्पद्यमानविष्टिप्रत्यायः साभ्यन्तरसिद्धिरचा-
टभटप्रवेशः सवृक्षमालाकुलः

३८ ससीमापर्यन्तः निधानालीयककुमारीसाहसदोषत्रयवर्जः
आचन्द्रार्क्कार्ण्णवक्षितिसरित्सुमेरु-

३९ कुलाचलसमकालीनः ग्रामो दत्तस्तथा देवीहराख्यग्राममध्ये
भूमिधुरार्द्धं च तदयमस्मद्दायो-

४० स्मद्वंश्यैरन्यैश्चागामिभिर्भूमिपालैः पालयितव्योनुमन्त-
व्यश्च। यत आह। स्वदत्तां परदत्तां वा

४१ यत्नाद्रक्ष नराधिप। महीं महीभृतां श्रेष्ठ दानाच्छ्रेयोनु-

---

१७. या अकरा अक्षरांचा अर्थ लागला नाही.

पालनं(नम्)[१८] ।।[२४।।*] तथा चोक्तं(क्तम्) । व(ब)हुभि-
र्व्वसुधा भुक्ता

४२ राजभिः सगरादिभिः । यस्य यस्य यदा भूमिस्तस्य तस्य
तदा फलं(लम्) ।।[२५।।*] तथा चोक्तं रामभद्रेण ।।

४३ सामान्योयं धर्म्मसेतुर्नृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः ।
सर्व्वानेतां(तान्) भाविनः पार्थि(र्थि)वेंद्रान्भू-

४४ यो भूयो याचते रामभद्रः ।।[२६।।*] अग्नेरपत्यं प्रथमं
सुवर्ण्णं भूर्व्वैष्णवी सूर्यसुताश्च गावः । लोकत्रयं

४५ तेन भवेद्धि दत्तं यः कांचनं गां च महीं च दद्यात्[१९] ।।[२७।।*]
यस्त्वज्ञानपटलान्वितदृष्टिरनिलव(ब)लाहतस-

४६ रित्तरंगभंगुरं तृणाग्रलग्नावश्यायपानवस्थिरं करिकलभ-
कर्ण्णाग्रलोलं श्रान्तविहगगलचपलं

४७ प्रकुपितभुजंगजिह्वांतरि(री)क्षणदि(दृ)[ष्ट]नष्टं प्रतिक्षण-
मनवस्थितगतिजीवितमनालोच्य इहा-

४८ मुत्र च यसः(शः)सौख्यनिदानं दानात्पुण्यसंचयमना-
दृत्यादृष्टफलानभिज्ञो दुर्म्मतिराच्छि-

४९ न्द्यादाच्छिद्यमानं वानुमोदेत स पंचभिर्म्महोपातकैस्सोप-
पातकैश्च संयु-

५० क्त[ः*] स्यादित्युक्तं भगवता वेदव्यासेन [व्या]सेन ।।
षष्टिर्व्वर्षसहस्राणि[२०] स्वर्गे वस-

---

१८. श्लोक २४-२६ यांचें वृत्त-अनुष्टुभ्.

१९. वृत्त-इंद्रवज्रा.

२०. 'षष्टि वर्षसहस्राणि' असें वाचावें.

५१ ति भूमिदः । आच्छेत्तां(त्ता) चानुमंता च तान्येव नरके
वसेत्[२१] ।।[२८।।*] विन्ध्याटवीष्वतो-

तिसरा पत्रा

५२ यासु शुष्ककोटरवासिनः [।*] कृष्णाहयो हि जायंते भूमि-
दायं हरन्ति ये ।।२९।।*]

५३ अन्यायेन हृता भूमिर्हारिता वानुमोदिता । अतीतागामि-
पापानां दहत्या-

५४ सप्तमं कुलं(लम्) ।।[३०।।*] स्वदत्तां परदत्तां वा [यो] हरेत
वसुन्धरां(राम्) । गवां शतसहस्रस्य हतुः(न्तुः)

५५ हरति किल्बिषं(षम्) ।।[३१।।*] ज्ञात्वैवं मत्प्रदत्तोयं
भूमिदायो मनीषिभिः । नोच्छेद्यो भाविभूपालैः स-

५६ र्व्वैरात्महितैषिभिः ।।[३२।।*] यानीह दत्तानि पुरा नरे-
न्द्रैर्द्दानानि धर्म्मार्थ(र्थ)यस(श)स्कराणि । निर्म्माल्य-

५७ वांतप्रतिमानि तानि को नाम साधुः पुनराददीत[२२] ।।[३३।।*]
इति कमलदलांवु(बु)वि(बिं)दुलोलां श्रियमत(व)लो-

५८ क्य मनुष्यजीवितं च । अतिविमलमनोभिरात्मनीनैर्न्न हि
पुरुषैः परकीर्त्तयो विलोप्याः[२३] ।।[३४।।*] श-

५९ कनरपतिकालातीतसम्वत्सरशतेष्वष्टास्वष्टाचत्वारि(रिं)-
शदधिकेषु वैशाखशुद्धाक्षततृतीयायां

---

२१. श्लोक २८-३२ यांचें वृत्त-अनुष्टुभ्.

२२. वृत्त-इंद्रवज्रा.

२३. वृत्त-पुष्पिताग्रा.

६० सोमे अ(अं)कतोपि सस्व(संव)त्सरे ८४८ व्ययसम्व-
(संव)त्सरेऽव्ययधर्म्मकोशवृद्धये लिखितमिद(दं) शा-

६१ सनं परमेश्वरपरमभट्टारकमहाराजाधिराजश्रीमदकाल-
वर्षदेवपादानुध्यातश्रीनित्य-

६२ वर्षदेवानुज्ञातश्रीसुगतिपाज्ञया संधानध्रुववर्थयानुमतेन
सुगतेन श्रीध्रुवराजसांधिविग्र-

६३ हिकाजितसुतेनेति ॥ यदत्रोनाक्षरमधिकाक्षरं वा तत्सर्व्वं
प्रमाणमिति ॥ ग्रामः काणाडुका-

६४ ख्यो वरधरणिधुरार्द्धं च देवीहराख्ये दत्तं येनेह स श्रीसुग-
तिपनृपतिः सूर्यतेजः(जाः) प्रसा(शा)स्ति । आन्नेयः
कीर्त्तनेन

६५ त्रिभुवनजयिना रेवणः कौतुकश्च सार्द्धं देव्याः प्रसादाद-
मरगिरिवरस्थायुकाः संतु सर्व्वे[२४] ॥[३५॥*] यावद्वीचीतरं-
गप्रच-

६६ लितमकरग्राहनक्राकुलोर्म्मिव्याविद्धो धूततोयक्षुभितकल-
कलारावरौद्रः समुद्रः । यावन्नक्षत्रचन्द्रग्रहग-

६७ णकिरणालंकृतांगश्च मेरुस्तावद्देव्याः प्रसादादविहतम-
मल(लं) शासनं स्थास्नु भूयात् ॥[३६॥*] मंगलं महती
च [श्री]: ॥

---

२४. श्लोक ३५ व ३६ यांचें वृत्त—स्रग्धरा.

१३. परमारनृपति जगद्देव याचा डोंगरगाव शिलालेख

उपलब्धि—हा शिलालेख सन १९३९ मध्ये माझे विद्यार्थी मित्र डॉ. मा. गो. देशमुख यांनी माझे नजरेस आणला. त्यांनी व पुसद येथील त्या वेळचे तहसीलदार श्री. तत्त्ववादी यांनी घेतलेल्या छापांवरून मी तो प्रथम वाचला आणि त्यावर एक संक्षिप्त टिप्पण स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलें. नंतर माझ्या विनंतीवरून भारत सरकारचे लेखशास्त्रज्ञ डॉ. छाबडा यांनी त्याचे उत्कृष्ट छाप मला पुरविले. त्यांवरून मी तो एपिग्राफिया इंडिका, पु. २६, पृ. १७७–१८५ मध्ये प्रसिद्ध केला. मराठींत तो येथे प्रथमच प्रसिद्ध होत आहे.

प्राप्तिस्थान—डोंगरगाव हें विदर्भाच्या यवतमाळ जिल्ह्यांत पुसदपासून सुमारें दहा मैलांवर एका टेकडीवर वसलें आहे. तेथे दोन जुनीं देवालयें आहेत. त्यांपैकी एक बऱ्या स्थितींत असून दुसरें अत्यंत जीर्णावस्थेंत आहे. त्याचें गर्भगृह पडलें असून मंडप मात्र सध्या उभा आहे. प्रस्तुत लेख गर्भगृहाच्या दरवाजाच्या गणेशपट्टीवर कोरला आहे. त्याच्या आठ ओळी असून त्यांनी ४ फूट ३½ इंच रुंद व ७½ इंच उंच इतकी जागा व्यापिली आहे. हा लेख ज्या शिलेवर लिहिला आहे ती आरंभीं चांगली गुळगुळीत केली नव्हती. तशांत ती आज अनेक वर्षें उन्हापावसांत असल्यामुळे हा लेख बराच खराब झाला आहे. तथापि महाप्रयासाने व चिकाटीने तो बहुतेक पूर्णपणें वाचतां येतो. ओळी १, ५, ७ व ८ यांतील दहा बारा अक्षरें मात्र आता नष्ट झालीं आहेत. त्यांतील कांही अनुमानाने जुळवितां येतात.

अक्षरवटिका—या लेखाची लिपी नागरी आहे. तिचा उल्लेखनीय विशेष हा की व्यंजनयुक्त ऐ व औ यांच्या दोन्ही मात्रा कांही ठिकाणीं

त्या त्या अक्षरांच्या मागे दिल्या आहेत. या काळच्या इतर लेखांत सामान्यतः त्यांतील एक मात्रा अक्षराच्या डोक्यावर व दुसरी पृष्ठमात्रा-रूपाने असते. तसा प्रकार प्रस्तुत लेखांत कांही ठिकाणीं आढळतो. कांही ठिकाणीं 'ब' बद्दल 'व' च लिहिला आहे; 'बभूव' (ओ. २) यांत मात्र 'ब' हा 'व' हून निराळा आहे.

भाषा—प्रस्तुत लेखाची भाषा संस्कृत असून त्याचा बहुतेक भाग गद्यांत आहे. आरंभींचें देवतानमन व शेवटचा कांही भाग—शापात्मक वचन, लेखाची मिती व लेखकाचें नांव हा—गद्यांत आहे.

विषय—प्रस्तुत लेख परमारनृपति जगद्देव याच्या काळचा आहे. त्याचा उद्देश जगद्देवाने श्रीनिवास नामक ब्राह्मणाला डोंगरगाव हा गाव दान दिला आणि त्या ठिकाणीं श्रीनिवासाने आपला पिता श्रीनिधि याच्या पुण्योपार्जनाकरिता एक शिवमंदिर बांधलें हें नमूद करण्याचा होता. याचा लेखक विश्वस्वामिन् नामक होता.

प्रस्तुत लेखाची मिती 'शकसंवत् १०३४, नंदन संवत्सर, चैत्री (पूर्णिमा)' अशी दिली आहे. तींत वाराचा उल्लेख नसल्यामुळे ती पडताळून पाहतां येत नाही. तथापि दाक्षिणात्य पद्धतीप्रमाणे शके १०३४ ला नंदनसंवत्सर हेंच नांव होतें. या मितीची इंग्रजी तारीख १५ मार्च सन १११२ अशी येते. तो दिवस शुक्रवार होता.

परमारनृपति जगद्देव याचा आतापर्यंत आणखी एकच लेख आन्ध्र प्रदेशाच्या अदिलाबाद जिल्ह्यांतील जयनद येथे सापडला आहे.[१] पण त्यांत मितीचा उल्लेख नाही. प्रस्तुत लेखांत मिती दिली आहे म्हणून त्याचें महत्त्व विशेष आहे. शिवाय परमारनृपतीचे आणखी दोन तीनच लेख विदर्भांत सापडले आहेत. त्यामुळेहि प्रस्तुत लेखाला महत्त्व आहे.

कोरीव लेखांच्या शिरस्त्याप्रमाणे या लेखांत आरंभीं जगद्देवाच्या पूर्वजांविषयी माहिती दिली आहे. यांतील दुसऱ्या श्लोकांत म्हटलें आहे की

---

१. एपिग्राफिया इंडिका, पु. २२, पृ. ५४–६३. या लेखाचे संपादक डॉ. धीरेंद्रचन्द्र गंगुली यांचीं कित्येक विधानें प्रस्तुत लेखामुळे बदलावीं लागतील.

अर्बुद (सध्याच्या अबू) पर्वतावर विश्वामित्र वसिष्ठ ऋषीची कामधेनु बलात्काराने नेत असतां त्या ऋषीला क्रोध आला आणि त्याने आपल्या होमाग्नीपासून परमाराची उत्पत्ति केली. त्या वंशांत भोज नामक राजा होऊन गेला. तो आपल्या गुणांनी रामचंद्रासारखा होता. नंतर तीन शत्रूंनी केलेल्या आक्रमणांत मालवभूमि मग्न झाली असतां भोजाचा भ्राता उदयादित्य याने तिचा उद्धार केला. त्याच्या शुभ्र कीर्तीने सर्व भुवनें, शत्रूंनी गुहा, आणि याचकांनी केलेल्या काव्यांनी दूरच्या दिशा व्यापल्या होत्या. त्याला अनेक पुत्र होते, तथापि त्यांपैकी एकहि आपल्या मनाप्रमाणे नसल्याने त्याने भगवान् शंकराची आराधना केली. त्याच्या प्रसादाने त्याला जगद्देव नामक पुत्र झाला. उदयादित्य स्वर्गवासी झाल्यावर राज्यलक्ष्मी स्वतः चालून आली असतांहि वडील भावांना दूर सारून आपण गादीवर बसलों तर आपणांस परिवित्तिचें पातक[२] लागेल असें वाटून त्याने ती राज्यलक्ष्मी आपल्या वडील भावाला अर्पण केली. नंतर तो कुंतलनृपतीकडे गेला. त्याने त्याचें पुढील शब्दांनी स्वागत केलें—'तूं माझ्या पुत्रांमध्ये श्रेष्ठ असून माझ्या राज्याचा स्वामी, माझा उजवा हात, सर्व दिशांस आक्रमण करणारा विजय, किंबहुना माझा आत्माच आहेस.' नंतर त्याच्या कृपेने जगद्देव दक्षिण दिशेचा अलंकार झाला. तो शत्रूंवर बाणांचा व याचकांवर धनाचा वर्षाव करी, तेव्हा ते अनुक्रमें आपलें सैन्य टाकून देऊन त्याची निःशंक मनाने सेवा करीत. नंतर म्हटलें आहे की—

न स देशो न स ग्रामो न स लोको न सा सभा ।
न तन्नक्तंदिवं यत्र जगद्देवो न गीयते ॥

---

२ येथे परिवित्ति हा शब्द 'वडील भावाच्या अगोदर विवाह करणें' या अर्थी योजिला आहे. असा विवाह स्मृतिकारांनी निषिद्ध ठरविला आहे. पाहा—परिवित्तिः परिवेत्ता यया च परिविद्यते । सर्वे ते नरकं यान्ति दातृयाजकपञ्चमाः ।। मनुस्मृति. ३, १७२. या श्लोकांत अशा वडील भावासच परिवित्ति म्हटलें आहे. इतर स्मृतिकार त्यास परिविन्न म्हणतात.

‘असा कोणताहि देश, गाव, भुवन, सभा किंवा कोणतेंहि ठिकाण नाही की ज्या ठिकाणीं जगद्देवाची कीर्ति रात्रंदिवस गाइली जात नाही.’

चर्चा—प्रस्तुत लेखांतील ऐतिहासिक माहिती अत्यंत महत्त्वाची आहे. परमारांच्या कांही उत्तरकालीन लेखांतल्याप्रमाणे येथेहि त्यांची उत्पत्ति अर्बुद पर्वतावर वसिष्ठाच्या होमाग्नीपासून झाली असें म्हटलें आहे. या तऱ्हेचें वर्णन प्रतीहार, चाहमान व चालुक्य या आणखी तीन राजवंशांच्या बाबतींत चंद भाटाच्या ‘पृथ्वीराजरासो’ या ग्रंथांत केलें आहे. यावरून हे चारी राजवंश मूळचे परकी असून नंतर त्यांना यज्ञ-संस्काराने हिंदुधर्मांत समाविष्ट करून घेण्यांत आलें अशी कल्पना कै. डॉ. देवदत्तपंत भांडारकर यांनी मांडली होती. पण तिला कांही आधार नाही. मध्ययुगांतील भारतीय राजे आपण सूर्य, चंद्र इत्यादि देव, कौरव, पांडव यांसारखे पुराणप्रसिद्ध राजवंश, हैहय, कर्ण, नल इत्यादि प्राचीन कालचे सुविख्यात नृपति आणि भारद्वाजासारखे ऋषि यांच्या पासून उत्पन्न झालेल्या राजवंशांत जन्मलों असें सांगण्यांत भूषण मानीत. परमार नृपति याला अपवाद नव्हते. इतर राजवंश सूर्य किंवा चंद्र याच्यापासून आपली उत्पत्ति झाल्याचें सांगतात तसें आपणहि आपल्या कुलाचा संबंध सूर्यचंद्रां-प्रमाणे सर्व भारतीयांस पूज्य असलेल्या अग्नीशीं जोडावा असें त्यांस वाटल्यास नवल नाही. अशा प्रकारच्या इच्छेपासून ही अग्निकुलाची कल्पना निघालेली दिसते. तिचा पहिला उल्लेख दहाव्या शतकाच्या अखेरीस झालेल्या पद्मगुप्ताच्या ‘नवसाहसांकचरितां’त आढळतो. परमारांच्या तत्पूर्व-कालीन कोरीव लेखांत ही कल्पना दिसत नाही. तसेंच प्रतीहार, चाहमान व चालुक्य यांच्याहि कोरीव लेखांत ती आढळत नाही. तेव्हा ही केवळ कविकल्पना असून पुढे चंद भाटाने आपल्या ग्रंथांत तिचा पुरस्कार केला यांत संशय नाही.

प्रस्तुत लेखाच्या पांचव्या श्लोकांत ‘तीन शत्रूंच्या आक्रमणामुळे मग्न झालेल्या मालवभूमीचा उद्धार भोजाचा भ्राता उदयादित्य याने केला’ असें म्हटलें आहे. धाराधिपति सुविख्यात राजा भोज आणि त्याच्या नंतर कांही काळाने माळव्याच्या गादीवर आलेला उदयादित्य

यांचा संबंध नक्की कोणत्या तऱ्हेचा होता याविषयी निश्चित माहिती प्रस्तुत लेखाने प्रथमच प्राप्त होत आहे. यापूर्वी प्राप्त झालेल्या नागपूर संग्रहालयांतील मालवनृपतिप्रशस्तींत भोजाच्या निधनानंतर मालवभूमीवर आलेल्या संकटाचें वर्णन खालील श्लोकांत[३] केलें आहे—

> तस्मिन् वासवबन्धुतामुपगते राज्ये च कुल्याकुले
> मग्नस्वामिनि तस्य बन्धुरुदयादित्योऽभवद्भूपतिः ।
> येनोद्धृत्य महार्णवोपममिलत्कर्णाटकर्णप्रभु-
> मुर्वीपालकदर्थितां भुवमिमां श्रीमद्वराहायितम् ॥

(तो भोजराजा इन्द्राचा बन्धु झाला म्हणजे स्वर्गास गेला, तेव्हा माळव्याच्या राज्यांत बंडाळी माजली. नंतर राज्याचा स्वामी (जयसिंह) हा मारला गेला. तेव्हा त्याचा (भोजाचा) बन्धु उदयादित्य गादीवर आला. कर्णाटनृपति आणि कर्णराजा यांनी दोन्ही बाजूंनी सागराप्रमाणे आक्रमण केल्यामुळे मग्न झालेल्या या पृथ्वीचा उद्धार करून त्याने भगवान् विष्णूच्या वराहावतारांतल्याप्रमाणें आचरण केलें.)

या श्लोकांत उदयादित्याला भोजाचा बंधु म्हटलें आहे खरें. पण 'बन्धु' या शब्दाचे संस्कृतमध्ये दोन अर्थ होतात—(१) भाऊ आणि (२) दूरचा नातेवाईक. उदयादित्याने स्थापिलेल्या उदयपुरनगरांत एक उत्तरकालीन शिलालेख सांपडला आहे. त्यांत उदयादित्य हा परमारवंशी शूरवीराचा पणतू, गोंडालाचा नातू आणि ग्याता याचा पुत्र होता असें म्हटलें होतें. त्यावरून तो सिन्धु राजाचा पुत्र भोज याचा सख्खा भाऊ नसून परमारांच्या दुसऱ्या एका शाखेंत जन्मला होता हें स्पष्ट दिसत होतें. म्हणून वर उद्धृत केलेल्या नागपूर संग्रहालय प्रशस्तीच्या श्लोकांतील 'बन्धु' याचा अर्थ 'दूरचा नातेवाईक' असाच करण्यांत येत असे. जयनद येथे अलीकडे सापडलेल्या शिलालेखांत भोज हा जगद्देवाचा पितृव्य होता असें म्हटलें आहे. तथापि त्यावरूनहि भोज व उदयादित्य यांचा परस्पर संबंध स्पष्ट होत

३. एपिग्राफिया इंडिका, पु. २, पृ. १८५.

नव्हता.[४] प्रस्तुत लेखांत उदयादित्याला भोजाचा भ्राता (भाऊ) म्हटलें असल्याने आता या बाबतींत संशयास जागा राहिली नाही. पूर्वोक्त उदयपूरच्या लेखांत उदयादित्याची निराळीच वंशावळ दिली आहे खरी, पण तो लेख उदयादित्यानंतर शेंकडो वर्षांनी पंधराव्या शतकांत लिहिला असल्यामुळे त्यांतील माहिती विश्वसनीय मानतां येत नाही.

उपरिनिर्दिष्ट पांचव्या श्लोकांत भोजाच्या निधनानंतर तीन शत्रूंनी मालव भूमीवर आक्रमण केलें असतां उदयादित्याने तिचा उद्धार केला असें म्हटलें आहे, त्याचा आता विचार करूं. या वर्णनाचें स्वारस्य ध्यानांत येण्यासाठी तत्कालीन इतिहासांतील कांही घटना लक्षांत घेतल्या पाहिजेत. माळव्याच्या परमारांचे चेदिदेशाचे कलचुरि, गुर्जरत्राचे (गुजराथचे) चौलुक्य व कुंतलचे (दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकचे) उत्तर चालुक्य या राजांशी वारंवार खटके उडत असत. धाराधीश भोजाने कलचुरि नृपति गांगेयदेव याचा पराभव केला होता. भोजाच्या निधनानंतर गांगेयाचा पुत्र कर्ण याने गुजराथचा चौलुक्य नृपति भीम याच्याशीं संधान बांधलें. त्या दोघांनी पूर्व व पश्चिम या दोन्ही दिशांनीं माळव्यावर चाल केली आणि त्याची राजधानी धारा काबीज करून जयसिंह नामक भोजाच्या उत्तराधिकाऱ्याला पदच्युत केलें. तेव्हा जयसिंह कुंतल देशाचा चालुक्यनृपति सोमेश्वर–आहवमल्ल याच्याकडे मदतीची याचना करण्यास कल्याणी येथे गेला. परमार व चालुक्य यांचें हाडवैर कित्येक पिढ्या चालू होतें. चालुक्य नृपति तैलपाने सुविख्यात परमार नृपति मुंज यास पकडून बंदींत टाकलें होतें व नंतर त्याचा क्रूरपणाने शिरच्छेदहि केला होता. स्वतः सोमेश्वराने पूर्वी धारानगरीवर स्वारी करून भोजास पिटाळून लावलें होतें. तथापि जयसिंह आपल्या आश्रयास आलेला पाहून सोमेश्वराने पूर्वीचा वैरभाव विसरून त्यास साहाय्य करण्याचें ठरविलें. कारण तसें केलें नाही तर कर्ण जास्तच प्रबळ होऊन आपल्या राज्यास धोका उत्पन्न करील अशी त्यास

४. त्या लेखाचे संपादक डॉ. गंगुली यांनीहि उदयादित्य हा भोजाचा दूरचा नातेवाईक होता, असेंच म्हटलें आहे. एपिग्राफिया इंडिका, पृ. २२, पृ. ५६.

भीति होती. त्याने आपला पुत्र विक्रमादित्य यास मोठी सेना देऊन कर्णाचें पारिपत्य करण्यास पाठविलें. त्याने कर्णाचा पूर्ण पाडाव करून जयसिंहास माळव्याच्या गादीवर बसविलें. ही घटना सन १०५५ च्या पूर्वी घडली असावी. कारण त्या वर्षी आषाढ महिन्यांत जयसिंहाने दिलेला ताम्रपट उपलब्ध झाला आहे.[५]

यानंतर सुमारें पंधरा वर्षांनी कर्णाने पुनः मालव देश जिंकण्याचा प्रयत्न केला. त्या प्रसंगाचें वर्णन प्रस्तुत लेखाच्या पांचव्या श्लोकांत केलें आहे. त्यांत म्हटलें आहे की तीन शत्रूंच्या आक्रमणाने मालव भूमि मग्न झाली होती. हे तीन शत्रु कोण हें त्या श्लोकांत सांगितलें नाही, पण नागपूर संग्रहालय प्रशस्तींत त्यांपैकी दोघांचा कर्णाटकनृपति व कर्ण असा उल्लेख आला आहे. या प्रशस्तीचे संपादक डॉ. कीलहॉर्न यांनी त्या श्लोकाचा उत्तरार्ध खालीलप्रमाणे वाचला होता--

येनोद्धृत्य महार्णवोपममिलत्कर्णाटकर्णप्रभु-
मुर्वीपालकदर्थितां भुवमिमां श्रीमद्वराहायितम् ।

यांतील पहिल्या पादाचा शेवट वृत्तानुकूल नव्हता म्हणून कै. चिंतामणराव वैद्य यांनी 'महार्णवोपममिलत्कर्णाटकर्णप्रभृत्युर्वीपालकदर्थितां' असा पाठ सुचविला होता.[६] प्रस्तुत लेखाचा अभ्यास करतांना नागपूर संग्रहालयांतील ही प्रशस्ति मला लक्षपूर्वक मुळावरून वाचावी लागली. तेव्हा कै. वैद्यांनी सुचविलेला पाठ मुळांतच आहे असें मला आढळून आलें आणि त्यांच्या कल्पकतेचें कौतुक वाटलें. या पाठावरून या प्रसंगीं मालवभूमीवर आक्रमण करणारे शत्रु कर्णाटनृपति व कर्ण हे दोघेच नसून आणखीहि होते, असें स्पष्ट दिसतें. प्रस्तुत लेखाच्या पांचव्या श्लोकांत तर ते तीन होते, असा स्पष्टच निर्देश आहे. हे शत्रु कोण याचा आता विचार करूं.

---

५. एपिग्राफिया इंडिका, पु. ३, पृ. ४६–५०

६. कै. चिंतामणराव वैद्यांचा मेडिईव्हल हिस्टरी ऑफ् इंडिया, भाग ३, पृ. १६९–१७० पाहा.

यांपैकी कर्ण हा त्रिपुरीचा (जबलपुरजवळच्या तेवरचा) कलचुरि नृपति होय हें उघड आहे. त्याच्या आक्रमक धोरणामुळे व त्याने अनेक राजांवर मिळविलेल्या विजयांमुळे त्याला 'हिंदी नेपोलियन्' अशी सार्थ पदवी इतिहासकारांनी दिली आहे. दुसरा शत्रु कर्णाटनृपति हा सोमेश्वर-आहवमल्लाचा पुत्र द्वितीय सोमेश्वर हा असावा. सोमेश्वर-आहवमल्लानें पूर्वी पदच्युत झालेल्या परमार जयसिंहास माळव्याच्या गादीवर बसविलें होतें, हें आपण पाहिलें आहेच. पण मध्यंतरींच्या काळांत दक्षिणेंतील राजकीय परिस्थितींत पुष्कळच बदल झाला होता. या वेळीं सोमेश्वर-आहवमल्ल निधन पावून त्याची गादी त्याचा वडील मुलगा द्वितीय सोमेश्वर यास मिळाली होती. त्याला आपल्या महापराक्रमी विक्रमादित्य नामक लहान भावाची भीति वाटत होती. म्हणून त्याने कलचुरि कर्णाशीं संधान बांधून त्याला मालव देशावर स्वारी करण्यांत मदत करण्याचें ठरविलें. तेव्हा मालव देशावर आक्रमण करणारे दोन शत्रु कर्णाटनृपति द्वितीय सोमेश्वर व कलचुरि नृपति कर्ण हे असावे.

तिसरा शत्रु कोण याचा स्पष्ट निर्देश कोठेहि नाही. तथापि त्या बाबतींत अनुमान करण्यास साधनें आहेत. कर्णाटकांत सापडलेल्या अनेक कोरीव लेखांवरून पश्चिम गंग नृपति उदयादित्य व त्याचा मांडलिक होयसळवंशी एडेयंग यांनी या प्रसंगीं द्वितीय सोमेश्वरास माळव्यावर स्वारी करण्यांत साहाय्य केलें असें दिसतें. एडेयंग याने मालव सैन्याचा पूर्ण पराजय केला, मालवनृपतीचा दुर्ग लुटला व धारा नगरी जाळून उध्वस्त केली असें वर्णन कर्णाटकांतील कोरीव लेखांत आढळतें.

द्वितीय सोमेश्वर, कर्ण व उदयादित्य हे मालव देशावर चालून गेले तेव्हा त्यांच्या सेनासागरांत मालव भूमि बुडून गेली (मग्नां मालवमेदिनीम्), मालवनृपति जयसिंह हा त्या युद्धांत मारला गेला (मग्नस्वामिनि राज्ये) आणि सर्वत्र हाहाकार उडाला. या प्रसंगाचें वर्णन करतांना माळव्याच्या कोरीव लेखांत त्याला प्रलयकालाची किंवा सूर्य अस्तास गेल्यावर सर्वत्र घनदाट अंधकार प्रसरतो त्याची उपमा दिली आहे. त्यावरून मालव देशांत सर्वत्र निराशेचें वातावरण कसें पसरलें होतें, याची कल्पना येईल.

या प्रसंगीं भोजाचा भ्राता उदयादित्य हा पुढे सरसावला आणि त्यानें लौकरच माळव देशाला शत्रूच्या मगरमिठींतून सोडविलें. त्याला कोरीव लेखांत प्रलयकालीं पृथ्वीला समुद्रांतून वर काढणाऱ्या वराह अवताराची आणि घनदाट अंधकाराचा नाश करून आपल्या किरणांनी लोकांचीं मनें उल्हसित करणाऱ्या सूर्याची उपमा दिली आहे. उदयपुर प्रशस्तीचा उत्तरार्ध पूर्वी उपलब्ध नव्हता तो आता सापडला आहे. त्यांत उदयादित्याने डाहलाधीशाचा अर्थात् कलचुरिकर्णाचा संहार केला[७] असें म्हटलें आहे.

जगद्देव हा या महाप्रतापी उदयादित्याचा कनिष्ठ पुत्र होय. याशिवाय उदयादित्याला लक्ष्मदेव व नरवर्मन् नामक आणखी दोन पुत्र होते असें कोरीव लेखांवरून दिसतें. तथापि त्यांच्यावर त्याची मर्जी नव्हती. म्हणून त्याने भगवान् शंकराची आराधना केली आणि त्याच्या प्रसादाने त्याला जगद्देव हा पुत्र झाला. आपणानंतर आपलें राज्य जगद्देवास—तो कनिष्ठ पुत्र असला तरी—मिळावें अशी तजवीज उदयादित्याने करून ठेवली होती असें दिसतें. त्याप्रमाणे उदयादित्याच्या निधनानंतर राज्यलक्ष्मी जगद्देवाकडे चालून आली. पण आपल्या वडील भावांचा हक्क दूर सारून आपण तिचा स्वीकार केला तर वडील भावाच्या अगोदर विवाह करण्याने जें पातक होतें तें आपणांस लागेल या भीतीने त्याने तिला आपल्या वडील भावाच्या स्वाधीन केलें असें प्रस्तुत लेखाच्या आठव्या श्लोकांत म्हटलें आहे. तेव्हा जगद्देव माळव्याच्या गादीवर बसला नव्हता, हें स्पष्ट आहे. होयसळ नृपतींच्या कांही कोरीव लेखांत जगद्देवाला मालवनृपति म्हटलें आहे. त्याचें नांव परमारांच्या वंशावळींत येत नसल्याने उदयादित्याचा पुत्र व उत्तराधिकारी लक्ष्मदेव याचेंच जगद्देव असें दुसरें नांव असावें असें अनुमान कांही विद्वानांनी केलें होतें. प्रस्तुत लेखावरून तें चूक ठरत आहे. जगद्देव हा परमारनृपति लक्ष्मदेव व नरवर्मन् यांच्याहून भिन्न असून तो कधीच माळव्याच्या गादीवर बसला नव्हता, यांत संशय नाही.

---

७. यावरून उदयादित्याने ज्याचा पराभव केला तो कर्ण गुजराथचा नृपति चौलुक्यवंशी कर्ण होता, हें डॉ. गंगुली यांचें मत चूक ठरत आहे.

जगद्देवाविषयी अनेक आख्यायिका 'रासमाला', 'प्रबन्धचिन्तामणि' इत्यादि गुजराथमध्ये लिहिलेल्या बखरवजा संस्कृत प्रबन्धग्रंथांत दिल्या आहेत. त्यांपैकी एकींत म्हटलें आहे की उदयादित्याला वाघेला व सोळंकी या वंशांतील दोन राण्या होत्या. पहिलीचा मुलगा रणधवल हा दुसरीच्या जगद्देवापेक्षा वडील होता. उदयादित्य वाघेला राणीच्या मुठींत असल्यामुळे, जगद्देव आपल्या आजोळीं गुजराथच्या सिद्धराज जयसिंहाकडे निघून गेला. तेथे तो अठरा वर्षें राहिला. पुढे सिद्धराज माळव्यावर आक्रमण करण्याचे बेत करीत आहे असें समजल्यावर देशभक्त जगद्देवाला गुजराथेंत राहवेना. तो तडक माळव्यांत गेला. तेथे उदयादित्याने मोठ्या प्रेमाने त्याचें स्वागत केलें व त्याला आपला उत्तराधिकारी नेमलें. उदयादित्यानंतर जगद्देव माळव्याच्या गादीवर बसला व त्याने बावन वर्षें राज्य केलें.

प्रस्तुत लेखांतील वर्णनावरून ही आख्यायिका सर्वस्वी बनावट ठरत आहे.[८] जगद्देवाने माळव्याचा त्याग केला खरा, पण तो उदयादित्या-नंतर. आपला वडील भाऊ लक्ष्मदेव यास माळव्याचें राज्य देऊन जगद्देव कुन्तलदेशाधिपति चालुक्य नृपति विक्रमादित्याकडे गेला. त्याने त्या शूर व उदार परमार कुमाराचें मोठ्या प्रेमाने स्वागत केलें. प्रस्तुत लेखांत विक्रमा-दित्याच्या तोंडचे शब्दच खालील श्लोकांत दिले आहेत—

> **पुत्राणां प्रथमोऽसि राज्यविषयस्वामी भुजो दक्षिणः**
> **सर्वास्वेव हरित्सु जङ्गम इयत्सीमा जयो मूर्तिमान् ।**
> **आत्मैवेति च सप्रसादमुदितो यः कुन्तलक्ष्माभृता**
> **ताद्रूप्यं दधदेव दक्षिणदिशालङ्कारतां पुष्यति ।।**

विक्रमादित्याने परमारांपासून जिंकून घेतलेला गोदावरीच्या उत्तरेचा प्रदेश जगद्देवाच्या स्वाधीन केला असें दिसतें. म्हणून जगद्देवाचे दोन शिलालेख यवतमाळ जिल्ह्यांतील डोंगरगांव व अदिलाबाद जिल्ह्यांतील जयनद येथे सापडले आहेत. जयनद हें डोंगरगांवाच्या पूर्वेस सुमारें साठ मैलांवर आहे.

---

८. डॉ. गंगुलीहि जगद्देव उदयादित्यानंतर गादीवर बसला असें म्हणतात. पण प्रस्तुत लेखावरून त्यांचें मत बरोबर दिसत नाही.

यानंतर जगद्देवाने आपला सम्राट् चालुक्य नृपति विक्रमादित्य याच्या अनेक युद्धांत भाग घेऊन विजय मिळविले. जयनदच्या शिलालेखांत त्याने गुजरात, आंध्र, चक्रदुर्ग (बस्तर जिल्हा) व दोरसमुद्र येथे मिळविलेल्या विजयांचा उल्लेख आहे. दोरसमुद्र ही होयसळांची राजधानी (हळेबीड) होय. होयसळांच्याहि लेखांत या युद्धांचा निर्देश आला आहे. त्यांत म्हटलें आहे की जगद्देवानें आपल्या सम्राटाचें मोठें सैन्य घेऊन होयसळांच्या प्रदेशावर स्वारी केली व त्यांच्या दोरसमुद्र या राजधानीपर्यंत धडक मारली. पण तेथे एडेयंग राजाच्या प्रथम बल्लाळ, विष्णुवर्धन व उदयादित्य या तीन पुत्रांनी त्याचा पराभव केला.

रासमालेंत म्हटलें आहे की जगद्देव ८५ वर्षें वयाचा होऊन निधन पावला आणि त्याने आपणानंतर जगद्धवल नामक आपल्या मुलास गादीवर बसविलें. रासमालेंतील अनेक गोष्टी काल्पनिक असल्यामुळे या विधानांत किती तथ्य आहे तें सांगतां येत नाही.

शौर्याप्रमाणे दातृत्वाबद्दलहि जगद्देवाची कीर्ति होती. त्याच्या दातृत्वाविषयी अनेक कथा व श्लोक मेरुतुंगाच्या 'प्रबंधचिन्तामणीं'त आल्या आहेत. नमुन्यादाखल खालील श्लोक पाहा.[१]

क्षोणीरक्षणदक्षदक्षिणभुजे दाक्षिण्यदीक्षागुरौ
श्रेयःसद्मनि धन्यजन्मनि जगद्देवे जगद्दातरि ।
वर्तन्ते विदुषां गृहाः प्रतिदिनं गन्धेभगन्धर्वयो-
रालानद्रुमरज्जुदामघटनाव्यग्रीभवत्किंकराः ।।

[ज्याचा उजवा हात पृथ्वीच्या रक्षणांत दक्ष आहे, जो इतरांना दाक्षिण्याची दीक्षा देणारा गुरु आहे, असा कल्याणास्पद, धन्यजन्मा जगद्देव दाता असतांना विद्वानांच्या घरीं त्यांचे सेवक गन्धगजांना व घोडयांना बांधण्याकरिता वृक्ष शोधण्यांत व दोरखंड वळण्यांत सदैव व्यग्र असतात.]

---

१. प्रबन्धचिन्तामणि (दुर्गाशंकरनी संपादिलेला), पृ. १८९. 'शार्ङ्गधरपद्धतीं'तील क्रमांक १२६१ चें सुभाषित याच जगद्देवाविषयी असावें.

स्थलनिश्चय—प्रस्तुत लेखांतील **अर्बुद** व **मालव** सुप्रसिद्ध आहेत. **कुन्तल** हें दक्षिण महाराष्ट्र व त्यालगतचा कर्णाटक यांचें नांव होतें. **डोंगरगांव** हें अर्थातच हा लेख जेथे आहे त्याचें प्राचीन काळापासून चालत आलेलें नांव होय.

ओळ **वाचन**[1]

१ [ओं] नमः शिवाय । कुर्व्वन्वः पातु जगतां प्रभवस्थिति-
संहि(ह्)तीः । तिस्रः ⏑ ⏑ ⏑ – – ⏑ विश्वं यत्र[2]
[सु]वर्त्तकः ।१। अस्त्यर्व्वु(र्ब्बु)द इति ख्यातः प्रतीच्यां
दिशि पर्वतः । मेखलाद्यन्तसंचारिकूर्मराजदिवाकरः ।२।
कामधेनुं [हृतवते]
२ विश्वामित्राय कुप्यतः । वसिष्ठात्तत्र होमाग्नौ परमारो
व्यजायत ।३। तद्वन्से[3] क्षत्रचरितैः पुष्पवन्तान्वयाधिके ।
बभूव भोजदेवाख्यो राजा रामसमो गुणैः ।४। ततो रिपुत्र-
यस्कन्दैर्मग्नां मालव[मेदिनीम्] । उ-
३ द्धरन्नुदयादित्यस्तस्य भ्राता व्यवर्द्धत ।५। यस्याच्छया
दिशाः कीर्त्या भुवनानि परैर्गुहाः । [काष्ठाः] परा व(ब)-
लादेव काव्यैर्व्याप्यन्त चार्थितः ।६। तस्य सत्स्वपि पुत्रेषु
स्वसम्मतसुतैषिणः । हराराधनतो जज्ञे जगद्देवो म[ही]-
४ पतिः ।७। दिवं प्रयाते पितरि स्वयं प्राप्तामपि श्रियम् ।
परिवित्तिभयात्त्यक्त्वा योऽग्रजाय न्यवेदयत् ।८। पुत्राणा-

१. डॉ. छाबडा यांनी पाठविलेल्या छापावरून. हा छाप माझ्या लेखांत, एपिग्राफिया इंडिका, पु. २६, पृ. १८३ समोर, प्रकाशित झाला आहे.

२. श्लोक १ ते ८ यांचें वृत्त अनुष्टुभ्.

३. 'तद्वंशे' असें वाचावें.

म्प्रथमोऽसि राज्यविषयस्वामी भुजो दक्षिणः। सर्वास्वेव हरित्सु जङ्गम [इ]-

५ यत्सीमा जयो मूर्तिमान्। आत्मैवेति च सप्रसादमुदितो यः कुन्तलक्ष्माभृता ताद्रूप्यन्दधदेव दक्षिणदिशालङ्कारतां पुष्यति[४]।९। अर्थिप्रत्यर्थिनो यस्मिन्वा(न्बा)[५]णैः स्वर्णैश्च वर्षति। दैन्यसैन्य[निधि] मुक्त्वा – –

६ ङ्कितमुपासते[६]।१०। न स देशो न स ग्रामो न स लोको न सा सभा। न तन्नक्तंदिवं यत्र जगद्देवो न गीयते।११। आचन्द्रार्क्कं शासनीकृत्य तेन क्ष्मापालेन श्रीजगद्देवनाम्ना। पु[ण्याधा]रं[७] डोङ्गरग्रामनामा ग्रामो दत्तः श्रीनि[वा]सद्वि-

७ जाय[८]।१२। तद्दत्तडोङ्गरग्रामे श्रीनिधे[:] श्रेयसां निधेः। विद्यावृत्तनिवासेन श्रीनिवासेन [सू]नुना।१३। पितुः पुण्यो-दयायैतत्कारितं शिवमन्दिरम्। आकल्पं कल्पतां भूमेर्भूष-णाय निरत्ययम्[९]।१४। अत्र देवाय ग्रामे[स्मि]न्यश्च [श्री-निवासप्रहि ?]

८ [व्याघातं] कृत्वातिक्षिप्य – यो हर्त्तुमिच्छति स पञ्चमहा-पातकैर्लिप्यते। शकसंवत् १०३४ नन्दनसंवत्सरे चैत्र्यां शासनं लिखितमिति। लेखको विश्वस्वामी [।*] १०३४ तथांके।१५। [।*]

---

४. वृत्त–शार्दूलविक्रीडित. ५. 'तेऽश–' असें वाचावें.

६. श्लोक १० व ११ यांचें वृत्त–अनुष्टुभ्.

७. 'पुण्याधारो' असें वाचावें. ८. वृत्त–शालिनी.

९. श्लोक १३ व १४ यांचें वृत्त–अनुष्टुभ्.

१४. यादवनृपति रामचंद्राचा रामटेक शिलालेख*

रामटेक हें नागपूर जिल्ह्यांतील रामटेक तहसिलीचें मुख्य गाव असून नागपूरच्या उत्तरेस २८ मैलांवर वसलें आ . गावाला लागूनच असलेल्या टेकडीवर श्रीरामचंद्राचें पुरातन देवालय असल्याने या गावाला रामटेक हें नांव पडलें आहे. गावांत व टेकडीवर अनेक तीर्थें व देवालयें असल्याने ह्याची क्षेत्रस्थान म्हणून फार प्रसिद्धि आहे. कार्त्तिक महिन्यांत येथे मोठी यात्रा भरते, त्या वेळीं आजूबाजूच्याच नव्हे तर दूरदूरच्या प्रदेशांतून हजारों लोक देवदर्शनास येतात.

रामटेक हेंच प्राचीन रामगिरि

तीर्थस्थान म्हणून रामटेकची ख्याति आज निदान दीड हजार वर्षांइतकी जुनी आहे. गुप्त वंशांतील प्रख्यात राजा द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्य याची मुलगी प्रभावतीगुप्ता ही विदर्भाच्या वाकाटक वंशांतील द्वितीय रुद्रसेन नामक राजास दिली होती. लग्नानंतर थोड्याच काळाने तिचा पति वारल्यामुळे ती आपल्या मुलाच्या नांवाने राज्यकारभार पाहूं लागली. वऱ्हाडांतील ऋद्धपूर येथे सापडलेला तिचा ताम्रपट प्रसिद्ध आहे.[१] हा ताम्रपट तिने 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' म्हणजे रामगिरीवरील श्रीरामचंद्राच्या पादुकांजवळून कार्त्तिक शुद्ध द्वादशीस दिला होता. प्राचीन कोरीव लेखांत 'पादमूल' या शब्दाचा प्रयोग पादुका असा होतो. सध्या सामान्यतः श्रीदत्तात्रयाचीच पादुकारूपाने पूजा होते. प्राचीन काळीं इतर हिंदु देवतांचीहि पादुकारूपाने पूजा होत असे. वर उल्लेखिलेल्या प्रभावतीगुप्तेचा मुलगा द्वितीय प्रवरसेन याच्या वेळचा एक ताम्रपट मध्यप्रदेशांतील

---

* हा लेख सन १९३८ मध्ये 'सरदेसाई–स्मारक-ग्रंथां'त प्रा. ल. रा. कुळकर्णी व मी प्रसिद्ध केला होता.

१. वा. वि. मिराशी–वाकाटकशृपति आणि त्यांचा काल, पृ. २३९.

बैतूल जिल्ह्यांतील पट्टन या गावीं कांही वर्षांपूर्वी सापडला आहे.[२] त्यांतहि महापुरुषाच्या म्हणजे विष्णूच्या पादुकांच्या देवालयांतील अन्नसत्त्राकरिता कांही जमीन दान दिल्याचा निर्देश आहे. इतर ठिकाणींहि विष्णूच्या पादुकांचा उल्लेख आढळतो. कविकुलगुरु कालिदास याच्या 'मेघदूतां'तील (श्लो. १२) यक्ष रामगिरीवरच कांही काळ राहात होता. त्याने मेघाला अलकेचा मार्ग सांगण्यापूर्वी रामगिरीचा 'वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु' (मनुष्यांना वंद्य अशीं श्रीरामचंद्राचीं पदें ज्यावर उमटलीं आहेत) असा निर्देश केला आहे. त्यावरूनहि कालिदासाच्या काळींहि रामगिरीवरील देवालयांत श्रीरामचंद्राची पादुकारूपाने पूजा होत असे, असें स्पष्ट दिसतें.[३] यानंतर कांही काळाने तेथे राम व सीता यांच्या मूर्ति बसविण्यांत आल्या व लक्ष्मणाचेंहि देऊळ बांधण्यांत आलें, असें दिसतें.[४] म्हणून सध्या रामटेकवर श्रीरामचंद्राचें देऊळ मागे व लक्ष्मणाचें पुढे असें दिसतें. सध्याच्या मूर्ति रामटेकास दुधाळा नामक तळ्यांत सापडल्या व पूर्वीच्या मूर्ति भग्न झाल्यामुळे त्यांची त्यांच्या जागीं स्थापना करण्यांत आली असें समजतें.[५]

प्रभावती गुप्तेचा ताम्रपट कार्त्तिक शुद्ध द्वादशीस दिला होता. त्यावरून तिने आदल्या दिवशीं प्रबोधिनी एकादशीस उपोषण करून दुसऱ्या दिवशीं द्वादशीस पारणें सोडतांना या ताम्रपटांत उल्लेखिलेला गाव एका ब्राह्मणास दान दिला होता, असें दिसतें. प्रभावतीगुप्तेचा पुण्यास सापडलेला ताम्रपट नंदिवर्धन गावाहून दिला आहे.[६] तें नंदिवर्धन रामटेकजवळ नंदरधन किंवा नगरधन या नांवाने प्रसिद्ध आहे व रामटेकमाहात्म्यांतहि

---

२. पूर्वोक्त, पृ. २८२.

३. अद्यापि गयेला विष्णूच्या पादुकांचीच पूजा केली जाते.

४. लघु व बृहत् सिंदूरगिरिमाहात्म्यांत लक्ष्मणाच्या देवळाचा उल्लेख आहे, पण तीं माहात्म्यें फार प्राचीन दिसत नाहीत.

५. रा. ब. हीरालाल यांचा रामटेकवरचा लेख, इंडियन अँटिक्वरी, पु. ३७.

६. वाकाटकनृपति आणि त्यांचा काळ, पृ. १९०.

नंदिवर्धन गावांतील तीर्थांचा उल्लेख आढळतो. उपरिनिर्दिष्ट ताम्रपट हाच वाकाटकांचा सर्वांत प्राचीन ताम्रपट असल्याने त्यांत निर्दिष्ट केलेलें नंदिवर्धन हें गाव त्या वेळीं वाकाटकांची राजधानी असावें. त्यानंतरचे द्वितीय प्रवरसेनाचे कांही ताम्रपट नंदिवर्धनाहूनच दिले होते.[८] त्यांवरूनहि वरील अनुमानास पुष्टि मिळते. तेव्हा प्रभावतीगुप्तेच्या काळीं म्हणजे इ. स. च्या चौथ्या शतकाच्या अखेरीस रामटेकला राजधानीच्या सान्निध्यामुळे फार महत्त्व आलें असावें. कालिदास विदर्भांत असतांना रामटेकास अनेकदा गेला असावा व टेकडीवरून आसपासचा देखावा पहात असतां मेघदूताचें कथानक त्यास सुचलें असावें असा तर्क करण्यास हरकत नाहीं.[९]

यानंतरचा रामटेकचा उल्लेख महानुभावांच्या 'स्थानपोथीं'त महानुभावपंथसंस्थापक श्रीचक्रधर हे रामटेकास गेले त्या वेळच्या वर्णनांत आढळतो. श्रीचक्रधर हे रामदेवराव यादवाच्या काळीं होऊन गेले व पुढे सिद्ध केल्याप्रमाणे प्रस्तुत शिलालेखहि यादवकालीनच आहे. स्थानपोथी ही श्रीचक्रधरांच्या काळींच लिहिलेली नसली तरी तींत आलेलें स्थलवर्णन श्रीचक्रधरांच्या काळापासून आलेल्या परंपरागत माहितीवरून लिहिलें गेलें यांत संशय नाही. प्रस्तुत कोरीव लेखांत अनेक तीर्थें व देवालयें उल्लेखिलीं आहेत. त्यांतील कांही सध्या दाखवितां येत नसलीं तरी त्यांचा उल्लेख महानुभावांच्या वरील स्थानपोथींत आढळतो. त्यावरून ती पोथी व प्रस्तुत शिलालेख परस्परोद्बलक आहेत हें दिसून येईल.[१०] याशिवाय सिंदूरगिरिमाहात्म्य नांवाची पोथी कांही वर्षांपूर्वी नागपूर येथे श्री. जोशी यांनी छापून प्रसिद्ध केली आहे, तींतहि रामटेकच्या व आजूबाजूच्या पंचक्रोशींतील तीर्थांचा उल्लेख व वर्णन आहे. हें माहात्म्य 'पद्मपुराणां'तून घेतलें आहे असा

---

७. अ. ६, श्लो. १-२, ८, ७; १३, ८ इत्यादि पाहा.

८. वाकाटकनृपति आणि त्यांचा काळ, पृ. १९८, २०७.

९. वा. वि. मिराशी-कालिदास (द्वितीयावृत्ति), पृ. १२४.

१०. या पोथींतील उतारा आमचे मित्र कैं. हरि नारायण नेने, एम्. ए., यांच्या कृपेने आम्हांस मिळाला.

शेवटीं उल्लेख आहे. तथापि सध्या प्रसिद्ध असलेल्या आनंदाश्रमग्रंथावलींतील किंवा वेंकटेश्वर प्रेसच्या ग्रंथावलींतील 'पद्मपुराणां'त तें आढळत नाही.

वर उल्लेखिलेल्या राम व लक्ष्मण यांच्या देवळांखेरीज इतर अनेक देवालयें टेकडीवर आहेत. त्यांतील कांही फार प्राचीन असावीं. तेथे वामनावताराची मूर्ति भग्न स्थितींत आढळते. ती प्राचीन दिसते व म्हणून पुराणवस्तुसंशोधन खात्याने ती व तिचें विशीर्ण देवालय आपल्या ताब्यांत घेतलें आहे. या मूर्तीचा उल्लेख प्रस्तुत शिलालेखाच्या सध्याच्या अवशिष्ट भागांत तसेंच रामटेकमाहात्म्यांतहि कोठे आढळत नाही. टेकडीवर एकांत एक असे तीन प्राकार असून शेवटचा प्राकार ओलांडून गेल्यावर राम व लक्ष्मण यांचीं देवालयें व त्यांच्या सभोवार इतर लहान देवालयें दिसतात. हिंदूंशिवाय इतरांस या तिसऱ्या प्राकाराच्या आंत जातां येत नाही.

प्रस्तुत शिलालेख लक्ष्मणाच्या देवळाच्या सभामंडपांत गर्भगृहाच्या पुढील भिंतींत दरवाजाच्या उजव्या बाजूस बसविला आहे. या शिलालेखाचा उल्लेख जनरल कनिंगहॅमचा सहाय्यक बेग्लर याने प्रथम केलेला आढळतो. तो सन १८७३–७४ सालीं रामटेकास गेला होता. त्याला शेवटच्या प्राकारांत जाऊं दिलें नव्हतें. तथापि आपल्या हिंदु नोकरांकडून त्याने लेखाचा छाप काढविला. त्यांत रामदेव हें नांव त्यास आढळलें.[११] तथापि हा लेख कोणी व कशाकरिता कोरविला याची कांहीच माहिती त्याला देतां आली नाही.[१२] यानंतर डॉ. फ्लीटमार्फत प्रस्तुत शिलालेखाचा एक अस्पष्ट छाप प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ प्रो. कीलहॉर्न यास मिळाला. तो छाप अस्पष्ट असल्याने कीलहॉर्नला तो सबंध वाचतां आला नसावा. तथापि त्यांतील सिंहण व रामचंद्र हीं राजांचीं नांवें त्याला दिसलीं. हीं नांवें हैहय वंशाच्या रायपूर शाखेंतील राजांच्या नामावलींत दिसत असल्याने त्याने हे राजे कलचुरि किंवा हैहयवंशाचे असावे असें एपिग्राफिया इंडिकामधील

---

११. हें नांव एकसष्ठाव्या ओळींतील असावें. पण तेथे तें श्रीरामचंद्राचें वाचक आहे.

१२. कनिंगहॅम—आर्किऑलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट, पु. ७, पृ. ११२ पाहा.

हरिब्रह्मदेवाच्या खलारी या लेखाचें संपादन करतांना म्हटलें आहे.[१३] त्यानंतर कझेन्स् सन १९०३-४ मध्ये रामटेकास गेला होता, पण त्यासहि आंत जाऊं न दिल्याने प्रस्तुत शिलालेखाविषयी कांही माहिती देतां आली नाही. या लेखाचा शेवटचा उल्लेख मध्यप्रांतांतील प्रसिद्ध पुरातत्त्वज्ञ कै. रायबहादूर डॉ. हीरालाल यांनी आपल्या 'मध्यप्रांत वऱ्हाड यांतील कोरीव लेखांच्या सूचीं'त केला आहे.[१४] याप्रमाणे अनेकदा या शिलालेखाचा निर्देश केला असला तरी अद्यापि कोणी तो समग्र छापला नाही. त्यामुळे त्यांतील माहितीबद्दल अनेकांचा गैरसमज झाला आहे. या लेखाचें यादवकालीन इतिहासांत महत्त्व जाणून माझे मित्र प्रा. ल. रा. कुळकर्णी व मी अनेकदा रामटेकला गेलों, आणि आम्ही तो लेख साफ करून त्याचें वाचन केलें. त्यांतील महत्त्वाच्या ऐतिहासिक भागाचें वाचन पुढे दिलें आहे.[१५]

वर्णन—वर लिहिल्याप्रमाणे प्रस्तुत लेख लक्ष्मणाच्या देवळांत गर्भगृहाच्या दरवाजाच्या उजव्या बाजूस भिंतींत बसविलेल्या दगडावर कोरलेला आहे. आरंभीं हा लेख फार मोठा असावा पण सध्या त्याच्या फक्त ७५ ओळी दिसतात. त्यांनी २ फूट ६ इं. व ३ फू. १ इं. उंच इतकी जागा व्यापली आहे. या लेखाचे दोन भाग पडतात. पहिल्यांत १ ते ३१ ओळी व दुसऱ्यांत ३२ ते ७५ ओळी येतात. हे दोन भाग ३१ व्या व ३२ व्या ओळींत 'ळ' काराकृति चिन्हें काढून निरनिराळे दाखविले आहेत. शिलेचा पृष्ठभाग अनेक ठिकाणीं-विशेषतः वर, खाली व डाव्या बाजूस खराब झाल्याने लेख त्रुटित झाला आहे. या लेखाच्या आरंभीं एका राजवंशाचें व त्यांतील पुरुषांनी केलेल्या पराक्रमाचें वर्णन केलें होतें, पण हा भाग फारच खराब झाल्याने त्यांतील बहुतेक ऐतिहासिक माहिती आता नष्टप्राय झाली आहे. दुसऱ्या भागांत रामटेकच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन आलें

---

१३. ए. इं.. पु. २, पृ. २३० पाहा.

१४. पहिली आवृत्ति (१९१६), पृ. ३-४; दुसरी आवृत्ति (१९३२), पृ. ३.

१५. सबंध लेखाचें वाचन 'सरदेसाई-स्मारक-ग्रंथां'त (पृ. १२३-१३१ वर) परिशिष्टासह दिलें आहे.

आहे. त्यांतील आरंभींचा भाग बराचसा शाबूत आहे. पण खालचा भाग पुनः अतिशय खंडित झाला आहे.

लिपी व भाषा--या लेखाची लिपी इ. स. च्या बाराव्या तेराव्या शतकांतील नागरी आहे. पृष्ठमात्रांचा अनेक ठिकाणीं उपयोग केला आहे. 'रि' बद्दल 'ऋ', 'ब' च्या ठिकाणीं 'व', 'षं' बद्दल 'ख' आणि 'ख' बद्दल 'ष'चा उपयोग केलेला आहे. कांही ठिकाणीं अवग्रहाचें चिन्ह कोरलें आहे. भाषा संस्कृत आहे.

विषय--या लेखाच्या पहिल्या चार ओळींतील बहुतेक सर्व शब्द नाहीसे झाल्याने त्यांतील मजकुराचा पत्ता लागत नाही. पांचव्या ओळींत 'यादवो वंशः' व '[य] दुवंशजः' हे शब्द येतात, त्यावरून ज्या राजाच्या कारकीर्दीत हा लेख कोरविला गेला तो स्वतःस यादववंशी म्हणवीत असे, हें उघड आहे. या वंशांतील एका राजाच्या पराक्रमाचें वर्णन पुढील ओळींत आलें होतें. पण त्यांपैकी रुद्र (ओळ ७), अंध्राधिप व चोल (ओ. ८) व कदाचित् गुर्जरेन्द्र (ओ. ९) एवढीच त्याच्या शत्रूंचीं नांवें शिल्लक आहेत. नवव्या ओळीच्या शेवटीं 'जैत्र' असा शब्द आला आहे तो जैत्रपाल या नांवाचा अवशेष असावा. पंधराव्या ओळींत सिंहणाचा उल्लेख त्याच्या नंतरच्या राजांच्या वर्णनांत ओघांत आला आहे. सिंहणाचें नांव १३ व्या ओळींतहि आलें असावें, पण त्याचीं पहिलीं दोन अक्षरें फुटून गेलीं आहेत. सोळाव्या ओळींत श्रीराघव नामक अधिकाऱ्याची वंशावळ सुरू होते. तो वायिनायक नांवाच्या गृहस्थाचा नातू होता. सतराव्या ओळींत असें म्हटलें आहे की, श्रीरामचंद्राने आपल्या साम्राज्यांतील समृद्धीमुळे सुंदर दिसणाऱ्या लक्ष्मीला या राघवाच्या स्वाधीन केलें व स्वतः क्रीडोद्यानांत अखिलकलानिपुण अशा स्त्रियांच्या सहवासांत रममाण झाला. अठराव्या व एकोणिसाव्या ओळींतहि याच राघवाचा शय्यापाल म्हणून उल्लेख आलेला दिसतो. त्याची पत्नी राजायी हिचें नांव १९ व्या ओळींत आलें आहे. एकदा या राघवाने आपल्या गुरूस प्रश्न केला की, 'भगवन्, आपणांस सर्व माहीत आहे. तेव्हा हा अगाध संसारसागर तरून जाण्यास योग्य असा एखादा उपाय मला सांगावा.' त्यावर, 'विष्णूच्या भक्ती-

शिवाय दुसरा उपाय नाही' असें त्या गुरूने उत्तर दिलें. व नंतर या टेकडीवरील व आजूबाजूंच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन केलें. लेखाच्या पहिल्या भागांत रामटेकच्या चारी बाजूच्या घंटेश्वर, सुधेश्वर, केदार व आंजनेय या चार देवळांचा उल्लेख आला आहे. दुसऱ्या भागांत 'सिंदूर-गिरिमाहात्म्यां'तल्याप्रमाणे रामगिरीवरील व त्याच्या सभोवतालच्या देवळांचें व तीर्थांचें वर्णन केलें आहे. यांतील बरीचशीं 'सिंदूरगिरिमाहात्म्यां'त व कांही महानुभावांच्या 'स्थानपोथीं'तहि वर्णिलेलीं आढळतात. या सर्व उल्लेखांवरून व स्थानिक माहितीवरून त्यांतील बहुतेकांचें स्थानहि निश्चितपणें ठरवितां येतें.[१६]

चर्चा—मागे सांगितल्याप्रमाणे खलारी येथील शिलालेखाचें संपादन करीत असतां कीलहॉर्नने प्रस्तुत शिलालेखाचा उल्लेख केला आहे. त्यांतील सिंहण व रामचंद्र हे राजे, खलारी लेख ज्या हरिब्रह्मदेव नामक हैहयवंशी राजाच्या कारकीर्दींत कोरविला होता, त्याचे अनुक्रमें पितामह व पिता असावे असें त्याला वाटलें व त्यावरून कलचुरि किंवा हैहयवंशी राजांचें राज्य पश्चिमेस नागपूर प्रांतापर्यंत पसरलें होतें असा त्याने निष्कर्ष काढला. कलचुरि राजांचे अनेक लेख आतापर्यंत प्रसिद्ध झाले आहेत. त्यांतील बहुतेकांत एका विशिष्ट शकाचा उपयोग केलेला आहे. ह्याला कलचुरि शक किंवा चेदि शक असें म्हणतात. या शकाच्या मितींचा विचार करून कीलहॉर्नने असें अनुमान काढलें की, कलचुरि शकाचा आरंभ पूर्णिमान्त आश्विन महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेस होत असावा. पण हिंदुस्थानांत आश्विन शुक्ल प्रतिपदेस एखाद्या शकाचा आरंभ होत होता याविषयी निश्चित पुरावा त्याला आढळेना. शेवटीं प्रसिद्ध हेन्री टॉमस् कोलब्रुक यांचें एक पत्र त्यांच्या मुलाने लिहिलेल्या चरित्रांत[१७] कीलहॉर्नला सापडलें.

---

१६. 'सरदेसाई-स्मारक-ग्रंथां'तील आमच्या लेखाचें परिशिष्ट (पृ. १३१-१३४) पाहा.

१७. पृ. १६३ पाहा. कोलब्रुक हा नागपूरच्या भोसल्यांच्या दरबारीं इंग्रजांचा वकील म्हणून १८ मार्च १७९९ ते १९ मे १८०१ पर्यंत होता. सन १७९९ च्या नागपुरांतील दसऱ्याचें वर्णन कोलब्रुकने केलें आहे. त्यांत त्यानें हें विधान केलें आहे.

त्यांत नागपूर प्रांतीं आश्विन शुक्ल प्रतिपदेस वर्षारंभ होतो असें म्हटलें होतें. रामटेकच्या लेखावरून कलचुरि किंवा हैहय वंशाचें राज्य नागपूर-पर्यंत पसरलें होतें असें कीलहॉर्नला वाटलें व कोलब्रुकाच्या पत्रावरून कोलब्रुकच्या कालापर्यंत नागपूर प्रांतीं आश्विन शुक्ल प्रतिपदेस वर्षारंभ होत होता, असें दिसलें. तेव्हा नागपूर प्रांतांतील हा वर्षारंभ कलचुरि शक त्या प्रांतांत प्रचलित होता याचा त्याने द्योतक मानला व त्यावरून त्या शकाचा वर्षारंभ पूर्णिमान्त आश्विन महिन्याच्या शुक्ल प्रतिपदेस होत असे असा सिद्धान्त त्याने प्रस्थापित केला.[१८] तेव्हा प्रस्तुत शिलालेखांत कोणत्या राज-वंशाचें वर्णन आहे याचा विचार केवळ या शिलालेखाच्या अर्थाकरिताच नव्हे तर कलचुरि शकाचा आरंभ निश्चित करण्याकरिताहि महत्त्वाचा होणार आहे.

प्रस्तुत लेखांतील राजे हैहयवंशी होते काय ?

हा लेख समक्ष पाहण्याची संधि कीलहॉर्नला मिळाली नव्हती. या लेखाचा एक अस्पष्ट छापच त्याच्यापुढे होता. आज शेंकडों वर्षें या लेखाला तेलाचीं, काजळीचीं व चुन्याचीं पुटें बसलीं असल्याने त्याचीं अवशिष्ट अक्षरेंहि बहुतेक बुजून गेलीं आहेत. त्यामुळे त्याचा चांगला छाप घेतां येत नाही व घेतलेल्या छापावरून लेख वाचणें अत्यंत कठिण जातें. रायबहादुर हीरालालनी हा लेख समक्ष पाहिला होता व त्यांत त्यांना 'यादवो वंशः' हीं अक्षरेंहि दिसलीं होतीं. पण यांत देवगिरीच्या यादवांचें वर्णन आलें असावें असें न मानतां कीलहॉर्नच्या मताचाच अनुवाद त्यांनी केला आहे व हैहयवंशी राजे हे यदूच्या वंशांतील राजे असल्याने त्यांस यादव मानण्यांत हरकत नाहीं असें त्यांनीं प्रतिपादिलें आहे. यदु, नंतर त्याचा मुलगा सहस्रजित् व त्यानंतर हैहय अशी वंशावळ पुराणांत आढळत असल्याने हैहय हे यदुवंशज होते यांत संशय नाही. पण रूढीमुळे यादव हें नांव यदूचा दुसरा मुलगा कोष्टु ह्याच्या वंशजांनाच प्राचीन

---

१८. Festgruss an Roth या पुस्तकांतील त्याचा 'कल-चुरिशकाचा वर्षारंभ' हा लेख पाहा.

काळापासून लावण्यांत आलें आहे.[१९] कलचुरि राजांचें साम्राज्य उत्तर हिंदुस्थानांत दहाव्या व अकराव्या शतकांत दूरवर पसरलें होतें व त्या वंशाच्या दोन शाखा मध्यप्रांताच्या पूर्वेकडील छत्तीसगढ या भागांत रतनपुर व रायपुर येथे मराठ्यांची सत्ता स्थापित होईपर्यंत राज्य करीत होत्या. हे राजे आपणांस हैहयवंशी म्हणवत. त्यांचे अनेक लेख सापडले आहेत, पण त्यांतील एकांतहि त्यांनी आपणास यादव म्हटलें नाही किंवा आपल्या पूर्वजांच्या यादींत यदूचा उल्लेख केला नाही. तेव्हा रामटेकच्या शिलालेखांतील राजे आपणांस यादव म्हणवीत असल्याने ते हैहय असणें संभवनीय नाही. शिवाय हैहयवंशी राजांच्या नामावळींत जैत्रपाल ह्यासारखें नांव कोठेहि आढळत नाही. हें नांव या लेखांत नवव्या ओळीच्या अखेरीस आलें असावें, हें वर दाखविलें आहे. शिवाय प्रस्तुत लेखांत निर्दिष्ट केलेले सिंहण व रामचंद्र हे राजे हैहयवंशी होते असें मानण्यांत सर्वांत मोठी अडचण येते ती ही की, छत्तीसगढांत चौदाव्या पंधराव्या शतकांत रायपुर येथे राज्य करणाऱ्या या राजांनी किंवा त्यांच्या पूर्वजांनी रुद्र, आंध्राधिप चोल, गुर्जरेंद्र या राजांवर कधी जय मिळविल्याचें त्यांच्या किंवा इतरांच्या लेखांतहि नमूद नाही. कारण हे राजे दुर्बल असून यांचें राज्य सामान्यतः रायपुर जिल्ह्याच्या पलीकडे चौदाव्या पंधराव्या शतकांत पसरलेलें दिसत नाही. शिवाय या शतकांत रुद्र नांवाचा कोणी राजा राज्य करीत होता असेंहि दिसत नाही. त्यामुळे प्रस्तुत लेखांतले सिंहण व रामचंद्र हे राजे हैहयवंशी होत हें कीलहॉर्न व हीरालाल यांचें मत बरोबर दिसत नाही.[२०]

ते राजे देवगिरीच्या यादववंशांतील

याच्या उलट सिंहण व रामचंद्र हीं नांवें देवगिरीच्या यादव वंशांतील प्रतापी राजांचीं म्हणून प्रसिद्ध आहेत. हे राजे इ. स. च्या तेराव्या शतकांत

---

१९. पार्जिटर याचें Ancient Indian Historical Traditions, पृ. ८७ पहा.

२०. आपल्या 'मध्यप्रांत-वऱ्हाडमधील कोरीव लेखां'च्या द्वितीय आवृत्तींत (पृ. ३) रा. ब. हीरालालनी स्वतःच याविषयी संदेह प्रकट केला आहे.

राज्य करीत होते. नवव्या ओळीच्या शेवटीं आलेलें जैत्रपाल हें नांव सिंहणाच्या पित्याचें दिसतें. सातव्या व आठव्या ओळींत रुद्र, आंध्राधिप, चोड वगैरे नांवें जैत्रपाल राजाच्या पराक्रमाच्या वर्णनांत आलेलीं दिसतात. कारण हेमाद्रीचा व्रतखंड,[२१] रामदेवरावाचा पैठणचा ताम्रपट[२२] इत्यादिकांवरून जैत्रपालानें काकतीयवंशी रुद्रदेवाचा पराभव करून त्याच्या पुतण्यास गादीवर बसविलें असें वर्णन आढळतें. रुद्र राजाचा कांही ठिकाणीं आंध्र म्हणूनहि उल्लेख आढळतो. त्यामुळे प्रस्तुत लेखांतील जैत्रपाल, सिंहण व रामचंद्र हीं नांवें यादववंशी राजांचींच होत असें निर्विवादपणें म्हणतां येतें. यादवांचें राज्य विदर्भात पूर्वेस बालाघाट जिल्ह्यांतील लांजी या गांवापर्यंत पसरलें होतें, हें लांजी येथील शिलालेखावरून स्पष्ट दिसतें. हा शिलालेख सध्या नागपूरच्या संग्रहालयांत ठेवला असून त्यांत रामदेवरावाचा उल्लेख आहे.[२३]

यादवांच्या इतर लेखांवरून सिंहणाच्या नंतर त्याचा नातू कृष्ण हा गादीवर बसला असें दिसतें. पण त्याचें नांव या लेखाच्या अवशिष्ट भागांत आढळत नाही. तथापि तें पंधराव्या ओळींत आलें असावें, असें अनुमान करतां येतें; कारण त्या ओळींत आपल्या सुराज्यानें त्यानें पृथ्वीला सिंहण राजाचा वियोग भासूं दिला नाही असें एका राजाविषयी म्हटलें आहे, तें अर्थातच सिंहणाचा उत्तराधिकारी कृष्ण याबद्दल असावें. कृष्णाचा बंधु महादेव व त्याचा मुलगा आमण यांचीं नांवें या लेखांत आलीं होतीं, असें वाटत नाही. यानंतर मागे सांगितल्याप्रमाणे कृष्णाचा मुलगा रामचंद्र राजा

---

२१. तिल्लंगाधिपतेः पशोर्विशसनं रौद्रस्य रौद्राकृतेः ।
कृत्वा पूरुषमेधयज्ञविधिना लब्धस्त्रिलोकीजयः ॥

२२. इंडियन् अँटिक्वरी, पृ. १४, पृ. ३१६.

२३. हीरालाल यांची 'मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील लेखांची सूचि' (द्वितीयावृत्ति) पृ. २० पहा. या सूचींत 'या लेखाचा कांही भाग रामटेक लेखाशीं तंतोतंत जुळतो' हें हीरालालांचें विधान मात्र चिंत्य आहे. कारण तसा भाग आम्हांस आढळला नाही.

याचें नांव १७ व १८ या ओळींत आलें आहे. हा रामचंद्र म्हणजे श्रीज्ञानेश्वरांचा समकालीन राजा रामदेवराव यादव होय.

प्रस्तुत लेखांत उल्लेखिलेले राजे हे यादववंशी होते हें याप्रमाणे सिद्ध झालें आहे. शिवाय कलचुरि किंवा हैहय यांचे शिलालेख विदर्भांत सापडले नाहीत.[२४] म्हणून कलचुरि शकाचा वर्षारंभ आश्विन महिन्यांत होत असे हें कीलहॉर्नचें मत नागपूर प्रांताच्या वर्षारंभाच्या रूढीने सिद्ध होणें शक्य नाही.[२५]

प्रस्तुत लेखाचा उद्देश

प्रस्तुत शिलालेख अनेक ठिकाणीं खंडित झाल्यामुळे तो कोरविण्यांत काय उद्देश होता हें सांगणें कठिण आहे. तथापि १६ व १७ या ओळींत श्रीराघव नांवाच्या अधिकाऱ्याची वंशावळ दिली आहे. व त्यावर राज्याचा भार टाकून रामचंद्र राजा विलासमग्न झाला असें म्हटलें आहे. पुढे ६३व्या ओळींत कांही विशिष्ट काम केल्यावर या राघवाला कृतकृत्य वाटलें असें वर्णन आलें आहे. त्यावरून या लेखाचा उद्देश राघवाची रामटेक येथील कांही कामगिरी—कदाचित् लक्ष्मणाच्या देवळाचा जीर्णोद्धार—नमूद करण्याचा दिसतो. ७० व ७१ या ओळींत माइदेव नांवाच्या अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. तो उपरिनिर्दिष्ट राघवाचा रामटेकला नेमलेला अधिकारी असावा.

---

२४. याला अपवाद फक्त एकच–स्वामिराजाच्या नगरधन ताम्रपटाचा. (कलचुरि नृपति आणि त्यांचा काल, पृ. १२८–१२९.) पण तो ताम्रपट फार प्राचीन काळीं दिला होता.

२५. ही रूढीहि कोलब्रुकच्या काळीं नागपूर प्रांतीं प्रचलित होती असें दिसत नाही. दसऱ्याचा मोठा समारंभ पाहून कोलब्रुकची तशी समजूत झाली. त्या वेळींहि नागपूर प्रांतीं चैत्रादि शालिवाहन शकच प्रचलित होता, हें तत्कालीन कागदपत्रांवरून दाखवितां येतें. कलचुरि-चेदि संवताचा आरंभ कार्त्तिक शुक्ल प्रतिपदेस होत असे, हें मी इतरत्र सिद्ध केलें आहे. कॉर्पस् इन्स्क्रिप्शनम् इंडिकॅरम्, पु. ४, प्रस्तावना पृ. ११–१२ पाहा.

रामगिरीचीं इतर नांवें

ज्या टेकडीवर श्रीरामचंद्र व लक्ष्मण यांचीं देवळें बांधलीं आहेत तिचीं सिंदूरगिरि व तपंगिरि अशीं नांवें प्रस्तुत लेखांत आलीं आहेत. यांपैकी पहिल्या नांवाबद्दलची कथा या लेखाच्या २३ व्या ओळींत आली आहे. ही ओळ बरीच खंडित झाली आहे. तथापि अवशिष्ट भागावरून, 'येथे नरसिंहाने आपल्या तीक्ष्ण नखाग्रांनी हिरण्यकशिपूचें वक्षःस्थळ फाडलें. त्यांतून वाहाणाऱ्या रक्ताने हा सर्व प्रदेश माखला गेला, तेव्हापासून याला सिंदूरगिरि म्हणूं लागले,' ही कथा त्या ओळींत वर्णिलेली दिसते.[२६] सध्या या टेकडीवर नृसिंहाची भव्य मूर्ति असलेलीं दोन देवळें आहेत. रायबहादूर हीरालाल यांनी अनुमान केल्याप्रमाणे सिंदूरगिरि हें नांव प्रारंभीं या टेकडीवरच्या तांबूस रंगाच्या दगडांवरून पडलें असावें. या टेकडीस तपंगिरि (किंवा तपोगिरि) म्हणण्याचें कारण सिंदूरमाहात्म्यांत असें दिलें आहे की, येथे शूद्रमुनि शंबूक तपश्चर्या करीत होता. नंतर श्रीरामचंद्रांनी मृत ब्राह्मणपुत्रास जिवंत करण्याकरिता आपल्या चंद्रहास खड्गाने त्याचा शिरच्छेद केला. तेव्हा शंबूकाने तीन वर मागितले. ते हे की, माझ्या देहाचें या ठिकाणीं शिवलिंग व्हावें; श्रीरामचंद्रांनी या गिरीवर सदोदित वास्तव्य करावें व यात्रेकरूंनी श्रीरामचंद्राचें दर्शन करण्यापूर्वी माझें दर्शन करावें. त्याप्रमाणेच सध्या यात्रेकरू टेकडीच्या दक्षिणेच्या टोकावर असलेल्या धूम्रेश्वराचें प्रथम दर्शन करून नंतर श्रीरामाच्या दर्शनास जातात. शंबूकाची कथा प्रस्तुत लेखाच्या ४५ व्या ओळींत आली आहे.[२७] तींत धूम्राक्षनामक शिवलिंगाचा उल्लेख आहे.

वाल्मीकि रामायणाच्या उत्तरकांडांत शंबूकाची कथा आली आहे. तेव्हा तेथील वर्णन रामटेकास कितपत जुळतें तें पाहूं. उत्तरकांडांत शंबूक

---

२६. प्रागत्र देवो नृहरिः सूरारेर्व(बि)भेद वक्षः
करजैः शिताग्रैः । तद्रक्तपूरारुणितस्ततोयं···।।

२७. श्रीरामचंद्रस्य करेण चंद्रहासाद्धतः प्राप्य पदं मुरारेः ।
स शम्वु(म्बु)कः शूद्रमुनिर्महीध्रराजेऽत्र धूम्राक्ष इति प्रसिद्धः।।

शैवल पर्वताच्या उत्तरेस एका विस्तीर्ण तलावाच्या काठीं तपश्चर्या करीत होता असें वर्णन आलें आहे.[२८] या शैवल पर्वताचा इतर कोठे निर्देश सापडत नाही. तथापि रामायणांतच विंध्य व शैवल या पर्वतामधील देशांवर दण्ड या नांवाचा राजा राज्य करीत होता.[२९] त्याने एका ब्राह्मण कन्यकेवर बलात्कार केल्यामुळे शैवल पर्वताच्या आसपासचा शंभर योजनें प्रदेश उध्वस्त झाला व त्यालाच पुढे दंडकारण्य म्हणूं लागले असें म्हटलें आहे.[३०] या दण्ड किंवा दाण्डक्य राजाला इतर ठिकाणीं भोज म्हटलें आहे.[३१] भोज हे प्राचीन विदर्भावर राज्य करीत होते हें प्रसिद्ध आहे. तेव्हा शंबूक हा विंध्याच्या दक्षिणेस विदर्भातच तपश्चर्या करीत होता हें उघड आहे. शंबूकाला ठार मारल्यानंतर श्रीरामचंद्र विमानांत बसून देवांसह अगस्त्याश्रमीं गेले असें रामायणांत म्हटलें आहे.[३२] पण शंबूकाच्या वधस्थानापासून अगस्त्याश्रम किती दूर होता याचा स्पष्ट निर्देश 'रामायणां'त आढळत नाही. एकंदरींत, 'रामायणां'त उत्तरेंतल्या स्थळांच्या इतकें दक्षिणेंतील स्थळांचें वर्णन स्पष्ट व निःसंदिग्ध नाही. त्यामुळे लंका कोठे होती याबद्दल विद्वानांत वाद माजून राहिला आहे. तथापि उत्तरकांड लिहिलें गेलें त्या काळीं विंध्य पर्वताच्या दक्षिणेस व गोदावरीच्या उत्तरेस विदर्भांत कोठे तरी शंबूकाच्या तपश्चर्येचें स्थान होतें यांत संशय नाही. रामायणांतील या स्थानाचें वर्णनें

---

२८. दक्षिणां दिशमाक्रामत्ततो राजर्षिनन्दनः ।
शैवलस्योत्तरे पार्श्वे ददर्श सुमहत्सरः ।
तस्मिन् सरसि तप्यन्तं तापसं सुमहत्तपः ।
ददर्श राघवः श्रीमाँल्लम्बमानमधोमुखम् ॥

अ. ७५, १३–१५. शैवलपर्वताविषयी टीकाकार राम म्हणतो, शैवलस्य शैवलाख्यस्य विन्धसमीपदक्षिणभागवर्तिगिरेः ॥

२९. उत्तरकाण्ड, अध्याय ७९, श्लोक १६.

३०. उत्तरकाण्ड, अध्याय ८१, श्लोक ८.

३१. दाण्डक्यो नाम भोजः कामात् ब्राह्मणकन्यामभिमन्यमानस्सबन्धुराष्ट्रो विननाश । अ. १, प्र. ३.

३२. उत्तरकाण्ड, अध्याय ७६, श्लो. १६–२०.

रामटेकास जुळेल असें आहे. कारण रामटेकास टेकडीच्या पायथ्याशीं अंबाळें नांवाचा तलाव अद्यापि विद्यमान आहे. या भागांत रामटेकाइतकें शंबूककथेशीं संबद्ध असें प्राचीन स्थान दिसत नाही म्हणून उत्तरकांडाच्या कर्त्यासहि रामटेक हेंच शंबूकाच्या तपश्चर्येचें स्थान म्हणून विवक्षित होतें असें मानण्यास हरकत नाही.[३३]

ओळ	वाचन[३४]
१	· · · · णु · · · · · · · · मवाङमु · ·
२	· · · · पूजित · · · · स्तत्वे(त्त्वे)न · ·
३	· · · · देवासुरोर[ग*] · · वचरितो · · ·

---

३३. वर उल्लेखिलेल्या सोळा अध्यायांच्या 'सिंदूरगिरिमाहात्म्या'-शिवाय आणखी एक ४५ अध्यायांची प्रत नागपूर येथील सुप्रसिद्ध ॲडव्होकेट श्री. दा. तु. मंगळमूर्ति यांच्या वडिलांजवळ आम्हांस पहावयास मिळाली. तींत (अ. २, श्लो. २०-२२) तपोगिरि व सिंदूराद्रि या दोन नांवांशिवाय महाशैवल नांवाचाहि उल्लेख आहे. व या गिरीवर श्रीशंकर शैवास आणतात (अस्मिन् गिरिवरे शम्भो शैवं लाति यतो भवान्) म्हणून यास शैवल म्हणतात, अशी व्युत्पत्ति दिली आहे. हें 'बृहत्-सिंदूरमाहात्म्य' 'पद्मपुराणा'च्या कौमारखंडांतून घेऊन रामानंदानें लिहिलें असें त्यांत म्हटलें आहे. पण यांतील शंबूकवधाविषयीचा भाग वाल्मीकि रामायणांतून जशाचा तसा घेतलेला दिसतो. 'पद्मपुराणा'च्या छापील प्रतींत कौमारखंड आढळत नाही. तथापि या माहात्म्यांतील वर्णनावरून रामटेकला शैवलगिरि म्हणत असावे, या आमच्या अनुमानाला पुष्टि मिळते.

३४. मूळ लेखावरून. या वाचनांतील दुरुस्त्या अर्धचंद्राकृति कंसांत व अस्पष्ट अक्षरें चतुष्कोणी कंसांत दाखविलीं आहेत. एखादें अक्षर लेखांत गळालें असल्यास तें चतुष्कोणी कंसांत देऊन त्याला तारकांकित केलें आहे.

४ · · · कः सुकविसार्थपथे प्र[विष्टः*] · · · · · ·
ज्योत्नाप्र · · ·

५ · · · युग्मः ॥ ततोभूद्यादवो वंशः · · · किं वर्ण्यतेऽ
[यं*] · · · [य]दुवंशजः · · · ·

६ · · · [क्षो]णिपालष्कालः[35] प्रोद्यद्वैरिवीर · · · जंभ-
शत्रुः । भ्रश्यत्कलंकविधुम · · ·

७ · · · यस्यातिभीषणरणांगण · · · · · मंडलमिदं
स्मरति स्म रुद्रको[ला ?] · · ·

८ · · · लीवनालीतलग(?)भुजगवा · · · त्वमंध्रा-
धिप त्वं रे चोड विमुंच द[र्पं] · · · धरानाथप्रबोध

९ · · · षि(खि)लभूपतीनां शिर[स्सु ?] · · · ·
[गुर्ज* ?]रेन्द्रः पराङमुखो यस्य पुरो रणेऽभूत् · · · हेषु
महामहीन्द्रे जैत्र · ·

१० · · · · यदस्त्रप्रभिन्नप्रतिभटविक्र[म ?] · · · ·
· · [मौक्ति*]कौघैर्गगनमिव सतारं संध्यया स · · ·
[क]रोत्कराणां सौंदर्यस्य

११ · · · [क्षो ?]णिपतेरस्य भूमिपालो · · · हासिनिहतो-
त्कटप्रतिभटेभकुंभद्वयीपटुद्यु · · · · कमुक्ताच्छलात् ।
अमुष्य

१२ · · · महीरुहस्य यशसा चंद्र · · · वाचस्पतेः ।
तेजोभिर्दिनकृद्रुचामपि हठादा[धि]क्य · · द्रालयभोग-
भूमिरभवत्काल–

---

३५. 'क्षोणिपाल ऽ कालः' असें वाचावें.

१३ · · [घ]ण[३६] देवनामा गुणाभि · · · कृष्टचंडकोदंडमुक्तैः शितकांडदंडैर्विष(ख)ण्डितारक्त · · देहषं(खं)डैर-मंडि क्षितिराहवस्य ।

१४ · · · · [मा]साद्य शान्ति परमामवाप · · जगतीं क्षितीशः । शशाश(स) विश्रामतरुस्ततो यष्फलेग्रहिर्या-[३७] चकपत्रिपंक्तेः ॥ धराचक्रं भ्रांत्वा तृ(त्रि)दश–

१५ · · · धिष्ठाय रचयत्यहो नृत्यत्क[बंध*] · · अपार-संसारसमुद्रसारैर्यशःसुधौघैर्वसुधा यदीयैः । श्रीसिंहणक्षो-णिपतेर्वियोगतापं जहौ ॥

१६ · · · · [म*]हीतले । वायिनायक इति क्षमातले नि · · द्यशोभरैः । तत्सुतः सकललोकविश्रुतो न श्रुतः क्वचिदपीह यत्समः॥ तस्याप्ययं राघवदेवनामा

१७ · · · · [गु]णगौरवप्रणयिनं श्रीरामचंद्रः प्रभुर्य साम्राज्यसमृद्धिसुंदररुचः पात्रं विधाय श्रियः । क्रीडोद्या-नतलेऽषि(खि)लोज्ज्वलकलालीलागृहस्त्रीजनालाप–

१८ · · · · श्रीरामभूपत्वधरस्य शय्यापालीकृतात्मानम-मानसत्वं(त्वं) ॥ श्रीवैद्यनाथशिवपादपयोजभक्तिसंपादि-ताषि(खि)लमहत्व(त्व)पदाय तस्मै । के के नृपा ज–

१९ · · · · तिर्द्धीरं क्षांतिरपि प्रधानकुलजं श्रद्धा यथा सात्वि(त्त्वि)कं । तद्वद्भूषयति स्म यं पृ(प्रि)यतमा सौभाग्यसौंदर्यभू राजायीति गुणाश्रया गुणगणाधारं धरा–

---

३६. 'सिंघणदेवनामा' असें वाचावें.

३७. य ~ फलेग्रहि असें वाचावें.

२० · · · · दिनकृद्दिनकृद्यु (द्द्यु) तिं । गुरुत्मात्मीयमित्येष प्रपच्छ तदनु द्विजम् । जानासि सर्व्वं भगवंस्ततस्त्वां पृच्छानि पर्युत्सुकतामुपेत: । अगाधसंसारपयोधि–

२१ · · · · षि (खि) लपारदृश्वा ।। शय्यापालकुलाधीश निबोधेदं वचो मम । संसारसागरोत्तारकारणं न हरे: परं (रम्) । अवतारा दशाप्यस्य रामस्ते[षां ?]

२२ · · · · वायुपुत्रयुक्तो वसत्युत्तमयोगिचिन्त्य: । महीधरस्यास्य तपंगिरेस्तं प्रभावमग्र्यं किमुदाहरामि । विहाय[38]

---

२८. यापुढील लेखांत रामटेक येथील तीर्थांचें वर्णन आहे. त्याचें वाचन 'सरदेसाई–स्मारक–ग्रंथ' पृ. १२६–१३१ आणि 'एपिग्राफिया इंडिका', पु. २५, पृ. १४–२० वर दिलें आहे.

प्राचीन भारतीय नाणीं

१५. चंदेल्लनृपति वीरवर्मन् याचें सोन्याचें नाणें*

नाणीं हें भारताच्या प्राचीन इतिहासाच्या ज्ञानाचें एक प्रमुख साधन होय. किंबहुना कांही प्राचीन राजवंशांचा इतिहास केवळ नाण्यांवरून ज्ञात झाला आहे. प्रस्तुत लेखांत अशा एका महत्त्वाच्या नाण्याविषयी माहिती दिली आहे.

हें नाणें जबलपूरपासून आठ मैलांवर तेवर गावांत सापडलें. तेवर ही प्राचीन इतिहासांतील सुप्रसिद्ध कलचुरि राजांची राजधानी त्रिपुरी. हें नाणें जबलपूरच्या हीरालाल पुरातत्त्व समितीचे उत्साही कार्यकर्ते डॉ. एम्. सी. चौबे यांनी गेल्या महिन्यांत मजकडे पाठविलें. नागपुरच्या म्यूझियमचे प्रमुख डॉ. पटवर्धन यांनी तें साफ करून त्याच्या दोन्ही बाजूंचे फोटो घेतले. या नाण्याचा फोटो प्लेटमध्यें दिला आहे. (नं. ४ पाहा.)

चंदेल्ल राजवंशाचें इतिहासांतील महत्त्व

हें नाणें चंदेल्लनृपति वीरवर्मन् याचें आहे. भारताच्या प्राचीन इतिहासांत चंदेल्ल राजवंशाला प्रमुख स्थान आहे. इ. स. च्या अकराव्या शतकाच्या आरंभीं मुसलमानांच्या स्वाऱ्या भारतावर होऊं लागल्या. त्या वेळीं उत्तर भारतांतील ज्या राजवंशांनी परकीय आक्रमण थोपवून धरण्याचा प्रयत्न केला, त्यांचें पुढारीपण चंदेल्लांकडे होतें. चंदेल्लांच्या कारकीर्दींत स्थापत्य कलेची मोठी उन्नति झाली. तिची साक्ष त्यांची राजधानी खजुराहो येथील सुंदर देवालयें अद्यापि देतात. चंदेल्लांच्या कारकीर्दींत संस्कृत कवि

---

* हा लेख भारत इतिहास संशोधन मंडळाच्या ४२ व्या संमेलन-प्रसंगी (ता. ४ जून १९५५ रोजीं) वाचला होता.

व नाटककार यांना उदार आश्रय मिळून संस्कृतवाङ्मयांत कांही उत्कृष्ट ग्रंथांची भर पडली. कृष्णमिश्र कवीचें 'प्रबोधचन्द्रोदय' हें सुप्रसिद्ध तत्त्वज्ञानपर संस्कृत नाटक चंदेल्ल नृपति कीर्तिवर्मन् याच्या दरबारी प्रथम रंगभूमीवर आलें. चंदेल्ल राजांनी सुमारें इ. स. ८०० पासून १५४५ पर्यंत म्हणजे जवळ जवळ साडेसातशें वर्षें मध्यभारतांत राज्य केलें. त्यांच्या राजधान्या कालंजर, खर्जूरवाहक (खजुराहो), आणि महोत्सवपुर (महोबा) येथे होत्या. अकबराची समकालीन शूर गोंड राणी दुर्गावती ही चंदेल्ल राजकन्या होती.

चंदेल्लांचीं नाणीं

चंदेल्लांनी जवळ जवळ साडेसातशें वर्षें राज्य केलें पण त्यांचीं नाणीं फारच थोडीं उपलब्ध झालीं आहेत. पन्नास साठ वर्षांपूर्वीं व्हिन्सेंट स्मिथने ज्ञात असलेल्या सर्व चंदेल्ल नाण्यांची मोजदाद केली तेव्हा ती संख्या ४१ च्या वर गेली नाही.[१] इ. स. अकराव्या शतकाच्या उत्तरार्धांत होऊन गेलेल्या चंदेल्ल नृपति कीर्तिवर्मन् याने प्रथम आपल्या नांवें सोन्याचीं नाणीं पाडलीं. हीं नाणीं नर्जीकच्या चेदि देशाचा अधिपति कलचुरि गाङ्गेयदेव याच्या नाण्यांसारखीं आहेत. या नाण्यांच्या पुढील बाजूवर मोठ्या अक्षरांत राजनाम व मागील बाजूवर कमलासना लक्ष्मीची आकृति असते.[२] त्यानंतर कीर्तिवर्म्याचा पुत्र सल्लक्षणवर्मन् याने प्रथम तांब्याचीं नाणीं पाडलीं. त्यांच्या पुढील बाजूवर राजनाम व मागील बाजूवर हनुमानाची आकृति असते. छत्तीसगडांतील रत्नपुर येथील कलचुरि नृपति पहिला जाजल्लदेव याचा चंदेल्लांशीं संबंध आला होता. त्याने या नाण्यांसारखींच हनुमान्–प्रतिमांकित तांब्याचीं नाणीं आपल्या नांवें पाडलीं होतीं. तशींच नाणीं त्याच्या नंतरच्या कांही कलचुरि राजांनीहि पाडलीं. चंदेल्ल-नृपति मदनवर्मन् याने चांदीचीं लक्ष्मीप्रतिमांकित नाणीं पाडलीं होतीं. याच्याशिवाय दुसऱ्या कोणा चंदेल्ल राजाचीं चांदीचीं नाणीं अद्यापि

---

१. इंडियन अँटिक्वरी, पु. ३७, पृ. १४७.

२. वा. वि. मिराशी–कलचुरिनृपति आणि त्यांचा काल, प्लेट १४ पाहा.

सापडलीं नाहीत. वीरवर्म्यांच्या कारकीर्दींत पाडलेलीं नाणीं हीं शेवटचीं चंदेल्ल नाणीं होत. हा राजा सुमारें विक्रम संवत् १३१६ पासून १३४२ पर्यंत म्हणजे इ. स. १२५० पासून १२८६ पर्यंत राज्य करीत होता. त्यानंतर दोन चंदेल्ल राजांचे कोरीव लेख सापडले आहेत, पण त्यांची नाणीं अद्यापि मिळालीं नाहीत.

वीरवर्म्याचीं नाणीं

चंदेल्ल नृपति वीरवर्मन् याचीं नाणीं अत्यंत दुर्मिळ आहेत. आतापर्यंत या राजाचें एकच सोन्याचें नाणें प्रसिद्ध झालें आहे. तें खजुराहो येथे सापडलें होतें. तें बंगाल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये पासष्ट वर्षांपूर्वी सन १८८९ मध्ये डॉ. होर्नल याने प्रसिद्ध केलें.[3] त्यावरील राजनाम होर्नल याने पुढीलप्रमाणे वाचलें—

१ श्रीमद्वी–
२ रवम्म ·
३ · देवी

दुसऱ्या ओळीच्या शेवटीं व तिसऱ्या ओळीच्या आरंभीं एक एक अक्षर गंज लागल्यामुळे खराब झालें होतें. त्यामुळे तीं दोन अक्षरें होर्नलला वाचतां आलीं नाहीत. राजनामाच्या शेवटीं 'देवी' कसें आहे याचाहि उलगडा होर्नलला झाला नाही. हें नाणें कलकत्त्याच्या इंडियन् म्यूझियम्‌मध्ये आहे. व्हिन्सेंट स्मिथने आपल्या इंडियन म्यूझियम्‌मधील नाण्यांच्या कॅटलॉगमध्ये हेंच नाणें प्रसिद्ध केलें आहे.[4] त्या वेळीं हें नाणें साफ केल्यामुळे त्यावरील सर्व अक्षरें दिसत होतीं, पण स्मिथला पूर्ण राजनाम चांगल्या रीतीनें वाचतां आलें नाही. त्याने तें 'श्रीमद्वीरवर्म्म [हरा] देव' असें वाचलें, पण शेवटच्या हरादेव याचा अर्थ त्याला लावतां येईना. स्मिथने हें नाणें अद्वितीय (unique) आहे असें म्हटलें आहे. आतापर्यंत वीरवर्म्याचें या किंवा दुसऱ्या कोणत्याहि तऱ्हेचें नाणें प्रसिद्ध झालें नसल्यानें स्मिथचें

---

३. जनरल ऑफ दि एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगाल, (१८८९), पृ. ३४ आणि प्लेट.

४. पु. १, पृ. २५४, प्लेट २६ (क्रमांक १०) पाहा.

म्हणणें यथार्थ होतें. पण आता हें त्याच तऱ्हेचे वीरवर्म्यांचें दुसरें नाणें सापडलें आहे. याशिवाय आणखी चार लक्ष्मीप्रतिमांकित तांब्याचीं नाणीं कनिंगह्यामच्या संग्रहीं होतीं, पण त्यावरील राजनाम त्याला समाधानकारक रीतीने वाचतां आलें नाही. 'श्रीमद्वासवमत्यदेव' किंवा 'श्रीमत्केशवमहीदेव' असें वाचन त्याने दिलें आहे,[५] पण तें अर्थातच बरोबर नाही. या नाण्यांचे चांगले छाप प्रसिद्ध झाले नाहीत. कनिंग्ह्यामने आपल्या दहाव्या रिपोर्टांत त्यांच्या आकृति काढून दिल्या आहेत, त्यांवरून तीं नाणींहि चंदेल्ल वीरवर्म्यांचींच होतीं असें दिसतें.

प्रस्तुत नाण्याचें वर्णन

प्रस्तुत नाणें सोन्याचें आहे. त्याचा आकार $\frac{७}{१०}$ इंच असून वजन ४७ ग्रेन आहे. त्याच्या पुढील भागावर खालील अक्षरें दिसतात.

१ श्रीमद्वी–
२ रवमध–
३ ·देवो

तिसऱ्या ओळींतील आरंभीचें एक अक्षर पूर्णपणें दिसत नाही. तथापि इंडियन म्यूझियममधील नाण्यावर तें 'रा' असें स्पष्ट दिसत असल्याने पूर्ण राजनाम 'श्रीमद्वीरवर्मधरादेवो' असें असावें. दुसऱ्या ओळींतील शेवटचें अक्षर आतापर्यंत वाचलें गेलें नव्हतें तें मी 'ध' असें वाचतों. वीरवर्म्यांच्या काळीं 'ध' अक्षराला डाव्या बाजूस शिंग फुटलें होतें, पण तें येथे दिसत नाही. नाण्यांवरील अक्षरें तत्कालीन अक्षरांपेक्षा थोडीं जुन्या पद्धतीचीं असतात असा अनुभव आहे. त्याच तऱ्हेचा हा प्रकार आहे.

या राजनामाच्या शेवटीं 'धरादेव' आलें आहे हें विशेष उल्लेखनीय आहे. चंदेल्ल, कलचुरि वगैरे राजवंशांतील इतर नृपतींच्या नाण्यांवरील राजनामांच्या शेवटीं 'देव' येतें. जसे श्रीमत्कीर्तिवर्मदेव, श्रीमद्गाङ्गेयदेव, श्रीमज्जाजल्लदेव, इत्यादि. वीरवर्म्याने आपल्या नांवाच्या शेवटीं 'धरादेव' योजलें आहे. 'धरादेव' (पृथ्वीवरील देव) हा शब्द सामान्यतः

५. कनिंग्ह्याम्–कॉइन्स् ऑफ मेडिव्हल इंडिया, पृ. ८९ पाहा.

'ब्राह्मण' या अर्थीं संस्कृत भाषेंत योजिला जातो, पण तो येथे 'राजा' या अर्थीं योजिला आहे. 'मनुस्मृतीं'त (अध्याय ७, श्लो. ८) 'महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति' (राजा हा मनुष्यरूपी महान् देव होय) असें म्हटलें आहे, त्याला अनुसरून 'धरादेव' या शब्दाचा असा प्रयोग या नाण्यावर केला असावा. याच अर्थाचें 'ना विष्णुः पृथिवीपतिः' हें वचनहि प्रसिद्ध आहे.

चंदेल्लांचें चेदि देशावर राज्य

चेदि देशावर कलचुरि राजांचें राज्य होतें. त्यांची राजधानी त्रिपुरी येथे कलचुरि नृपति गाङ्गेयदेव याचीं नाणीं सापडलीं आहेत. तेव्हा चंदेल्ल नृपति वीरवर्मन् याचें नाणें त्रिपुरीस कसें आलें याचें सकृद्दर्शनीं आश्चर्य वाटेल. पण त्याची उपपत्ति लावणें कठीण नाही. कलचुरि नृपति विजयसिंह हा त्या वंशाचा शेवटचा ज्ञात राजा होय. यानंतर चंदेल्लांनी चेदि देशावर स्वारी करून कलचुरींचा पराजय केला व तो देश आपल्या राज्यास जोडला. वीरवर्म्याचा पिता त्रैलोक्यवर्मन् याचा एक ताम्रपट पूर्वीच्या रेवा संस्थानांत धुरेती येथे कांही वर्षांपूर्वी सापडला होता तो आता प्रसिद्ध झाला आहे. तो कलचुरि संवत् ९६३ (इ. स. १२१२)चा आहे.[६] त्यावरून जबलपूर–सागर–दमो हा प्रदेश व त्याजवळचा विंध्य प्रदेश चंदेल्लांच्या राज्यांत मोडत होता यांत संशय नाही. स्वतः वीरवर्म्याचे लेख चेदिदेशांत अद्यापि सापडले नाहीत, पण त्याच्या नंतरच्या भोजवर्मन् व हम्मीरवर्मन् या चंदेल्ल नृपतींचे लेख दमो जिल्ह्यांत मिळाले आहेत. भोजवर्मन्चा लेख विक्रम संवत् १३४४ व हम्मीरवर्मन्चा लेख विक्रम संवत् १३६५ चा आहे.[७] या लेखांवरून जबलपूर, सागर, दमो या प्रदेशांवर चंदेल्लांचें राज्य चौदाव्या शतकापर्यंत होतें यांत संशय नाही. तेव्हा चंदेल्ल वीरवर्मन् याचें नाणें त्रिपुरीस सापडावें, यांत आश्चर्य नाही.

---

६. एपिग्राफिया इंडिका, पु. २५, पृ. १ इ.

७. हीरालाल–इन्स्क्रिप्शनस् इन दि सेंट्रल प्राव्हिन्सेस् अँड बेरार (द्वितीयावृत्ति), पृ. ५६–५७.

१६. विजयनगरच्या कृष्णरायाचें तांब्याचें नाणें*

उपलब्धि—हें नाणें पश्चिम खानदेशांतील नंदूरबारचे रहिवासी श्री. शिवलदास शम्भुभाई देसाई यांच्या संग्रहांतील आहे. त्यांनी तें कांही महिन्यांपूर्वी मजकडे वाचनार्थ पाठविलें, तें त्यांच्या अनुज्ञेने येथे प्रसिद्ध करीत आहें. (प्लेटमधील क्रमांक ५ पाहा.)

वर्णन—हें नाणें कोठे सापडलें त्याची नोंद नाही. 'तें आमच्या संग्रहीं पुष्कळ वर्षांपासून आहे' असें श्री. शिवलदास सांगतात. हें नाणें वाटोळें तांब्याचें असून त्याचा व्यास $\frac{५७}{१००}$ इंच व वजन ५२ ग्रेन आहे. नाण्याच्या पुढील बाजूवर क्वचित् दिसणाऱ्या वर्तुलाकार सीमेच्या आंत 'श्रीकृष्णराय' हें राजनाम नागरी लिपींत तीन ओळींत लिहिलें आहे. पहिल्या व तिसऱ्या ओळींत एक एक अक्षर व मधल्या ओळींत तीन अक्षरें आहेत. ही अक्षरें सामान्यतः इलियटने प्रकाशित केलेल्या सोन्याच्या नाण्यांवरील अक्षरांसारखींच आहेत.[१] 'कृ' या अक्षराचा ऋकार 'क'च्या खाली जोडला नसून त्याच्या उजव्या बाजूस दाखविला आहे. 'रा' या अक्षराचेंहि वळण किंचित् निराळें आहे. नाण्याच्या मागील बाजूस वीरासनस्थ गरुडाची आकृति आहे. गरुडाच्या डाव्या बाजूस चक्र व उजव्या बाजूस शंख आहे. त्याने किरीट धारण केला असून त्याचे पंख दोन्ही बाजूस पसरलेले दाखविले आहेत. त्याचें अधोवस्त्र पायांमध्ये व दोन्ही बाजूस दिसत आहे. गरुडाने आपला डावा गुडघा जमिनीवर टेकला असून उजवा पाय वाकविला आहे व दोन्ही हात नमस्कार करण्याकरितां जोडले आहेत. एकंदरींत या नाण्यावरील गरुडाची आकृति कृष्णरायाच्या इतर नाण्यांवरील आकृतीपेक्षा जास्त सुबक आहे.

---

* हा लेख भारत इतिहास संशोधन मंडळाच्या ४२ व्या संमेलनप्रसंगीं (ता. १४ जून १९५५ रोजीं) वाचला होता.

१. इलियट्–कॉइन्स् ऑफ् सदर्न इंडिया, प्लेट ३, क्रमांक ११२ (जी).

चर्चा—हें नाणें 'कृष्णराय' नामक राजाचें आहे. हा राजा विजयनगरच्या राजवंशांतील असून त्याने इ. स. १५०९ ते १५३० पर्यंत राज्य केलें. या राजाच्या कांही नाण्यांवर 'प्रताप' हें बिरुद त्याच्या नांवामागे लावलेलें आढळतें. तसें बिरुद या नाण्यांवर नसलें तरी हें नाणें या कृष्णरायाचेंच यांत संशय नाही. कृष्णरायाप्रमाणे देवरायाचीं नाणींहि 'प्रताप' बिरुदासहित व तद्रहित अशीं दोन्ही प्रकारचीं आढळतात.

कृष्णरायाचीं अनेक सोन्याचीं व तांब्याचीं नाणीं आतापर्यंत प्रसिद्ध झालीं आहेत. तांब्याचीं सर्व नाणीं मोठया आकाराचीं होतीं. त्यांचा व्यास $\frac{9}{10}$ इंच किंवा थोडा अधिकच असून वजनहि २१७ ते २४७ ग्रेन पर्यंत होतें. प्रस्तुत नाणें हें या नाण्यांच्या चतुर्थांशाचें असावें. कृष्णरायाचें इतकें लहान तांब्याचें नाणें प्रथमच प्रसिद्ध होत आहे.

विजयनगरच्या अनेक हिंदु राजांचीं सोन्याचीं नाणीं वऱ्हाडच्या चारी जिल्ह्यांत तसेंच वऱ्हाडला लागून असलेल्या चांदा जिल्ह्यांतहि सापडतात. पण त्यांचीं तांब्याचीं नाणीं विदर्भांत किंवा मुंबई प्रांतांतील इतर मराठी प्रदेशांत सापडलेलीं माहीत नाहीत. तांब्याचीं नाणीं जेथे प्रचलित असत तेथून दूरच्या प्रदेशांत सामान्यतः सापडत नाहीत. या दृष्टीनेहि विजयनगरच्या हिंदु राजाचें प्रस्तुत तांब्याचें नाणें खानदेशसारख्या उत्तरेच्या जिल्ह्यांत सापडावें ही गोष्ट विशेष उल्लेखनीय मानली पाहिजे.

विजयनगरच्या राजांचीं नाणीं विदर्भांत कशीं सापडतात ?

विजयनगरच्या हिंदु राजांचीं सोन्याचीं नाणीं वऱ्हाडांत अनेक ठिकाणीं कां सापडावीं याचेंहि समाधानकारक उत्तर अद्यापि सापडलें नाही. कृष्णरायाने दूरवर स्वाऱ्या करून विजय प्राप्त केले होते, पण वऱ्हाडवर त्याचा कधी अंमल होता असें दिसत नाही. वऱ्हाडांतील मुसलमानी राज्यकर्त्यांनी हीं नाणीं आपल्या राज्यांत चालू दिलीं असणें संभवनीय वाटत नाही. या प्रश्नाचें कै. डॉ. एम्. एच्. कृष्ण यांनी जें उत्तर सुचविलें आहे तेंहि बरोबर वाटत नाही. ते म्हणतात, 'मध्यप्रदेशाच्या बैतुल जिल्ह्यांतील खेडला या ठिकाणीं राज्य करणाऱ्या गोंड राजांनी विजय-


नगरच्या राजांचें आधिपत्य स्वीकारून हीं नाणीं आपल्या राज्यांत चालू केलीं असावीं. म्हणून तीं विजयनगरच्या उत्तरेस इतक्या दूरवर सापडतात.'[२] हें कारण मनाला पटत नाही. खेडल्याच्या गोंड राजांनी—विशेषतः त्यांपैकी नरसिंगरायाने–आजूबाजूच्या माळवा, खानदेश, एलिचपूर येथील मुसलमानी अधिपतीशीं तसेंच गुलबर्ग्याच्या बहामनी सुलतानाशीं अनेकवार युद्ध करून आपलें स्वातंत्र्य कांही काळ टिकविलें होतें खरें, पण त्यांचें स्वातंत्र्य सन १४३३ मध्ये माळव्याच्या हुशंगशहाने नरसिंगरायास ठार मारल्यावर संपुष्टांत आलें. कृष्णराय व इतर विजयनगर नृपतींचीं नाणीं त्यानंतरचीं आहेत. तेव्हा तीं खेडला येथील गोंडनृपतींनी आपल्या राज्यांत प्रचलित केलीं असणें शक्य नाही. कदाचित् हीं नाणीं वऱ्हाडच्या मुसलमानी राज्यकर्त्यांनी व सेनाधिपतींनी विजयनगरच्या राजांशीं केलेल्या युद्धांत सापडलेल्या लुटीपैकी असतील. विजयनगरचीं सोन्याचींच नाणीं वऱ्हाडांत सापडतात, तांब्याचीं नाणीं मुळीच आढळत नाहीत, यावरूनहि या अनुमानाला पुष्टि मिळते. प्रस्तुत तांब्याच्या नाण्यासारखें एकादें नाणें महाराष्ट्र-विदर्भांत सापडतें तें कदाचित् विजयनगरहून या भागांत येणाऱ्या हिंदु प्रवाशाबरोबर आलें असावें.

---

२. ॲन्युअल रिपोर्ट ऑफ मैसोर आर्किऑलॉजिल डिपार्टमेंट फॉर १९३०, पृ. ६९.

भारतीय नाणीं

पुढील बाजू क्र. १ मागील बाजू



पुढील बाजू क्र. २ मागील बाजू



पुढील बाजू क्र. ३ मागील बाजू




पुढील बाजू क्र. ४ मागील बाजू



पुढील बाजू क्र. ५ मागील बाजू



पुढील बाजू क्र. ६ मागील बाजू



पुढील बाजू क्र. ७ मागील बाजू



पुढील बाजू क्र. ८ मागील बाजू



क्र. १ ते ३–शकनृपति मान याचीं नाणीं. क्र. ४–चंदेल्लनृपति वीरवर्म्याचें नाणें.
क्र. ५–विजयनगराधिपति कृष्णरायाचें नाणें. क्र. ६–गोंडनृपति संग्रामसिंहाचें नाणें.
क्र. ७ व ८–गोंडनृपति जाटबाचीं नाणीं.

१७. गोंड राजांचीं नाणीं*

गोंड राजांनी मध्यप्रदेशांत कित्येक शतकें राज्य केलें, विद्या व कला यांना उदार आश्रय दिला व भारतीय राजांची उज्ज्वल परंपरा राखली. त्यांचा इतिहास संशोधकांच्या परिश्रमाने हळू हळू ज्ञात होत आहे, पण त्यांच्या नाण्यांविषयी फारशी माहिती अद्यापि उपलब्ध झाली नाही. आतापर्यंत गोंडांचीं फक्त पांच नाणीं प्रकाशित झालीं आहेत. तीं सर्व गढा–मंडला येथे राज्य करणाऱ्या गोंडांचीं आहेत. यांपैकी चार नाणीं सध्या कलकत्त्याच्या इंडियन म्युझियम्‌मध्ये असून पांचवें लंडनच्या म्युझियम्‌मध्ये आहे. याशिवाय कांही नाणीं नागपूरच्या म्युझियम्‌मध्ये आहेत. तीं सर्व देवगडच्या गोंड राज्याचा संस्थापक जाटबा आणि त्याचा नातू याचीं आहेत. तीं अद्यापि अप्रकाशित आहेत. त्यांपैकी दोन नाण्यांचे छाप त्या म्युझियम्‌चे असिटंट क्युरेटर श्री. रोडे यांच्या कृपेने येथे प्रकाशित केले आहेत.

संग्रामशाह

मंडल्याजवळ रामनगर येथे एक संस्कृत शिलालेख आहे. त्यांत गढा–मंडल्याच्या ५३ गोंड राजांची वंशावळ दिली आहे, पण त्यांतील आरंभीचीं नांवें काल्पनिक दिसतात. दादीरायापासून ऐतिहासिक वंशावळीला आरंभ होतो. दादीराय–त्याचा मुलगा अर्जुनसिंह–त्याचा मुलगा संग्रामसिंह अशी वंशावळ रामनगरच्या लेखांत आढळते. अबुल फाजलच्या 'अकबरनामा' ग्रंथांत ही वंशावळ खर्जी–संगीनदास–अर्जुनदास–अमानदास ऊर्फ संग्रामशाह अशी दिली आहे. या दोन वंशावळींत अर्जुनसिंह किंवा अर्जुनदास आणि संग्रामसाहि किंवा संग्रामशाह हीं नांवें समान आहेत, पण इतर नांवें भिन्न आहेत. त्यांतील खरीं नांवें कोणतीं हें ठरविण्यास सध्या साधन नाही.

---

* 'मधुवन', चांदा, दिवाळी अंक, सन १९५२.

संग्रामशाह हा बलाढय राजा होता. त्याच्याविषयी रामनगरच्य लेखांत खालील श्लोक आले आहेत—

आसीत्सूनुस्तस्य संग्रामसाहि–
विद्विट्तूलस्तोमकल्पान्तवह्निः ।
विश्वग्व्याप्ते यत्प्रतापप्रकाशे
मध्याह्नार्को विस्फुलिङ्गीबभूव ॥
वज्रप्रायैः पर्वतप्रौढगाढैः
सुप्राकारैरम्बुभिश्चाक्षयाणि ।
द्वापंचाशद् येन दुर्गाणि राज्ञा
निर्वृत्तानि क्षोणिचक्रं विजित्य ॥

या श्लोकामध्ये संग्रामसाहि अत्यंत प्रतापी होता, त्याने आपल्या शत्रूंना जिंकून बावन किल्ले बांधले असें वर्णन आहे. हे बावन किल्ले कोणते हें माहीत नाही, पण त्यांपैकी चौरागड हा होता यांत संशय नाही. गढा–मंडल्याच्या गोंड राजांना अनेकवार आश्रय देऊन या चौरागडाने गोंडांच्या इतिहासांत आपलें नांव सुविख्यात केलें आहे.

'अकबरनाम्यां'तहि संग्रामशहाविषयी बरीच माहिती आढळते. त्याचा पिता अर्जुनदास याने त्याला गादी न देतां ती त्याचा धाकटा भाऊ जोगीदास यास देण्याचें ठरविलें; तेव्हा संग्रामशाह रींवाच्या राजाच्या आश्रयास गेला. तेथून एके दिवशीं गुप्तपणें येऊन त्याने आपल्या पित्याचा खून केला व गादी बळकाविली, इत्यादि माहिती अबुल फाजलने दिली आहे, पण तींत किती तथ्य आहे हें सांगतां येत नाहीं.

संग्रामशहाची सून राणी दुर्गावती हिने आपल्या अल्पवयी मुलाच्या नांवें राज्य केलें व मोंगलांशीं शौर्याने लढून अजरामर कीर्ति संपादन केली, हें सुप्रसिद्ध आहे.

संग्रामशहाचीं दोन सुवर्ण नाणीं

या संग्रामशहाचीं दोन नाणीं आतापर्यंत प्रसिद्ध झालीं आहेत. तीं दोन्ही सोन्याचीं आहेत. त्यांपैकी एक चौकोनी व दुसरें वाटोळें आहे.

चौकोनी नाणें जबलपूर जिल्ह्यांत सापडलें होतें. तें कै. राखालदास बॅनर्जी यांनी पुराणवस्तुसंशोधनखात्याच्या सन १९१३-१४ च्या वार्षिक अहवालांत प्रसिद्ध केलें आहे. सध्या तें कलकत्त्याच्या इंडियन म्युझियम्‌मध्ये आहे. या नाण्याचा फोटो प्रस्तुत पुस्तकांतील प्लेटमध्ये (क्रमांक ६) दिला आहे.

या नाण्याचा आकार ·७ इंच असून वजन १६६·५ ग्रेन आहे. पुढील बाजूवर मध्यभागीं उजवा पाय वर केलेला व डावीकडे तोंड करून उभा असलेला सिंह असून त्याच्यावर सुर्याचें चिन्ह आहे. सभोंवती संस्कृत भाषेंत लेख आहे. तो कै. रा. ब. डॉ. हिरालाल यांनी खालीलप्रमाणें वाचला होता. पुढील बाजूवर–नागरी लिपींत– 'पुतरि स्वस्ति श्रीसंग्रामसाहि, संवत १५७०', मागील बाजूवर वरील अर्ध्या भागांत तेलगू लिपींत 'श्रीसंग्राम-साह', खालील अर्ध्या भागांत नागरी लिपींत–पहिली ओळ 'श्री ग्रमसह', दुसरी ओळ 'स्वश्रीसम'. या बाजूवरच्या नागरी लिपींतील लेखांत बराच घोटाळा झालेला दिसतो.

यानंतर हें नाणें श्री. विद्याविनोद यांनी इंडियन म्युझियम्‌मधील नाण्यांच्या पूरक सूचींत प्रसिद्ध केलें. तींत यावरील संवत् '१५६६' असें वाचलें आहे. या नाण्याचा फोटो येथे दिला आहे, त्यावरून हीं दोन्हीं वाचनें बरोबर नसून खरें वाचन 'संवत १५८८' असावें असें वाटतें.

नाण्यांचा अर्थ

या नाण्यांच्या पुढील बाजूवर डॉ. हीरालाल यांनी 'पुतरी' असें वाचलें होतें व 'पुतरी' हा शब्द अद्यापि गोंड लोकांत 'मोहरेपेक्षा थोडें कमी वजनाचें नाणें' या अर्थी प्रचलित आहे असेंहि म्हटलें होतें. पण 'पुतरी' हें वाचनहि बरोबर नसून खरा शब्द 'पुलस्त' आहे, हें संग्राम-शहाचें दुसरें नाणें सापडलें तेव्हा ध्यानांत आलें. हें दुसरें नाणें कोठे सापडलें तें नमूद नाही. तें नाणकसंग्राहक श्री. रॉबर्ट सट्क्लिफ यांच्या संग्रहातील असून तें प्रथम श्री. नेव्हिल यांनी बेंगाल एशियाटिक सोसायटी-च्या सन १९२५ च्या जर्नलमध्ये व नंतर श्री. ॲलन यांनी लंडन येथील न्यूमिस्मॅटिक् क्रॉनिकलमध्ये प्रसिद्ध केलें आहे. सध्या हें ब्रिटिश म्युझियम्‌मध्ये आहे.

हें दुसरें नाणें वर्तुलाकार असून त्याचा व्यास '९५ इंच व वजन १६७·५ ग्रेन आहे. याच्या पुढील भागांवर मध्यभागीं सिंह व त्यावर सूर्याचें चिन्ह असून सभोंवती 'पुलस्तवंश श्रीसंग्रामसाहि संवत १६००' असा लेख नागरी लिपींत आहे. मागील बाजूवर मध्यभागीं तेलगू लिपींत लेख असून सभोंवती 'श्रीपुलस्तवंश श्रीसंग्रामदेव' असा नागरी लिपींत लेख आहे.

या नाण्यावरून संग्रामशहाच्या येथे दिलेल्या चोकोनी नाण्यावरहि पुढील बाजूस त्याच प्रकारचा लेख असावा असें वाटतें व जरा सूक्ष्मपणें पाहिल्यावर त्या बाजूवर 'पुलस्तवंश श्रीसंग्रामसाहि संवत १५८८' असा लेख वाचता येतो.

संवताबद्दल मतभेद

मागें सांगितल्याप्रमाणें या चौकोनी नाण्यावरील संवताच्या वाचनाबद्दल मतभेद आहे. १५६६, १५७० व १५८८ अशी तीन वाचनें आहेत. वर्तुळाकार नाण्यावरचें संवत् १६०० निश्चित आहे. हीं वर्षें अर्थातच विक्रम संवताचीं आहेत. संग्रामशहाच्या काळचा एक सतीलेख दमोजवळ सापडला असून त्यावर संवत् १५७० कोरलें आहे, असें डॉ. हीरालाल यांनी म्हटलें आहे. तेव्हा संग्रामशहाने निदान विक्रम संवत् १५७० ते १६०० (किंवा इ. स. १५१३ ते १५४३) या काळांत राज्य केलें असें दिसतें. 'अकबरनाम्यां'तील उल्लेखांवरून संग्रामशहाचा मुलगा दलपतशाह सन १५४१ यध्यें गादीवर आला असें श्री. विल्स याने आपल्या 'सातपुडा पर्वतांतील राजगोंड महाराज' या इंग्रजी पुस्तकांत म्हटलें आहे त्यांत थोडी चूक दिसतें, कारण संग्रामशहा निदान इ. स. १५४३ पर्यंत राज्य करीत होता, यांत संशय नाही.

पुलस्त्यवंश आणि गोंडी नाणें

प्राचीनकाळीं आपला वंश चन्द्रसूर्यांपर्यंत किंवा एखाद्या पुराणप्रसिद्ध विख्यात व्यक्तिपर्यंत मागे जातो हें सांगण्याची पद्धति होती व राजे लोक त्याचा उल्लेख अभिमानाने आपल्या लेखांत करीत असत. गोंडराजे हे

आर्येतर वंशाचे असल्याने स्वतःस रावणवंशी म्हणवत. रावण हा पुलस्त्य ऋषीचा नातू. पुलस्त्याचा मुलगा विश्रवस् याला केशिनी नामक स्त्रीपासून रावण, कुंभकर्ण व बिभीषण असें तीन पुत्र झाले. आपला पूर्वज रावण हा पुलस्त्य ऋषीच्या वंशांत उत्पन्न झाल्यामुळे संग्रामशहाने आपल्या सोन्याच्या नाण्यांवर पुलस्त्यवंशाचा निर्देश केला आहे.

गढा-मंडला येथें राज्य करणारे गोंड राजे मूळचे गोदातीरचे तेलगू भाषेच्या मुलखांतील. उत्तरेंत नर्मदातीरीं राज्य स्थापल्यावरही त्यांनी आपल्या पूर्वजांच्या भाषेची स्मृति कायम ठेवून नागरीप्रमाणें तेलगू लिपींतही आपलें नांव स्वतःच्या नाण्यांवर उमटवून आपलें स्वभाषाप्रेम व्यक्त केलें हें उल्लेखनीय आहे.

आणखी तीन चांदीचीं नाणीं

या दोन नाण्यांखेरीज आणि तीन चांदीचीं नाणीं डॉ. हीरालाल यांनी सातपुड्याच्या पठारावर 'तनिया' या गांवी सापडलीं होतीं. तींहि कै. राखालदास बॅनर्जी यांनी आपल्या लेखांत प्रसिद्ध केलीं आहेत. हीं नाणीं ·३ इंच रुंदीचीं, चौकोनी किंवा अनियमित आकाराचीं असून त्यांचें वजन १३ ते १४ ग्रेन आहे. त्यांच्या पुढील बाजूवर सिंहाची आकृति आहे, पण मागील बाजू कोरी आहे. या नाण्यांवर लेख नसल्याने तीं कोणीं पाडलीं तें सांगतां येत नाही. कै. बॅनर्जी यांचे मतें ती संग्रामशहाच्या नाण्यांपेक्षा प्राचीन असावीं.

गढा-मंडल्याप्रमाणें देवगड येथेहि गोंडांचें राज्य होतें. हें घराणें मूळचें हरयागड या ठिकाणचें. याचा मूळ पुरुष जाटबा याचीं कांहीं नाणीं सापडलीं आहेत. त्यांपैकी एक येथें दिलें आहे.

जाटबाचें तांब्याचें नाणें

हें तांब्याचें नाणें (प्लेट, क्रमांक ७) मोंगली नाण्यांप्रमाणें जाड आकाराचें असून वाटोळें आहे. हें जवळ जवळ ·९ इं. व्यासाचें आहे आणि याचें वजन २०२ ग्रेन आहे. यावर तीन ओळींचा नागरी लेख असून मध्यभागीं कांही गोंडी चिन्ह आहे. नागरी

लेख येणें प्रमाणें (१) श्रीवास्त (२) श्रीराजा (३) जाटबा. याच्या मागील बाजूवर (१) श्री [वा •] (२) कोकसाहि (३) [के] प्रतिराज अशीं अक्षरें दिसतात. जाटबाच्या पित्याचें नांव कोकशहा असावें. या नाण्यांवरून या राजाचें नांव कै. या. मा. काळे यांनी म्हटल्याप्रमाणें 'जातबा' असें नसून 'जाटबा' होतें असें स्पष्ट दिसतें. याशिवाय आणखी कांही नाणीं नागपूर म्युझियम्‌मध्ये आहेत. त्यापैकी एक येथे दिलें आहे (प्लेट, क्रमांक ८ पाहा.) त्याच्या पुढील बाजूवर तीन ओळींत लेख खाली दिल्याप्रमाणें आहे (१) श्रीमा [हा] [रा*] (२) जा जाटबा. याच्या खालीं गोंडी चिह्न आहे. मागील बाजूवर (१) श्री (२) राजा (३) कोकसुत याचा व्यास '७ इंच आणि वजन ८० ग्रेन आहे. जाटबा नांवाचे दोन राजे गोंड वंशांत झालेले दिसतात. दोघेहि कोकशहाचे मुलगे होते. पहिल्याने 'राजा' आणि दुसऱ्याने 'महाराजा' ही पदवी धारण केली होती असें या नाण्यांवरून दिसतें.

गोंडांची नाणीं अनेकांच्या संग्रहीं असतील त्यांनी तीं स्वतः प्रसिद्ध करावीं किंवा तज्ज्ञांकडून प्रसिद्ध करवावीं व त्यायोगें गोंडांच्या इतिहासावर जास्त प्रकाश पाडावा हे सुचविण्याच्या उद्देशाने हें लहानसें टिपण प्रसिद्ध केलें आहे.

परिशिष्ट

प्रा. वा. वि. मिराशी यांचे संशोधनपर लेख

इंग्रजी लेख

Articles*

1. The Epoch of the Gaṅga Era (Journal of the Bihar Reseach Society, Vol. XLII, pp. 309–315).
2. A Note on the Andhāvaram Plates of Indravarman III (to be published in the Epigraphia Indica).
3. A Note on the Senakapāṭa Inscription of Maha-Śivagupta-Bālārjuua (to be published in Ep. Ind.).
4. New Light on the Ancient History of Malwa (Indian Historical Quarterly, Vol. XXXIII, pp. 314 f.)
5. Bhavabhūti and Umbeka (to be published in Ind. Hist. Quart.)
6. Manor Plates of Dantidurga (to be published in Ind. Hist. Quart).

---

* For a list of the earlier 165 research articles, see Saṃśodhana-Muktāvali, Part I (197-206) (151 articles) and Saṃśodhana-Muktāvali, Part II (15 articles).

7. A Note on the Thana Plates of Mummuṇirāja (to be published in the Annual Report of the Secretariat Record Office, Bombay).

मराठी लेख†

§१ भवभूति आणि उम्बेक (महाराष्ट्रसाहित्यपत्रिका, वर्ष ३१, अंक १२०).

§२ भवभूतीचें जीवनचरित.

§३ हूणविजेता यशोधर्मन्-विष्णुवर्धन (नवभारत, पुणें, आगष्ट १९५७).

§४ दन्तिदुर्गाचा मानोर ताम्रपट (युगवाणी, मे १९५८).

§५ राष्ट्रकूटांचा अरब मांडलिक सुगतिप याचा चिंचणी ताम्रपट (नवभारत, जुलै १९५८).

§६ 'पृथ्वीराजविजयां'तील कल्चुरिविषयक उल्लेख.

७ द्वितीय प्रवरसेनाचा पांढुर्णा ताम्रपट (विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक १९५७-५८).*

§८ सेंद्रक नृपति जयशक्ति याचा मुंदखेडे ताम्रपट.

§९ परमारनृपति जगद्देव याचा डोंगरगाव शिलालेख.

§१० चंदेल्लनृपति वीरवर्मन् यांचें सोन्याचें नाणें.

§११ विजयनगरच्या कृष्णरायाचें तांब्याचें नाणें.

१२ मुम्मुणिराजाचा ठाणें ताम्रपट (भा. इ. सं. त्रै. मध्ये प्रकाशित होईल).

---

† यापूर्वीच्या ८० लेखांची यादी संशोधनमुक्तावलि, सर पहिला, (पृ. २०७-११) (७० लेख), आणि संशोधनमुक्तावलि, सर दुसरा, (पृ. २२८-२२९) (१० लेख) यांत दिली आहे.

§ हे लेख प्रस्तुत सरांत घेतले आहेत.

* श्री. वि. प्र. रोडे यांच्या साहाय्याने.

सूची

अकबर २०२
अकबरनामा २०९, २१०
अकालजलद ७१
अगस्त्य ६३
अग्निवर्मा ९१
अज ६४
अजयमेरु १२१
अजंटा ६८
अनिरुद्ध १४२
अन्तोलो ७९
अन्ध्राधिप १८९, १९२, १९३
अन्नसत्र १५६, १८५
अपराजितदेव १६२
अबूल फाजल २१०
अभिनवगुप्त २३
अभिमन्यु ९६
अमानदास २०९
अमोघवर्ष, प्रथम १५३
अयोध्या ७७
अरब १४९
अरिकेसरी १६२
अर्जुनदास (अर्जुनसिंह) २०९, २१०
अर्थवाद २२
अर्बुद १७२, १७३, १८२
अर्थशास्त्र २४
अल्लशक्ति १३४, १३६
अवन्ति ६७, १०१
अवन्तिसुन्दरी ७०
अविधेय ९६
अशोक ६४
आंजनेय १९०
आदित्यवर्धन ११२-११७
आदित्यशक्ति १३४, १३६
आदिशनगर ८१
आनंदवर्धन ६९
आन्ध्र ९, १०१, १८१, १९३
आन्नेय १५७, १६०
आप्पायिक १०२
आभीर ९९
आमराज १५
आमण १९३
आयुर्वेद २४, २५
आयुर्वेदरसायन ७४
आवल्लदेवी ९१
आसट्टिग्राम १३७
इक्ष्वाकुवंश ९१
इच्चाफान्मो १५
इन्दुमती ६४
इन्द्र, प्रथम १४४, १५३
इन्द्र, द्वितीय १४४

इन्द्र, तृतीय १४४, १५१, १५३-१५८
ईशानवर्मन् ८३
ईशावास्योपनिषद् २२
उज्जयिनी ५
उंडिकवाटिका ९६
उत्तररामचरित २१-२३, २६, ३५, ४४, ७१
उदयादित्य (परमार) १७३-१८१
उदयादित्य (गंग) १७८
उदुम्बर १४
उपवर्ष ५२
उपैय १६०
उम्बेयक ५२
उमदेव ५१
उम्बेक १८-२०; ४३-६१
ऋग्वेद २२
ऋद्धपुर ७४
ऋद्धपुरवर्णन ७५
ऋषभदत्त ८५, १०३
ऋषीक ६३, ८९
एकादशस्कंद ७५
एडेयंग १७८, १८१
औचित्यविचारचर्चा ३, १००
औलिकर वंश १०९, ११५, ११७, ११८
कच्छेल्ल १५०
कण्हवेण्णा ६५
कदंब ६७
कनिष्क ८४, ९१
कमलशील ४४, ५२, ५३
करहाट १६०
कर्क, प्रथम १४४, १५३
कर्ण (कलचुरि) ९१, १२५, १२६, १७७-१७९
कर्ण, सातकर्णि ६४
कर्पूरदेवी १२१, १२५
कर्पूरमंजरी ७१
कलचुरि वंश ६९, ९१, १२१-१४४, १५४, १७६
कलचुरि संवत् १३६, १९०, १९३
कलिंग ६४, ६७, १०१, १४४
कल्याण ६०
कल्लग्राम १५७, १६१
कल्लिवन १३३, १३८
कल्हण १५, ४२
कांची १४४
काणाड्डक १५१, १५६, १६१
काण्व ९
कादम्बरी ५८
कामशास्त्र २४
कामसूत्र ११, २४
कायावरोहण ६
कार्तवीर्य १२२
कालकाचार्य कथानक ९
कालंजर १२९, २०२
कालप्रियनाथ १२, ३५-३९, ७०

कालिदास १–११, २२, ६६, ८०, १००, १०१
कालीवन १२२, १२७
काव्यमीमांसा ११, ७१, १००
काव्यादर्श ५८, ७०
किरात ९३
किस्सा–इ–संजान १६२
कीर्तिवर्मन् २०२
कुंडिनपुर ६२
कुन्तल ६६, ९७, ९९, १०१, १८०, १८२
कुन्तलेश्वरदौत्य ३
कुन्दलिकामल १३३, १३८
कुमारगुप्त, प्रथम ११०
कुमारशर्मार्य १६०
कुमारसंभव ८
कुमारिल ४४, ४६–५३, ५८, ६१
कुम्भ, सातकर्णि ६४
कुशस्थली ७८
कुशाण राजे ३, ३०, ८४
कुशावती ७८
कृत ९
कृष्ण (यादव) ७३, १९३
कृष्ण (सातकर्णि) ६४
कृष्णराज (कलचुरि) ५, ६९
कृष्णराज, प्रथम (राष्ट्रकूट) ७१, १५३
कृष्णराज, द्वितीय (राष्ट्रकूट) १५३, १५६
कृष्णराज, तृतीय (राष्ट्रकूट) १४४
कृष्णराय (विजयनगरनृपति) २०६–२०८
कृष्णवर्णा (नदी) ९७, ९८
केदार १९०
कैलास लेणें १४४
कोकशाह २१४
क्रोष्टृ १९१
कोणार्क ३७–३८
कोशंबखंड ८५
कोसल, दक्षिण ६६, ६७, ७७–८३, १०१, १४४
कौतुकदेवी १५७
खर्जी २०९
खजुराहो ३१, २०१, २०२
खारवेल ६४
खोलापुर ७६
खोलेश्वर ७५–७६
गणपति ७, ८
गणार्य १६०
गणेशपुराण ८०
गद्याणक ७३
गर्दभिल्ल ९
गांगेयदेव १२५–१२८, १७६, २०२
गाथासप्तशती ८, ४१
गान्धार ९३
गुंडम राउळ ७४
गुर्जर ९४, १५०
गुर्जरत्रा १७६

गोंड २०९-२१४
गोपाल १७, ५६
गोविंद १०२
गोविंद, प्रथम (राष्ट्रकूट) १४४, १५३
गोविंद, द्वितीय (राष्ट्रकूट) १५३
गोविंद, तृतीय (राष्ट्रकूट) १५३ १७४
गोविंदप्रभु ७४
गोविय १४३
गोवियसंग १४३
गौडवध (गउडवहो) १५, ४१,४३
गौतमीपुत्र (वाकाटक) ३०
गौतमीपुत्र सातकर्णि ६४
गौरि (मानवायनि नृपति) १११, ११२, ११६
घटोत्कच लेणें ६८
घंटेश्वर १९०
चक्रधर ७४
चतुर्वर्गचिंतामणि ७४
चन्देल्ल २०१-२०३
चन्द्रगुप्त, द्वितीय, २-४, ६६, १००-१०१, १८४
चन्द्रभागा ३७
चष्टन ८४
चामुंडराज १६३
चालुक्य (पूर्व) १४
चालुक्य (उत्तर) ७२, १६२, १७४,१७६
चावोटक १५०
चाहमान १७४
चिंचणी १४९
चित्सुखाचार्य १९, २०, ५३, ५४
चित्सुखी ४४, ५३, ५५, ६०
चुटुकुल ८७
चेदि देश २०५
चेदि शक १९०
चोड (चोल) १८९, १९२, १९३
चौरागड २१०
चौलुक्य १७६
छित्तराज १६३
जगद्देव ७२, १७१-१८३
जगद्धवल १८१
जयचंद १२१
जयनद १७२, १८०
जयपुरद्वारी १३३, १३८
जयमिश्र ४७, ५१
जयवर्मन् ११०, ११७
जयशक्ति १३४
जयसिंह (कलचुरि) १२५
जयसिंह, धराश्रय (चालुक्य) १३७
जयसिंह (परमार) १७६-१७८
जयानक ११९, १२०, १२८
जाजल्लदेव २०२
जाटझा २१३, २१४
जातूकर्णी ११, १७, ३६
जैत्रपाल १८९, १९२, १९३
टंक १४४

डाहल नृपति १५४, १५५
डोंगरग्राम १८२
तक्षशिला ९१
तगरपुर १६०
तत्त्वप्रदीपिका १९, ५४
तत्त्वसंग्रह ४४, ५२
तन्त्रवार्त्तिक ४७
तन्त्रशास्त्र २३, ६०
तन्त्रालोक २३
तपोगिरि १९५
तंत्रसाहिका १४३, १४७
तरल ७१
ताजिक १५१, १५६, १५८
तिक्कपैय १६०
तैलप १७६
तोरमाण ९१, १०७
त्रिकूट ६७, १०१
त्रिपुरी ७०, १२१-१२८, १५४, २०१
त्रिभुवनमल्ल ५९
त्रिविक्रम ७५
त्रिविक्रमभट्ट ७१
त्रैकूटक ९९
त्रैलोक्यवर्मन् २०५
दक्षिणापथ ११, १२
दण्ड १९६
दण्डी ५८, ६७
दद्द, द्वितीय ९४
दन्तिदुर्ग १४४, १४५, १४७, १५३
दन्तियदुर्ग १४२
दन्तिवर्मन् १४४
दमयन्ती ६४
दलपतशहा २१२
दशकुमारचरित ६७, ७०
दशपुर १०३, १११, ११६
दशावतार लेणें १४४
दांउपैय १६०
दाण्डक्य १९६
दादीराय २०९
दामोदरसेन ६६
दिङ्नाग ५२
दिवाकरसेन ६६
दिवाकरैय १६०
दुर्ग १४३
दुर्गावती २०२, २१०
देज्जमहाराज १०२
देवनाग २९
देवम्म १४३
देवराज ९६
देवीहर १५१, १५७, १६१
दोरसमुद्र १८१
द्रव्यवर्धन ११३-११७
धन्यविष्णु १०७
धंमिक १४६
धराश्रय १३७
धर्मभट्ट १४२
धूम्रेश्वर ३३

ध्रुव १४४, १५३, १५७
नंद ९
नन्दिवर्धन १३, १४, ६६, ६७, ९९, १८५, १८६
नयनप्रसादिनी टीका १९, ४५, १५५
नरवर्मन् (औलिकर) १०९, ११०, ११७
नरवर्मन् (परमार) १७९
नरसिंगराय (गोंड) २०८
नरसिंह, प्रथम (गंग) ३७
नरसिंह (कलचुरि) १२५
नरेंद्रकवि ७५
नलचम्पू ७१
नल नृपति ६४
नलवंश ५७
नवसारी १५०
नवसाहसांकचरित १७४
नहपान ८४, ८५, ८७
नागण ७५
नागसेन ३०
नाणीं—गुप्तांचीं ५, ६;
—शकांचीं ८७–८९;
—वीरवर्मनचें २०१–२०५;
—कृष्णरायाचें २०६–२०८;
—संग्रामशहाचीं २०९–२१३;
—जाटबाचीं २१४.
नान्दीपुरद्वारी १३३, १३६
नारो व्यास ७५
निकुंभ (गण) ७, ८
निकुंभ (बिरुद) १३५
नित्यवर्ष १५१, १५७
नीचैर्गिरि ४
नीलकंठ १७, ५६
नैगमवंश ११६
पंक्तिपावन १६
पंचगौड १६१
पंचगौडीय महापर्षद् १५६, १६०
पंचद्राविड १६१
पद्मगुप्त १७४
पद्मपुर ११–१४, ६७, ७०
पद्मपुराण १८६, १८७, १९३, १९७
पद्मावती १२, २९–३४
पयोष्णी ६३, ७१, ७६
परमामृत ७५
परमार ७२–७३
परशुराम ७, ८
पांडरंगपल्ली ९६
पादमूल १४३, १८४
पारा नदी ३२, ३३
पार्थसारथिमिश्र ५२, ५३, ५८
पिंग्चीलो ७९, ८२
पिप्पलिखेट १३६
पुण्यसोम ११२
पुरुषपुर ८४
पुरुषोत्तम ७३
पुरुषोत्तमपुरी ७३
पुरूरवस् १२२
पुलकेशिन्, अवनिजनाश्रय १५०

पुलकेशिन्, प्रथम १३५
पुलकेशिन्, द्वितीय ७०, १०२, १३६
पुलस्त्यवंश २१२, २१३
पुवैय १५६, १५८, १६०
पुळुमावि ६४, ८६
पूर्वमीमांसा २०, ५९, ६०
पृथ्वीराज, तृतीय ११९–१२१
पृथ्वीराजरासो १७४
पृथ्वीराजविजय ११८–१३०
पृथिवीषेण, द्वितीय ६७
पेठपंगरक ९८
पोलोमोलोकिलि ८१
प्रतापरुद्र ५३
प्रतिष्ठान ६४
प्रतीहार १७४
प्रबन्धचिन्तामणि १८०, १८१
प्रबोधचन्द्रोदय २०२
प्रभाकर १११, ११७
प्रभावतीगुप्ता ६६, ६८, १००, १०१, १८४
प्रवरपुर १३, ९९
प्रवरसेन, प्रथम १७, ३०, ६५, ९९
प्रवरसेन, द्वितीय ६, ६६–६८, ८५, १८४
प्रश्नोपनिषद् ६३
बन्धुवर्मन् ११०, ११७
बप्पस्वामी १३३
बर्बर ९३
बलिस १३६
बल्लाल १८१
बल्हारा १५१
बाण ५८, ६९
बादडि १४३
बालरामायण ७
बालहर्ष १५५
बालार्जुन ८२, ८३
बिल्हण ११९
बुध १२२
बृहत्संहिता ७७, ११३, ११४
बृहदारण्यक उपनिषद् ६३
बृहस्पतिनाग २९
बेण्णाकट (कटक) ८५
बोडवर्म १४३
बोपदेव ७४
ब्रह्मदेवाचें देऊळ १४५, १४६
ब्रह्मसूत्र ४२
ब्रह्मसूत्रभाष्य २३
भट्टपुत्र ४७, ५१
भरत १२२
भरद्वाज (शक) ८७, ९०, ९१
भर्तृमित्र ५१
भर्त्रीश्वर ५२
भवदत्तवर्मन् ६७
भवनाग ३०
भवभूति १०–६१,
भविष्य (राष्ट्रकूट) ९६
भविष्यपुराण ३७

भाइल्लस्वामी ५
भागवत पुराण ६२
भानुशक्ति १३४, १३६
भारद्वाज (मुनि) ११३
भारशिव ३०
भार्गव ६३
भावनाविवेक ४४, ४७, ४९, ५०, ५७, ५९
भास्करभट्ट ७५
भीमनाग २९
भूमक ८७
भृंगारपर्वत ८२
भोज ३, ३१, १००, १७३–१७६
भोजकट ७७, ७८
भोजप्रबन्ध १०
भोजवर्मन् २०५
मंडनमिश्र ४४–५०, ५२, ५९, ६१
मदनवर्मन् २०२
मधुमति (मुहम्मद) १५६, १६१
मधुमती (नदी) ३४
मधुमथनविजय ४१
मनुस्मृति १६, ९२, २०५
मन्दसोर १०३
महमुद (गजनीचा) १५०
महाकवि १४, १६, ५६
महाजन १४३, १४५, १४६
महादेव (यादव) १९३
महानुभाव ७४
महापुरुष (विष्णु) १८५
महाभारत ६३, ८९, ९३
महामात्र (माहुत) ७०
महालक्ष्मी १५१
महावीरचरित ८, ११, १२, १४, १६, २८, ३५, ४४, ५७, ७१
महाशिवगुप्त ८२, ८३
महिष देश ८९
महिषासुरमर्दिनी १५२
महीपाल (पाल) ५१
महीपाल (प्रतीहार) ७१, १५५
महेन्द्रनृपति ७८
महेन्द्रपाल (प्रतीहार) ७१
महेश्वरार्य १६०
महोत्सवपुर २०२
महोदय नगर १५५
माइदेव १९४
माधव ५२
माधवसेन ८०
मान नृपति (शक) ८७–८९, ९२
मानपुर ९५–१०२
मानांक ९६, ९७
मानोर १४२
मान्यखेट ७२
मालतीमाधव ८, १२, १८, १९, २३, २४, २७, २८, ३२, ३५, ६३, ४१, ४६, ४८, ५४, ५७, ६१, ७१, १२७
मालव ९, १४४, १७३-१७८, १८२

मालविकाग्निमित्र ६३, ८०, ८८
माहिषक देश ८९–९०
माहिष्मती ११
मिहिरकुल ९१, १०३, १०५, १०८, ११६, ११७
मीमांसा २२
मुकुंदराज ७५
मुक्तापीड १५, ४२
मुक्ताफल ७४
मुक्ताफलटीका ७४
मुंज १७६
मुम्मुणिराज १६०
मुहम्मद बिन कासीम १५०
मूलस्थान ३७, ३८
मेघदूत ४, ६९, १०३, १०४, १८५
मौर्य ९, ६४, १५०
यज्ञसेन ८०
यदु १९१
यदुवंश १८९, १९१
यवन ७, ९३, ९४
यश ९४
यशःकर्ण १२५, १२६
यशोधर्मन् १०३–१०८
यशोवर्मन् १५, ४०
यादव ७३–७६
युक्तिस्नेहप्रपूरणी टीका ४५, ५३
योग २३
रघुवंश ७
रणधवल १८०
रवळो व्यास ७५
राघव ७३, १८९, १९३
राजतरंगिणी १५, ४२, ५४
राजशेखर (ब्राह्मण) ५, ७१, १००
राजशेखर (जैन) १५
राजार्यी १८९
राज्यवर्धन (मानवायनि) ११२
रामकृष्ण ५३
रामगिरि ६६, ६८, १८४–१८५
रामगिरिस्वामिन् १८४
रामगुप्त २, ३
रामचंद्र (यादव) ७३, १८४
रामदेवराव यादव ७३, ७५, १९३
रामपाल ७५
रामायण ६३, ८९, १९१, १९६, १९७
रावणवध ६९
राष्ट्रकूट, उत्तर ७०, १४३, १५५
राष्ट्रकूट, पूर्व ९५, ९८
राष्ट्रवर्धन ११२
रासमाला १८०, १८१
रिसिपय १६०
रुक्मिणी ६४
रुक्मिणीस्वयंवर ७५
रुद्र १८९, १९२, १९३
रुद्रसेन, द्वितीय ६६, १८४
रेवण १५७
रेवस्वामी १३३

लक्ष्मदेव १७९, १८०
ललितादित्य १५, ४२
लाट ६७, १०१, १४४
लोपामुद्रा ६३
वत्सगुल्म १३, ६६, ६७, ९९
वत्सभट्टि १११
वत्सहरण ७५
वथैय १५७, १५८, १६०
वनवासी ६७
वरदा ६२, ६३
वरदाकट ६२
वरदातट ६२, ६३, ७६
वराहपुराण ३७
वराहमिहिर ११३-११४
वलभी १४
वल्लभराज १५१
वाकाटक १३, १७, ३०, ६५-६९, ९९, १८४
वाकाटक गृहपति ६५
वाक्पतिराज १५, ४१, ४२
वाजपेय १७
वात्स्यदेवार्य १६०
वात्स्यायन ११
वामदेव १२०-१२२, १२५
वामराजदेव १२९
वामन १६
वायिनायक १८९
वायुपुराण ७७, ८९
वासटा ८२
विक्रमसंवत् १०४
विक्रमादित्य ९, ६६
विक्रमादित्य, प्रथम (पूर्व चालुक्य), १३७
विक्रमादित्य (उत्तर चालुक्य) १७७, १८०, १८१
विजयनगर २०७-२०८
विजयसिंह १२५
विन्ध्यसेन ९९
विभुनाग २९
विभुराज ९६
विदर्भ ६२-७६
विदर्भराजा ६२
विदर्भा नदी ६२
विदर्भी कौण्डिन्य ६३
विदिशा ४
विद्धशालभञ्जिका ७१, ७२
विन्ध्यशक्ति ६५
विवर्तवाद २२
विवेकसिन्धु ७५
विष्णुदत्ता ९१
विष्णुवर्धन (चालुक्य) १०२
विष्णुवर्धन (होयसळांचा मांडलिक) १८१
विष्णुवृद्ध गोत्र ६५
विश्वनाथ बाळापूरकर ७५
विश्ववर्मन् ११०, ११७
वीरवर्मन् २०१-२०५
वीरसिंहदेव ३३

वृत्तिकार ५२
वेंगी ७९
वेणा ६२, ६३, ७८
वेणाकट ६२, ७८
वेदान्त २२, ५९
व्रतखंड १९३
शक ९, ९३, ९४
शकवंश ८४–९५
शकसंवत् ९४, १३३, १५१, १७२
शंकरदिग्विजय ४६–४८, ६१
शंकराचार्य ४७
शतपथ ब्राह्मण २२
शबर ९३
शबरस्वामी ५१, ५८
शम्बूक १९५–१९७
शय्यापाल १८९
शरयूपार १२०
शहाबुद्दीन घोरी १२०
शाकंभरी १२०, १२२
शांतरक्षित ४४, ५२, ५३
शार्ङ्गधरपद्धति ४२
शालिवाहन शक ९४, ९५
शास्त्रदीपिका ४५, ५३, ५८
शिलाहार १६१, १६३
शिवनंदी २९
शिवल ९४
शिशुपालवध ७५
शृंगारप्रकाश १००
शैवल पर्वत १९७
श्रीकंठ १७, १८
श्रीकरणाधिप ७४
श्रीदेव ४५, ५३
श्रीधरदास १८
श्रीनिधि १७२
श्रीनिवास १७२
श्रीपुर ७९–८३, १४३–१४७
श्रीशैल १४४
श्लोकवार्त्तिक १८, ४४–४९, ५४, ५६, ५७, ६१
संयान १५६, १५७
संयोगिता १२१
संगीनदास २०९
संग्रामसाहि २०९–२१३
संजान १५१, १५२, १६१, १६२
सदुक्तिकर्णामृत १८
समुद्रगुप्त ३०
सरस्वतीकण्ठाभरण ३१
सर्वसेन ६९
सल्लक्षणवर्मन् २०२
सहस्रजित् १९१
सहियारहार १५६
सह्याद्रिवर्णन ७५
सांख्य २३
सातकर्णि, गौतमीपुत्र ६४, ८५, ८६
सातकर्णि, यज्ञ ८६
सातकर्णि, वासिष्ठीपुत्र ९१
सातकर्णि, स्कन्द ६४
सान्धिविग्रहिक १५८

सांब ३७
साहसिक १२१
सिंहण १८७, १९०, १९२, १९३
सिंहवर्मन् ११०, ११७
सिंघण ७३
सिद्धपैय १६०
सिंद राजे १३७
सिंदूरगिरि १९५
सिंदूरगिरिमाहात्म्य १८६, १९०
सुगतिप १४९–१७०
सुधेश्वर १९०
सुरानंद ७१
सुरेश्वर ४८, ६१
सुवर्णबिन्दु ३४
सूक्तिमुक्तावलि ४२
सूर्यवर्मन् ८३
सेणाणा १३३, १३८
सेतुबंध ६, ६९
सेंद्रक नृपति १३२, १३५–१३८
सैंधव १५०
सोमानन्द ६०
सोमेश्वर (चाहमान) १२१
सोमेश्वर–आहवमल्ल १७६
सोमेश्वर, द्वितीय (उत्तर चालुक्य) १७८
सौराष्ट्र १५०
स्कन्दगुप्त १०७
स्कन्दनाग २९
स्कन्दपुराण ३७
स्थानपोथी १८६
स्याद्वादरत्नाकर ४५, ५३
स्वामिराज ७०
हंयमन १६२, १६३
हम्मीरवर्मन् २०४
हरविलास ७१
हरिनाथ ७५
हरिपाल ७४
हरिराज १२०, १२१
हरिविजय ६, ६९
हरिषेण १०१
हर्षचरित ५९, ८४
हुविष्क ९१
हुशंगशहा २०८
हूण ७, ९१, १०३–१३७
हेमाद्रि १९३
हेलिओडोरस ५, ९१
हैहय १८७, १९०-१९२
होयसळ १७८, १८१
ह्यूएन्त्संग ७८–८३
क्षत्रप ३, ६६, ८४
क्षहरात ८५
क्षेमेंद्र ३, १००
ज्ञाननिधि २१, २२
ज्ञानबोध ७५
ज्ञानेश्वर १९३

संशोधनमुक्तावलि : सर दुसरा
यावरील
कांही अभिप्राय

लोकनायक **डॉ. मा. श्री. अणे**, नागपूर—

म. म. वासुदेवराव ऊर्फ नानासाहेब मिराशी यांनी केलेल्या संशोधनाचा विचार केल्याशिवाय मध्ययुगीन भारताचा सुसंगत इतिहास इतउत्तर कोणासहि लिहितां येणें शक्य नाही, एवढें त्यांच्या लेखांचें महत्त्व आहे.

× × ×

या लेखांचे प्रतिपाद्य विषय जरी गंभीर स्वरूपाचे आहेत तरी नानासाहेबांच्या सुबोध व आकर्षक लेखनशैलीमुळे त्यांचें वाचन कष्टदायक किंवा कंटाळवाणें होत नाही हें मला येथे मुद्दाम नमूद करावेसें वाटतें.

× × ×

सर्व पुरावा व्यवस्थित जमवून व तो नीट पारखून घेऊन केवळ सत्यान्वेषणासाठीच त्याचा उपयोग एका विशिष्ट पद्धतीने संशोधकाला कसा करावा लागतो, याची कल्पना या मुक्तावलींतील लेखांच्या परिशीलनाने वाचकांस बऱ्याच अंशाने येईल.

युगवाणी, नागपूर, एप्रिल १९५७

पद्मभूषण **डॉ. गो. स. सरदेसाई**, कामशेत—

नागपूरचे म. म. मिराशी उच्च कोटीचे अभ्यासक असून त्यांचा पहिला ग्रंथ, प्रस्तुतच्या मालेचा पहिला सर बाहेर आला तेव्हा त्याचें परीक्षण मीच कांही कालपूर्वी प्रसिद्ध केलें होतें. त्याच्याहून वरचढ विवेचन करणारा ऐतिहासिक ग्रंथ हा संशोधनमुक्तावलीचा दुसरा सर नवीन मार्गदर्शन करणारा आहे. त्यांतील एकंदर चर्चा इतकी मार्मिक बनली आहे की तिचा परिपूर्ण अभ्यास केल्याशिवाय कोणाहि इतिहाससंशोधकास पुढे

पाऊल टाकणें शक्य नाही. पुस्तक वाचतांना मी त्यांतील विषयांत इतका गढून गेलों की माझ्याच वाचनांतलें अनेक मिथ्यालाप निरसन पावले.

× × ×

भारताच्या इतिहासाभ्यासकांना हें सर्वच पुस्तक हाताशीं बाळगलें पाहिजे अशी त्याची योग्यता आहे.

सकाळ, पुणें, ता. १२-५-५७

तर्कतीर्थ **लक्ष्मणशास्त्री जोशी**, वाई—

महामहोपाध्याय मिराशी यांनी वाङ्मय व इतिहास या क्षेत्रांत मौलिक संशोधन केलें आहे. त्या संशोधनाचें स्वरूप मराठी वाचकांस संशोधनमुक्तावलीच्या दोन सरांनी उत्तम रीतीने समजून येतें. भारतीय पुरातत्त्ववेत्त्यांमध्ये मिराशी यांचें स्थान अत्यंत उंच आहे. याचें उत्कृष्ट गमक म्हणजे संशीधनमुक्तावलीचे दोन सर होत.

× × ×

प्राचीन महाराष्ट्राचें भव्य असें सुसंगत चित्र दाखविण्याचा मोठा अधिकार मिराशींच्या ठिकाणीं कसा आहे हें या लेखांवरून सिद्ध होतें.

नवभारत, मुंबई, सप्टेंबर, १९५७

डॉ. के. ना. वाटवे, पुणें—

म. म. मिराशी यांचीं मतें विशिष्ट अभिनिवेशांतून किंवा पूर्वग्रहांतून निघालेलीं नसतात. तीं प्रमाणावलंबी असतात. म्हणूनच त्यांचें संशोधन वस्तुनिष्ठ आहे असें म्हणावयाचें. संशोधनांत वस्तुसत्य ही महत्त्वाची बाब असून व्यक्तीचा मताभिनिवेश ही बाब गौण आहे. परीक्षणांत मिराशी यांचा ओढा वस्तुसत्याकडे असतो; व आपल्या प्रतिपक्षालाहि न्याय व सौजन्य देण्याची ते खबरदारी बाळगतात.

या सरांतील बहुतेक सर्व संशोधनविषय सामान्य वाचकांच्या ज्ञानकक्षेबाहेरचे, म्हणून कठीण, जटिल व अपरिचित असले तरी मिराशी यांनी ते फार सुलभ पद्धतीने व प्रसन्न मराठी भाषेंत मांडले आहेत. त्यामुळे

सामान्य मराठी वाचकालाहि हे संशोधनपर लेख वाचण्यांत गोडी वाटेल. या दृष्टीनें पाहिलें तर निवडक तज्ज्ञ अभ्यासूंच्या गुंफेंतून संशोधनाला म. म. मिराशी यांनी सामान्य वाचकाच्या दारापर्यंत आणून पोहोंचविलें आहे.

तरुण भारत, पुणें, ८ सप्टेंबर १९५७

डॉ. म. गो. माईणकर, पुणें—

प्राचीन भारताच्या इतिहासविषयक साधनांचा खोल अभ्यास करून भारतीय इतिहासांत मोलाची भर घालणाऱ्या विद्वानांत म. म. नानासाहेब मिराशी यांचें स्थान फारच वरचें आहे.

× × ×

भारतीय इतिहासाचीं साधनें एकंदरीने अल्प. त्यांतून प्राचीन भारतीयांच्या ठिकाणीं खऱ्या ऐतिहासिक दृष्टीचा अभाव असल्याने त्यांनी केलेले जे कांही उल्लेख मिळतात त्यांच्या भोवती अविश्वसनीयतेचें धुकें दाट. अशा परिस्थितींत शिलालेख, ताम्रपट, नाणीं, वाङ्मय यांच्यामध्ये तर्कशुद्ध अशी संगति लावून सुसंगत इतिहास जुळविणें म्हणजे पांडित्याचें, परिश्रमाचें व प्रतिभेचें काम आहे. याला वस्तुनिष्ठ संशोधनाची दृष्टि हवी, जबर व्यासंग हवा व निष्कर्षाबाबत अनाग्रही वृत्ति हवी. या सर्व गुणांचा प्रत्यय या लेखांत येईल.

महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जुलै-सप्टेंबर १९५७

डॉ. व. ग. राहूरकर, पुणें—

प्राच्यविद्या हा भारतीय संशोधनक्षेत्रांतील एक अत्यंत मोलाचा आणि महत्त्वाचा विषय आहे. प्राच्यविद्येचें संशोधन जसजसें अधिक होईल तसतशा भारतीय इतिहासांतील त्रुटि भरून काढल्या जातील व तो अधिक सुसंगतपणें लिहिणें शक्य होईल. या दृष्टीने म. म. मिराशी यांचें संशोधनकार्य अत्यंत भरीव झालें आहे यांत शंका नाही.

केसरी, पुणें, ता. ५ जानेवारी १९५८

महामहोपाध्याय प्रा. वा. वि. मिराशी यांचीं
इतर संशोधनपर पुस्तकें

इंग्रजी

1. **Inscriptions of the Kalachuri-Chedi Era** (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. IV) (Published by the Archaeological Department, Government of India) Rs. 125/-
2. **Inscriptions of the Vakatakas** (Corpus Inscriptionum Indicarum, Vol. VI) (in the press).

मराठी

३. **कालिदास** (द्वितीयावृत्ति) (प्रकाशक-व्हीनस प्रकाशन, पुणें), रु. ६
४. **कलचुरि नृपति आणि त्यांचा काल** (प्रकाशक–मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद, नागपूर), रु. २
५. **वाकाटक नृपति आणि त्यांचा काल** (महादेव हरि वाठोडकर व्याख्यानमाला, पुष्प ५) (प्रकाशक, नागपूर विश्वविद्यालय, नागपूर), रु. ५
६. **संशोधनमुक्तावलि, सर पहिला** (प्रकाशक, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर), रु. ४.
७. **संशोधनमुक्तावलि, सर दुसरा** (प्रकाशक, विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर), रु. ४.

हिन्दी

८. **कालिदास** (द्वितीयावृत्ति) (प्रकाशक, हिंदी ग्रंथरत्नाकर, हीराबाग, मुंबई ४), रु. ४.

विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर

स्वीय व पुरस्कृत ग्रंथ

१ **नागपूरकर भोसल्यांची बखर**
विदर्भांतील नामवंत इतिहासकार **कै. यादव माधव काळे** यांनी संपादिलेली द्वितीयावृत्ति, **किंमत अडीच रुपये.**

२ **दृष्टांतपाठ**—(यादवकालीन मराठी गद्य प्रबंध)
लेखक–**कै. नी. ब. भवाळकर** आणि **कै. ह. ना. नेने** (शिल्लक नाही).

३ **निवडक निबंध, खंड १**
कै. म. म. कृष्णशास्त्री घुले, कै. नी. ब. भवाळकर, कै. डॉ. दप्तरी, म. म. मिराशी, कै. प्रा. नेने, डॉ. य. खु. देशपांडे, श्री. दे. गो. लांडगे, यांचे विविध विषयांवरील संशोधनपर लेख. **किंमत दोन रुपये.**

४ **नागपूरचा सांस्कृतिक इतिहास** लेखक—**श्री. दे. गो. लांडगे.**
भोसल्यांच्या राज्यस्थापनेपासून सुमारें दीडशें वर्षांचा नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासाचा सर्वांगीण परामर्श. **किंमत दोन रुपये.**

५ **संशोधनमुक्तावलि : सर पहिला** **म. म. वा. वि. मिराशी**
यांच्या सोळा संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये.**

६ **मध्यप्रदेशांतील संशोधनकार्य** (सन १९३४ ते १९५५)
जुन्या मध्यप्रदेशांतील संशोधकांनी वीस वर्षांत विविध विषयांत केलेल्या संशोधनाचा आढावा. **किंमत सव्वा रुपया.**

७ **संशोधनमुक्तावलि : सर दुसरा** **म. म. वा. वि. मिराशी**
यांच्या वीस संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये.**

८ **औपनिषदिक जीवनसौख्य** **कै. डॉ. के. ल. दप्तरी**
यांनी वस्तुनिष्ठ आणि बुद्धिप्रत्ययक पद्धतीने लिहिलेला उपनिषदांचा उपसंहार. **किंमत चार रुपये.**

९ **संशोधनलेखसंग्रह : भाग पहिला** **कै. हरि नारायण नेने**
यांनी लिहिलेल्या संशोधनपर लेखांचा संग्रह. **किंमत चार रुपये.**

प्राप्तिस्थान--१ चिटणीस, **विदर्भ संशोधन मंडळ,**
विदर्भ साहित्य मंदिर, सीताबर्डी, नागपूर १.
२. **डेनेट आणि कंपनी,** सीताबर्डी, नागपूर १.